वाद-विवेचन-माल

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ७७२८

पुष्प




# लोकशाही

आचार्य शं. द. जावडेकर

REFBK-0005991

किंमत १ रुपया

९८२०

वाद-विवेचन-माला : : पुष्प ५ वें

# लो क शा ही

लेखक

आचार्य शं. द. जावडेकर


म. हिं ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क. ५२६१
लेखक शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0005991



प्रथमावृत्ति १।५।४०

किंमत १ रुपया

प्रकाशक :
यशवंत गोपाळ जोशी,
६२३।१५, सदाशिव पेठ, पुणें २.

[ सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन ]

संपादक
श्री. पां. वा. गाडगीळ

मुद्रक :
लक्ष्मण सखाराम केळकर,
जनार्दन सदाशिव लि. चा प्रेस,
३९४ सदाशिव पेठ, पुणें नं. २.

# अनुक्रमणिका


१. लोकशाही म्हणजे काय ? ... ... १

२. आधुनिक लोकशाही ... ... २६
(उद्भव आणि प्रसार)

३. अनियंत्रित सत्ता विरुद्ध लोकशाही ... ... ५१

४. व्यक्तिवाद, राष्ट्रवाद आणि समाजवाद ... ७५

५. लोकशाही राज्ययंत्र ... ... ... १०२
(घटना व कार्यपद्धति)

६. लोकशाही संस्कृति ... ... ... १३६

७. लोकराज्य आणि आत्मराज्य ... ... १५०

## मालेचीं पुढील पुष्पें

# १ राष्ट्रवाद

लेखक—कॉ. एस्. एम्. जोशी

# २ ईश्वरवाद

लेखक—आचार्य सोनोपंत दांडेकर

हीं पुस्तकें अनुक्रमें १५ जुलै १९४०

व

१ ऑगस्ट १९४० रोजीं प्रसिद्ध होतील

प्रकाशक—यशवंत गोपाळ जोशी,

६२३।१५, सदाशिव, पुणें २.

# लोकशाही

## लोकशाही म्हणजे काय ? : : १

लोकशाही ही एक विशिष्ट प्रकारची राज्यपद्धति आहे. पण येवढें म्हटल्यानें लोकशाहीचें खरें रहस्य व्यक्त होत नाहीं. या राज्य-पद्धतीचा जे स्वीकार किंवा पुरस्कार करितात त्यांच्यापुढें विशिष्ट सामाजिक ध्येय असतें आणि या सामाजिक ध्येयांच्या प्राप्तीचें साधन म्हणून ते या राज्यपद्धतीचा पुरस्कार करीत असतात. या लोकशाही सामाजिक ध्येयाच्या पुरस्कारांत मानवसंस्कृतीसंबंधीं विशिष्ट भावना आणि कल्पना अंतर्भूत झालेल्या असतात आणि म्हणून लोकशाही हा एक मानव संस्कृतीचा आदर्श गणला जातो. या सांस्कृतिक आदर्शांत अर्थातच विशिष्ट नैतिक तत्त्वें व सामाजिक मूल्यें अंतर्भूत झालेलीं आहेत आणि मनुष्य-स्वभावाच्या वास्तविक आणि आदर्शभूत स्वरूपासंबंधींहि कांहीं सिद्धान्त लोकशाहीच्या ध्येयांशीं निगडित झालेले आहेत.

### लोकशाही राज्ययंत्रांचें सामान्य स्वरूप

लोकशाही राज्यपद्धति एक असली तरी तिचीं राज्ययंत्रें निर-निराळ्या प्रकारचीं आढळून येतात. तथापि त्या सर्वांना सामान्य अशीं कांहीं लक्षणें सांगतां येतील. यांचा विशेष तपशीलवार विचार पुढें एका स्वतंत्र प्रकरणांत करण्यांत येईल. येथें त्यांचें संक्षिप्त सामान्य

स्वरूप सांगितलें असतां काम होईल. लोकशाही राज्यांतील सर्व प्रौढ स्त्रीपुरुष राष्ट्रिकांना ( Citizen ) मताधिकार असावा. या मतदारांनीं निवडलेल्या प्रतिनिधिसभेला राज्यकारभारावर देखरेख ठेवणें, कायदे करणें, कर बसविणें, आयव्यय मंजूर करणें इत्यादि हक्क असावेत. राज्यांतील कारभाराबद्दल जबाबदार असणारें मंत्रिमंडळ या प्रतिनिधि सभेला जबाबदार असावें किंवा मतदारांनीं स्वतंत्रपणें निवडलेल्या राष्ट्राध्यक्षाला जबाबदार असावें, म्हणजे राज्यकारभार खात्यांवरहि अंतिम सत्ता लोकांनीं निवडलेल्या प्रतिनिधींची अथवा लोकनियुक्त राष्ट्राध्यक्षाची असावी. राज्यांतील सर्व कारभार लोकांच्या प्रतिनिधींनीं केलेल्या कायद्यानुसार, त्यांच्या संमतीनें आणि त्यांच्या नियंत्रणा-खालीं चालावा. या कायद्यांविरुद्ध कोणींहि वर्तन केलें तर त्यास स्वतंत्र न्यायासनांपुढें उघड चौकशी होऊन शासन व्हावें. कोणाच्या-हि जीवितास, वित्तास, अब्रूस, अथवा हालचालीस कायद्यांनीं घातलेल्या मर्यादांव्यतिरिक्त आणि न्यायासनांनीं दिलेल्या निर्णयांव्यतिरिक्त धक्का बसूं नये. न्यायासनांतील अधिकाऱ्यांवर राज्यकारभार करणाऱ्या अधिकाऱ्यांची हुकमत चालूं नये म्हणजे न्यायदानांत अधिकारी वर्गाला ढवळाढवळ करतां येऊं नये. अंतिम राजकीय प्रभुत्व लोकां-कडे असावें आणि लोकांना आपल्या मतानुसार राज्यकारभार नियंत्रित व नियमित करतां यावा. राज्यकर्ते हे प्रजेचे स्वामी नसून ते तिचे सेवक—कायदेशीर सेवक—बनावेत आणि प्रजा हीच राज्याची प्रभु बनावी. अशा प्रकारें लोकशाही राज्ययंत्राचें सामान्य स्थूल वर्णन करतां येईल.

## लोकशाही आणि स्वराज्य

लोकशाही राज्यपद्धतीला आधारभूत अशीं जीं सामाजिक ध्येयें किंवा तत्त्वें आहेत त्यांत स्वातंत्र्याला अग्रस्थान आहे. स्वतंत्रता,

समता आणि बंधुता हीं तत्त्वत्रयी लोकशाहीचीं ध्येयें व्यक्त करणारी मानण्यांत येते. यांपैकीं समता आणि बंधुता यांहून स्वतंत्रता या तत्त्वास लोकशाहीचें खास वैशिष्ट्य मानण्यास हरकत नाहीं. अर्थात् समता व बंधुता यांच्या अभावीं स्वतंत्रताहि टिकूं शकत नाहीं हें खरें असलें तरी समता व बंधुता असून स्वतंत्रता नसेल, तर लोकशाही आहे असें म्हणतां येणार नाहीं. समता व बंधुता यांची स्वतंत्रतेला कशी आवश्यकता आहे तें पुढें विशद करण्यांत येईल.

लोकशाही राज्यांतील सामान्य राष्ट्रिक प्रभु आणि प्रजा या दोन्ही नात्यांनीं वावरत असतात आणि म्हणून लोकशाही राज्य हेंच खरें स्वराज्य असेंहि कांहीं लोक म्हणतात. ‘ स्वराज्याची तहान सुराज्यानें भागणार नाहीं ’ असे म्हणतांनाहि आमचा स्वराज्य शब्दाचा अर्थ लोकशाही राज्य किंवा प्रजातंत्र राज्य असा असतो असें लो. टिळकांनीं लिहिलें आहे. ‘ स्वराज्य आणि सुराज्य ’ या आपल्या लेखांत ते लिहितातः “ सर्वत्र जी चळवळ चालू आहे ती प्रजेचा पगडा राज्यकारभारावर असावा एवढ्याकरतांच होय, आणि त्याप्रमाणें ठिकठिकाणच्या लोकांस थोडेंबहुत यशहि येत चाललें आहे. आम्हांसहि तीच गोष्ट प्राप्त करून घ्यावयाची आहे व स्वराज्य-प्राप्तीसाठीं झटा म्हणून जेव्हां आम्ही लोकांस सांगतो तेव्हां याच अर्थानें ‘ स्वराज्य ’ शब्दाचा उपयोग करतों. ‘ स्व ’ म्हणजे ज्याचा तो, किंवा लोक अथवा एकंदर प्रजा; आणि त्यांचें म्हणजे त्यांच्या सल्ल्यानें चालणारें जें राज्य तें स्वराज्य. ” याच लेखांत ते या स्वराज्यासंबंधीं लिहितातः “ अशा प्रकारच्यां स्वराज्याकरितां केवळ खालसा मुलखांतच खटपट झाली पाहिजे इतकेंच नव्हे, तर नेटिव संस्थानांतूनहि ही चळवळ होणें जरूर आहे. ” “ इतकेंच नव्हे तर ‘ प्रजासत्ताक राज्याखेरीज खरें स्वराज्यच नाहीं ’ असें म्हणण्यापर्यंत

लोकांची मजल येऊन ठेपेल; आणि याखेरीज दुसरें राज्य सुराज्य होणें शक्य नाहीं असेंहि लोकांस वाटूं लागेल. स्वराज्य आणि सुराज्य यांची ही अंतिम एकवाक्यता होय. " या विचारांनुसार आज जर्मनी, इटाली या देशांत स्वराज्य आहे असें मानतां येणार नाहीं. कारण, तेथें लोकशाही राज्यपद्धति नाहींत. पण टिळकांचें वरील लिखाण १९०७ सालचें आहे. यावेळीं लोकशाहीचें ध्येय सर्वत्र अस्तित्वांत नव्हतें, पण तें सर्वत्र मान्यता पावलेलें होतें. आज ना उद्यां सर्व राज्यें लोकसत्ताक बनलीं पाहिजेत, हाच त्यांचा स्वाभाविक विकास अथवा हेंच त्यांचें आदर्श स्वरूप असें राजकीय तत्त्वज्ञ मानीत असत. आज लोकशाही राज्यपद्धतीला इतकी सर्वमान्यता उरलेली नाहीं. ' फॅसिझम् ' ' नाझीझम् ' यांनीं लोकशाही ध्येयाचा उघडपणें त्यागच केला आहे आणि ' कम्यूनिझम् ' च्या मतानें भांडवलशाही राष्ट्रांतील लोकशाही ही केवळ एक माया असून ती नष्ट केल्याखेरीज लोकांना खरें स्वातंत्र्य मिळणार नाहीं, ही माया नष्ट करण्यास कांहीं काळ ' अनियंत्रित कामगारशाही ' ( Dictatorship of the proletariet ) स्थापन केली पाहिजे. त्यानंतर कदाचित् समाजसत्ताक लोकशाही अस्तित्वांत येईल किंवा राज्यसंस्थाच विलय पावेल ! तात्पर्य टिळकांनीं स्वराज्य म्हणजे प्रजातंत्र राज्य आणि प्रजातंत्र राज्याखेरीज कोणतेंहि स्वराज्य किंवा सुराज्य होऊं शकत नाहीं असें जें लिहिलें आहे त्यांतील दृष्टिकोण मूलतःच सदोष आहे असें म्हणणारे फॅसिस्ट व कम्यूनिस्ट लोक इतर देशांत निघाले असून आपल्या देशांतहि त्यांचे अनुयायी पसरले आहेत.

या दोन लोकशाही-विरोधी मतप्रणालींहून भिन्न असा एक सत्याग्रही संप्रदाय हिंदुस्थानांत निघाला असून तो फॅसिझम्च्या सापेक्षतेनें इंग्लंड-अमेरिका-फ्रान्स या देशांतील लोकशाहीचें ध्येय श्रेष्ठ आहे हें

मान्य करीत असला तरी अद्यापि खरी लोकशाही जगांत कोठेंच अवतीर्ण झाली नाहीं असें म्हणतो. राजकारणांत अहिंसावादाचा अधिक प्रवेश झाल्याविना लोकशाही टिकूं शकत नाहीं असें या सत्याग्रही संप्रदायाचें म्हणणें असून ' स्वराज्य म्हणजे प्रजातंत्र राज्य ' या टिळकांच्या सूत्राच्या फार पुढें गेलेलें असें त्याचें अंतिम ध्येय आहे. ' स्व ' म्हणजे आत्मा आणि स्वराज्य म्हणजे ' आत्मराज्य ' असा अर्थ तो करतो. हें आत्मराज्य स्थापन झालें म्हणजे समाजाला दंडहीन-अराज्य अवस्था—प्राप्त होईल असें त्याचें मत आहे. युरोपांतहि अराज्य-वादी संप्रदाय निघाले असून कम्यूनिस्टांचेंहि अंतिम ध्येय अराज्यवाद आहे. पण सत्याग्रहाची सृष्टि आध्यात्मिक असून त्यांच्या ध्येयास ' अराज्यवाद ' म्हणण्यापेक्षां ' आत्मराज्यवाद ' किंवा ' आत्मसत्ता-वाद ' असें म्हणणें आम्हांस अधिक युक्त वाटतें. याच ' आत्म-राज्या ' स म. गांधी ' रामराज्य ' असेंहि म्हणतात. पण तेथें राम याचा अर्थहि अंतरात्मा असाच असतो. तात्पर्य युरोपाप्रमाणें हिंदु-स्थानांतहि लोकशाहीच्या राजकीय ध्येयाच्यापुढें जाणारा व युरोपीय लोकशाही अपुरी आणि विकृत मानणारा स्वतंत्र सत्याग्रही मतसंप्रदाय निर्माण झाला आहे. तथापि लोकशाहीचें ध्येय आपणांस मान्य नाहीं असें मात्र त्याचें मत नाहीं; भांडवलप्रधान राष्ट्रांतील लोकशाही ही खरी लोकशाही नाहीं एवढेंच त्याचें मत आहे. तसेंच लोकशाहीचें अंतिम पर्यवसान ' आत्मराज्यांत ' झालें पाहिजे व तेंच खरें ' स्व ' राज्य होय, असें त्याचें अंतिम राजकीय तत्त्वज्ञान आहे.

## लोकशाही आणि लोकस्वातंत्र्य

अशा प्रकारें कोणी लोकशाहीच्या पुढें जाणारे तर कोणी लोक-शाहीला विरोध करणारे असे राजकीय विचारसंप्रदाय आज जगांत

निर्माण झाले आहेत. तथापि लोकशाही राज्यपद्धतींत प्रत्येक राष्ट्रिकांस ' हें आपलें राज्य आहे ' असें वाटत असतें किंवा वाटत असलें पाहिजे याबद्दल मतभेद नाहीं. हा एक केवळ भ्रम आहे असें मानलें तरी तो भ्रम या दृष्टीनें खराच असून त्याचे बरेवाईट परिणाम झाल्याविना राहत नाहींत. आपल्या राज्यांतील कायदे पाळणारे, कर देणारे, आपलें कर्तव्य चुकलें असतां शिक्षा भोगणारे, आपल्या राज्यासंबंधीचें कर्तव्य पार पाडण्यासाठीं क्लेश भोगणारे किंवा प्रसंगीं प्राणत्यागहि करणारे आपण आहों ही जाणीव सर्वच राज्यपद्धतींखालीं नांदणाऱ्या राष्ट्रिकांत असते. पण आपल्या राज्यकारभाराचे नियंते आणि विधाते आम्ही आहों, आम्ही त्याचें धोरण ठरवूं शकतों आणि पात्रता असल्यास राज्यकारभार आपल्या हातीं घेऊन तो वाटेल तसा चालवूं शकतों अथवा सुधारूं शकतों ही जाणीव लोकशाही राज्यांतील राष्ट्रिकांत विशेष असते. हेंच लोकशाहींतील राष्ट्रिक-स्वातंत्र्य होय.

या लोकशाही राष्ट्रिक-स्वातंत्र्यांत अनेक हक्कांचा अंतर्भाव होत असला तरी ' मतस्वातंत्र्य ' आणि ' प्रचारस्वातंत्र्य ' हे दोन हक्क लोकशाहीला आधारभूत किंवा तिचे प्राणभूत असे गणले पाहिजेत. लोकशाही राज्य हे लोकमतानुसार चालावयाचें असल्यानें लोकांना आपलीं मतें स्वतंत्रतेनें बनवितां आलीं पाहिजेत हें उघड आहे. आपलीं मतें बनविण्याचें व तीं प्रसृत करण्याचें स्वातंत्र्य लोकांना नसून राज्यकर्ते लोकमतावर नियंत्रण चालवूं लागले, आपणांस अप्रिय अशीं मतें दडपून टाकून आपणांस प्रिय असणाऱ्या मतांनाच प्रचार करण्याचें स्वातंत्र्य उपभोगूं देऊं लागले म्हणजे त्या राज्यांत लोकमतानुसार कारभार चालू आहे असें म्हणण्याऐवजीं राज्यकारभारानुसार लोकमत बनत आहे असें म्हणावें लागतें. या प्रकारास लोकशाही म्हणतां येणार नाहीं; मग तेथें निवडणुकी असोत किंवा नसोत, लोकांचे

मत अजमावण्यांत येवों किंवा न येवों. तात्पर्य मतस्वातंत्र्य आणि प्रचार-स्वातंत्र्य हा लोकशाहीचा आधार आहे.

मतस्वातंत्र्यांत राज्यकारभारावर टीका करणें, राज्यकर्त्यांच्या धोरणांवर टीका करणें, तें धोरण बदलून घेण्याचा प्रयत्न करणें, एका पक्षाच्या हातांतील राज्यकारभार काढून तो दुसऱ्या धोरणाच्या दुसऱ्या पक्षाच्या हातीं देण्यासाठीं प्रयत्न करणें या सर्व गोष्टींचा समावेश होतो. यासाठीं राज्यकारभार करण्याची अंतिम सत्ता ज्यांच्या हातीं असते ते मंत्रि आणि कायदे करणाऱ्या प्रतिनिधिसभेचे सभासद यांना विशिष्ट मुदतीनंतर पुनः निवडून देण्याची व्यवस्था लोकशाही राज्यांत केलेली असते. आज ज्यांच्या हातीं राज्यसत्ता असेल त्यांना विशिष्ट मुदतीनंतर पुनः लोकांकडून निवडून यावें लागणार असल्यामुळें आपण लोकांना जबाबदार आहोंत आणि लोक आपले स्वामी आहेत ही जाणीव राज्यकर्त्यांच्या अंतःकरणांत राहते; तसेंच प्रजाजनांतहि आपल्या प्रभुत्वाची जाणीव राहते. अशा रीतीनें होणारा राज्यकारभार आपणच करीत आहों व तो बरा वाईट झाला तर त्याचीहि अंतिम जबाबदारी आपणांवरच आहे या जाणीवेलाच स्वराज्याची जाणीव असें म्हणतात. या स्वातंत्र्याला विशेष महत्त्व आहे आणि या स्वातंत्र्याच्या अभावीं एखादा राज्यकारभार अधिक सुखावह असला तरीहि त्याला इतकें महत्त्व नाहीं. हाच अर्थ ‘ स्वराज्याची तहान सुराज्यानें भागत नाहीं ’ या सूत्रानें व्यक्त करण्यांत येत असतो. राजकीय बंधनें पाळणें त्रासदायक वाटलें तरी तीं आपणच निर्माण केलेलीं आहेत, तीं आपल्याच हितासाठीं आहेत आणि त्यांत योग्य त्या सुधारणा घडवून आणण्याचें स्वातंत्र्य आपणांस आहे या जाणीवेमुळें हीं राजकीय बंधनें त्रासदायक वाटूं नयेत आणि तीं पाळणे हेच आपले कर्तव्य आहे असें सर्वांना वाटावें, हा या राज्यपद्धतीचा एक महत्त्वाचा उद्देश आहे. हा केवळ

एक भ्रम असेल आणि अनेक परिस्थितींत तो केवळ भ्रमच असतो असें दिसून आलें आहे तर लोकशाही ही एक ' माया ' आहे हा आक्षेप खरा ठरतो. पण या आक्षेपामुळें लोकशाहीचा उद्देश अनिष्ट ठरत नाहीं तर तो उद्देश साध्य करण्याचें साधन बरोबर नाहीं किंवा अद्यापि उपलब्ध झालें नाहीं, एवढेंच त्यामुळें सिद्ध होतें. तात्पर्य लोकशाही राज्यकारभार लोकांना आपलासा वाटतो, त्याच्या गुणदोषांकडे ते आपुलकीच्या भावनेनें पाहतात, त्यामुळें त्यांच्यांत जबाबदारी व प्रभुत्वाची भावना जागृत राहते आणि या जाणीवेमुळें त्यांची समाजभावना जागृत होऊन एकप्रकारची आत्मोन्नति होते, हें खरें असेल तर इतर सर्व राज्यपद्धतींहून तिचें श्रेष्ठत्व सिद्ध होईल हें उघड आहे. कोणत्याहि राज्यांतील लोकशाही खरी आहे किंवा नाहीं हें ठरवितांना तेथील राज्ययंत्र या कसोटीवरच तपासून पाहिलें पाहिजे.

## लोकांचा राज्यकारभार म्हणजे काय ?

लोकशाही म्हणजे लोकांनीं स्वतः चालविलेला राज्यकारभार असें कित्येक वेळां म्हणतात. पण असें म्हणण्यानें एक गैरसमज होण्याचा संभव असतो त्याचें निराकरण येथें केलें पाहिजे. एका प्रसिद्ध मराठी लेखकांनीं ' स्वराज्य म्हणजे स्वयंपाक '—स्वतः बनविलेलें अन्न—असा दृष्टान्त देऊन लोकशाहीचें समर्थन केलें आहे. पण हा दृष्टान्त योग्य नाहीं. स्वतः शिजविलेलें अन्न हें नेहमींच चांगलें असतें असें नाहीं किंवा जो अन्न शिजविण्यांत तज्ज्ञ असेल त्याच्याकडून अन्न शिजवून घेण्यापेक्षां आपणच अन्न शिजवावें ही इच्छाही नेहमीं स्तुत्य असते असें म्हणतां येणार नाहीं. लोकशाहीची इच्छा म्हणजे स्वतः राज्यकारभार करण्याची इच्छा नसून राज्यकारभार कसा चालावा, तो कोणाच्या हातीं असावा आणि त्याचें धोरण कसें असावें हें ठर-

विण्याची इच्छा असें म्हणणें अधिक योग्य आहे. लोकशाही राज्यांतील सर्व राष्ट्रिक स्वतः राज्यकारभार करीत नसतात तर जे राज्यकारभार करीत असतात त्यांचे ते स्वामी होऊं इच्छितात. त्यांना काढण्याची व नेमण्याची सत्ता उपभोगूं इच्छितात. याला स्वयंपाकाचा दृष्टान्त द्यावयाचा तर स्वयंपाक करण्याचा हक्क नव्हे, तर स्वयंपाकी नेमण्याचा व काढण्याचा हक्क आपणांस असावा अशी इच्छा असणें हें लोकशाहीची इच्छा धरण्यासारखें आहे असें म्हणतां येईल. अन्न चांगलें झालें आहे किंवा नाहीं, याचा निर्णय तें खाणारांनीं केला पाहिजे. स्वयंपाकांत कोणकोणते पदार्थ करावेत आणि त्यांना खर्च किती करावा याचा निर्णय मालकानें करावा आणि त्याच्या इच्छेप्रमाणें स्वयंपाक करणाऱ्यानें पाकसिद्धि करावी असा हा व्यवहार आहे.

या व्यवहारांत तज्ज्ञांवर अतज्ज्ञांचे नियंत्रण चालावें असें म्हटल्यासारखा विरोधाभास आढळतो. पण हा विरोधाभास आपल्या अनेक व्यवहारांत आढळतो. तज्ज्ञांचें साहाय्य घेतल्याखेरीज आज कोणाचेंहि चालत नाहीं. पण अनेक तज्ज्ञांपैकीं कोणत्या तज्ज्ञांकडून आपलें कार्य करून घ्यावें याचा निर्णय त्या विषयांतील अतज्ज्ञच करीत असतात. इंजिनीयर आजारी पडला तर डॉक्टरचें औषध घेतो, डॉक्टरला खटला चालवावयाचा असला तर तो वकीलाकडे जातो, वकीलाला शेत करावयाचें असलें तर शेतकऱ्यांकडे तें तो देतो आणि शेतकरी माल विकण्यासाठीं व्यापाऱ्याकडे जातो. याचें कारण इंजीनीयरला औषध देतां येत नाहीं, डॉक्टरला खटला चालवितां येत नाहीं, वकीलाला शेत करतां येत नाहीं आणि शेतकऱ्याला व्यापार करतां येत नाहीं हेंच होय. पण आपला डॉक्टर आपण ठरवावा, आपला वकील आपण निवडावा, आपला शेतकरी आपण नेमावा आणि आपला व्यापारी आपण शोधून काढावा हा व्यवहार सर्वांना इष्ट वाटतो. याचें कारण

आपलें काम तज्ज्ञांकडून करवून घ्यावें अशी जशी सर्वांची इच्छा असते त्याचप्रमाणें तें काम आपल्या मनाप्रमाणें व्हावें आणि त्या तज्ज्ञानें आपला गळा कापूं नये अशीहि सर्वांची इच्छा असते. तज्ज्ञ हा शहाणा असतो पण तो सद्बुद्धीचाच असतो असें नाहीं आणि आपलें सुख किंवा समाधान कशांत आहे हें त्याला समजतें असेंहि नाहीं. म्हणून तज्ज्ञाला आपला प्रभु न बनवितां त्याला आपला सेवक बनवावा अशी सर्वांची इच्छा असते. ही इच्छा लोकशाहीच्या बुडाशीं आहे. यांत तज्ज्ञाचें काम स्वतः करण्याची इच्छा नाहीं पण तज्ज्ञावर आपलें प्रभुत्व गाजविण्याची इच्छा आहे. या कार्यास सामान्य जनतेचें अतज्ज्ञत्व आड येण्याचें कारण नाहीं. कारण तिच्या अंगीं तज्ज्ञत्वाची पात्रता येण्याची अपेक्षा येथें केलेली नाहीं. फक्त अनेक तज्ज्ञांपैकीं कोणांवर विश्वास ठेवावा आणि कोणांकडून आपलें काम करवून घ्यावें हें सामान्य व्यवहारज्ञान जनतेच्या अंगीं अपेक्षित आहे. यांतहि जनतेची फसगत होऊं शकते व ती होऊं नये यासंबंधीं दक्षता घ्यावी लागते; पण या व्यवहारांत तज्ज्ञाचें काम करण्याची अतज्ज्ञांनीं आकांक्षा धरण्यासारखा हास्यास्पद प्रकार नाहीं अथवा स्वतःचीं सर्व कामें स्वतःच करण्याची अव्यवहार्यता किंवा अशक्यताहि नाहीं. सामान्य प्रजाजनांस हें स्वातंत्र्य नसेल तर अनियंत्रित सत्ताधारी तज्ज्ञ त्यांचें हित करतील असा इतिहासाचा दाखला नाहीं. तेव्हां प्रजाजनांतील सर्वांचें हितरक्षण करण्याच्या दृष्टीनेंहि लोकशाही राज्य असावें असें सर्वांस वाटतें.

## लोकशाही आणि सामाजिक समता

स्वतंत्रतेप्रमाणेंच सामाजिक समता हेंहि लोकशाहीचें साध्य आहे. सामाजिक समता या शब्दाचा अर्थ खुजे आणि उंच, मूर्ख आणि

शहाणे, चोर आणि साव यांसारखे भेद लोकशाही राज्यांत करीत नाहींत असा नाहीं. निरनिराळ्या व्यक्तींच्या अंगीं निरनिराळे गुणदोष असतात, प्रत्येकाचें कर्तृत्व कमीअधिक असतें, प्रत्येकाला सर्वच कार्यें साधत नाहींत आणि ज्यांना जीं साधतात त्यांपैकीं सर्वांना तीं सारखींच साधत नाहींत हा सर्व भेदाभेद लक्षांत घेऊनच लोकशाही समाजांतील व्यवहार चालावे लागतात व चालतात. पण या भेदांमुळें आनुवंशिक जातिभेद किंवा आर्थिक वर्गभेद यांचें समर्थन होऊं शकत नाहीं. प्रत्येक व्यक्तीला आपापल्या गुणांचा पूर्ण उत्कर्ष होण्यास योग्य संधि मिळावी आणि प्रत्येकास आपल्या प्रयत्नांनीं वाटेल तें स्थान प्राप्त करून घेतां यावें. विशिष्ट कुलांत, जातींत, धर्मांत किंवा वर्गांत जन्मल्यामुळें आपल्या गुणांच्या विकासास अवसर मिळत नाहीं अथवा आपल्या गुणांचें चीज होत नाहीं असें समाजांतील कोणत्याहि व्यक्तीस अथवा वर्गास वाटूं नये. श्रीमंताचा मुलगा शहाणा असो वा मूर्ख असो शहाणा होतो, जमीनदाराचा मुलगा जमीनदार होतो आणि निर्धनाचा मुलगा निर्धनच राहतो ही विषमता आहे. तशीच विषमता ब्राह्मणाचा मुलगा ब्राह्मण म्हणून श्रेष्ठ आणि महाराचा मुलगा महार म्हणून कनिष्ठ या उच्चनीच भावनेंत आहे. प्रत्येक व्यक्तीच्या कर्तृत्वाला योग्य अवसर मिळून त्याचें भाग्य त्याच्या प्रयत्नांवर अवलंबून ठेविल्यामुळें जो भेद निर्माण होईल त्यांत विषमता मानण्याचें कारण नाहीं. पण या भेदांतून जेव्हां समाजांत वर्गभेद व जातिभेद निर्माण होतात आणि निरनिराळ्या वर्गांत व जातींत जन्म पावण्यानें आपल्या गुणोत्कर्षास कमीअधिक अडथळे येत असल्याचा अनुभव येतो तेव्हां सामाजिक विषमता व अन्याय यांचा प्रादुर्भाव होतो. ही विषमता लोकशाहीच्या ध्येयाशीं विसंगत असून केवळ राज्ययंत्राचें स्वरूप लोकशाहीचें बनविल्यानें तेथें लोकशाही समाज निर्माण झाला

असें म्हणतां येणार नाहीं. तसेंच अशा विषम सामाजिक परिस्थितींत लोकशाही राज्ययंत्र न्यायप्रस्थापना करूं शकणार नाहीं तर उलट अन्यायाची वृद्धीहि करूं शकेल.

व्यवहाराच्या दृष्टीनें आधी लोकशाही राज्ययंत्र स्थापन करावें कीं आधीं सामाजिक समता निर्माण करावी हा प्रश्न नेहमींच मतभेदाचा व वादग्रस्त असतो. समाजाच्या विशिष्ट अवस्थेंत लोकशाही राज्ययंत्र स्थापन करणें हाच सामाजिक समतेच्या प्रस्थापनेचा उत्तम मार्ग असतो, तर विशिष्ट भिन्न अवस्थेंत आधी सामाजिक समता स्थापन करून मग राज्ययंत्राला लोकशाही स्वरूप देणें हितप्रद ठरतें. भांडवलशाही धनोत्पादनामुळें उत्पन्न झालेली सामाजिक विषमता नष्ट होईपर्यंत लोकशाही राज्ययंत्र स्थापन न करण्याचा कम्यूनिस्टांचा प्रयत्न दुसऱ्या प्रकारचा आहे आणि आपल्या देशांतील लोकशाही राज्ययंत्र कायम ठेऊन त्याच्याच आधारें भांडवलशाहीमुळें उत्पन्न झालेली विषमता नष्ट करण्याचा फ्रान्स—इंग्लंड—अमेरिकेंतील समाजवाद्यांचा प्रयत्न पहिल्या प्रकारचा आहे. जेव्हां लोकशाही राज्ययंत्र सामाजिक विषमतेमुळें एकाच वर्गाच्या हातीं जाणें अपरिहार्य आहे. असें दुसऱ्या एका किंवा अनेक वर्गांना वाटत असतें व त्या राज्ययंत्राचा उपयोग आपल्यावरील अन्याय दूर करण्यास होणार नाहीं अशी भावना त्या वर्गांत जागृत असते तेव्हां लोकशाही राज्ययंत्र हा एक आपल्या फसवणुकीचा मार्ग आहे असें त्यांना वाटते. अशा अवस्थेंत आधी सामाजिक समता व मग लोकशाही राज्य असे विचार प्रसार पावत असतात. तात्पर्य लोकशाही राज्ययंत्र आणि सामाजिक समता या गोष्टी परस्परावलंबी आहेत व त्यांपैकीं फक्त एकाच गोष्टीचा आश्रय करून खरी लोकशाही निर्माण करतां येणार नाहीं. तसेंच लोकशाही समाजघटना झाली नाहीं तोंपर्यंत राज्य-

घटनाही पूर्ण होणार नाहीं आणि राज्यघटनेला लोकशाहीचें स्वरूप प्राप्त झाल्याखेरीज समाजघटनेलाहि लोकशाहीचें स्वरूप येणार नाहीं. यांपैकीं कोणत्या अंगावर केव्हां किती भर द्यावा हा व्यावहारिक राजकारणाचा प्रश्न असून त्याचें उत्तर केवळ तात्त्विक दृष्टीनें देतां येणार नाहीं. तात्त्विक दृष्टीनें येवढेंच म्हणतां येईल कीं हीं दोन्हीं अंगें परस्परावलंबी आहेत आणि त्यांची कार्यक्षमता आणि हितप्रदता एकमेकावर अवलंबून असतात.

## लोकशाही आणि बंधुभावना

लोकशाहीच्या ध्येयाचा सामाजिक समतेप्रमाणें बंधुभावनेशींहि अत्यंत निकट संबंध आहे. एका राज्यांत राहणाऱ्या लोकांत बंधु-भावना नांदत असल्याविना लोकशाही राज्यघटना तेथें हितप्रद होणार नाहीं. लोकशाही राज्यांतील निवडणुकी बहुमतानें होत असतात. प्रतिनिधि-सभेंतील निर्णय बहुमतानें होतात आणि बहुसंख्य पक्षाच्या हातीं राज्यकारभारहि जात असतो. हा बहुसंख्य पक्षाचा कारभार आणि बहुमताचे निर्णय अल्पसंख्याकांना आपले वाटले पाहिजेत आणि आपणांसहि लोकमताचें परिवर्तन करून बहुसंख्य बनतां येईल आणि राज्यकारभार हातीं घेतां येईल असा विश्वास वाटत असला पाहिजे तरच हें राज्य आपलें आहे आणि त्याच्या धोरणाचे नियंते व विधाते आपण आहों ही जाणीव या अल्पसंख्य लोकांत किंवा पक्षांत राहूं शकेल. असें होण्यास बहुसंख्य पक्ष आणि अल्पसंख्य पक्ष यांच्यांत बंधुभावना नांदत असली पाहिजे. आपले कितीहि तीव्र मतभेद असले तरी आपण ते विचारविनिमयानें आणि परस्पर समेटानें मिटवूं शकूं अशी भावना असली पाहिजे.

लोकशाही राज्य म्हणजे बहुसंख्यांकांचें राज्य असें कांहीं लोक

म्हणतात आणि त्याच्या आधारें हिंदुस्थान हिंदूंचा, महाराष्ट्र मराठ्यांचा वगैरे घोषणा करतात. ही मतें लोकशाहीच्या ध्येयाशीं किती विसंगत आहेत तें वरील विवेचनावरून स्पष्ट होईल. लोकशाही राज्यांत अनेक गोष्टींचे निर्णय बहुमतानें घ्यावे लागतात. याचा अर्थ ते बहुसंख्याकांचें राज्य आहे असा होऊं शकत नाहीं. लोकशाही राज्य हें त्यांपैकीं प्रत्येक राष्ट्रिकाला 'स्व'राज्य वाटलें पाहिजे आणि प्रत्येक अल्पसंख्य पक्षाला आपला सत्पक्ष असल्यास मतपरिवर्तनानें बहुसंख्य पक्ष बनण्याची खात्री वाटली पाहिजे व त्यांस मतस्वातंत्र्य, प्रचारस्वातंत्र्य इत्यादि राष्ट्रिक हक्क समानतेनें उपभोगतां आले पाहिजेत. अर्थात्च बहुमताचे निर्णय अथवा बहुसंख्य पक्षाच्या हातीं राज्यकारभार या सूत्रांचा अर्थ बहुसंख्य जातीच्या किंवा धर्माच्या लोकांचें अल्पसंख्य जातीच्या किंवा धर्माच्या लोकांवरील राज्य असा केव्हांहि करतां कामा नये किंवा होता कामा नये. असा त्याचा अर्थ होईल तर तें लोकशाही राज्य न होतां अल्पसंख्य जातीच्या किंवा धर्माच्या लोकांच्या दृष्टीनें अनियंत्रित राज्यच होईल. तें जुलमी होईल किंवा कदाचित् होणारहि नाहीं पण तें लोकशाहीचें होणार नाहीं आणि लोकशाहींतील बहुमताच्या निर्णयाच्या तत्त्वाशीं त्याचा कोणताहि संबंध नाहीं.

लोकशाही राज्यांतील बहुमताच्या निर्णयाचें तत्त्व प्रत्येकाला युक्तिवादानें आपल्या मतांतील सत्यांश आज ना उद्यां बहुमताला पटवून देतां येईल या गृहीत कृत्यावर आधारलेलें आहे. अर्थात् कोणत्याहि मताचा विचार करतांना केवळ सत्यासत्य अथवा न्याय-अन्याय या दृष्टीनेंच विचार करण्याची वृत्ति लोकांत जागृत राहिली पाहिजे; असें न होईल तर बहुमतानुसार राज्यकारभार हा न्यायानुसारी होणार नाहीं. मतप्रचार करीत असतां जातीय भावनेचा आधार घेणें, विशिष्ट

धर्मांत जन्मलेल्या लोकांच्या स्वार्थभावनेला जागृत करून बहुमत मिळविणें, तत्त्वनिष्ठ पक्ष निर्माण न करतां जातिनिष्ठ, धर्मनिष्ठ किंवा वर्गनिष्ठ पक्ष बनवून आपल्या पक्षाच्या हातीं राज्ययंत्र काबीज करणें या सर्व वृत्ति अथवा धोरणें लोकशाहीला मारक आहेत. ज्या राष्ट्रांत अनेक जातींचे, धर्मांचे अथवा वर्गांचे लोक राहत असतील त्यांतील लोकांत जाति-धर्म-वर्ग निरपेक्ष होऊन सार्वजनिक प्रश्नांचा खऱ्या सार्वजनिक बुद्धीनें—म्हणजेच सर्वजनहितबुद्धीनें—विचार करण्याची संवय राष्ट्रिकांना लागल्याविना तत्त्वनिष्ठ पक्ष निर्माण होणार नाहींत, बहुमताचे निर्णय न्यायानुसारी होणार नाहींत, अल्पमताला हें आपलें राज्य आहे असें वाटणार नाहीं आणि खरी लोकशाही स्थापन होणार नाहीं. जाति-धर्म-वर्ग-निरपेक्ष होऊन सार्वजनिक बुद्धीनें सार्वजनिक प्रश्नांचा निर्णय करण्याच्या वृत्तीसच बंधुभावना असें म्हणण्यास हरकत नाहीं.

या बंधुभावनेलाच संकुचित अर्थानें राष्ट्रीय भावना असेंहि म्हणतां येईल. ज्या राष्ट्रांत ही सर्वव्यापक राष्ट्रीय भावना नसते किंवा नष्ट होते तेथें लोकशाही राज्ययंत्र टिकूं शकत नाहीं असा अनुभव भांडवलप्रधान युरोपीय देशांत आज येत आहे. भांडवलदार आणि कामगार यांच्यांतील वर्गविग्रह आज येवढ्या थराला जाऊन पोहोचला आहे कीं त्याचा निकाल शांततेनें, समेटानें, युक्तिवादानें लावून घेण्यास दोन्हीहि पक्ष तयार नाहींत. यामुळें अशा राष्ट्रांना एका देशांत नांदणाऱ्या दोन राष्ट्रांचें स्वरूप प्राप्त झालें आहे व तीं राष्ट्रें दुभंगलीं आहेत. आपल्या देशाचें राष्ट्रीयत्व जातिधर्मभावनेनें छिन्नभिन्न होण्याचा संभव दिसत आहे. अशा प्रकारें एकाच देशांत राहणारे निरनिराळे गट, समूह किंवा वर्ग एकमेकांकडे शत्रुत्वाच्या वृत्तीनें पाहूं लागले आणि वाटेल त्या साधनांनीं आपलें मत दुसऱ्यावर लादण्याचा आग्रह

धरूं लागले म्हणजे लोकशाही राज्ययंत्र निकामी बनतें, उलथून पडतें अथवा एका पक्षाच्या हातीं जाऊन तें अनियंत्रित व जुलमी बनतें. फॅसिझम किंवा कम्यूनिझम् ही अशीच एकपक्षीय अथवा एकवर्गीय अनियंत्रित सत्ता आहे. तेथें विरोधी पक्षाला अवसरच नाहीं व शांततेनें आपल्या हातीं सत्तासंक्रमण होण्याची आशा नाहीं.

विरोधी पक्ष असावेत पण दोन्ही पक्षांत अंतिम दृष्ट्या हितैक्याची व बंधुभावनेची जाणीव असावी हें लोकशाहीचें लक्षण आहे. लोकशाहींत मतविरोध असलेच पाहिजेत, हितविरोधहि अपरिहार्य आहेत, पण या सर्व मतविरोधांचा व हितविरोधांचा निर्णय दंडुकेशाहीनें, डोकेफोडीनें लावून न घेतां युक्तिवादानें, मतपरिवर्तनानें, शांततेनें आणि देवाणघेवाणीनें करून घेऊं अशी वृत्ती सर्वांत जागृत असली पाहिजे.

## सत्यनिष्ठा आणि लोकशाही

वरील विवेचनावरून सत्यनिष्ठा आणि अहिंसावृत्ति या गुणांचा लोकशाहीशीं किती संबंध आहे याची कल्पना वाचकांस येऊं शकेल. समाजाच्या सर्व व्यवहारांत सत्यनिष्ठेचा आणि अहिंसावृत्तीचा अधिकाधिक प्रवेश होण्यांतच खरी मानव संस्कृति आहे असें ज्यांचें मत आहे व तसा तो करण्यासाठीं सत्य, अहिंसा, अपरिग्रहादि व्रतें ज्यांनीं आपल्या वैयक्तिक जीवनांत घेतलीं आहेत अशा सत्याग्रही संप्रदायाच्या लोकांना इतर कोणत्याहि राज्यपद्धतीपेक्षां लोकशाही राज्यपद्धति अधिक पसंत कां पडते याचाहि उलगडा आतां होऊं शकेल. लोकशाही राज्य हें इतर सर्व राज्याप्रमाणें पूर्णपणें अहिंसामय होणार नाहीं हें खरें आहे पण त्यांच्या खालीं अहिंसेचा व सत्याचा अधिकांत अधिक विकास होऊं शकेल व लोकांत ज्या मानानें या

वृत्ति अधिकाधिक बाणत जातील त्या मानानें 'आत्मराज्या' चें सत्याग्रही ध्येय अधिकाधिक संनिध येऊं लागेल अशी सत्याग्रही लोकांना आशा आहे. युरोपांतील लोकशाही भ्रष्ट झाली आहे हें त्यांना स्पष्ट दिसत आहे. पण यामुळें लोकशाहीचें ध्येयच झुगारून द्यावयाचें कीं, तिचें सत्यावर व अहिंसेवर आसन मांडून शुद्धीकरण करावयाचें हा प्रश्न आशियादि इतर खंडांतील राष्ट्रांपुढें आहे. सत्याग्रही संप्रदायाच्या लोकांनीं दुसरा पर्याय स्वीकारिला आहे व तेंच त्यांच्या तत्त्वांशीं सुसंगत आहे.

आपापसांतील मतभेदाचे प्रश्न विचारविनिमयानें, युक्तिवादानें आणि मतपरिवर्तनानें सोडवावयाचें ही वृत्ति सत्यसंशोधनाची आहे. सत्य म्हणजे सामाजिक न्याय किंवा आत्यंतिक समाजहित कशांत आहे तें कोणाहि एकास पूर्णपणें कळलेलें नाहीं, त्याचा शोध एकसारखा चालला पाहिजे, या सत्यसंशोधनाच्या कार्यांत प्रत्येकानें आपापल्या बुद्धीप्रमाणें व शक्तीप्रमाणें भाग घ्यावा आणि आपणांस जें सत्य म्हणजे न्याय्य वाटत असेल त्याचा प्रचार करून तें बहुमतास पटवून द्यावें. आपल्या मतास बहुमताचा पाठिंबा मिळविण्याचें कार्य शांततेनें, चिकाटीनें आणि तत्त्वनिष्ठेनें करीत राहावें. सर्वांना हें स्वातंत्र्य असलें म्हणजे प्रत्येकाच्या मताची इतरांकडून छाननी होत राहते आणि लोकमताचा प्रवाह अधिकाधिक शुद्ध आणि सत्यपूत बनत जातो. अशा लोकमतानुसार राज्यकारभार होत राहण्यानें तो न्यायानुसारी होण्याचा अधिकांत अधिक संभव आहे.

समाजांतील न्यायसंशोधनाचें कार्य योग्य प्रकारें चालू राहावयाचें तर त्या कार्यांत त्यांतील प्रत्येक व्यक्तीनें अंशभागी झालें पाहिजे. सामाजिक व्यवहारांचा किंवा कायद्यांचा प्रत्येकावर होणारा परिणाम हा भिन्न असतो, त्या परिणामानुसार प्रत्येकाच्या न्याय-अन्यायाच्या

कल्पनाहि भिन्न बनतात, अशा भिन्न भिन्न सर्व कल्पना लोकांपुढें येत गेल्या, त्यांची अनुकूल प्रतिकूल चर्चा होत राहिली म्हणजे जें बहुमत बनतें त्यांत अन्यायाचा अंश कमी असण्याचा संभव आहे. निदान लोकांना तरी तो कमी भासणार आणि लोकांना जी गोष्ट न्यायाची भासते तीस अनुरूप असेच कायदे होत राहणार. हें सत्य-संशोधनाचें व न्यायप्रस्थापनेचें कार्य अखंड सतत चालू राहिलें म्हणजे कालक्रमानुसार आपणांवरील अन्यायाचें निवारण करून घेण्याचा एक शांततेचा मार्ग प्रत्येकास उपलब्ध राहील व समाजांत बंडाळी किंवा अत्याचारी क्रांति करण्याची आवश्यकता कोणास वाटणार नाहीं. बहुमताचे निर्णय मान्य करून त्याची शिस्त पाळण्याच्या पद्ध-तींतील हेंच रहस्य आहे.

पण बहुमत हें न्यायानुसारी राहावयाचें तर त्यांतील दोष दाख-वून त्याची सुधारणा करण्याचें कार्य नित्य चालू राहिलें पाहिजे. अर्थात् बहुमताची शिस्त पाळावी ही लोकशाहीची नीति असली तरी बहुमताची खुषमस्करी करावी ही मात्र लोकशाहीची नीति नव्हे. बहुमत हें नेहमीं न्यायाचें असतें असा दावा लोकशाही मांडत नाहीं किंवा बहुमत ठरवील तोच न्याय अशीहि न्यायाची व्याख्या लोक-शाहींत अभिप्रेत नाहीं. न्याय व अन्याय यांचें संशोधन नित्य चालू राहावें म्हणून प्रत्येक व्यक्तीस बहुमताच्या निर्णयावर टीका करण्याचा व त्याचें परिवर्तन करण्याचा हक्क लोकशाहींत दिलेला असतो. प्रत्ये-कानें आपल्या सदसद्विवेक बुद्धीचा उपयोग करून हा हक्क बजावला पाहिजे. हें कर्तव्य करीत असतां लोकांची निंदा, उपहास, छळ हें सर्व सहन केलें पाहिजे आणि आपलें सर्व बुद्धिबल व आत्मबल खर्ची घालून बहुमताचें परिवर्तन घडवून आणिलें पाहिजे; मात्र तसें करतांना अत्याचाराचा किंवा सक्तीचा उपयोग करतां कामा नये.

वर बुद्धिबल व आत्मबल असे शब्द योजिले यांतील आत्मबल या शब्दाची अधिक फोड केली पाहिजे. आत्मबल म्हणजे सत्यनिष्ठे-साठीं भोगावे लागणारे क्लेश सहन करण्याचें बल असें थोडक्यांत सांगतां येईल. सत्याच्या उपासकांनीं त्याच्या प्रचारासाठीं व संस्था-पनेसाठीं निःस्वार्थ बुद्धीनें क्लेश सहन केले असतां त्यांची सत्यनिष्ठा पारखून निघते, त्यांच्या मतांतील असत्याची प्रतीति त्यांना येते आणि त्यांतील सत्यांशाची प्रतीति इतरांना येते असा आत्मबलाचा सिद्धांत आहे. या सिद्धान्तानुसार अनेक धर्मनिष्ठांनीं, धर्मप्रचारकांनीं आणि समाजोद्धारक साधुसंतांनीं सत्यासाठीं आत्मक्लेश सहन केलेले आहेत. बहुमताच्या हातीं राज्यकारकार असतां याच आत्मबलाच्या साहाय्यानें लोकमताचें परिवर्तन करून सामाजिक अन्यायाचें निवारण अधिक त्वरेनें आणि अधिक निश्चितपणें होईल हें उघड आहे.

एकोणिसाव्या शतकांतील युरोपीय राज्यशास्त्रज्ञांनीं या आत्म-बलाच्या सिद्धान्ताकडे फारसें लक्ष दिलेलें नव्हतें. त्यांचा सर्व भर केवळ बुद्धिबलावर होता. पण हें बुद्धिबल सामाजिक मतपरिवर्तनास अपुरें पडत आहे असा अनुभव युरोपांत येत आहे. यामुळें बुद्धि-बलाधिष्ठित लोकशाही राजकारणहि मागें पडत आहे. या बुद्धिबलाच्या प्रभावीपणाचा संबंध लोकशाहीच्या राजकारणाशीं कसा आहे, तें प्रो. जोड यांनीं पुढीलप्रमाणें विशद केलें आहे. बुद्धिबलाच्या तत्त्वास त्यांनीं "The Principle of Rationality" असें नांव दिलें आहे. यासंबंधीं ते लिहितात :

"This principle asserts that men are reasonable in the sense that, if an opinion is true and evidence can be brought forward to show that it is true, then in the long run they will embrace it. This view, which was taken for granted by the democrats of the ninteenth century, is widedy denied in the

modern world. Unless, however, we are prepared to agree with John Stuart Mill that it is possible to make men believe according to evidence, and know what was their real interest, which, when they once knew, they would, we thought, by the instrument of opinion, enforce a regard to it upon one another, we have no adequate ground for believing that they can be entrusted with the previlege of self-government."

एखादें मत खरें असेल व तसा पुरावा देतां येईल तर आज ना उद्यां लोक त्याचें ग्रहण करतात, या अर्थानें मनुष्यप्राणि बुद्धिप्रधान आहे हा सिद्धान्त एकोणिसाव्या शतकांतील लोकशाहीवादी युरोपीय राज्यशास्त्रज्ञांनीं गृहीत धरिला होता. पण आज हा सिद्धान्त पुष्कळ लोक मान्य करीत नाहींत आणि तो गृहीत धरल्याखेरीज लोकशाही राज्यपद्धतीचें समर्थन होऊं शकत नाहीं अशी प्रो. जोड यांची वरील उताऱ्यांत तक्रार आहे. अर्थात् प्रो. जोड यांनीं लोकशाहीच्या समर्थनार्थ बुद्धिबलाच्या प्रभावीपणाचा सिद्धान्त गृहीत धरिला आहे, पण हें त्यांचें करणें मनुष्य स्वभावासंबंधींच्या अलीकडील मीमांसेशीं सुसंगत नाहीं.

लोकमताच्या परिवर्तनास केवळ बुद्धिबल पुरें पडत नाहीं याचें कारण सामान्य मनुष्यांची न्यायबुद्धि स्वार्थानें, लोभानें, भीतीनें, अहंकारानें आणि परंपरेला चिकटून राहण्याच्या तमोगुणानें मलिन व मंद झालेली असते. हा तिच्यावरचा मल झाडून टाकून ती तीव्र आणि प्रखर बनण्यास समाजांतील न्यायनिष्ठेचें–सत्यनिष्ठेचें आत्मबल जागृत असावें लागतें किंवा जागृत करावें लागतें. समाजांतील हें आत्मबल जागृत करण्यास सत्यनिष्ठेनें क्लेश भोगणें आणि अहिंसावृत्तीनें सत्याचा प्रचार करीत राहणें हा मार्ग आहे. या मार्गाचा अवलंब करणारे लोकनायक लाभल्यास समाजांत न्यायनिष्ठेची

ज्योत प्रज्वलित राहील आणि तिच्या प्रकाशांत लोकांना सत्याचें ज्ञान होऊन ते त्याचा स्वीकार करीत राहतील. लोकशाहीची उभारणी ज्या बुद्धिबलाच्या सिद्धान्तावर झालेली आहे त्याला आधारभूत असा हा आत्मबलाचा सिद्धान्त आहे. या आत्म-बलाच्या आधाराच्या अभावीं केवळ बुद्धिबल सामाजिक अन्यायाच्या निवारणास पुरें पडत नाहीं असा बोध आधुनिक युरोपीय लोकशाही जगाला आज करीत आहे. न्यायप्रस्थापनेसाठीं स्वार्थत्याग करण्याची वृत्ति त्या राष्ट्रांतून नष्ट झाल्यानें तेथील लोकशाही नष्ट होत आहे व वर्गयुद्धानें न्यायप्रस्थापना करण्याची लोकशाहीविरोधी राजकारणें पुढें सरसावत आहेत. बुद्धिबलावर अधिष्ठित झालेलें राजकारण अपुरें पडल्यास आत्मबलाचें राजकारण निर्माण करणें ही मानव संस्कृतीची उन्नति आहे; पण बाहुबलाचें राजकारण निर्माण करणें ही तिची अधोगति आहे असें सत्याग्रही तत्त्व आहे. या तत्त्वाच्या दृष्टीनें आज लोकशाहीला सत्याग्रहाचें अधिष्ठान निर्माण करून देणें अवश्य झालें आहे.

## अहिंसावृत्ति आणि लोकशाही

लोकशाहीच्या यशस्वितेस लोकांमध्यें आणि राज्यकर्त्यांमध्यें केवळ सत्यनिष्ठा असून भागत नाहीं तर अहिंसावृत्तीहि असावी लागते. आपल्या मतांतील सत्यासंबंधीचा आग्रह असावा परंतु तें मत इतरां-वर सक्तीनें लादण्याची वृत्ति नसावी आणि इतरांच्या मतांतील सत्यां-शाचा स्वीकार करून स्वतःच्या मतांतील असत्यांशाचा त्याग कर-ण्याची वृत्ति असावी. आपणांस जें सत्य पटलें असेल त्यासंबंधीचा आग्रह आणि आपल्या मतांतील असत्यांशाचा त्याग करून त्याचें शुद्धीकरण करण्याची वृत्ति या दोन वृत्ति परस्परविरोधी असतात, पण

त्या दोहोंचाहि आश्रय केल्याखेरीज सत्याची खरी उपासना करतां येणार नाहीं. केवळ पहिल्या वृत्तीनें-स्वमताच्या आग्रहबुद्धीनें-दुराग्रह वाढत जाईल आणि केवळ दुसरीनें निष्क्रियता व बुद्धीचा अनिश्चय वाढत जाईल. धर्मनिष्ठ म्हणविणारे पुष्कळ लोक पहिल्या वृत्तीनें दुराग्रही व हेकट बनतात व आपल्या मतांचें संशोधन करण्याची सत्यनिष्ठा गमावून बसतात. सामाजिक न्यायअन्यायाचें संशोधन नित्य चालू राहिलें पाहिजे व त्यांत समाजांतील सर्व प्रौढ व्यक्तींनीं भाग घेतला पाहिजे हें लोकशाहीचें ध्येय आहे. सामाजिक सत्य हें कोणाहि एकास समजलेलें नाहीं, तें एकाच काळीं समग्र समजणेंहि शक्य नाहीं आणि त्याचें स्वरूपहि नित्य पालटणारें आहे. ही वृत्ति लोकशाहीच्या बुडाशीं आहे. या वृत्तीमुळेंच आपल्या मतासंबंधीचा दुराग्रह सुटतो आणि इतरांच्या मतासंबंधींची सहिष्णुता वाढते. ही परमतसहिष्णुता म्हणजेच सत्यसंशोधनांतील अहिंसावृत्ति असून प्रत्येक शास्त्राच्या वाढीस तिची आवश्यकता असते.

पण या वृत्तीप्रमाणें आपणांस जें सत्य पटलें असेल त्यासाठीं प्रयोग करण्याचें धैर्यहि अंगीं असावें लागतें. सोन्यांतील हिणकस भाग जसा अग्नींत घातल्याविना जळून जात नाहीं त्याचप्रमाणें आपल्या मतांतील हिणकस भाग म्हणजे असत्यांश तें मत जीवनाच्या मुशींत घालून पडताळून पाहिल्याखेरीज नष्ट होत नाहीं. सामाजिक मतें पडताळून पाहण्याची प्रयोग शाळा म्हणजे आपलें जीवन आहे हें ओळखून सत्याचे अनेक प्रयोग करण्यास लागणारें धैर्य किंवा निष्ठा ज्यांच्यापाशीं नसेल त्यांची बुद्धि सत्यसंशोधनास अपात्र ठरते. आपल्या मतांवर दृढनिष्ठा असल्याखेरीज हे प्रयोग होणार नाहींत आणि असे प्रयोग करून आपलीं मतें पडताळून पाहिल्याखेरीज ही निष्ठा निर्माण होणार नाहीं. शुष्क वादविवाद करून तार्किक युक्तिवादांची जाळीं विणीत

बसल्यानें जीवनांतील सत्याचें संशोधन आणि दर्शन होणार नाहीं. केवळ तार्किक युक्तिवादानें बुद्धीचा निर्णय होत नाहीं आणि तिला एकाग्रता येऊन कार्य करण्यास लागणारी एक निष्ठा किंवा स्थिरता प्राप्त होणार नाहीं. अशीं स्वमतासंबंधीची अनिश्चिति किंवा अनिष्ठा हिलाच कांहीं लोक शास्त्रीय बुद्धि मानितात पण ही खरी शास्त्रीय बुद्धि नव्हे आणि केवळ हेकटपणा किंवा स्वमतासंबंधीचा दुराग्रह ही धर्मवृत्ति नव्हे. खरी धर्मवृत्ति आणि सत्यसंशोधनाची शास्त्रीय वृत्ति यांच्यांत विरोध नाहीं. सत्यसंशोधनास दुराग्रह आड येतो त्याचप्रमाणें निष्ठेचा अभावहि आड येत असतो. अशी दुराग्रहरहित सत्यनिष्ठा लोकशाही समाजांत अभिप्रेत आहे. हिच्यांत परमतसहिष्णुता आणि स्वमतनिष्ठा या दोहोंची एकत्र स्थिति असते.

अर्थातच अशा सत्यनिष्ठेशीं आपलीं मतें दुसऱ्यावर अथवा समाजावर सक्तीनें लादणें हें विसंगत आहे. लोकशाही राज्यांत मुळींच सक्ति नसतें असें नाहीं, कारण राज्य म्हटलें कीं सक्ति आलीच; पण ही सक्ति करण्याची सत्ता बहुजन समाजाला अथवा त्यानें निवडलेल्या प्रतिनिधींच्या हातीं दिलेली असते. राज्यसंस्थेची सक्ति न्यायप्रस्थापनेसाठीं व्हावयाची असते आणि स्वार्थबुद्धीला किंवा अहंकाराला वा ममत्वाला वश होऊन अन्यायाचें आचरण करणारांवरही सक्ति व्हावी असा हेतु असतो. प्रत्येक सरकारपाशीं समाजाचें संघटित शस्त्रबल असतें तें लोकशाही सरकारपाशींहि असतें. प्रत्येक सरकार या शस्त्रबलाचा उपयोग आपण अन्यायाच्या प्रतिबंधासाठीं करतो असेंच म्हणतें; पण हा न्यायअन्याय ठरविण्याची अंतिम सत्ता प्रत्येक राज्यपद्धतींत निरनिराळ्या ठिकाणीं असते. लोकशाही राज्यांत ही सत्ता बहुजनसमाजाच्या हातीं असावी अशी योजना केलेली असते. बहुजन समाजाच्या न्यायबुद्धीला पटलेले कायदे मोडणारांस शासन करण्याची

व्यवस्था लोकशाही राज्यांत करावीच लागते; पण त्या कायद्यांस बहुजन समाजाच्या न्यायबुद्धीचा पाठिंबा असतो. जोंपर्यंत कोणतेंहि तत्त्व बहुजन समाजाच्या न्यायबुद्धीस पटलेलें नाहीं तोंपर्यंत त्याचा कायद्यांत प्रवेश होऊं नये आणि कायद्यांत प्रविष्ट झालेल्या ज्या मतांना बहुजन समाजाच्या न्यायबुद्धीचा पाठिंबा नाही तीं कायद्यांतून काढून टाकावींत असा लोकशाहीचा न्याय आहे.

याचा अर्थ बहुजनसमाजाची न्यायबुद्धि नेहमीं शुद्ध असते किंवा बहुजन समाजापेक्षां कोणाची न्यायबुद्धि अधिक शुद्ध किंवा सूक्ष्मवादी नसते असा नाहीं. न्यायतत्त्वांच्या द्रष्टेपणांत बहुजन समाजाच्या पुढें गेलेले अनेक द्रष्टे अथवा सत्पुरुष समाजांत असतात, त्यांचें नेतृत्वहि समाजाला हवें असतें, बहुजन समाजाच्या हातीं सत्ता असणाऱ्या लोकशाही राज्यांतहि त्यांच्या नेतृत्वाची अत्यंत आवश्यकता असते; पण समाजावर आपल्या तत्त्वांची सक्ति करण्याची सत्ता अशा द्रष्ट्यांच्या किंवा सत्पुरुषांच्या हातीं नसून ती बहुजन समाजाच्याच हातीं असावी असें लोकशाहीच्या पुरस्कर्त्यांचें मत आहे. जे द्रष्टे सत्पुरुष समाजाची न्यायबुद्धि सुधारूं इच्छीत असतील वा त्यांचें नेतृत्व करूं इच्छीत असतील त्यांनीं आपलें कार्य केवळ आत्मबलानेंच करावें, त्यासाठीं सक्तीचा, सत्तेचा अथवा हिंसेचा उपयोग करूं नये. त्यांनीं आत्मबलानें प्रथम बहुजन-समाजाचें मतपरिवर्तन करावें, त्याची न्यायबुद्धि शुद्ध बनवावी आणि नंतर त्याच्याकडूनच त्याचा उद्धार करावा. अशा प्रकारें सुधारणा होण्यास थोडा वेळ लागला तरी त्यांत न्यायाच्या नांवानें अन्यायाची प्रस्थापना होण्याचा संभव कमी आहे आणि समाजाच्या न्यायबुद्धीचा होणारा उद्धार हाच त्याचा खरा उद्धार होय. आत्मोद्धाराचें तत्त्व जसें वैयक्तिक उन्नतीला लागू आहे तसेंच तें सामाजिक उन्नतीलाहि लागू आहे आणि सक्तीनें समाजाची

न्यायबुद्धि उन्नत होऊं शकत नाहीं. तात्पर्य न्यायप्रस्थापनेसाठीं सत्तीचा अवलंब करावा लागणें हें लक्षण इतर राज्यपद्धतींप्रमाणें लोकशाही राज्यपद्धतीलाहि लागू पडत असलें तरी या पद्धतींत समाजाच्या न्याय-बुद्धीच्या आधारावरच या सत्तीची उभारणी केली असल्यानें तिच्या-खालीं यासाठीं होणारी किंवा करावी लागणारी हिंसा अगदी किमान होईल अथवा व्हावी अशी अपेक्षा आहे. मात्र समाजाची न्यायबुद्धि जागृत आणि प्रखर बनविण्याचे प्रयत्न त्याच्यांतील सत्यनिष्ठ सत्पुरुषांनीं आपलें सर्व आत्मबल खर्चीं घालून करीत राहिलें पाहिजे.

## आंतरराष्ट्रीय शांतता आणि लोकशाही

राष्ट्रीय बंधुभावना आणि लोकशाही यांचा संबंध किती निकट आहे याचें विवेचन मागें केलेंच आहे. राष्ट्रीय बंधुभावनेप्रमाणें आंतरराष्ट्रीय बंधुभावना वाढून राष्ट्राराष्ट्रांतील मतभेदांचा निर्णय केवळ युद्धानें म्हणजे शस्त्रबलानें लावून घेण्याची प्रथा बंद पडल्याखेरीज लोकशाहीची खरी वाढ होणार नाहीं. राष्ट्रांतर्गत प्रश्न युक्तिवादानें, बुद्धिबलानें अथवा आत्मबलानें सोडवून घेण्याची संस्कृति सुरक्षित व्हावयाची तर आंतर-राष्ट्रीय प्रश्नांचाहि निकाल शस्त्रबलानें व आत्मबलानेंच लावून घेण्याची प्रथा जगांत पडली पाहिजे. मात्र तसें होण्यापूर्वीं आंतरराष्ट्रीय बंधु-भावना अधिक जागृत आणि प्रभावी बनावी लागेल.राष्ट्रांतर्गत न्याय-अन्यायांचा विचार करतांना वैय्यक्तिक, जातीय, वर्गीय अहंकार आणि ममत्व यांच्यापासून अलिप्त होऊन वर्तन करणारे लोकनायक निघाल्या-खेरीज राष्ट्रीय बंधुभावना निर्माण होत नाहीं, त्याचप्रमाणें राष्ट्रीय अहं-कार व ममत्व यांच्यापासूनहि मुक्त होऊन केवळ सत्यनिष्ठेनें न्याय-अन्यायांचा विचार करून वर्तन करणारे आणि आपल्या राष्ट्रांच्याहि अन्यायाविरुद्ध आत्मबलानें झगडणारे लोकनायक निर्माण झाल्याखेरीज

ही आंतरराष्ट्रीय बंधुभावना जागृत होऊन प्रभावी बनणार नाहीं असें होऊन आंतरराष्ट्रीय व्यवहारांत लोकशाहीचें ध्येय अवलंबिलें जाईपर्यंत राष्ट्रांतर्गत लोकशाहीहि खरी प्रभावी बनणार नाहीं. युद्धें आणि लोकशाही या संस्था परस्परांना मारक असून जगाची प्रगति एक युद्धें कमी करण्याच्या दिशेनें तरी झाली पाहिजे किंवा ती लोकशाहीचा विनाश करून लष्करशाहीच्या दिशेनें तरी झाली पाहिजे. युरोपीय संस्कृतीची प्रगति आज लष्करशाहीच्या दिशेनें झपाट्यानें होत असून लोकशाहीचें ध्येयहि झुगारून देण्याकडे तिचा स्पष्ट कल होत आहे. आधुनिक युरोपांत उदय पावलेली लोकशाही संस्कृति आज तेथून नामशेष होऊं लागली आहे. हेंच तिचें भवितव्य ठरणार कीं आधुनिक युरोपीय लोकशाहीहून अधिक शुद्ध लोकशाही संस्कृति जगांत निर्माण होणार हाच आज सर्व जगापुढें अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे.

---

# आधुनिक लोकशाही : उद्भव आणि प्रसार : २

## आधुनिक युरोपीय संस्कृतीचा जन्म

आधुनिक लोकशाहीच्या विचारांचा उद्भव युरोपांत सतराव्या शतकांत झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. पंधराव्या शतकाच्या अखेरीपासून युरोपांतील व्यापारी लोक दर्यावर्दीपणांत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारांत पुढें येऊं लागले. सोळाव्या शतकापासून समाजांत त्यांचें वर्चस्व वाढूं लागलें आणि परंपरागत श्रेष्ठ गणलेल्या सरंजामदार

वर्गाशीं या वर्गांतील लोकांचा सामाजिक लढा सुरू झाला. या वर्गांतील लोकांना अमेरिका व आशियाखंडांतील दूरदूरच्या व अज्ञात अशा देशांत जाऊन आपलें दैव काढण्याचे नवे मार्ग आढळूं लागले आणि अनेक देशांच्या व धर्मांच्या लोकांशीं संबंध आल्यामुळें त्यांच्या विचारांतहि क्रांति होऊं लागली. या विचारक्रांतीचेंच एक फल म्हणजे युरोपांतील धर्मक्रांति असें म्हणतां येईल. अनेक शतकें चालत आलेल्या परंपरागत धार्मिक व सामाजिक विचारांना या धर्मक्रांतीनें धक्का दिला आणि शब्दप्रामाण्य, ग्रंथप्रामाण्य आणि धर्मगुरुप्रामाण्य यांच्यापेक्षां बुद्धिप्रामाण्य आणि अनुभवप्रामाण्य यांना महत्त्व देण्याकडे समाजाचा कल होऊं लागला. या विचारक्रांतींतून आधुनिक युरोपीय संस्कृति जन्मास आली आणि तिचें संरक्षण व संगोपन युरोपीय व्यापारी वर्गानें केलें. या संस्कृतींतून बुद्धिस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, सामाजिक समता आणि राजकीय लोकसत्ता किंवा लोकशाही हीं सामाजिक ध्येयें निर्माण झालीं आणि या संस्कृतीच्या प्रसाराबरोबर त्यांचाहि प्रसार जगभर झाला. स्थूलमानानें सतराव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास आधुनिक लोकशाहीच्या ध्येयाचा उद्भव झाला असें मानतां येतें आणि एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस त्याला जगन्मान्यता प्राप्त झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

## इंग्लिश लोकशाहीची क्रांति

इंग्लंडांत सतराव्या शतकाच्या मध्यास प्युरिटन लोकांनीं लोकशाहीच्या नांवानें पहिली राज्यक्रांति केली आणि आपला राजा पहिला चार्लस याला इ. स. १६४९ जानेवारी ३० ला फाशीं दिलें. राष्ट्रानें अथवा राष्ट्राच्या कायद्यांनीं जी मर्यादित सत्ता त्याला दिली होती तिचा दुरुपयोग करून, तिच्या मर्यादा झुगारून देऊन आपल्या स्वैर

इच्छेप्रमाणें जुलमी व दुष्ट धोरणानें राजसत्तेचा उपभोग घेतला असा त्याच्यावर आरोप ठेवण्यांत आला होता. इ. स. १६४९ पासून १६६० पर्यंत इंग्लंडांत लोकशाहीचा आधुनिक काळांतील पहिलाच मोठा प्रयोग झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. या प्रयोगाचें नेतृत्व आलिव्हर क्रॉम्वेल याच्याकडे असून ज्या पार्लमेंटचें नेतृत्व तो करीत होता त्यांत व्यापाऱ्यांचें वर्चस्व होतें. प्युरिटन पंथांत व्यापारी वर्गाचेंच प्राबल्य असून त्या वर्गाच्या न्यायासंबंधीं, स्वातंत्र्यासंबंधीं आणि समाजधारणेसंबंधीं ज्या कल्पना व आकांक्षा होत्या त्यांना मूर्त स्वरूप देण्याचें कार्य क्रॉम्वेलकडून घडत होतें. याच्या उलट राजपक्षाच्या बाजूस सरंजामदार आणि धर्माधिकारीवर्ग होते व त्यांचें पार्लमेंटांतील लॉर्डांच्या सभेंत प्राबल्य होतें.

## वर्गविग्रहांतून क्रांतीचा जन्म

हें व्यापारी वर्गाचें बंड किंवा ही क्रांति धार्मिक व राजकीय अशा द्विविध जुलमाविरुद्ध होती. धर्माधिकारीपक्ष इंग्लंडांत पुनः रोमच्या पोपचें वर्चस्व स्थापन करणार आहेत असा आरोप क्रांतिकारक प्युरिटन करीत असले तरी प्रत्यक्ष रोमच्या पोपची सत्ता पुनः स्थापन होण्याचें फारसें भय नव्हतें. प्युरिटन लोकांना जें धर्मस्वातंत्र्य हवें होतें व ज्या सुधारणा हव्या होत्या त्या करण्यास धर्माधिकारी तयार नव्हते. सरंजामदार वर्गाला समाजांतील व्यापारी वर्गाचें वाढतें प्राबल्य आणि कॉमन्स सभेचें राजकीय महत्त्व असह्य वाटत होतें. अशा प्रकारें या राजकीय क्रांतीच्या बुडाशीं सामाजिक व आर्थिक वर्गविग्रह होता. व्यापारीवर्ग हा आपणच राष्ट्राचे व सामान्य जनतेचे प्रतिनिधि म्हणून अनियंत्रित राजसत्ता आणि प्रतिगामी धर्मसत्ता यांच्याविरुद्ध झगडत होता आणि सामान्य शेतकरीवर्गाचाहि सरंजामदार वर्गाविरुद्ध व्यापारी वर्गाला पाठिंबा होता.

## क्रॉम्वेलच्या क्रांतीची फलश्रुति

क्रॉम्वेलच्या नेतृत्वाखालीं इंग्लंडांत स्थापत झालेली लोकशाही फार काळ टिकली नाहीं आणि जितका काळ ती अस्तित्वांत होती तितक्या काळांतहि तिला अनियंत्रित लष्करशाहीचें स्वरूप प्राप्त झालें. इ. स. १६६० मध्यें पुनः राजशाही स्थापन झाली व दुसरा चार्लस गादीवर आला. तथापि ( १ ) इंग्लंडांतील अनियंत्रित राजसत्ता कायमची नष्ट होऊन पार्लमेंटचें वर्चस्व प्रस्थापित झालें. ( २ ) पार्लमेंटांतहि लॉर्डांच्या सभेपेक्षां कॉमन्ससभेचें महत्त्व वाढलें. ( ३ ) रोमन कॅथॉलिक पंथाचें निर्मूलन होऊन पुनः पोपची धर्मसत्ता इंग्लंडांत स्थापन होण्याची भीति उरली नाहीं. ( ४ ) ब्रिटिश लोकांना लष्करशाहीचा इतका तिटकारा आला कीं राष्ट्रांत खडें सैन्य मुळींच असूं नये असें त्यांना वाटूं लागलें. या सर्व गोष्टींना हरताळ फासून प्रगतीचीं चक्रें उलट फिरवण्याचा प्रयत्न दुसऱ्या जेम्सनें केला तेव्हां इ. स. १६८८ मध्यें पुनः राज्यक्रांति झाली आणि इंग्लंडांत लोकनियंत्रित राजसत्ता कायमची स्थापन झाली.

## अयशस्वी आर्थिक क्रांतीचीं बीजें

पण याच क्रांतीच्या वेळीं इंग्लंडांत दुसरी एक क्रांति होऊं घातली होती अथवा दुसऱ्या एका क्रांतीच्या अस्पष्ट कल्पना या क्रांतिकालांत जन्मास आल्या होत्या, त्या मात्र यशस्वी होऊं शकल्या नाहींत. क्रॉम्वेलच्याच सैन्यांत लेव्हलर्स आणि डिगर्स या नांवाचे कांहीं लोक होते. लिलबर्न व विन्स्टॅनले हे त्यांचे पुढारी असून धर्मछळ आणि अनियंत्रित राजसत्ता यांच्या पासून समाजावर अन्याय होतो त्याचप्रमाणें समाजांतील धनिक वर्गापासून निर्धन वर्गावर जुलूम होत असतो या जुलमापासून निर्धन वर्गाचें संरक्षण करण्याचें कार्य

लोकशाही सरकारनें केलें पाहिजे किंबहुना सधननिर्धन असा वर्ग-भेदच नष्ट केला पाहिजे असें या लोकांचें म्हणणें होतें. लोकशाही राज्य हें श्रीमंतांचें व गरीबांचें सर्वांचेंच असलें पाहिजे, श्रीमंतांप्रमाणें गरीबांनाहि मताधिकार असला पाहिजे, बेकारांना धंदा देण्याची, गरिबांना व्यापाऱ्यांनीं लुबाडूं नये म्हणून बाजार-भावांवर नियंत्रण करण्याची आणि निसर्गदत्त संपत्ति सर्वांना समप्रमाणांत उपभोगतां येण्याची व्यवस्था लोकशाही सरकारनें केली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. ज्यांच्यापाशीं स्वतःचें शेत नाहीं आणि स्वतंत्र धंदा करण्यास पुरेसें भांडवल नाहीं अशा शेतावरील मजुरांची आणि छोट्या व्यापाऱ्यांची लोकशाही राज्यापासून ही अपेक्षा होती. हीं अपेक्षा सफल व्हावयाची तर धार्मिक व राजकीय जुलुमाप्रमाणें आर्थिक जुलूम आणि आर्थिक विषमता यांचा अंत करणें अवश्य आहे. या आर्थिक समतेच्या तत्त्वांवर एकवर्गसमाज निर्माण करण्याच्या व नवी समाजरचना करण्याच्या कल्पना विशद व निश्चित बनलेल्या नव्हत्या आणि ज्या निर्धन कामगार वर्गाला या सामाजिक क्रांतीची आवश्यकता असते असा कामगारवर्ग जागृत व संघटित बनलेला नव्हता. औद्योगिक क्रांति झाल्यानंतर समाजांतील फार मोठ्या वर्गाचा कामगार वर्गांत समावेश होऊन समाजसत्ताक क्रांतीच्या कल्पना सुस्पष्ट आणि निश्चित बनल्या. तशी अवस्था अद्यापि या कल्पनांना प्राप्त झालेली नव्हती;तथापि समाजसत्ताक क्रांतीच्या कल्पनांचीं बीजें आधुनिक काळांतील पहिल्या लोकसत्ताक क्रांतीच्या वेळीं सामान्य जनतेच्या अंतःकरणांत पेरिलीं गेलीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण समाजरचनेचा आर्थिक पाया उखडून काढून तो नव्या तत्त्वावर घालण्याच्या या कल्पना त्यावेळीं यशस्वी झाल्या नाहींत आणि लोकसत्ताक क्रांतीला आर्थिक क्रांतीचें स्वरूप प्राप्त झालें नाही.

## आर्थिक क्रांतिविरोधी एकजूट

राजपक्ष आणि लोकपक्ष यांच्या लढ्याच्या काळांत देशांतील बराच भाग उध्वस्त झाला, बेकारी वाढली, धनोत्पादन मंदावलें आणि बाजारभावहि भयंकर कडाडले. या आर्थिक अरिष्टांमुळें सधन निर्धन वर्गभेद विशेष भासूं लागला आणि धार्मिक व राजकीय जुलमांपेक्षांहि आर्थिक जुलुमाची जाणीव निर्धन वर्गाला अधिक तीव्रतेनें होऊं लागली. या अनुभवांतून या आर्थिक क्रांतीच्या कल्पना निर्माण झाल्या होत्या पण त्या पुढें येतांच आपापसांतील मतभेद विसरून सर्व धनिकवर्ग या क्रांतिकारक कल्पनांना चुरडून टाकण्यास अथवा निर्मूल करण्यास एक झाले. जमीनदार—सरंजामदारवर्ग आणि धनिक व्यापारीवर्ग हे दोघे आपले हितविरोध तडजोडीनें मिटविण्यास आणि आपल्या मालमत्तेवर येऊं लागलेल्या या संकटास एकमुखानें तोंड देण्यास तयार झाले. या दोन वर्गांनीं समाजांत फैलावूं लागलेल्या या क्रांतिकारक कल्पनांना चुरडून टाकण्यास क्रॉम्वेलच्या लष्करशाहीस साहाय्य केलें आणि क्रॉम्वेलच्या मृत्यूनंतर शुद्ध लोकशाहीची स्मृतिहि भयानक मानून इंग्लंडांत लोकनियंत्रित राजसत्तेची स्थापना केली.

## लोकशाहीला धनिकशाही वळण लागलें

या वेळेपासून क्रांतिकारक जहाल मतांची जी भीति ब्रिटिश मुत्सद्यांच्या मनावर बसली आहे ती अद्यापि नष्ट झालेली नाहीं. तसेंच लोकशाहीच्या ध्येयांत आर्थिक समतेचा अंतर्भाव होऊं नये असें वळण या वेळेपासूनच युरोपीय लोकशाही कल्पनांना लागूं लागलें. या वळणामुळेंच आज युरोपीय लोकशाहीला धनिकशाही स्वरूप ( Plutocratic democracy ) प्राप्त झालें असून तिचें नेतृत्व राष्ट्रांतील धनिक वर्गाकडे गेलें आहे. तात्पर्य सतराव्या शतकांतील इंग्लंडांत

आधुनिक काळांतील पहिली लोकशाही क्रांति झाली, या क्रांतींत मध्यम व्यापारी वर्गाला अभिप्रेत असणाऱ्या धार्मिक व राजकीय सुधारणांचा पाया घालण्यांत आला, जमीनदारवर्ग व धनिक व्यापारी यांच्यांतील सामाजिक समतेला मान्यता मिळाली, कॉमन्स सभेकडे राष्ट्राचें नेतृत्व आलें आणि अनियंत्रित राजसत्तेपासून लोकांच्या जीवित-वित्ताला येणारा धोका नष्ट झाला. याचवेळीं आर्थिक समतेच्या कल्पना निघून धनिकांपासून निर्धनांवर होणाऱ्या अन्यायांच्या व आक्रमणाच्या निराकरणाची मागणी जनतेकडून पुढें आली, पण तिचा लोकशाहीशीं व सामाजिक समतेशीं कांहीं संबंध नाहीं, सधन-निर्धन हा वर्गभेद नैसर्गिक व परमेश्वरकृत आहे व तो नष्ट झाल्यास समाज उच्छिन्न होईल अशा मिषानें ही मागणी धुडकावून लावण्यांत आली. लोकशाही राज्य हें राष्ट्रांतील सर्व धनिकांचें राज्य आहे आणि मालमत्तेचा हक्क हा त्रिकालाबाधित निसर्गदत्त हक्क आहे, त्याच्यावर आक्रमण करण्याचा हक्क राज्यसंस्थेस नाहीं, ही विचारसरणी हळूं हळूं सर्वमान्य होऊं लागली आणि लोकराज्य म्हणजे धनिकराज्य असें समीकरण विचारी लोक बसवूं लागले.

## पार्लमेंटचे धनिकशाही स्वरूप

इंग्लंडांत इ. स. १६८८ नंतर पार्लमेंटचें व विशेषतः कॉमन्स सभेचें वर्चस्व प्रस्थापित झालें हें खरें असलें तरी त्यावेळीं कॉमन्स सभा ही इंग्लंडांतील सामान्य जनतेची प्रतिनिधि सभा होती असें म्हणतां येत नाहीं. ती इंग्लंडांतील केवळ जमीनदार व बडे व्यापारी यांची प्रतिनिधि असून लॉर्डांची सभाही उघडच आनुवंशिक सरदार व बडे धर्माधिकारी यांची सभा होती व आहे. यामुळें इंग्लंडांत पार्लमेंटचें वर्चस्व सतराव्या शतकाच्या अखेरीपासून झालें याचा अर्थ

तेथें लोकशाहीची प्रस्थापना त्यावेळीं झाली असा करतां येत नाहीं. तेथें धनिकशाही निर्माण झाली येवढाच याचा खरा अर्थ होता. पुढें अठराव्या शतकांत जी औद्योगिक क्रांति झाली तिच्यामुळें दक्षिणेकडील व पूर्वेकडील शहरें ओस पडून उत्तरेकडे मोठीं शहरें निर्माण झालीं. तथापि कॉमन्स सभेच्या प्रतिनिधींची वाटणी निरनिराळ्या विभागांत पूर्वीच्या प्रमाणांतच झालेली होती. यामुळें नव्या औद्योगिक शहरांतील कारखानदारांना योग्य प्रतिनिधित्व मिळेना. हा अन्याय दूर करण्यासाठीं लोकशाहीच्या नांवानें प्रचंड चळवळ झाली व तिचा परिणाम होऊन १८३२ चा पार्लमेंट सुधारणा कायदा झाला तरीहि सामान्य जनतेला म्हणजे कामगार वर्गाला मताधिकार मिळाला नाहीं. यानंतर एकोणिसाव्या शतकाच्या मध्यास चार्टिस्ट नांवाची प्रचंड चळवळ तेथील कामगारांनीं केली आणि पुनः लोकशाही बरोबरच आर्थिक समता स्थापन करण्याचें ध्येय जोरांत पुढें आलें. ही चळवळ दडपून टाकून १८६७ सालीं शहरांतील कामगारांना मताधिकार देऊन संतुष्ट करण्यांत आलें. तरीहि खेड्यांतील कामगारांना मताधिकार मिळाला नव्हता. तो इ. स. १८८४ सालीं देण्यांत आला. या वेळपासून कामगारपक्ष निर्माण होऊन त्यांचे प्रतिनिधि कॉमन्स सभेंत जाऊं लागले. तथापि १९१८ पर्यंत सार्वत्रिक मताधिकाराचें व स्त्रियांच्या मताधिकाराचें तत्त्व मान्य झालें नव्हतें. हीं तत्त्वें या वेळीं मान्य झालीं व स्त्रियांना मताधिकार प्राप्त होण्यास तीस वर्षांची अट होती तीहि १९२२ सालीं बदलून पुरुषांप्रमाणें त्यांनाहि वयांत आल्याबरोबर मताधिकार मिळावा असा कायदा झाला. अशा प्रकारें पार्लमेंटकडे राजकीय सत्ता आल्यानंतर दीडशे वर्षांनीं पार्लमेंटला राजकीय मताधिकाराच्या दृष्टीनें लोकशाही स्वरूप इंग्लंडांत प्राप्त झालें. पण या राजकीय मताधिकारामुळें आज आपलें राज्य आपल्या

देशांत आहे असें तेथील कामगारवर्गाला वाटत आहे किंवा नाहीं याची शंकाच आहे. आपल्या देशांतील राज्य हें लोकशाहीचें सोंग घेतलेलें भांडवलशाही राज्य आहे असें तेथील बहुतेक विचारी लोकांना पटलेलें असून ही जाणीव कामगारवर्गात झपाट्यानें पसरत आहे. आर्थिक वर्गभेद नष्ट झाल्याखेरीज राजकीय लोकशाही फारशी महत्त्वाची नाहीं हें तत्त्व तेथील राज्यशास्त्रज्ञांना आतां स्पष्ट दिसत आहे व प्युरिटन क्रांतीच्या वेळीं पुढें आलेल्या लेव्हलर्स वगैरे पंथांकडे पाहण्याचा त्यांचा दूषित दृष्टिकोण सुधारूं लागला आहे.

## अमेरिकन स्वातंत्र्य युद्ध आणि निर्धन वर्ग

इंग्लंडांतील सतराव्या शतकांतील क्रांतीनंतर अठराव्या शतकांत अमेरिका आणि फ्रान्स या देशांत लोकशाहीच्या नांवानें क्रांत्या झाल्या. त्यांपैकीं पहिली अमेरिकेंतील ब्रिटिश वसाहतींनीं केली आणि तेथें 'अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें' या नांवाचें एक नवें राष्ट्र निर्माण झालें. ब्रिटिश राज्यक्रांतीप्रमाणें अमेरिकन राज्यक्रांतीचें नेतृत्वहि अमेरिकेंतील व्यापारी कारखानदार वर्गाकडेच होतें, पण ब्रिटिश राज्यक्रांतीच्या वेळीं एकाच राष्ट्रांतील दोन वर्गांत लढा झाला तर अमेरिकन राज्यक्रांतीच्या वेळीं वसाहतींतील व्यापारी-कारखानदार आणि ब्रिटनमधील व्यापारी-कारखानदार यांच्यांत लढा झाला. यामुळें अमेरिकन राज्यक्रांतीला राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा असें म्हणतात. हा राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा लोकशाहीच्या नांवानेंच झाला आणि तो यशस्वी होऊन तेथें लोकशाही राज्य निर्माण झालें, पण तेथें वर्गयुद्धांतून या लोकशाहीचा जन्म झाला असें म्हणतां येत नाहीं. तथापि इंग्लंडांतील राज्यक्रांतीच्या वेळेप्रमाणें अमेरिकन राज्यक्रांतीच्या वेळींहि व्यापारी कारखानदार वर्गाला अभिप्रेत असणाऱ्या केवळ राजकीय क्रांतीच्या पुढें

जाऊन कामकरी–शेतकरी वर्गाची सुधारणा करण्यासाठीं व्यापारी कारखानदार वर्गाच्या स्वातंत्र्यावर बंधनें घालून आर्थिक समतेचे कायदे करावेत असे विचार निर्माण झाले होते व "Shay's revolt" (शेचें बंड) या नांवाचें एक बंडहि या वर्गाविरुद्ध झालें होतें. पण तें तात्काल दडपून टाकण्यांत आलें. तथापि अमेरिकेचें राष्ट्रीय स्वातंत्र्याचें युद्ध समाजांतील निर्धन वर्गापर्यंत पोहोचलेंच नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. तेथील निर्धन शेतकरी, कामकरी किंवा गुलाम यांनीं या युद्धांत फारसा भाग घेतला नाहीं आणि स्टँपावरील कर अथवा चहावरील कर या ज्या दोन बाबींच्या निमित्तानें हें स्वातंत्र्य युद्ध झालें त्यांत शेतकरी कामकरी जनतेच्या हिताहिताचा फारसा संबंध नव्हता. कायदेशीर व्यवहारावरील स्टँप ड्युटी ही व्यापारीवर्गावरच विशेषतः बसत असून चहा हा त्यावेळीं केवळ श्रीमंतांच्या चैनीचा पदार्थ गणला जात असे. हा लढा वस्तुतः ब्रिटन व अमेरिका या दोन देशांतील व्यापारी कारखानदारांचा असून वसाहतींतील निर्धन वर्गाला कोणी राबवावें व पिळून काढावें येवढाच प्रश्न त्याच्या बुडाशीं होता असें म्हणणारेहि कांहीं लोक आहेत. ब्रिटनसारखा सरंजामदार वर्ग अमेरिकेंत नव्हता आणि अमेरिकेंतील निर्धन जनतेच्या हिताला विरोध राजाचा किंवा सरंजामदार वर्गाचा नसून व्यापारी कारखानदार वर्गाचाच होता. पण त्यावेळीं हा हितविरोध फारसा विशद झाला नव्हता आणि राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या भावनेनें तो दृष्टिआड झाला होता. तथापि ब्रिटनप्रमाणें अमेरिकेंतील क्रांतीचें नेतृत्व व्यापारी कारखानदार वर्गाकडेच असल्यानें तेथील लोकशाहीला ज्यामुळें धनिकशाही स्वरूप प्राप्त होईल अशा कल्पनांच्या आधारावरच तिचा पाया घालण्यांत आला. आज अमेरिकेंतील लोकशाही तेथील भांडवलशाहीच्या पूर्ण ताब्यांत गेलेली आहे आणि तेथें आर्थिक किंवा सामा-

जिक विषमता मुळींच दिसून येत नाहीं. तथापि इ. स. १७७६ सालीं जो स्वातंत्र्याचा जाहीरनामा अमेरिकन क्रांतिकारकांनीं काढिला त्यांत पुढील तत्त्वें उद्घोषित करण्यांत आलीं होतीं.

## स्वातंत्र्याचा जाहीरनामा

"जेव्हां ऐतिहासिक घडामोडींच्या क्रमानुसार एका लोकांना दुसऱ्या लोकांशीं असलेले राजकीय संबंध तोडून निसर्गाच्या व परमेश्वराच्या कायद्यानुसार प्राप्त होणारा जगांतील इतर राज्यांच्या बरोबरीचा, स्वतंत्र राष्ट्राचा, दर्जा प्राप्त करून घ्यावयाचा असतो, तेव्हां आपणास असें करणें कां भाग पडत आहे, तें जगाला जाहीर करणें जगांतील लोकमताला योग्य मान देण्याच्या दृष्टीनें अवश्य असतें. पुढील तत्त्वें स्वयंसिद्ध आहेत असें आमचें मत आहे. सर्व मानव हे जन्मतः समान निर्मिलेले आहेत. परमेश्वरानें त्या सर्वांना कांहीं अविनाशी हक्क दिलेले आहेत. अशा हक्कांत जीवित, स्वातंत्र्य आणि सुखाचा प्रयत्न हे प्रमुख आहेत. या हक्कांच्या शाश्वतिसाठींच सरकारें निर्माण करण्यांत येत असतात आणि लोकांच्या संमतींतून त्यांच्या न्याय्य सत्तेचा उद्भव होत असतो. जेव्हां कोणतीहि राज्यपद्धति या साध्यांना हानिकारक होऊं लागतें तेव्हां ती राज्यपद्धति बदलण्याचा अथवा नष्ट करण्याचा आणि आपल्या सुखास व सुरक्षिततेस अधिकांत अधिक पोषक होतील अशा तत्त्वांच्या आधारावर आपल्या मतानुसार नवें राज्य स्थापन करण्याचा हक्क तेथील लोकांना असतो."

## स्वातंत्र्यापूर्वीची अंदाधुंदी

इ. स. १७७६ सालीं अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा हा जाहीरनामा प्रसिद्ध झाला. या वेळपासून १७८९ पर्यंत म्हणजे तेरा वर्षेपर्यंत हा स्वातंत्र्याचा लढा आणि अमेरिकन राष्ट्राच्या निर्मितीचें कार्य चालू

होतें. १७८९ सालीं नव्या राज्ययंत्राच्या संस्थापनेचें हें कार्य पुरें होऊन 'अमेरिकन संस्थानांचें संयुक्त राज्य' या नांवाचें एक नवें लोकशाही राष्ट्र निर्माण झालें आणि जॉर्ज वाशिंग्टन हा त्याचा पहिला लोकनियुक्त अध्यक्ष झाला. पण तत्पूर्वी इ. स. १७८१ च्या १९ ऑक्टोबरला लॉर्ड कॉर्नवालिसचा वाशिंग्टननें अखेरचा पराभव केला आणि लवकरच ब्रिटिशांनीं अमेरिकेच्या स्वातंत्र्याला मान्यता दिली होती. यानंतर सात वर्षेपर्यंत निरनिराळ्या वसाहतींत नव्या राज्याच्या स्थापनेसंबंधी झगडे चालू होते व अखेरच्या एक दोन वर्षांत तर सर्वत्र पूर्ण बेबंदशाही व अराजक अनवस्थाच माजली होती. पण अखेरीस संयुक्त राज्याची स्थापना झाली आणि संपूर्ण लोकशाहीचें एकमेव आदर्श राज्य निर्माण झालें असें जग म्हणूं लागलें. आज या लोकशाहीलाच जगांत अत्यंत प्रबल आणि संपन्न अशा धनिकशाही राज्याचें स्वरूप प्राप्त झालेलें असून त्या राज्यांतील कामगार आणि नीग्रो यांना आपलें स्वातंत्र्य व सुख किंबहुना जीवितहि पूर्णपणें सुरक्षित आहे अशी शाश्वति वाटत नाहीं. तसेंच या हक्कांच्या दृष्टीनें सर्व मानव समान दर्जाचे आहेत, असाहि अनुभव त्यांना येत नाहीं.

## फ्रेंच राज्यक्रांति आणि वर्गयुद्ध

अमेरिकेंतील ब्रिटिश वसाहतींनीं स्वातंत्र्य युद्ध केलें तेव्हां युरोपांतून व विशेषतः फ्रान्समधून अनेक तत्त्वनिष्ठ स्वयंसेवक या युद्धांत लोकशाहीकरितां लढण्यासाठी गेले होते. याचा परिणाम लोकशाहीसाठीं फ्रान्स देशांत एक प्रचंड क्रांति होण्यांत झाला हें अगदीं साहजिक असेंच झालें. अठराव्या शतकाच्या अखेरीस इ. स. १७८९ मध्यें फ्रान्स देशांत या क्रांतीचा भडका उडाला आणि त्यांत फ्रान्समधील राजा सोळावा लुई, त्याची राणी, सरंजामदारवर्ग आणि त्याला पर-

घरेनें प्राप्त झालेले जादा हक्क व सवलती या सर्वांच्या आहुति पडल्या. या क्रांतीचा सर्व रोख अनियंत्रित राजशाही आणि सरंजामदारवर्ग यांच्याविरुद्ध होता. सरंजामदारवर्ग आणि व्यापारी कारखानदारवर्ग या दोन वर्गांतील हा लढा आहे आणि व्यापारी-कारखानदार वर्ग हा जनतेचा प्रतिनिधि आहे अशी भावना त्यावेळीं बऱ्याच मोठ्या प्रमाणावर सर्व युरोपभर पसरली होती आणि युरोपांतील अनियंत्रित राजे आणि सरंजामदार वर्ग ही क्रांति दडपून टाकण्याच्या कार्यांत एक झाले. अंतर्गत वर्गकलहाच्या क्रांतीला लवकरच अशा प्रकारें युरोपीय महायुद्धाचें स्वरूप प्राप्त झालें आणि यांतूनच अखेरीस फ्रान्स-मध्यें नेपोलियनची लष्करशाही निर्माण झाली. नेपोलियननें लोक-शाहीच्या नांवानें बहुतेक युरोपियन राज्यांचा पाडाव केला आणि फ्रान्सचें आधिपत्य सर्व युरोपावर प्रस्थापित केलें. पण ब्रिटिशांनीं त्याच्याविरुद्ध लढणाऱ्या सर्व शक्तींचें एकीकरण करून नेपोलियनचा व या अल्पकालीन फ्रेंच साम्राज्याचा पाडाव इ. स. १८१५ सालीं केला. यापूर्वीच्या पंचवीस वर्षांत लोकशाही ध्येयाचे क्रांतिकारक विचार सर्व युरोपभर प्रचंड घडामोडी करीत होते आणि त्यांनीं युरो-पांतील सरंजामशाही व अनियंत्रित राजशाही यांना जो धक्का दिला तो त्यावेळीं जरी त्यांना नामशेष करूं शकला नाहीं तरी पुढील पन्नास वर्षांत युरोपांतील बहुतेक राज्यांत लोकशाही संस्थांचा उदय झाला आणि लोकशाहीचें ध्येय १८७० नंतरच्या काळांत सर्व युरोपांतच नव्हे तरी सर्व जगांत मान्यता पावूं लागलें. ही मान्यता त्याला प्राप्त होण्यास युरोपांतील बहुतेक राज्यांतील व्यापारी-कारखानदार वर्गास राज्यक्रांत्यांचे प्रयोग करावे लागले. तथापि फ्रान्समधील इ. स. १७८९ मधील क्रांतीच्या इतकी प्रचंड क्रांति एकोणिसाव्या शतकांत कोणत्याहि देशांत झाली नाहीं.

## समाजसत्ताक क्रांति व खरी खोटी लोकशाही

इ. स. १९१७ सालीं रशियामध्यें जी समाजसत्ताक क्रांति झाली तिनें मात्र फ्रान्समधील अठराव्या शतकांतील क्रांतीला मागें टाकिलें आणि समाजसत्ताक क्रांति होऊन भांडवलशाही नष्ट झाल्याशिवाय आणि मालकमजूर हा वर्गभेद नष्ट होऊन एकवर्ग समाज निर्माण झाल्याशिवाय खरी लोकशाही निर्माण होत नाहीं अशी विचारक्रांति सर्व जगांत घडवून आणिली. यामुळें इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका या देशांतील लोकशाही ही खरी लोकशाही नसून त्यांची संस्कृति ही भांडवलशाही व साम्राज्यशाही संस्कृति आहे आणि तिचा आधार आर्थिक व राजकीय परोपजीवन हा आहे असें बहुतेक विचारवंतांना पटूं लागलें आहे. भांडवलप्रधान लोकशाही आणि समाजसत्ताक लोकशाही अशी लोकशाहीचीं दोन स्वरूपें असून त्यांपैकीं पहिली खोटी व दुसरी खरी लोकशाही हे विचार केवळ विचार किंवा ध्येय या दृष्टीनें इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका या देशांतील राज्यशास्त्रज्ञ आणि बहुजन यांच्यांत आज फार व्यापकत्वानें फैलावले आहेत.

## लोकशाहीवरील दोन गंडान्तरें

इ. स. १९१७ मधील रशियांतील क्रांतीनंतर चालू महायुद्ध सुरूं होईपर्यंतच्या वीस बावीस वर्षांच्या काळांत समाजसत्ताक क्रांति करण्याचे अथवा समाजसत्ताक लोकशाही स्थापण्याचे अनेक लहान मोठे प्रयत्न युरोपांत झाले, पण ते कोठेंच यशस्वी झाले नाहींत. असा मोठा प्रयोग स्पेनमध्यें झाला पण तो युरोपांतील भांडवलशाहीच्या सर्व पुरस्कर्त्यांनीं दडपून टाकिला. याच्या उलट युरोपांत लोकशाही ध्येयाचा उघडपणें त्याग करून भांडवलशाहीचें संरक्षण करण्यासाठीं फॅसिस्ट अथवा नाझी पक्षांची अनियंत्रित सत्ता निर्माण झाली असून त्यांनीं सर्वत्र

लष्करशाही वातावरण निर्माण केलें आहे. इंग्लंड आणि फ्रान्स येथील लोकशाही ही खरी लोकशाही नसून ती तेथील भांडवलदार वर्गाची साम्राज्यशाही आहे व तशी साम्राज्यशाही निर्माण करण्याचा आमच्या राष्ट्रांनाहि हक्क आहे असें नाझी व फॅसिस्ट पक्ष आपापल्या देशांतील लोकांना सांगत असून या साम्राज्याच्या मोहानें तेथील जनताहि या पक्षांची अनियंत्रित सत्ता स्वीकारून लोकशाहीचा त्याग करीत आहेत. अशा प्रकारें इ. स. १७८९ मध्यें फ्रेंच क्रांतीच्या रूपानें प्रकट होऊन सर्व युरोपीय राजकारणावर शेसवाशें वर्षं प्रभाव गाजविणारें आणि सर्व जगभर मान्यता पावलेलें लोकशाहीचें ध्येय आज युरोपांत लोप पावूं लागलें आहे.

## फ्रेंच क्रांतीच्या वेळचे समाजसत्ताक क्रांतिकारक

युरोपीय लोकशाहीला धनिकशाही स्वरूप प्राप्त होणार हें ओळखणारे आणि तिला समाजसत्ताक लोकशाहीचें स्वरूप देण्याचा प्रयत्न करणारे क्रांतिकारक इ. स. १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीच्यावेळीं पुढें आले होते. त्यांचा नेता बॅबूफ हा होता व त्यानें रॉबिसपीअर या जॅकोबिन् पुढाऱ्याच्या शिरच्छेदानंतर ( इ. स. १७९४ ) समाजसत्ताक क्रांति करण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा तो प्रयत्न यशस्वी झाला नाहीं. पुढें एकोणिसाव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास कार्ल मार्क्स व एन्जल्स् यांनीं समाजसत्ताक क्रांतीचें शास्त्र बनविलें आणि रशियांतील लेनिन्-प्रभृति कम्यूनिस्टांनीं तें पूर्ण करून बोल्शेविक क्रांति केली. या समाजसत्ताक अथवा कामगारशाही क्रांतीची पाळेंमुळें फ्रेंच राज्य-क्रांतीच्या वेळच्या बॅबूफच्या बंडापर्यंत जाऊन पोहोंचलेलीं आहेत.

## जुन्या बदमाषांच्या ठिकाणीं नवे बदमाष

व्यापारी कारखानदार वर्गाचें मालकी हक्क अथवा मालमत्तेचें हक्क

हे त्रिकालाबाधित अथवा निसर्गदत्त आहेत आणि त्यांच्या संरक्षणासाठींच राज्यसंस्था आहे अशा विचारांच्या आधारावर फ्रेंच लोकशाहीच्या क्रांतीची उभारणी झालेली होती. खासगी मालमत्तेची सुरक्षितता हा लोकशाहीचा पाया बनला आणि ज्यांच्यापाशीं स्वतःची जमीन अथवा मालमत्ता नाहीं त्यांना, फक्त स्वतःची श्रमशक्ति बाजारांतील जड वस्तूंप्रमाणें चढाओढीनें धनिकांना विकून त्यांचे गुलाम बनण्याचें, करारस्वातंत्र्य मिळालें. जमीनदार सरंजामदारवर्ग नष्ट झाला आणि देशांत लोकशाहीच्या नांवानें व्यापारी कारखादार वर्गाचें राज्य सुरू झालें. या घडामोडीस उद्देशून बॅबूफ हा आपल्या कोर्टापुढील जबानींत म्हणतो " राज्यक्रांतीचे क्लेशावह परिणाम पाहून मला व माझ्या सहकाऱ्यांना विषाद होत आहे. जुन्या बदमाषांचें राज्य नष्ट होऊन नव्या बदमाषांचें राज्य सुरू झालें आहे येवढाच बदल या क्रांतीनें झाला आहे. " सर्वांना सुख प्राप्त करून देणें हें समाजाचें ध्येय आहे. समतेच्या राज्याविना हें शक्य नाहीं व निसर्गाच्या कायद्याचाहि तोच अर्थ आहे. समाजांत निर्माण होणाऱ्या संपत्तीवर सर्व व्यक्तींचा नित्याचा हक्क आहे. खासगी मालमत्ता आणि सधन निर्धन भेदभाव यांना मान्यता देणें म्हणजे समाजाच्या गाभाऱ्यांतच चोरीला मान्यता देण्यासारखें आहे. आनुवंशिक संपत्ति हा अन्याय आहे आणि बुद्धिमानांना श्रेष्ठ गणण्यांतहि धोका आहे. सर्व कामाचें मोल सारखेंच आहे आणि सर्वप्रकारच्या कर्तबगारीला सारखेंच बक्षिस मिळालें पाहिजे हें साध्य करण्यास समाजाची समाईक मालकी हेंच एक साधन आहे. जमिनींवर व कारखान्यांवर सामाजिक मालकी स्थापन केली पाहिजे

---

" My companions and I, " he told his judges " have groaned over the unhappy results of The Revolution ... it has merely replaced a band of ancienf scoundrels by a band of new ones "
P. 25 : The Socialist tradition in French Revolution by Laski.

आणि सर्वांना सक्तीनें काम करावयास लाविलें पाहिजे. शिक्षणहि सर्वांना समानतेनें दिलें पाहिजे. या ध्येयांच्या प्राप्तीसाठीं निर्धन कष्टजीवी वर्गाच्या साहाय्यानें कांहीं काळ समाजसत्ताक पक्षानें आपली अनियंत्रित सत्ता देशांत स्थापन केली पाहिजे आणि धनिकशाही निर्माण करणाऱ्यांस समाजाचे शत्रू लेखून दडपून टाकिलें पाहिजे. या क्रांतिकालांत समाजांत लोकशाही नांदणार नाहीं पण त्यानंतर एकवर्ग समाज स्थापन होईल व खरी लोकशाही निर्माण होईल. अशा प्रकारचें बॅबूफ या क्रांतिकारकाचे विचार होते. याच विचारांचा विकास कम्युनिस्टांनीं केला असून त्या पक्षाचे क्रांतिकारक आज जगांतील सर्व देशांत पसरलेले आहेत. रशियाखेरीज कोणत्याहि देशांत त्यांना अद्यापि यश आलेलें नसलें तरी भांडवलप्रधान लोकशाही ही खरी लोकशाही नव्हे हें त्यांचें मत सर्व विचारवंतांस आज पटलेलें आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. पण समाजसत्तेच्या व आर्थिक समतेच्या प्रस्थापनेसाठीं अनियंत्रित कामगारशाही प्रस्थापित करण्याचा त्यांचा मार्ग मात्र सर्वमान्य झालेला नाहीं.

## लोकशाहीला साम्राज्यशाहीचा आधार

आधुनिक युरोपांतील लोकशाही ही जशी भांडवलशाही औद्योगिक घटनेमुळें दुभंगून जाऊन खोटी बनली आहे त्याचप्रमाणें ती साम्राज्यशाहीमुळेंहि विपरीत बनलेली आहे. ब्रिटिश व फ्रेंच लोकशाही राष्ट्रांचीं साम्राज्यें इतर खंडांत पसरलीं आहेत त्याचप्रमाणें अमेरिकेनेंहि क्यूबा, फिलिफाईन, हॅटी, हवाई वगैरे बेटांवर आपलें साम्राज्य स्थापिलें असून मध्य अमेरिका व दक्षिण अमेरिका येथील राज्यांवर आपलें आर्थिक व राजकिय वर्चस्व स्थापन केलें आहे. आपल्या औद्योगिक मालाला

राखीव बाजार पेठा मिळाव्यात, कारखानदारीस लागणारा कच्चा माल सवलतीनें मिळावा, देशांतील जादा संपत्ति कर्जाऊ घेणारे ऋणको देश मिळावेत, जादा लोकसंख्येस वसाहती करण्यास प्रदेश मिळावेत आणि राज्यकारभारांतील वरिष्ठ नोकऱ्या मिळाव्यात अशा अनेक हेतूंनीं ही भांडवलप्रधान लोकशाही राज्यें आपला साम्राज्य विस्तार करीत असतात. देशांतील राज्ययंत्रें ज्या भांडवलदार वर्गाच्या हातीं आहेत त्या वर्गाला तर या आर्थिक साम्राज्यशाहीमुळें फायदा होतोच पण या भांडवलदार वर्गाच्या नोकरींत राबणाऱ्या कामगार वर्गालाहि आपल्या राष्ट्राच्या या साम्राज्यापासून आपलें आर्थिक हित होत आहे असें वाटत असतें. या साम्राज्यांच्या अस्तित्वांमुळें आपल्या देशांत जादा संपत्तीचा जो ओघ येत असतो त्यामुळेंच आपली राहणी इतर राष्ट्रांतील सामान्य जनतेच्या राहणीपेक्षां अधिक संपन्न राहूं शकते असें इंग्लंड-फ्रान्स-अमेरिका या राष्ट्रांतील कामगारांनाहि वाटत असतें. यामुळें या राष्ट्रांत साम्राज्याची आकांक्षा अगदीं खालच्या थरापर्यंत जाऊन पोहोंचल्याचें दिसून येतें.

## लोकशाहीची भ्रष्टता

हा साम्राज्यवाद आणि ही साम्राज्यशाही लोकशाहीशीं अगदीं विसंगत आहेत आणि साम्राज्यांतील अंकित देशांच्या राष्ट्रीयत्वाला आणि स्वातंत्र्याला मारक आहेत. पण त्यांच्या आधारावर प्रमुख राष्ट्रांतील वैभव बरेंचसें अवलंबून असल्यानें तेथील लोकशाही राज्ययंत्र टिकून राहण्यास त्यांचा अप्रत्यक्षपणें उपयोग झालेला आहे असेंहि कांहीं लोकांचें म्हणणें आहे. उदाहरणार्थ इंग्लंडांत औद्योगिक क्रांतीनंतर भांडवलदार व कामगार असे दोन वर्ग निर्माण होऊन त्यांच्यांत वर्गकलह सुरू झाला. हा वर्गकलह असाच वाढत गेला असतां तर

या कलहांत देशांतील कोणातरी एका वर्गाची अनियंत्रित सत्ता स्थापन झाली असती. पण ब्रिटिश साम्राज्यांतून मिळणाऱ्या लुटीचा कांहीं अंश तेथील कामगार वर्गाला देऊन त्याला संतुष्ट ठेऊन क्रांतिपराङ्मुख बनविण्याचें कार्य ब्रिटिश भांडवलशाहीनें केलेलें आहे. अशा प्रकारें ब्रिटिश साम्राज्यशाही ब्रिटनमधील वर्गविग्रह कमी करून लोकशाही राज्ययंत्र चालू ठेवण्यास उपयोगी पडली आहे असें एखाद्यास म्हणतां येईल. पण हें म्हणणें खरें नाहीं. साम्राज्यशाहीमुळें वर्गयुद्ध कांहीं काळ थांबलें व लोकशाही राज्ययंत्र मोडून पडलें नाहीं असें भासलें, तरी त्यामुळें खरी लोकशाही विपरीत बनली आणि लोकशाही राज्य-यंत्र भांडवलशाहीच्या हातीं गेलें हें विसरून चालणार नाहीं. तसेंच इतर राष्ट्रांना गुलामगिरींत ठेवून व त्यांना लुटून आपल्या राष्ट्राचें वैभव टिकविण्याचा हा राक्षसी मार्ग टिकावू नाहीं. आपल्या राष्ट्राचें वैभव, संस्कृति किंबहुना जीवन इतरांच्या गुलामगिरीवर आधारणाऱ्या या युरोपीय लोकशाही राष्ट्रांवर आज महान् आपत्ति आली असून या आपत्तींतून त्यांची साम्राज्यें टिकून राहणें अशक्य झालें आहे आणि या साम्राज्यांच्या अभावीं त्यांचा स्वतःचाहि निभाव लागणें कठीण झालें आहे. यापेक्षां या राष्ट्रांत वर्गकलह माजून यापूर्वींच भांडवलशाही नष्ट झाली असती तर कदाचित् तेंथें समाजसत्ताक लोकशाही निर्माण झाली असती व तेंच बरें झालें असतें, असें तत्वदृष्ट्या म्हणावें लागतें. तात्पर्य ब्रिटिश फ्रेंच राष्ट्रांनीं साम्राज्यशाहीचा आधार घेतल्यामुळें त्यांची लोकशाही टिकून राहिली असें म्हणण्यापेक्षां ती साम्राज्यशाही-मुळें भ्रष्ट झाली व भांडवशाहीच्या आहारी गेली आणि आतां सर्वस्वी नामशेष होण्याच्या पंथास लागली आहे असें म्हणणेंच अधिक संयु-क्तिक व तर्कशुद्ध आहे. येवढें खरें कीं भांडवलशाही आणि लोक-

शाही राज्ययंत्र या दोन परस्पर विरोधी संस्थांच्या एकत्र स्थितीस कांहीं काळ साम्राज्यशाहीचा उपयोग झाला आहे.

## लष्करशाहीचा उदय व लोकशाहीचा अस्त

दुसऱ्या एका दृष्टीनें आर्थिक साम्राज्यशाही ही लोकशाहीच्या विकासास मारक ठरली आहे. ब्रिटिश व फ्रेंच राष्ट्रांनीं साम्राज्य-विस्तार केल्यामुळें इतर स्वतंत्र व प्रबल राष्ट्रांनाहि साम्राज्यविस्ताराचें वेड लागलें आहे आणि युरोपांतील निरनिराळ्या साम्राज्यवादी राष्ट्रांत साम्राज्यप्रसाराची स्पर्धा लागून जगावर महायुद्धांची परंपरा ओढवूं लागली आहे. राष्ट्रांची बहुतेक शक्ति आणि धन युद्धांत अथवा युद्धाच्या तयारींत खर्चीं पडत असल्यानें लोकांना सुखाचा व स्वातंत्र्याचा लाभ मिळत नाहीं. अशा लष्करशाही वातावरणांत राष्ट्रिक स्वातंत्र्य आणि लोकशाही हीं ध्येयें सुरक्षित राहूं शकत नाहींत. युद्धें व युद्धांची तयारी, शस्त्रबल आणि संहारसाधनें, आक्रमण आणि राज्यविस्तार या सर्व परिस्थितीचा परिणाम शांतता, बुद्धिवाद, सह-कार्य, सहानुभूति, सत्यनिष्ठा इत्यादि गोष्टींस मारक असा होत असून परराष्ट्रीय राजकारणांतील ही रानटी तत्त्वें राष्ट्रांतर्गत व्यवहारांत व्यक्त झाल्याखेरीज राहत नाहीं. आपल्या राष्ट्राला कोणताहि पुरुषार्थ केवळ शस्त्रबलानेंच साधतां येईल ही वृत्ति लोकशाही राष्ट्रांत वाढूं लागल्यानें लोकशाही नामशेष किंवा नामधारी बनते. इटाली, जर्मनी या राष्ट्रांत ती नामशेष झाली आहे तर इंग्लंड व फ्रान्स या राष्ट्रांत ती नाम-धारी बनली आहे. ब्रिटिश व फ्रेंच राष्ट्रांनीं साम्राज्यशाही सोडली नाहीं तर त्यांच्यांतील नामधारी लोकशाहीहि आतां फार काळ टिकणार नाहीं.

## लोकशाही ध्येयाच्या प्रसाराचा काळ

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत ब्रिटिश-फ्रेंचादि युरोपीय राज्यांच्या साम्राज्यकक्षेंत जगांतील सर्व प्रदेश आले आणि त्यांच्या शिकवणुकीनें अथवा अनुकरणानें लोकशाहीचें ध्येय इतर खंडांतील लोकांनींहि स्वीकारिलें. कांहीं काळ जगांतील मागसलेल्या राष्ट्रांना लोकशाही संस्कृतीचें शिक्षण देण्यासाठींच आमची साम्राज्यें आम्ही वाढवीत आहों व साम्राज्यांतील अंकित राष्ट्रें लायक बनलीं म्हणजे आम्ही त्यांच्यावरील आमची सत्ता सोडून देऊं असें ब्रिटिश मुत्सद्दी जगाला सांगत असत. या त्यांच्या आश्वासनांच्या आधारावर हिंदी राष्ट्रीय भावनेचा उद्भव होऊन तिला लोकशाही स्वरूप प्राप्त झालें. जपाननें सरंजामशाही मोडून लोकशाहीचा स्वीकार केला. चीनमध्यें लोकशाहीची क्रांति झाली आणि तुर्कस्थानांतहि लोकशाहीची स्थापना करण्याचे प्रयत्न सुरू झालें. इतक्यांत १९१४ मध्यें युरोपांत अँग्लो-जर्मन महायुद्ध सुरू झालें आणि ब्रिटिश व फ्रेंच राष्ट्रांना विजय मिळाल्यास लोकशाही व राष्ट्रीय स्वयंनिर्णय यांच्या आधारावर जागतिक शांतता व संस्कृति यांची उभारणी करण्यांत येईल अशी आशा कांहीं लोकांना वाटूं लागली.

## राष्ट्रसंघ आणि लोकशाहीचा आभास

लोकशाही, राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि जागतिक शांतता यांचा पुकारा करणाऱ्या ब्रिटिश फ्रेंचांना विजय मिळाला. जर्मनी, ऑस्ट्रिया आणि तुर्कस्थान यांची साम्राज्यें नष्ट झालीं आणि युरोपांत या साम्राज्यांच्या ठिकाणीं अनेक छोटीं लोकशाही राष्ट्रें निर्माण झालीं आणि त्यांच्या संरक्षणाची हमी देणारी राष्ट्रसंघ नांवाची आंतरराष्ट्रीय संघटनाहि अस्तित्वांत आली. पण ब्रिटिश फ्रेंच यांचीं साम्राज्यें कायम राहिलीं

इतकेंच नाहीं तर तीं अधिक वाढलीं. जर्मनी व तुर्कस्थान यांचीं साम्राज्यें ब्रिटिश फ्रेंचांनीं वाटून घेतलीं व त्या प्रदेशांना राष्ट्रसंघानें ब्रिटिश फ्रेंचांना दिलेले ' मँडेट ' म्हणजे ' पाल्य प्रदेश ' असें नांव देण्यांत आलें. या प्रदेशांना सुधारून स्वतंत्र बनविण्याची अथवा तेथील लोकांचें हितरक्षण करण्याची जबाबदारी ब्रिटिश फ्रेंच राष्ट्रांवर टाकण्यांत आली. ही जबाबदारी त्यांनीं पार पाडली असें तेथील लोकांना वाटत नाहीं आणि ज्या राष्ट्रांना स्वतंत्र बनण्याचें शिक्षण देण्याची हमी या राष्ट्रांनीं घेतली होती त्यांपैकीं एकासहि त्यांनीं अद्यापि स्वातंत्र्य दिलेलें नाहीं. सीरिया, पॅलेस्टाइन, इराक हीं याचीं उत्कृष्ट उदाहरणें आहेत. हिंदुस्थानला गेल्या महायुद्धाच्या वेळीं स्वराज्य देण्याचे अभिवचन ब्रिटिशांनीं दिलें तें अद्यापि खरें केलेलें नाहीं. राष्ट्रसंघानें जपान, इटाली आणि जर्मनी यांच्या छोट्या राष्ट्रा-वरील आक्रमणास वेळींच पायबंद घातला नाहीं यामुळें त्यांच्या संर-क्षणाच्या हमीवर जी छोट्या लोकशाही राज्यांची माया युरोपांत निर्माण करण्यांत आली होती तीहि आज नष्ट झाली आहे. अशा प्रकारें गेल्या महायुद्धांतील विजयानंतर लोकशाही संस्कृतीचा प्रसार व प्रस्थापना जगभर करण्याचें जें अभिवचन विजयीं राष्ट्रांनीं जगाला दिलें होतें तें आज सर्वस्वी फोल ठरलें आहे आणि हीं राष्ट्रें लोकशाही संस्कृतीचें रक्षण करतील, करूं शकतील किंवा करूं इच्छितील यावर जगाचा आज विश्वास उरलेला नाहीं.

## राष्ट्रसंघाच्या अपयशाची मीमांसा

राष्ट्रसंघाचा प्रयोग त्याच्या स्थापनेपासून वीस वर्षांच्या आंत असा अयशस्वी झाला याचीं अनेक कारणें सांगतां येतील. त्यांपैकीं दोनतीन प्रमुख कारणांचा उल्लेख येथें केला असतां पुरे होईल. राष्ट्रसंघाचा

उद्देश युद्धें बंद पाडून जगांत शांतता प्रस्थापित करावी असा जाहीर करण्यांत आला होता. जगांत खरी शांतता नांदावयाची तर जगांतील अन्यायांचें निवारण करणें अवश्य आहे. आजच्या जगांत राजकीय अन्यायांचे मुख्यतः दोन किंवा तीन प्रकार आहेत. एकाच राष्ट्रांत भांडवलदार आणि कामगार असे दोन वर्ग निर्माण झाल्यामुळें जे अन्याय निर्माण होतात ते अन्यायांच्या पहिल्या प्रकारांत पडतात आणि एका राष्ट्राचें दुसऱ्या राष्ट्रांवर राज्य झाल्यामुळें जे अन्याय घडतात त्यांचा दुसऱ्या प्रकारांत समावेश होतो. पहिल्या प्रकारांस भांडवलशाही अन्याय आणि दुसऱ्या प्रकारास साम्राज्यशाही अन्याय असें म्हणतां येईल. याशिवाय ज्या देशांत भांडवलशाही निर्माण झालेली नाहीं अशा मागासलेल्या पण स्वतंत्र देशांत अनियंत्रित राजसत्तेपासून निर्माण होणारे अन्याय यांचा एक तिसरा प्रकार कल्पितां येईल. हा प्रकार आतां फारसा स्वतंत्र उरलेला नाहीं. कारण अशीं मागासलेलीं राज्यें आतां कोणातरी भांडवलशाही राज्यांच्या साम्राज्यशाहीच्या कक्षेंत गेलेलींच आढळतात आणि असें झालें म्हणजे त्या अन्यायांची जबाबदारी ज्या साम्राज्यशाहीच्या कक्षेंत तीं राज्यें असतील तिच्यावरच टाकणें योग्य ठरतें. उदाहरणार्थ, हिंदुस्थानांतील संस्थानिक आपल्या अनियंत्रित सत्तेचा दुरुपयोग करून जे अन्याय आपल्या प्रजेवर करतात त्याची जबाबदारी ब्रिटिश साम्राज्यशाहीवरच येऊन पडते. अशा प्रकारें जगांतील अन्यायांचीं जीं तीन प्रमुख उगमस्थानें म्हणजे ( १ ) भांडवलशाही ( २ ) साम्राज्यशाही आणि ( ३ ) अनियंत्रित राज्यपद्धति अथवा सुलतानशाही, त्यांचा विनाश करण्याची कोणतीहि योजना राष्ट्रसंघानें केलेली नव्हती. जगांतील अन्याय निवारणास किंवा लोकशाही संस्कृतीच्या प्रस्थापनेस भांडवलशाही उत्पादन पद्धति आड येत आहे याची मुळींच जाणीव राष्ट्र-

संघाच्या प्रस्थापकांस नव्हती. साम्राज्यशाही नष्ट झाली पाहिजे ही गोष्ट त्यांना समजली होती पण ती नष्ट करण्याची त्यांची ताकद नव्हती. ब्रिटिश व फ्रेंच राष्ट्रें विजयी झालीं होतीं आणि तीं राष्ट्रें अथवा त्या राष्ट्रांतील भांडवलदारवर्ग आपलीं साम्राज्यें वाढविण्यास उद्युक्त झाला होता. त्यापासून त्यांस परावृत्त करण्याची शक्ति राष्ट्र-संघापाशीं नव्हती तेव्हां त्यांच्या साम्राज्यविस्तारास 'मॅंडेट' असें नांव देऊन मान्यता देण्यांत आली आणि त्यांच्या पूर्वींच्या साम्राज्यांचा प्रश्न अंतर्गत आहे व त्यांत राष्ट्रसंघानें हात घालूं नये असें ठरविण्यांत आलें. याचा उघड अर्थ असा झाला कीं, पराभूत राष्ट्रांचीं साम्राज्यें मोडून तीं विजयी राष्ट्रांनीं बळकावलीं. यावर ब्रिटिश मुत्सद्यांचें असें म्हणणें आहे कीं आम्ही आमच्या साम्राज्यांतील लोकांना लोक-शाहीचें शिक्षण देऊन हळूंहळूं स्वतंत्र करणार आहों म्हणून आमची साम्राज्यशाही इतर साम्राज्यशाह्यांहून श्रेष्ठ आहे, पण तसें त्यांच्या साम्राज्यांत नांदणाऱ्या परतंत्र राष्ट्रांना वाटत नाहीं. आजचें महायुद्ध निर्माण होण्याचीं कारणें या ब्रिटिश व फ्रेंच साम्राज्यांचा जो विस्तार गेल्या महायुद्धानंतर झाला व ज्याला राष्ट्रसंघानें मान्यता दिली त्यांतच पेरिलीं गेलीं याबद्दल आतां कोणासहि शंका उरलेली नाहीं. अशा प्रकारें जगांतील अन्यायांची कारणें कायम ठेऊन शांतता प्रस्थापित करण्याचा करण्यांत येणारा हा प्रयोग अयशस्वी होणार हें भविष्य राष्ट्रसंघाच्या प्रस्थापनेच्या वेळींच विचारी लोकांनीं केलें होतें व तें आज खरें ठरलें आहे. ज्या मुत्सद्यांनीं राष्ट्रसंघ स्थापन केला आणि त्याची घटना ठरविली त्यांनाहि आपला प्रयोग अयशस्वी होणार असें दिसत असलेंच पाहिजे पण तो इतक्या थोड्या वेळांत अयशस्वी होईल, म्हणजे इतक्या थोड्या वेळांत पुनः जागतिक महायुद्ध निर्माण होईल अशी मात्र त्यांची अपेक्षा नसावी. आपलीं साम्राज्यें वाढविण्याचा

हा एक प्रच्छन्न प्रयोग आहे-या बुद्धीनें ज्यांनीं त्यांत भाग घेतला त्यांच्या हेतूच्या दृष्टीनेंहि त्यांचा हा प्रयोग निदान आणखी वीस पंचवीस वर्षें तरी टिकावयास हवा होता. म्हणजे आम्ही न्यायप्रस्थापना केली नाहीं तरी आपल्या राष्ट्रांचा स्वार्थ तरी साधला असें त्यांना मानतां आलें असतें पण त्याही दृष्टीनें त्यांचा प्रयोग अयशस्वी झाला आहे. यावरून उघड स्वार्थबुद्धीनें केलेल्या साम्राज्यशाहीप्रमाणें न्याय प्रस्थापनेच्या व जगत्कल्याणाच्या मिषानें केलेली साम्राज्यशाहीहि टिकण्याचा काळ आतां उरलेला नाहीं असें दिसून येतें.

## राष्ट्रीय भावनेची विकृति

दुसऱ्या एका दृष्टीनें या प्रश्नाचा विचार करतां येतो. युरोपांतील प्रबल राष्ट्रांचें निःशस्त्रीकरण करून तेथें एक संयुक्त राज्य स्थापन झाल्याखेरीज ही महायुद्धांची आपत्ति टळणार नाहीं असें पुष्कळ लोक बोलत आहेत. ज्याप्रमाणें दारूच्या बंदुकी व तोफा निघाल्या नंतर सरंजामदारांचें निःशस्त्रीकरण करणें अवश्य झालें त्याचप्रमाणें आजचीं भयंकर संहारसाधनें निघाल्यामुळें राष्ट्रांचें निःशस्त्रीकरण करून एक जागतिक राज्य स्थापणें आज अवश्य झालें आहे व त्याची पहिली पायरी म्हणून सर्व युरोपचें संयुक्त राज्य व त्यांतील घटकांचें निःशस्त्रीकरण या योजनेचा पुरस्कार केला जात आहे. पण तसें व्हावयाचें तर राष्ट्रीय भावनेच्या पुढें जगाची प्रगति झाली पाहिजे. लोकशाहीच्या संरक्षणास साम्राज्यशाही आड येत आहे आणि ही साम्राज्यशाही म्हणजे राष्ट्रीय भावनेचीच विकृति आहे हें मान्य केल्याशिवाय हा प्रश्न सुटत नाहीं. व्यक्तिहित किंवा वर्गहित यापेक्षां राष्ट्रहित श्रेष्ठ या स्वरूपाची राष्ट्रभावना लोकशाहीला पोषक आहे तितकीच आपल्या राष्ट्राच्या स्वार्थासाठीं इतरांना लुबाडणें समर्थनीय आहे ही

विकृत राष्ट्रभावना लोकशाहीला मारक होत आहे. युरोपीय राष्ट्रांतील विकृत राष्ट्रभावनाच आज त्यांचा व त्यांच्यांतील लोकशाही संस्कृतीचा विध्वंस करीत आहे.

### लोकशाहीला नवा आधार हवा

युरोपीय राष्ट्रांनीं आपल्या लोकशाहीला मांडलशाहीचें आणि राष्ट्रीय भावनेला साम्राज्यशाहीचें जें अमंगल स्वरूप दिलें आहे, त्यामुळें हीं मंगल ध्येयेंच कांहीं लोकांना अमंगल वाटूं लागलीं आहेत. पण ही विचारसरणी योग्य नसून त्यांना प्राप्त झालेलें आजचें अमंगल विकृत स्वरूप नष्ट करून राष्ट्रीय बंधुभावनेवर आधारलेली खरी लोकशाही आणि आंतर राष्ट्रीय बंधुभावनेशीं अविरोधी अशी राष्ट्रीय भावना निर्माण करणें हाच जगाच्या प्रगतीचा खरा मार्ग आहे. हा मार्ग अनुसरून जगाची प्रगति साधावयाची तर न्यायप्रस्थापनेचें साध्य गाठण्याचें शस्त्रबलाहून श्रेष्ठ आणि केवळ बुद्धिबलाहून अधिक प्रभावी असें साधन जगानें शोधून काढिलें पाहिजे. तें आपण शोधून काढिलें आहे असा विश्वास ज्या सत्याग्रहींना वाटत आहे त्यांना लोकशाही संस्कृति टिकविण्यास आपणच समर्थ आहों अशी श्रद्धा आज वाटत आहे.

---

## अनियंत्रित सत्ता विरुद्ध लोकशाही : : ३

### अनियंत्रित सत्तेचे नवे प्रकार

अनियंत्रित राजसत्तेचे अनेक प्रकार आहेत. व्यक्तिसत्ता, गटसत्ता, वर्गसत्ता आणि पक्षसत्ता असे अनियंत्रित सत्तेचे वर्ग कल्पितां

येतील. एकाच व्यक्तीची अनियंत्रित सत्ता अशी फारच क्वचित् आढळून येते आणि जेथें बाह्यतः तशी परिस्थिति दिसत असेल तेथेंहि ती पूर्णपणें अनियंत्रित अशी वस्तुतः नसते. सामान्यतः अनियंत्रित व्यक्तिसत्ता ही समाजांतील एखाद्या लहानशा गटाची सत्ता असते आणि या गटालाहि एकंदर समाजाच्या, व विशेषतः तो ज्या वर्गांतील असेल, त्या वर्गाच्या नियंत्रणांतून मुक्त राहतां येत नाहीं. प्राचीन वा मध्ययुगीन काळांत राजांची सत्ता अनियंत्रित होती असें लोक म्हणतात पण या राजांची सत्ता निरनिराळ्या सरदारांत विभागलेली असून त्या सरदार वर्गाच्या हातींच खरी राजसत्ता असे असें म्हणणें वस्तुस्थितीला अधिक धरून होईल. जेव्हां एखादी असामान्य पराक्रमी व्यक्ति राजपदावर आरूढ असेल तेव्हां कांहीं काल अनियंत्रित राजसत्ता त्यावेळीं अस्तित्वांत येई. नाहींतर सामान्यतः सरदार वर्गाच्या अथवा त्यांतील एखाद्या गटाच्या हातीं ती सत्ता असे. शिवाय या सरदार वर्गाचीहि सत्ता पूर्णपणें अनियंत्रित नसे. समाजाचीं व धर्माचीं, ग्रामसंस्थांचीं व जातिसंस्थांचीं अनेक बंधनें त्यांना पाळावीं लागत असून तत्कालीन राजांना आंतले व बाहेरचे शत्रू सहज पदभ्रष्ट करूं शकत असत. राज्यक्रांति ही त्यावेळीं फारशी अवघड गोष्ट नव्हती आणि कोणाहि कर्तबगार व्यक्तीला सैनिकाचा सरदार आणि सरदाराचा राजा बनणें अशक्य नव्हतें. शिवाय समाजाच्या आर्थिक, सामाजिक व धार्मिक व्यवहारांत अनियंत्रित गणलेले राजेहि फारशीं ढवळाढवळ करूं शकत नसत आणि त्यांची जुलुम करण्याची साधनें फारच मर्यादित होतीं. तथापि या काळांत राजसत्ता लोकांच्या किंवा समाजाच्या हातीं नसून सरदार वर्गाच्या हातीं होती असे म्हणणेंच युक्त ठरतें. या काळास सरंजामशाही युग असें आज आपण म्हणतों. मनुष्य जातीच्या ज्ञात

इतिहासांतील बराच मोठा भाग या सरंजामशाही युगांतच पडतो, व तो एक अनियंत्रित वर्गसत्तेचाच प्रकार आहे.

याहून राज्यघटनेचा भिन्न प्रकार आधुनिक युरोपांत लोकशाहीच्या नांवानें इंग्लंड, फ्रान्स प्रभृति राष्ट्रांत निर्माण झाला. त्याचा इतिहास मागील प्रकरणांत थोडक्यांत दिला आहे. १९१४ ते १९१९ पर्यंत जें युरोपीय महायुद्ध झालें त्याच्यापूर्वी लोकशाही राज्यपद्धति सर्वमान्य होऊं लागली होती आणि त्या महायुद्धानंतर युरोपांतील जर्मनी ऑस्ट्रिया, तुर्कस्थान हीं अनियंत्रित साम्राज्यें मोडून त्यांच्या जागीं अनेक छोटीं लोकशाही राज्यें राष्ट्रसंघाच्या संरक्षणाखालीं स्थापण्यांत आलीं तेव्हां निदान युरोपखंडापुरतें तरी लोकशाही राज्यांचें युग कायमचे निर्माण होणार असें कांहीं लोकांना वाटलें. तथापि याचवेळीं रशियांत सोव्हिएट राज्यपद्धति या नांवाची एक आणि पुढें लवकरच इटालींत फॅसिस्ट नांवाची दुसरी अनियंत्रित राजसत्ता अस्तित्वांत आली. कांहीं काळ युरोपांतील निरनिराळ्या देशांत या दोन राज्यपद्धतींच्या पुरस्कर्त्यांच्या झटापटी झाल्या आणि आज इंग्लंड, फ्रान्स हे दोन देश वगळल्यास फॅसिस्ट स्वरूपाची अनियंत्रित राजसत्ता सर्वत्र विजयी झालेली दिसत आहे. नाझी पक्षसत्ता हा फॅसिस्ट पद्धतीचाच एक प्रकार आहे. फॅसिस्ट किंवा नाझी अनियंत्रित सत्ता ही एक पक्षसत्ता आहे असे तिचे पुरस्कर्ते म्हणतात आणि या पक्षसत्तेच्या बुडाशीं एक वर्गसत्ता असल्याचें दिसून येतें. पण 'फॅसिझम' किंवा 'नाझीझम' यांचें जाहीर ध्येय अनियंत्रित वर्गसत्ता हें नसून अनियंत्रित पक्षसत्ता हेंच त्यांचें ध्येय आहे. याच्या उलट कम्यूनिझमचें तात्कालिक ध्येय वर्गसत्ता हें आहे पण या वर्गसत्तेचें मूर्त स्वरूप अनियंत्रित पक्षसत्ता असें बनलेलें आहे. हा तात्विक मतभेद सोडून दिल्यास व्यवहारतः कम्यूनिझम् व फॅसिझम् हें दोन्हीहि सांप्रदाय निरनिराळ्या हेतूंनीं व

निरनिराळ्या दृष्टींनीं आज अनियंत्रित पक्षसत्तेचेच भोक्ते वा पुरस्कर्ते बनलेले आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. लोकशाहीला प्रतिस्पर्धी असे आजच्या जगांत हेच दोन राज्यपद्धतींचे प्रकार असून लोकशाही नष्ट झाल्यास या दोहोंपैकींच कोणत्या तरी एका प्रकारची अनियंत्रित पक्षसत्ता आपल्या देशांत अस्तित्वांत येईल असें लोकांनीं समजण्यास हरकत नाहीं.

## कम्युनिझम व फॅसिझम यांतील भेद

फॅसिझम् आणि कम्यूनिझम् हे दोन्हीहि अनियंत्रित पक्षसत्तेचे पुरस्कर्ते असले तरी त्यांच्या ध्येयांत आणि व्यवहारांत जमीनअस्मानाइतकें अंतर आहे हें विसरून चालणार नाहीं. तसेंच लोकशाहीच्या ध्येयाचे हे दोन्ही सारखेच शत्रु आहेत असेंहि म्हणतां येणार नाहीं. फॅसिझम् हाच लोकशाहीच्या सामाजिक व आर्थिक समतेचा आणि मानवी स्वातंत्र्याचा ध्येयदृष्ट्या खरा विरोधी असून कम्यूनिझम्ला ही सर्व ध्येयें तत्त्वतः मान्य आहेत. मात्र ही ध्येयें अस्तित्वांत येण्याच्या दृष्टीनें भांडवलशाही नष्ट झाली पाहिजे आणि ती नष्ट होईपर्यंत कामगारवर्गाची अनियंत्रित सत्ता शेतकरी-वर्गाच्या साह्यानें प्रस्थापित केली पाहिजे असें कम्यूनिझम्चें मत आहे. भांडवलप्रधान देशांतील लोकशाही ही खरी लोकशाही नसून तिच्या आश्रयानें देशांतील कष्टजीवी बहुजन समाजाला आपला उद्धार करून घेतां येणार नाहीं म्हणून ही खोटी लोकशाही नष्ट केली पाहिजे व कांहीं काळ जगांत अनियंत्रित कामगारशाही स्थापन केली पाहिजे म्हणजे खरी लोकशाही निर्माण होईल असें कम्यूनिझम्चें म्हणणें आहे. अशा प्रकारें खऱ्या लोकशाहीच्या प्रेमानेंच ते आजच्या खोट्या लोकशाहीचे वैरी बनले आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. तथापि त्यांना अभि-

प्रेत असणारा एकवर्ग समाज स्थापन करण्याची क्रांति आजच्या लोकशाही राज्ययंत्रामार्फत कोणी करून दाखवील अथवा तसें सिद्ध करील तर त्यांचा लोकशाहीला असणारा तात्कालिक विरोधहि नष्ट होईल. पण फॅसिझम्चें तत्त्वज्ञान याहून अगदीं भिन्न आहे. त्याचा सामाजिक व आर्थिक समता आणि एकवर्ग समाज या ध्येयांनाच विरोध असून लोकशाहीचेंहि ध्येय त्यांना तत्त्वतःच अमान्य आहे. आजच्या समाजांतील वर्गपद्धति हीच नैसर्गिक असून मानवसंस्कृतीच्या रक्षणास तिची आवश्यकता आहे असें त्यांचें म्हणणें आहे. वर्गसंस्था नष्ट झाल्यास धर्म, राज्य, राष्ट्र या परंपरागत सर्व संस्था व उच्च भावना नष्ट होतील. समाजाचें नेतृत्व श्रेष्ठांच्या हातीं न राहतां हीन संस्कृतीच्या अज्ञान लोकांच्या हातीं तें जाईल आणि अनेक शतकांच्या किंवा संस्कारांच्या परिश्रमांनीं निर्माण केलेली मानव संस्कृति नष्ट होईल. यासाठीं सामाजिक समता, राजकीय लोकशाही अथवा आर्थिक समाजसत्ता हीं ध्येयेंच समूळ नष्ट केली पाहिजेत. श्रेष्ठ आणि समर्थ लोकांसंबंधीं कनिष्ठ आणि दुर्बल लोकांना वाटणाऱ्या या असूयेंतून या भ्रष्ट ध्येयांचा जन्म झाला असून त्यांना विजय झाल्यास सर्वांचाच नाश होणार आहे.

## फॅसिझमचे हेत्वाभास

वरील विचारसरणी ही लोकशाही विचारांच्या अगदीं विरुद्ध असल्यानें तिच्यांतील हेत्वाभास प्रथम विशद करूं. समाजांतील श्रेष्ठ लोकांच्या हातीं त्याच्या नियंत्रणाची सत्ता असावी हें मत लोकशाहीच्या पुरस्कर्त्यांना मान्य नाहीं किंवा समाजांतील निरनिराळ्या व्यक्तींत श्रेष्ठ कनिष्ठ भाव मानूं नये अथवा समाजनियंत्रण करण्याचें कार्य कोणत्याहि व्यक्तीस सारखेंच साधेल अशीं त्यांचीं मतें आहेत असें

नाहीं. पण समाजाचें नियंत्रण करण्याची पात्रता कोणाच्या अंगीं आहे हें कसें ठरवावें आणि त्याची ती पात्रता समाजाला हितप्रद कशी होईल या संबंधींच काय तो लोकशाहीच्या पुरस्कर्त्यांचा इतरांशीं मतभेद आहे. आपला राज्यकारभार करण्यास कोण लायक आहेत तें लोकांनीं ठरवावें, म्हणजेच राज्यकारभार करणारे नेते लोकांनीं निवडावेत आणि ते लोकांना जबाबदार असावेत येवढेंच लोकशाहीच्या पुरस्कर्त्यांचें म्हणणें असतें. हा मार्ग सोडून दिला तर राज्यकारभार करण्यास किंवा कायदे करून राज्याचें नियंत्रण करण्यास लागणारे श्रेष्ठ गुण कोणाच्या अंगीं आहेत हें ठरविण्यास विशिष्ट विद्येंतील प्राविण्य अथवा विशिष्ट संपत्तीची मालकी अशा कांहींतरी कसोटी ठरवाव्या लागतील. पण या सर्व कसोटी किती निरुपयोगी अथवा हानिकारक आहेत तें इतिहासांत अनेक वर्षांच्या अनुभवानें सिद्ध झालें आहे. विशिष्ट कुलांत जन्म पावण्यानें किंवा विशिष्ट धनार्जन करण्यानें मनुष्य त्या समाजाचें नियंत्रण करण्यास पात्र ठरतो हा युक्तिवाद आज कोणासहि पटणें शक्य नाहीं. धनार्जन करण्याला निरनिराळ्या समाजांत निरनिराळ्या प्रकारचे गुण लागत असतात हें खरें असलें तरी ते गुण आणि समाजाचें नियंत्रण करण्यास लागणारे गुण यांचा कांहीं संबंध नाहीं; किंबहुना आजच्या समाजांत ज्यांना इतरांहून अधिक धनार्जन करतां येतें त्यांच्या हातीं राज्याचीं सूत्रें देणें हें समाजांतील अन्यायांस प्रोत्साहन देण्यासारखेंच होणार आहे. लोकशाही पद्धतींतहि अशा लोकांच्या हातींच राज्याचीं सूत्रें जात आहेत हा तर आजच्या लोकशाहीवर मोठा आक्षेप आहे. पण राज्यकारभार लोकांना जबाबदार न ठेवितां तो धनार्जनाच्या कार्यांत यशस्वी ठरलेल्यांच्या हातींच दिला तर चोरांच्या हातीं जामदारखान्याच्या किल्ल्या दिल्यासारखेंच होणार नाहीं काय? आजच्या समाजांत तरी धनार्जनाची पात्रता आणि

समाजहितबुद्धि यांचें प्रमाण व्यस्त असण्याचाच संभव अधिक आहे आणि राज्यकारभारावर नियंत्रण करणाऱ्यांपाशीं तर समाजहितबुद्धि विशेष विकास पावलेली असली पाहिजे. लोकांचा विश्वास संपादन करणें आणि टिकविणें हीच याची खरी कसोटी गणणें योग्य आहे.

## राज्यकर्त्यांची पात्रता व लोकशाही

केवळ विद्वत्ता हीहि राज्यकारभार करण्याची किंवा त्याचें नियंत्रण करण्याची पात्रता ठरूं शकत नाहीं. पुष्कळ वेळां विद्वत्ता आणि व्यवहारज्ञान यांची फारकत झाल्याचें दिसतें आणि ' मणिना भूषितः सर्पः किमसौ न भयंकरः ' या सुभाषितांत म्हटल्याप्रमाणें अनेक विद्वान् मणिविभूषित सर्पाप्रमाणें जनतेला चावा घेण्यासहि कचरत नाहींत. तेव्हां केवळ विद्वत्ता हीहि राजकीय नेतृत्वाची पात्रता सिद्ध करूं शकत नाहीं. विद्वत्तेप्रमाणें केवळ साधुत्व हेंहि समाजाच्या राजकीय नेतृत्वास पुरेसें पडूं शकत नाहीं. राजकीय नेत्याला सदसद्विवेकाप्रमाणें, शक्याशक्यतेचाहि विवेक करावा लागतो आणि आपलीं मतें बनविण्याच्या कलेप्रमाणें इतरांचीं मतें सहिष्णुतेनें व सहानुभूतीनें समजून घेण्याचीहि कला अवगत असावी लागते. तसेंच आपलीं मतें लोकांना पटवून देण्याची व लोकांचा विश्वास संपादन करण्याची पात्रताहि राजकीय नेत्यापाशीं असावी लागते. ही पात्रता ओळखण्यास लोकशाही पद्धतीविना दुसरी कोणतीहि समाधानकारक कसोटी अद्यापि अवगत झालेली नाहीं. राज्यकारभाराचें नियंत्रण करणारांच्या अंगीं विद्वत्ता किंवा साधुत्व हे गुण नसावेत असा मात्र या विवेचनाचा कोणी अर्थ करूं नये. यांपैकीं साधुत्वाची निर्विवाद बाह्य कसोटी कांहींच सांगतां येत नाहीं आणि विद्वत्तेची कसोटी लावतां आली तरी राजकीय नेतृत्वाच्या दृष्टीनें ती उपयोगी पडण्यासारखी नसते. या दृष्टीनें

लोकशाही राज्यांतील सामान्य राष्ट्रिकांना राष्ट्रिक नीतीचें शक्य तितकें उत्कृष्ट शिक्षण देणें, सामाजिक परिस्थितीची सुधारणा करून सत्पात्र आणि सद्‌गुणी लोकांना समाजांत मानमान्यता मिळेल असे प्रयत्न करणें आणि केवळ कुल वा संपत्ति हें गुणांचें अधिष्ठान नसतें हें ओळखून कुलजाति-धर्म-वित्त यांचा विचार न करतां केवळ गुणांकडे लक्ष देऊन वर्तन करण्याची प्रवृत्ति लोकांत वाढविणें हाच एक खरा मार्ग आहे. हेंच राष्ट्रिकांचें शीलसंवर्धन असून हें जितक्या प्रमाणांत होईल, तितक्या प्रमाणांत लोकशाही राज्यपद्धति अधिकाधिक फलप्रद अथवा हितप्रद होत जाईल. समाजनियंत्रणाचें कार्य खऱ्या श्रेष्ठांच्या हातीं जाण्याचा हाच एक मार्ग आज दिसत असून इतर मार्ग याहून अधिक हीन ठरले आहेत.

## अनियंत्रित सत्ताधाऱ्यांची भ्रष्टता

दुसऱ्या एका दृष्टीनें, लोकहित साध्य करण्याच्या दृष्टीनें, लोकशाही राज्याचें श्रेष्ठत्व सिद्ध करतां येतें. राज्यकारभार करण्याच्या दृष्टीनें समाजांतील कोण व्यक्ति श्रेष्ठ आहेत हें ठरलें तरी त्या व्यक्तींना अनियंत्रित सत्ता उपभोगूं देणें धोक्याचें आहे कारण अनियंत्रित व बेजबाबदार सत्तेच्या उपभोगानें श्रेष्ठ व्यक्तींहि भ्रष्ट बनतात असा अनुभव आहे. शिवाय राज्यकारभार चालविण्याची कला केवळ सद्‌बुद्धीनें किंवा केवळ शहाणपणानें अवगत होऊं शकत नाहीं. सद्‌बुद्धि असली तरी शहाणपण असावें लागतें आणि सद्‌बुद्धि आणि शहाणपण हे दोन्हीहि गुण असले तरी लोकांचें मनोगत, लोकांच्या वासना, लोकांच्या गरजा आणि लोकांच्या अभिरुचि यांचें ज्ञान असावें लागतें. तसेंच लोकांवर आपलें नैतिक प्रभुत्व प्रस्थापित करण्याचें आणि आपल्या सद्‌बुद्धीनें लोकांची सद्‌बुद्धि व आपल्या शहाण-

पणानें लोकांचें शहाणपण जागृत करण्याचें सामर्थ्यहि राजकीय नेत्यांपाशीं असावें लागतें. हें सामर्थ्य ज्यांच्यापाशीं जितकें असेल तितक्या प्रमाणांत त्यांना आपल्या नैतिक व बौद्धिक शक्तीनें लोकांचा कारभार करतां येतो आणि लोकांना तो प्रिय होऊन ते त्याला निष्ठा दाखवितात. अशा राज्यकारभारांत सक्तीचा वा शास्त्रबलाचा उपयोग फारसा करावा लागत नाहीं आणि लोकांवर जुलूम होण्याचा संभव त्या प्रमाणांत नाहींसा होतो. पण राज्यकारभार करणारांच्यापाशीं नैतिक शक्तीनें राज्य करण्याचें हें सामर्थ्य आहे किंवा नाहीं हें वरचेवर पडताळून पाहावें लागतें व तें पडताळून पाहण्याचा मार्ग त्यांनीं पुनः पुनः लोकांकडून निवडून यावें आणि लोकांना त्यांच्या कारभारावर टीका करण्याचें व त्यांच्या विरोधी मतें व पक्ष संघटित करण्याचें पूर्ण स्वातंत्र्य असावें हाच आहे. जर अशा उघड निवडणुकींत त्यांचा पराभव झाला आणि विरोधी पक्षाचा विजय झाला तर नैतिक शक्तीनें राज्यकारभार करण्याचें त्यांचें सामर्थ्य उरलें नाहीं असें तितक्यापुरतें मान्य करणें भाग आहे. अनियंत्रित सत्ता उपभोगणाराच्या अंगचें हें नैतिक सामर्थ्य नष्ट होत असतें. राज्यकारभारावर आरूढ होतांच समाजाचें शस्त्रबल हातीं येतें आणि त्याचा उपभोग घेऊं लागल्यानंतर आत्मबलाचा उपयोग करण्यापेक्षां सत्तेच्या व सक्तीच्या साधनांनीं आपले उद्देश सिद्धीस नेण्याची संवय लागते. ही संवय आत्मबल नष्ट करते कारण कोणतेंहि बल अनुपयोगानें कमी होतें असा सार्वत्रिक अनुभव आहे. हें आत्मबल कमी झालें कीं सद्‌बुद्धि विकृत बनते आणि सदसद्विवेक शक्ति भ्रष्ट होते. यासाठीं राजसत्ता धारण करणारांनीं पुनः पुनः ती स्वेच्छेनें सोडून द्यावी आणि लोकांच्या प्रसादानें ती पुनः प्राप्त करून घेण्यास सज्ज व्हावें असा लोकशाहीचा सिद्धांत आहे.

## अनियंत्रित सत्ता व समाजाची शील भ्रष्टता

पण अनियंत्रित सत्तेमुळें केवळ सत्ताधारीच भ्रष्ट होतात असें नाहीं तर सत्ताधाऱ्यांप्रमाणे किंबहुना त्यांच्यापेक्षांहि प्रजाजन अधिक भ्रष्ट होत असतात. त्यांच्यावर अन्याय होतो हा एकच अनियंत्रित सत्तेचा दुष्परिणाम नसून त्याहून अधिक भयंकर असा परिणाम म्हणजे प्रजाजनांची न्यायबुद्धी विकृत बनते हा होय. सत्ताधाऱ्यांनीं केलेल्या अन्यायी कृत्यांचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य नसल्यानें त्यांच्या अन्यायांपुढें मान वाकविण्याची किंबहुना त्यांच्या अन्यायांना न्याय म्हणण्याचीहि वृत्ति अनियंत्रित सत्तेखालीं नांदणारांच्या अंगीं बाणूं लागते. प्रजाजनांच्या न्यायबुद्धीची तीक्ष्णता बोथट बनण्याइतका अधिक भयंकर व समाजाला हानिकारक दुसरा कोणताहि परिणाम असूं शकणार नाहीं. सत्ताधारी आणि सत्तेपुढें नमणारे अशा उभयतांचा नैतिक अधःपात थांबविण्यास प्रजेला आपल्या राज्यकर्त्यांवर टीका करण्याचा व त्यांना पदभ्रष्ट करण्याचा शांततेचा मार्ग उपलब्ध असला पाहिजे आणि लोकशाही राज्यपद्धतीचा तो एक प्रमुख उद्देश आहे. न्यायअन्यायाचा निर्णय करण्याची शक्ति समाजांत नित्य जागृत राहिली पाहिजे आणि या बलाचा उपयोग करण्याचें स्वातंत्र्य प्रत्येकास असलें पाहिजे, तरच राज्यांत होणारे अन्याय प्रकाशांत येतील व त्यांचें निवारण करण्याच्या उपायांचें संशोधन होत राहील. समाजांत कोणत्याहि अवस्थेंत पूर्ण न्यायाची प्रस्थापना झालेली नसते. कारण एक तर पूर्ण न्यायाचें संशोधनहि झालेलें नसतें आणि जें संशोधन झालेलें असतें त्याच्या प्रस्थापनेचे उपाय समजलेले नसतात आणि दुसरें असें कीं न्यायाच्या प्रस्थापनेच्या आड येणारांचें निवारण करण्याची प्रत्येक राज्याची शक्तिहि मर्यादित असते. तेव्हां अनि-

यंत्रित सत्ताधारी वर्ग किंवा व्यक्ति यांच्यापाशीं सद्बुद्धी व शहाणपण आहे असें गृहीत धरलें तरीहि त्यांच्या हातून अन्याय होणें अपरिहार्य ठरतें. अर्थात् समाजांतील न्यायसंशोधनाचें कार्य बंद पडल्यास हे अन्याय वाढत जातात व राज्यकर्ते व प्रजाजन या दोघांचाहि अधःपात वेगानें होऊं लागतो. याचे परिणाम जुलूम, जबरदस्ती, अन्याय, बंडाळी, अशांतता व अनवस्था हेच होणार. अन्यायाला राजसत्तेच्या पाठींब्यानें न्याय ठरविण्यांत येत आहे हें पाहून लोकांतील जुलमाची व सक्तीची प्रवृत्ति बळावते आणि 'बळी तो कान पिळी' हाच न्याय रूढ होतो. यालाच जंगली कायदा किंवा मात्स्य न्याय असें म्हणतात. तेव्हां समाजांतील न्यायबुद्धी प्रखर आणि प्रज्वलित ठेवणें आणि न्यायसंशोधनाचें कार्य सतत चालू ठेवणें हें समाजहिताच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यक आहे. ही आवश्यक परिस्थिती अनियंत्रित राजसत्तेखालीं—मग ती व्यक्तीची असो, वर्गाची असो किंवा पक्षाची असो—टिकूं शकत नाहीं.

मात्र ही आवश्यक परिस्थिती केवळ लोकशाही राज्ययंत्र प्रस्थापित झाल्यानें आपोआप निर्माण होऊं शकेल असे नाहीं. हें राज्ययंत्र निर्माण होत असतां आणि निर्माण झाल्यावर समाजांत न्यायनिष्ठा, न्यायजिज्ञासा आणि न्यायसंवेदन शक्ति निर्माण करणारे, ती संघटित करणारे आणि आपल्या चारित्र्यानें तिला प्रभावी बनविणारे लोकनायक निर्माण व्हावे लागतात. असे लोकनायक निर्माण होण्यास लोकशाही राज्ययंत्र हें एक महत्वाचें अनुकुल कारण आहे, पण तें पुरेसें नाहीं. लोकशाहीचें सामाजिक ध्येय त्याच्या इतर संस्थांतहि व्यक्त होत असलें पाहिजे.

## न्यायसंशोधनाची अखंड आवश्यकता

सामाजिक न्यायसंशोधन ही एक भौतिक विद्येंतील सत्यसंशोधनासारखी अशी क्रिया आहे कीं ती कधींहि पूर्ण होत नाहीं आणि ती अविरत चालू राहिल्याखेरीज समाजाला सुख, स्वास्थ्य आणि शांति यांचा खरा लाभ होणार नाहीं. यासाठीं समाजाच्या प्रत्येक व्यवहारावर आणि विशेषतः त्याच्या राजकीय व्यवहारांवर अनुकूल प्रतिकूल टीकेचा प्रकाश पडत राहिला पाहिजे. अनियंत्रित सत्तेखालीं ही गोष्ट शक्य नसते आणि लोकसत्तेखालीं ते शक्य असतें. केवळ ज्ञात सत्याची प्रस्थापना करणें हेंच समाजाचें कर्तव्य आहे आणि समाजांतील विशिष्ट व्यक्तीला किंवा पक्षाला सामाजिक सत्याचें पूर्णज्ञान झालेलें आहे असें गृहीत धरल्यास या न्यायसंशोधन क्रियेच्या सातत्याची तितकीशी आवश्यकता उरणार नाहीं. असें असतें तर ज्यांना तें संपूर्ण सत्य अवगत झालें असेल त्यांच्या हातीं सत्ता दिली आणि ते समाजहितदक्ष असले म्हणजे राज्यसंस्था योग्य प्रकारें चालेल असें मानतां आलें असतें. पण वस्तुस्थिति तशी नाहीं. सामाजिक सत्य हें नित्य संशोधनगम्यच असतें आणि त्याचें योग्य प्रकारें ज्ञान होण्यास समाजांतील प्रत्येक प्रौढ व्यक्तीला आपल्या अनुभवाप्रमाणें व बुद्धिप्रमाणें सार्वजनिक विषयांवर आपलें मत बनवून हें संशोधन करण्याचें स्वातंत्र्य असणें अवश्य असतें. याचा अर्थ प्रत्येक व्यक्तीला आपल्या अनुभवावरून योग्य मतें बनवितां येतात किंवा सर्वांच्या अंगीं ही शक्ति सारखीच असते असा नाहीं. सार्वजनिक लोकमत म्हणून ज्याला आम्ही म्हणतों तें नित्य पालटत असतें आणि त्यांत अनेक परस्परविरोधी प्रवाह असतात. ते पालटण्यांत आणि त्या सर्व प्रवाहांना आपल्या मतांप्रमाणें दिशा लावण्याचा हक्क प्रत्येकास असावा येवढेंच लोकशाहीच्या पुर-

स्कर्त्यांचें म्हणणें असतें. हा हक्क सर्वांना दिल्यानें सर्वच त्याचा सारख्याच प्रमाणांत उपभोग घेतील किंवा घेऊं शकतील असें नाहीं. तसेंच जे या हक्काचा उपभोग घेतील ते सार्वजनिक लोकमताच्या प्रवाहाला आपल्या मताप्रमाणें वळण लावण्यांत सारखेच यशस्वी होतील असेंहि नाहीं. पण तसा हक्क सर्वांना असला म्हणजे समाजांतील न्यायबुद्धि अधिकांत अधिक कार्यक्षम राहील, ज्यांच्या अंगीं ती विशेष प्रमाणांत असेल त्यांच्या नेतृत्वाचा लाभ समाजाला मिळेल व लोकमताचा प्रवाह अधिक शुद्ध बनेल अशी अपेक्षा आहे. भौतिक सत्याप्रमाणें सामाजिक न्यायाचें संशोधनहि सर्व लोक करूं शकत नाहींत तथापि प्रत्येकानें आपल्या अनुभवाप्रमाणें आणि बुद्धिप्रमाणें सार्वजनिक विषयांवर मतें बनविण्याचा व तीं व्यक्त करण्याचा प्रयत्न केल्यास समाजस्थितीवर प्रकाश पडतो आणि ज्यांच्या अंगीं स्वतंत्र मतें बनविण्याचें सामर्थ्य असतें त्यांना त्या प्रकाशांत आपलीं मतें तपासतां येऊन शुद्ध बनवितां येतात.

## न्याय संशोधनांतील अडथळे

भौतिक विद्येच्या सत्यसंशोधनांत व न्याय संस्थापनांत एक फार मोठा फरक आहे. भौतिक प्रश्नांपेक्षां सामाजिक प्रश्न अधिक संकीर्ण, संदिग्ध आणि अनिश्चित फलें देणारें असतात. तसेंच या प्रश्नांशीं निरनिराळ्या वर्गांचें हितसंबंध निगडित झालेले असल्यानें त्यांची चर्चा व निर्णय निर्विकार, निरहंकार आणि निःपक्षपाती वृत्तीनें करण्याची मनुष्यांची तयारी नसते आणि न्यायबुद्धी देईल तो निर्णय मान्य करण्यासहि मनुष्यें तयार नसतात. उलट स्वार्थाला, अहंकाराला अथवा परंपरेला बळी पडून अन्यायाला प्रोत्साहन देतात, प्रवृत्त होतात किंवा अन्यायालाच न्याय मानूं लागतात. बुद्धीवरील

राजस व तामस गुणांच्या आवरणांचा हा परिणाम आहे आणि समाजाच्या बुद्धीवरील हीं आवरणें दूर होऊन तिला शुद्ध सात्त्विक स्वरूप प्राप्त झाल्याविना लोकशाही समाजाचें व्यवहार न्यायाचे व नीतीचे होणार नाहींत. यासाठीं लोकशाही समाजांत बुद्धिवादाची प्रवृत्ति वाढणें जितकें अवश्य आहे तितकेंच किंबहुना त्याहूनहि अधिक प्रमाणांत समाजाची बुद्धि शुद्ध म्हणजे सात्विक अथवा न्यायनिष्ठ बनणें हें अवश्य आहे. जो समाज अनेक वर्गांत भंगलेला असेल त्या समाजांत वर्गीय अहंकाराचा रजोगुण अथवा वर्गीय जुलूम सहन करण्याचा तमोगुण वाढून त्याची बुद्धि अशुद्ध, मलिन आणि विकृत बनलेली असते. अशा अशुद्धबुद्धीचा बुद्धिवाद हा एक आत्मवंचनेचा व लोकवंचनेचा प्रकार आहे व त्यापासून समाजाचें कल्याण न होतां अधःपात आणि हानीच होत असते. बुद्धिवादाची ही मर्यादा लक्षांत घेऊनच लोकशाहीला बुद्धिबलाप्रमाणें आत्मबलाचेंहि अधिष्ठान प्राप्त होणें अवश्य आहे असें आम्हांस वाटतें.

## अनियंत्रित सत्तेचे अपरिहार्य दुष्परिणाम

अनियंत्रित व्यक्तिसत्ता, पक्षसत्ता किंवा वर्गसत्ता यांना हा बुद्धीच्या रजोगुणाचा व तमोगुणाचा सिद्धान्त अधिक प्रमाणांत लागू पडतो. ज्या व्यक्तीच्या, पक्षाच्या अथवा वर्गाच्या हातीं सत्ता असते त्यांच्या बुद्धीवर अहंकाराच्या रजोगुणाचें आवरण चढण्याचा फार संभव असतो. या अहंकारानें त्यांची बुद्धी पछाडली गेली म्हणजे ते न्यायाच्या नांवानें अन्याय करण्यास प्रवृत्त होतात, पण त्यांना मात्र आपण न्यायीच आहों असा भास होत असतो. उलट जे लोक अनियंत्रित सत्तेखालीं नांदत असतात त्यांची बुद्धि तमोगुणानें आवृत होते आणि त्यांची अन्यायाचा प्रतिकार करण्याची बौद्धिक व नैतिक शक्ति

नष्ट होते. अनियंत्रित सत्ताधारी व त्यांचें प्रजाजन यांच्यापैकीं जे स्वतःच्या दृष्टीनें प्रामाणिक असतात त्यांचा असा अधःपात होतो. शिवाय अनियंत्रित सत्ताधारी उघडपणें स्वार्थी उन्मत्त व जुलमी बनतात आणि त्यांच्या सत्तेखालीं नांदणारे जाणुन बुजून भेकड, लाचार व गुलाम बनतात. उभय पक्षांचा हा नैतिक अधःपात थांबविण्यास लोकशाही राज्यपद्धति व राष्ट्रीय स्वातंत्र्य हाच एक ज्ञात मार्ग आहे.

## तात्कालिक कार्यक्षम पण अंती अनर्थावह

एक पक्षसत्ता किंवा एक वर्गसत्ता ही आपत्कालीन अनियंत्रित उपाययोजना म्हणून विशिष्ट परिस्थितींत कांहीं काल लोकशाही राज्यापेक्षांहि अधिक कार्यक्षम अथवा हितप्रद ठरेल, कारण जीं सामाजिक सत्यें उपलब्ध झालीं आहेत त्यांची संस्थापना करणारांकडून होणारा विरोध दडपून टाकिल्यामुळें तीं अधिक त्वरेनें आणि अधिक परिणामकारकपणें अमलांत आणतां येतील. पण नवीं सामाजिक सत्यें संशोधन करण्याचें कार्य बंद पडल्यामुळें थोड्याच काळांत सत्ताधीश आणि सत्ताहीन या दोघांचाहि नैतिक व बौद्धिक अधःपात सुरू होईल आणि समाजाला अवनति प्राप्त होईल. आज कम्युनिस्ट पक्ष रशियांत किंवा फॅसिस्ट पक्ष युरोपांत जे सामाजिक सिद्धान्त अमलांत आणीत आहे त्यांचें संशोधन लोकशाही वातावरणांत झालेलें आहे. यामुळें शिक्षणप्रसार, आरोग्यरक्षण, औद्योगिक उन्नति, लष्करी तयारी वगैरेसंबंधी कांहीं कार्यें तेथें झपाट्यानें करून दाखवितां येतात यांत शंका नाहीं. पण ही कार्यक्षमता ज्या ज्ञानामुळें प्राप्त झालेली आहे तें ज्ञान वाढण्याचें कार्य स्थगित होत असतें कारण तेथें विचार स्वातंत्र्य आणि प्रचार स्वातंत्र्य यांना अडथळा होत असतो. हें ज्ञानसंवर्धनाचें कार्य बंद पडल्यानें समाजाच्या सुधारणांसंबंधी नवे विचार किंवा नव्या

योजना सुचणार नाहींत आणि ज्या सुधारणा सुचलेल्या आहेत त्या प्रत्यक्ष अमलांत आणींत असतां कितपत इष्ट ठरतात व कितपत अनिष्ट ठरतात याचाहि शोध होणार नाहीं. त्यांच्या अंमलबजावणींत होणाऱ्या अन्यायांकडे अपरिहार्य म्हणून जाणूनबुजून दुर्लक्ष होत जाईल आणि लोकांना आपणांवर होणारे अन्याय वेशीवर टांगण्याचें स्वातंत्र्य नसल्यानें ते घडत आहेत याची जाणीवहि सत्ताधारी वर्गांत राहणार नाहीं. अशा प्रकारें लोकांचें सुखदुःख आणि अधिकाऱ्यांच्या सुधारणा किंवा धोरणें यांचा संबंध तुटत जाऊन अन्यायाची व जुलमाची वाढ होत राहील. याचा परिणाम, स्वतंत्र विचार खुंटल्यानें समाजाला बौद्धिक दास्य तरी प्राप्त होईल, अथवा समाज या अनियंत्रित सत्तेविरूद्ध बंड करील व तिला उलथून पाडील.

## अनियंत्रित सत्तेच्या उद्भवाची मीमांसा

अनियंत्रित सत्तेचे हें दुष्परिणाम अवगत असतां रशिया, इटाली, जर्मनी या राष्ट्रांत अनियंत्रित पक्षसत्ता कां प्रस्थापित झाली आहे व कोणत्या परिस्थितींत अथवा अवस्थेंत अशी सत्ता निर्माण होत असते याचा थोडा विचार आतां केला पाहिजे. देशावर कोणतेंहि अंतर्गत अथवा बाह्य संकट प्राप्त झालें आणि आणि त्यावेळीं त्याचें निवारण करण्यास समर्थ असें सरकार लोकशाही पद्धतीनें निर्माण होऊं शकत नाहीं अशी अवस्था समाजाला प्राप्त झाली, म्हणजे तेथें अनियंत्रित पक्षसत्ता किंवा वर्गसत्ता निर्माण होत असते. लोकशाही राज्याचा आधार विचार स्वातंत्र्य, प्रचार स्वातंत्र्य, संघ स्वातंत्र्य यांवर असतो. या आधारावर अनेक पंथ वा पक्ष अस्तित्वांत आले; त्यांपैकीं कोणाचेंच कोणाशीं सख्य वा सहकार्य होईनासें झालें; कोणासहि बहुमत मिळेना, मिळालेलें बहुमत फार काळ टिकेना अथवा बहुमताचें राज्य

चालविण्यास इतरांचा अडथळा होऊन तें चालेना, अशी परिस्थिती प्राप्त झाली म्हणजे कांहीं काळ तरी अनियंत्रित सत्ता प्रस्थापित होणें अपरिहार्य बनतें. टीका करण्याचा हक्क, प्रचार स्वातंत्र्य आणि संघ स्वातंत्र्य यांचा उपभोग घेणारांनीं त्यांच्या योग्य मर्यादा पाळल्या नाहींत आणि समाजांत अंदाधुंदी, अनवस्था आणि अत्याचार निर्माण केले म्हणजे लोकशाही राज्यपद्धति राज्यच करूं शकत नाहीं. अशा अवस्थेंत अनियंत्रित सत्ता निर्माण न होईल तर समाजांत अराजकच माजून राहील व ती अवस्था टाळण्यासाठी कोणतेंहि सुस्थिर राज्य —मग तें कोणत्याहि पक्षाचें व कशाहि प्रकारचें असो—स्थापन व्हावें अशी इच्छा सर्वांस होईल. याप्रसंगीं जो पक्ष एखाद्या वर्गाच्या साहाय्यानें आपली सत्ता सुस्थिर आणि प्रभावी बनवूं शकेल तो पक्ष आपली अनियंत्रित सत्ता प्रस्थापित करूं शकतो. त्यानें समाजांतील अनवस्था थांबविली, आलेल्या तत्कालीन आपत्तीचें निवारण केलें, कांहीं सुधारणा झपाट्यानें घडवून आणिल्या आणि लोकांच्या आकांक्षा तृप्त केल्या तर तो अनियंत्रित अंमल समाजाला कांहीं काल सुखावह वाटेल व त्या पक्षाला लोकप्रियताहि प्राप्त होईल. पण या सर्व गोष्टी घडत असतां लोकांची विचारशक्ति घटत असते, स्वातंत्र्याची लालसा मरत असते, न्यायबुद्धि विकृत बनत असते, अन्यायाची उपेक्षा व तितिक्षा करण्याचा तमोगुण वाढत असतो. याच्या उलट सत्ताधारी वर्गाचा अहंकार वाढत असतो. अहंकारामुळें स्वार्थाला परार्थ मानण्याची वृत्ति बळावते. यामुळें नकळत घडणारे अन्याय व जुलूम यांची संख्या वाढूं लागते आणि अखेरीस सर्वच राज्यावर आपत्ति कोसळते. अनियंत्रित सत्तेमुळें प्राप्त होणाऱ्या अहंकाराचा मद कोणासहि भ्रष्ट केल्याविना राहत नाहीं, यामुळें विशिष्ट आपत्तीचें निवारण करण्याच्या मिषानें तात्कालिक उपाय म्हणून अस्तित्वांत आलेली अनियंत्रित सत्ता आपलें

कार्य करून आपोआप विलीन होईल अथवा आपण होऊन समाजाला स्वातंत्र्य देऊन लोकशाही राज्यपद्धति स्थापन करील अशी आशा करतां येत नाहीं.

## इटाली, जर्मनी व मध्ययुरोप यांची युद्धोत्तर अवस्था

आधुनिक युरोपांतील अनियंत्रित राज्यपद्धति, विशिष्ट अरिष्टांच्या आघातांनीं लोकशाही राज्यपद्धति अकार्यक्षम अथवा स्थगित झाल्या-मुळें, अस्तित्वांत आल्या असून ज्या राष्ट्रांत त्या स्थापन झाल्या आहेत, तेथें लोकशाही संस्कृति फार काळ बद्धमूल झालेली नव्हती असें दिसून येतें. जर्मनी, इटाली, ऑस्ट्रिया या देशांत इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका या देशांप्रमाणें लोकशाही राज्यपद्धति कधींच फारशी बद्ध-मूल झालेली नव्हती. आधुनिक लोकशाहीचा सर्वांत आधी उदय इंग्लंडांत झाला. या देशांत सरंजामदारवर्ग प्रथमपासूनच दुर्बल होता आणि सामाजिक दृष्ट्या व्यापारी-कारखानदार वर्गापासून अलग किंवा विभक्त नसल्यानें त्या दोघांचें वर्गयुद्ध फारसें विकोपास गेलें नाहीं आणि सरंजामशाहीचें लोकशाहींत रूपान्तर बरेंचसें शांततेनें आणि तडजोडीनें झालें. फ्रान्समध्यें सरंजामदार वर्ग आणि व्यापारी-कारखान-दार वर्ग यांच्यांत तीव्र वर्गयुद्ध होऊन लोकशाहीचा जन्म झाला व सरंजामशाहीचा निःपात झाला. पण जर्मनी, ऑस्ट्रिया, इटाली या देशांत सरंजामदारशाहीचा पूर्ण पाडाव कधींच झाला नाहीं. व्यापारी-कारखानदार वर्गानें शुद्ध लोकशाहीचा स्वीकार कधींच केला नाहीं कारण तो जागृत झाला त्यावेळीं कामगारवर्गहि जागृत होऊन राज-कीय लोकशाहीचें औद्योगिक लोकशाहींत अथवा समाजसत्तेंत रूपान्तर करण्याचे प्रयत्न करूं लागला होता. यामुळें मध्ययुरोपांत अथवा इटालींत सरंजामशाहीचें लष्करी वातावरण आणि अनियंत्रित राज-

सत्तेचें प्रेम समूळ कधींच नष्ट झालें नव्हतें. तसेंच लोकशाही राज्याच्या यशस्वितेस अवश्य असे संघटित तत्त्वप्रधान पक्ष आणि त्यांच्यांत परस्पर सहिष्णुतेची वृत्ति यांचीहि वाढ झालेली नव्हती. यांमुळें गेल्या महायुद्धानंतर आर्थिक अरिष्ट आणि आंतरराष्ट्रीय आपत्ति यांचा आघात होतांच त्यांच्या निवारणाच्या मिषानें एकपक्षीय अनियंत्रित सत्तांचा उदय त्या देशांत झाला. इटालीनें युद्धांत इंग्लंड-फ्रान्सच्या वतीनें भाग घेतला होता, पण महायुद्धानंतर ब्रिटिश-फ्रेंचांनीं आपल्या साम्राज्यांचा भरपूर विस्तार केला तेव्हां इटालीची साम्राज्यलालसा तृप्त करण्यांत आली नाहीं. ही लालसा तृप्त करण्यास राष्ट्रीय लष्करशाही निर्माण करून आपल्या राष्ट्राचा दरारा इतरांना बसविण्याशिवाय गत्यंतर नाहीं असें तेथील लोकांना वाटूं लागलें. तसेंच महायुद्धानंतरच्या आर्थिक अरिष्टांमुळें देशांत अनेक पक्षोपपक्ष निर्माण होऊन कोणासच आपलें धोरण अमलांत आणतां येईना. कामगारांच्या पाठिंब्यानें कामगारशाहीची स्थापना करण्याचा कम्युनिस्टांचा प्रयत्न यशस्वी होण्याइतका तो पक्ष संघटित व तो वर्ग जागृत नव्हता. अशा अंदाधुंदीच्या काळांत राष्ट्रीय वैभव, अंतर्गत शिस्त आणि परराष्ट्रीय आक्रमण या भावनांच्या आधारावर मुसोलिनीनें फॅसिस्ट पक्षाची अनियंत्रित लष्करी सत्ता निर्माण केली. असें करीत असतां परंपरारक्षण, धर्मरक्षण आणि आध्यात्मिक संस्कृति यांच्या आधारें कम्यूनिस्टांच्या क्रांतिकारक प्रयत्नांना कठोरपणें दडपून टाकिलें आणि भांडवलदार व कामगार अशी द्विवर्ग सामाजिक संस्कृति सुरक्षित करण्याचा एक मार्ग भांडवलशाही संस्कृतीच्या अभिमान्यांना दाखवून दिला. जर्मनींत हिटलरनें याच मार्गाचें आपल्या परिस्थितीस व परंपरेस अनुरूप असें अनुसरण केलें आणि नाझी तत्त्वज्ञान या नांवानें फॅसिझमची सुधारलेली आवृत्ति प्रकट केली. इटालीपेक्षां जर्मनींत

अनियंत्रित पक्षसत्ता निर्माण करणें अधिक सुलभ झालें, याचें कारण त्या राष्ट्राला महायुद्धानंतरच्या व्हर्साय तहांतील अटींनी कायमचें खच्ची करण्याचा प्रयत्न करण्यांत आला होता. जर्मनीसारख्या लढावू वृत्तीच्या राष्ट्राला हा अपमान फार काळ सहन करणें अशक्य होतें आणि त्याच्यावर लादलेलीं आर्थिक व लष्करी बंधनें तोडून टाकिल्याखेरीज तेथील कोणताहि महत्त्वाचा प्रश्न सुटणेंहि शक्य नव्हतें. ब्रिटिश-फ्रेंच मुत्सद्यांच्या कृपेनें आणि राष्ट्रसंघाच्या अनुमतीनें अस्तित्वांत आलेलें युद्धोत्तर कालांतील लोकशाही राज्य हा राष्ट्रीय अपमान धुवून काढण्यास असमर्थ होतें आणि त्याला जर्मनींतील लोकांची अढळ निष्ठा संपादन करणेंहि शक्य नव्हतें. गेल्या महायुद्धानंतर ब्रिटिश-फ्रेंच मुत्सद्यांनीं घेतलेल्या सूडाचा सूड उगविणें हाच एक आपल्या उद्धाराचा मार्ग आहे ही भावना जर्मनींत फैलावण्यास हिटलरला फारसे प्रयास पडले नाहींत. या सूड उगविण्याच्या कार्यास लष्करी सामर्थ्य वाढलें पाहिजे, शस्त्रबलावरचा विश्वास वाढला पाहिजे, अंतर्गत क्रांतीचे प्रयत्न दडपून टाकिले पाहिजेत आणि ब्रिटिश-फ्रेंच राष्ट्रांतील ढोंगी लोकशाही संस्कृतीचा बुरखा फाडून टाकिला पाहिजे, अशी मनोवृत्ति हिटलरच्या अनुयायांनीं निर्माण केली आणि आपल्या पक्षाची अनियंत्रित सत्ता स्थापन केली.

## अनियंत्रित सत्ता व साम्राज्यलोभ

वरील विवेचनावरून दिसून येईल कीं इटाली व जर्मनी या राष्ट्रांतील अनियंत्रित पक्षसत्ता ही देशांतील भांडवलशाहीच्या संरक्षणार्थ तिच्या आधारानें आणि साम्राज्यशाहीच्या लोभानें निर्माण झालेली आहे. ब्रिटिश व फ्रेंच साम्राज्यशाहीचें ध्येय आपणांस लोकशाहीच्या आधारानें प्राप्त होणें शक्य नाहीं हें पाहून त्यांनीं लोकशाहीचाच

उच्छेद केला आहे. अर्थात् लोकशाहीवरील प्रेमापेक्षां साम्राज्यशाहीचा लोभ अधिक प्रबल झाला म्हणजे फॅसिझमचा—भांडवलप्रधान राष्ट्रीय लष्करशाहीचा—उदय होत असतो. आपल्या साम्राज्यांवर जर्मनी-इटालीकडून धोका येण्याचा संभव आहे असें दिसूं लागल्यापासून ब्रिटन व फ्रान्स या देशांतहि ही वृत्ति बळावूं लागली आहे, पण ती यशस्वी होण्यास जो एक उत्साह अथवा धडाडी लागते ते गुण या राष्ट्रांत उरलेले दिसत नाहींत. अनेक वर्षांच्या साम्राज्योपभोगानें हीं राष्ट्रें गलितवीर्य झालेलीं असून त्यांची लोकशाहीवरील निष्ठा मंदावली तरी भांडवलशाहीच्या आधारावर अनियंत्रित पक्ष सत्ता स्थापन करून राष्ट्रीय लष्करशाही गाजविण्याचाहि जोम त्यांच्यापाशीं उरला आहे असें दिसत नाहीं. तत्त्वनिष्ठेची दैवीवृत्ति लोप पावली असून आसुरी संस्कृति निर्माण करण्याचें सामर्थ्यहि त्यांच्यापाशी दिसत नाहीं. त्यांची लोकशाही संस्कृतीवर खरी निष्ठा असेल तर तिच्याशीं विसंगत अशा भांडवलशाहीचा व साम्राज्यशाहीचा स्वेच्छेनें अंत करण्यास त्यांनीं उद्युक्त झालें पाहिजे.

## लोकशाही राष्ट्रांत जोम कां उरला नाहीं ?

असें करण्याइतका ध्येयवाद आज या लोकशाही राष्ट्रांत उरलेला नाहीं. कम्यूनिस्ट आणि फॅसिस्ट या तत्त्वज्ञानांचे पुरस्कर्ते आज आपल्या ध्येयासाठीं जितका त्याग करावयास तयार आहेत तितका त्याग करण्यास लोकशाहीचे पुरस्कर्ते तयार असल्याचें दिसत नाहीं. याचें कारण काय ? आज जीं राष्ट्रें आपणांस लोकशाहीचे पुरस्कर्ते म्हणवून घेतात, त्यांत स्वार्थत्यागाच्या तत्त्वाला प्राधान्य देण्यांत आलेलें नाहीं. व्यक्तिवाद हेंच त्यांचे सामाजिक तत्त्वज्ञान बनलेलें असून या व्यक्तिवादास भौतिक सुखवादाचें स्वरूप देण्यांत आलेलें आहे. प्रत्येक

व्यक्तींनें आपापलें सुख साधण्याचा प्रयत्न केला म्हणजे राष्ट्राचें अथवा समाजाचें सुख आपोआप साधतें, असें भ्रामक तत्त्वज्ञान या राष्ट्रांत रूढ झालें असल्यानें या राष्ट्रांतील लोक सुखासीन आणि स्वार्थपरायण बनले आहेत. त्यांच्या तुलनेनें विचार केल्यास फॅसिस्ट व कम्यूनिस्ट तत्त्वज्ञानें त्यागप्रधान आहेत आणि व्यक्तीच्या सुखाला व स्वार्थाला कर्तव्य भावनेनें मर्यादा घालणारीं आहेत. फॅसिस्ट तत्त्वज्ञान हें राष्ट्रवादी आणि कम्यूनिस्ट तत्त्वज्ञान समाजवादी आहे. राष्ट्रवाद हा राष्ट्रासाठीं आणि समाजवाद हा आर्थिक समता व एकवर्ग समाज या ध्येयांसाठीं व्यक्तीला त्याग करण्याचा उपदेश करतो. राष्ट्रवादामुळें राष्ट्रीय अहंकार जागृत होऊन इतर राष्ट्रांचा द्वेष उत्पन्न होतो आणि कम्यूनिझमच्या वर्ग युद्धाच्या धोरणानें वर्गीय अहंकार आणि भांडवलदार वर्गाचा द्वेष उत्पन्न होतो. अहंकार आणि द्वेष यांनीं लिप्त झाल्यामुळें हा त्याग सात्त्विक ठरत नाहीं हें खरें असलें तरी व्यक्तिवादामुळें मनुष्यें त्यागालाच तयार होत नाहींत. प्रत्येकानें आपापला स्वार्थ साधण्यानें समाजहित आपोआप होईल या तत्त्वावर भांडवलप्रधान लोकशाही राष्ट्रांची संस्कृति उभारली गेल्यानें तिच्यांत त्यागाचें तेज व जोम हीं मुळींच उरलेलीं नाहींत.

## व्यक्तिवादाचें श्रेष्ठ व सत्य स्वरूप

व्यक्तिवादाचें खरें स्वरूप वर सांगितलें त्याहून श्रेष्ठ आहे. आपल्या मनोदेवतेच्या आज्ञेसाठीं लागतील ते कष्ट सोसण्यास तयार व्हावयाचें आणि तिच्या आज्ञेविरुद्ध असणाऱ्या कोणत्याहि आज्ञेपुढें मान वाकवावयाची नाहीं हें व्यक्तिवादाचें खरें स्वरूप आहे. या व्यक्तिवादांत सत्यनिष्ठेला अग्रस्थान आहे आणि सत्यनिष्ठेसाठी सुखावर तिलांजली सोडण्याची कर्तव्यभावना अंतर्भूत होत असते. पण हा श्रेष्ठ प्रतीचा

व्यक्तिवाद आजच्या भांडवलप्रधान लोकशाही राष्ट्रांत उरलेला नाहीं आणि भांडवलशाही व्यक्तिवाद हा या श्रेष्ठ व्यक्तिवादाला मारक आहे. सत्याग्रह तत्वज्ञान हेंहि व्यक्तिवादीच आहे, पण त्यांतील व्यक्तिवाद हा स्वार्थ, सुखासक्ति आणि अहंकार यांपासून अगदीं अलिप्त असला पाहिजे, असा निर्बंध आहे. लोकशाही संस्कृतीला व्यक्तिवादाची आवश्यकता आहे, पण तो व्यक्तिवाद भांडवलशाही व्यक्तिवाद नव्हे. सत्याग्रही व्यक्तिवाद हा लोकशाही संस्कृतीचा तारक बनूं शकेल किंबहुना युरोपिय लोकशाही राष्ट्रांनीं सत्याग्रही व्यक्तिवादाची दीक्षा घेतली तरच त्यांची संस्कृति टिकविण्याचें सामर्थ्य त्यांच्यापाशीं येऊं शकेल, नाहींतर फॅसीझम् आणि कम्यूनिझम् या नव्या पंथांच्या जोरदार हल्ल्यांपासून या लोकशाही राष्ट्रांना आपलें रक्षणहि करणें कठीण होईल. सुखासक्ति, वैयक्तिक स्वार्थ आणि अनिर्बंध स्पर्धा यांच्या आधारावर ज्या राष्ट्रांचीं संस्कृति उभारलेली आहे त्यांच्यांत कर्तव्यनिष्ठेची व स्वार्थत्यागी वृत्तीची जोपासना होणें कठीण आहे आणि या गुणांच्या अभावीं त्यांचें सामर्थ्य व तेज नष्ट झाल्याविना राहणार नाहीं. गेल्या महायुद्धापूर्वीं पन्नास पाऊणशें वर्षें ब्रिटिश, फ्रेंच व अमेरिकन राष्ट्रांची जी भौतिक भरभराट झाली आणि परोपजीवनाची जी वृत्ति त्यांच्यांत बाणली गेली, त्यामुळें त्यांची कर्तव्यनिष्ठा व त्यागवृत्ति यांचा लोप होऊन त्यांच्या व्यक्तिवादाला हीन स्वरूप प्राप्त झालें आहे. कांहीं काळ 'शहाणा स्वार्थ' ( Enlightened self-interest ) हेंच त्यांचें नैतिक ध्येय बनलें अथवा तोच त्यांचा धर्म बनला, पण आज त्यांच्या स्वार्थापाशीं शहाणपणहि उरलेलें दिसत नाहीं. स्वार्थामुळें शहाणपणाला व दूर-दृष्टीला ग्रहण लागतें असा मानसशास्त्रीय सिद्धान्त आहे, त्यास अनु-सरून आज हीं राष्ट्रें शहाण्या दूरदर्शी स्वार्थावरून संकुचित

स्वार्थांधतेवर येऊन पोहोंचलीं आहेत. त्यांच्या या अवस्थेपासून जीं राष्ट्रें लोकशाही संस्कृतीची दीक्षा घेण्यास आज प्रवृत्त होत आहेत त्यांनीं योग्य तो बोध घेतला पाहिजे. हा बोध म्हणजे कम्यूनिझम् किंवा फॅसिझम् यांचा स्वीकार करून लोकशाहीचा त्याग करावा हा नसून अनियंत्रित पक्षसत्तेचा त्याग करून तत्त्वनिष्ठ व्यक्तिवादाच्या पायावर लोकशाहीची उभारणी करावी आणि भांडवलशाहीचा स्वीकार करूं नये हाच होय.

## व्यक्तिवाद, समाजवाद व राष्ट्रवाद यांचा समन्वय

सत्याग्रही व्यक्तिवाद हा राष्ट्रवादाशीं व समाजवादाशीं विसंगत नाहीं अथवा विरोधी नाहीं. किंबहुना असेंहि म्हणतां येईल कीं आधुनिक युरोपांत व्यक्तिवाद, राष्ट्रवाद आणि समाजवाद अशीं जीं तीन सामाजिक तत्त्वज्ञानें निघालीं आहेत त्या सर्वांना सत्याग्रही-वृत्तीच्या अभावामुळेंच विकृत स्वरूपें प्राप्त झालीं आहेत आणि या सर्व वादांतील विकृति नष्ट करून त्यांचा सुंदर समन्वय करण्याचें सामर्थ्य सत्याग्रही तत्त्वज्ञानांत आहे. हा समन्वय झाला नाहीं तर समाजवादाला व राष्ट्रवादाला अनियंत्रित पक्षसत्तेचें स्वरूप प्राप्त होऊन लोकशाहीचा लोप होतो. लोकशाहीला व्यक्तिवादाप्रमाणें राष्ट्र-वादाची आणि समाजवादाचीहि आवश्यकता आहे असें सूक्ष्म विचारा-अंतीं दिसून येईल. युरोपांत मात्र राष्ट्रवादाची व समाजवादाची वाढ होतां होतां त्यांना व्यक्तिवादाच्या विरोधी स्वरूप प्राप्त झालेलें आहे. यामुळेंच लोकशाहीलाहि झुगारून देण्याचें विकृत स्वरूप राष्ट्रवादाला व समाजवादाला प्राप्त झालें आहे. लोकशाही विरोधी राष्ट्रवादाला फॅसीझमचें आणि लोकशाहीविरोधी समाजवादाला कम्युनिझमचें स्वरूप आज प्राप्त झालें असलें, तरी हीं त्यांचीं खरीं व शुद्ध स्वरूपें नव्हेत

असें मान्य करण्याचा काळ लवकरच येईल अशी आमची अपेक्षा आहे. लोकशाही संस्कृतीवर मनुष्यांची खरी श्रद्धा बसेल तर—आणि सत्याग्रहाच्या आश्रयानें लोकशाहीला आत्मबलाचा आधार देऊन अधिक शुद्ध बनविल्यास आज डळमळीत होऊं लागलेली लोकशाही-वरील श्रद्धा दृढमूल बनेल असें आमचें मत आहे—समाजवाद, राष्ट्र-वाद व व्यक्तिवाद यांचा योग्य समन्वय लोकशाही राज्यांत दिसूं लागेल. हिंदुस्थान सत्याग्रहाच्या आश्रयानें लोकशाही राष्ट्रवाद निर्माण करण्याचें कार्य आज करीत आहे. यांत त्याला यश आल्यास या राष्ट्रवादास समाजवादाचें स्वरूप प्राप्त होईल पण तो समाजवाद खऱ्या व्यक्तिवादाचा व लोकशाहीचा त्याग करणार नाहीं अशी आशा करतां येईल. पुढील प्रकरणांत आधुनिक लोकशाहीला व्यक्ति-वाद, राष्ट्रवाद आणि समाजवाद या तीहींच्या समन्वयाची कां व कशी आवश्यकता आहे आणि तो समन्वय करण्याचें सामर्थ्य सत्या-ग्रही तत्त्वज्ञानांत कसें आहे त्याचेंच विवेचन करावयाचें योजिलें आहे.

---

# व्यक्तिवाद, राष्ट्रवाद आणि समाजवाद : : ४

## व्यक्तिवादाचा त्रिविध उगम

आधुनिक युरोपांतील लोकशाहीचा उदय व्यक्तिवादी तत्त्वज्ञानांतून झालेला आहे. या व्यक्तिवादाची निरनिराळीं स्वरूपें निरनिराळ्या लोकांच्या मनापुढें होतीं तथापि सुमारें तीनशें वर्षांपूर्वी म्हणजे सत-राव्या शतकांत सर्व युरोपांत अनेक कारणांमुळें व्यक्तिस्वातंत्र्याची मागणी निरनिराळ्या क्षेत्रांतील सुधारक करूं लागले होते. धर्मक्षेत्रांतील

सुधारक प्रत्येक व्यक्तीनें आपल्या मनोदेवतेस शरण जाऊन धर्मग्रंथांचा जो अर्थ योग्य वाटेल तो स्वीकारावा आणि आपल्या अंतरात्म्यास शांति आणि समाधान वाटून भावशुद्धि होईल अशा प्रकारें परमेश्वराची प्रार्थना करावी असें म्हणूं लागले होते. या धर्मसुधारकांना समाजाची भावशुद्धि करावयाची होती आणि धर्माच्या नांवानें जें अनेक विधिविधानांचें आणि व्रतोद्यापनांचें जंजाळ माजलें होतें तें मोडून टाकून समाजांत पावित्र्य, शुद्धता आणि साधेपणा आणून त्याची आत्मोन्नति करावयाची होती. समाजांत स्वैरोचार माजावा आणि प्रत्येकानें स्वार्थाच्या व लाभाच्या पाठीमागें लागावें अशी त्यांची व्यक्तिस्वातंत्र्याची कल्पना नव्हती.

यानंतर भौतिकविद्येचे संशोधकहि व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार बुद्धिस्वातंत्र्याच्या नांवानें करीत होते. भौतिक विद्येंतील अनेक शोध पूर्वींच्या धर्मग्रंथांतील सृष्टिरचनेसंबंधींच्या सिद्धांताशीं विसंगत भासूं लागले. तेव्हां जुन्या धर्मग्रंथांचा आधार घेऊन भौतिक शास्त्रांतील संशोधकांचा छळ करण्यास धर्माधिकारी पुढें येऊं लागले. या वादांतून ग्रंथप्रामाण्य विरुद्ध बुद्धिप्रामाण्य असा वाद सुरु झाला आणि ग्रंथप्रामाण्यापेक्षां बुद्धिप्रामाण्य श्रेष्ठ आहे आणि प्रत्येकानें आपल्या बुद्धीचा स्वतंत्रपणें उपयोग करून सृष्टीचें निरीक्षण करावें आणि या निरीक्षणानें तिच्या व्यापाराचे जे सिद्धान्त आपल्या अनुभवास पटतील ते शोधून काढून त्यांचा प्रसार करावा असें मत प्रभावी बनूं लागलें. भौतिक विद्येंतील संशोधकांनीं पुरस्कारिलेला हा बुद्धिस्वातंत्र्यवाद हळूहळूं सामाजिक प्रश्नांनाहि लागूं करण्यांत येऊं लागला आणि समाजरचनेचे प्रश्न बुद्धिस्वातंत्र्याच्या तत्त्वानुसार सोडविले पाहिजेत या मताला मान्यता मिळूं लागली. परंपरागत सामाजिक व्यवहारांत किंवा संस्थांत बुद्धिवादाला न पटणारे असे जे व्यवहार किंवा

संस्था असतील त्यांचा त्याग करून बुद्धिवादाशीं सुसंगत असे नवे सामाजिक व्यवहार व संस्था स्थापन केल्या पाहिजेत, हें मत पुढें येऊन बुद्धिवादाला सामाजिक क्रांतिवादाचें स्वरूप लवकरच प्राप्त झालें. व्यक्तिस्वातंत्र्याचें किंवा व्यक्तिवादाचें हें दुसरें स्वरूप होय.

वर वर्णन केलेल्या दोनहि प्रकारच्या व्यक्तिवादाचा वैयक्तिक स्वार्थ आणि लोभ यांच्याशीं फारसा संबंध नाहीं. परंतु याच वेळीं तिसऱ्याहि एका प्रकारचा व्यक्तिवाद उदयास येत होता. तो व्यक्तिवाद म्हणजे मध्यमवर्गीय व्यापारी व सावकार वर्गानें परंपरागत धार्मिक, सामाजिक व औद्योगिक बंधनांतून मुक्त होऊन भौतिक अभ्युदय करून घेण्यासाठीं पुरस्कारिलेला व्यक्तिवाद होय. या व्यक्तिवादाचा संबंध प्रत्यक्ष आर्थिक व्यवहारांशीं येत असून त्यांतून आर्थिक क्षेत्रांतील व्यक्तिवादाचा उदय झाला. हा आर्थिक क्षेत्रांतील व्यक्तिवादच समाजाला विघातक ठरला असून त्याच्या विरुद्ध झालेल्या बंडांतून समाजवादाचा उदय झालेला आहे. मागें जे दोन प्रकारचे व्यक्तिवाद सांगितले ते आत्मिक आणि बौद्धिक क्षेत्रांतील व्यक्तिवाद असून आत्मशुद्धि आणि भौतिक वा सामाजिक सत्य संशोधन हें त्यांचें साध्य होतें, पण व्यापारी सावकार वर्गानें आपल्या आर्थिक व्यवहारांवरील धार्मिक, सामाजिक व राजकीय बंधनांविरुद्ध केलेल्या बंडांतून जो व्यक्तिवाद निर्माण झाला, त्याचें ध्येय वैयक्तिक सांपत्तिक भरभराट हें बनलें. या व्यक्तिवादांतूनच समाजाच्या आर्थिक व्यवहारांवर वित्तरक्षण आणि करारबजावणी या खेरीज कोणतीहि राजकीय बंधनें नसावींत हें अनियंत्रणाचें तत्त्व ( Lesseiz faire ) पुढें आलें आणि प्रत्येकानें आपापलें सुख संपादन करण्याचा प्रयत्न करीत राहिलें म्हणजे व्यक्ति व्यक्तींमध्यें जी अनिर्बंध स्पर्धा निर्माण होते तीमुळें एकंदर समाजाचें हित किंवा अधिकांत अधिक सुख आपो-

आप साध्य होतें हें घातुक तत्त्व प्रसार पावूं लागलें. आज अशा प्रकारचा आर्थिक क्षेत्रांतील व्यक्तिवाद समाजाला हानिकारक असून अनियंत्रणाचें धोरण स्वीकारून समाजांत अनिर्बंध स्पर्धा चालू दिली तर लवकरच त्यांत जंगली कायदा किंवा 'मात्स्य न्याय' सुरू होतो आणि सधन निर्धन वर्गांत कलह, किंबहुना युद्ध सुरू होऊन समाजांत शांतता, सुख व समाधान नांदूं शकत नाहींत असा अनुभव येऊं लागला आहे. सरकारनें आर्थिक व्यवहारांचें नियंत्रण करावयाचें नाहीं याचा अर्थ समाजांतील आर्थिक दृष्ट्या प्रबल असणाऱ्यांच्या दास्यांत त्यांतील निर्धन वर्गानें रखडावयाचें असा होतो. समाजवाद आणि व्यक्तिवाद यांच्यांतील मुख्य मतभेद या आर्थिक क्षेत्रांतच निर्माण झाला असून या क्षेत्रांतील आर्थिक अनियंत्रणाचें तत्त्व आतां असमर्थनीय ठरून त्याज्य गणलें जात आहे. समाजवादाप्रमाणें राष्ट्रवादानेंहि हें अनियंत्रणाचें तत्त्व त्याज्य ठरविलें असून सर्व आर्थिक व्यवहारांचें राष्ट्रहिताच्या दृष्टीनें राजसत्तेनें नियंत्रण केलें पाहिजे आणि समाजाची आर्थिक घटना वैयक्तिक स्पर्धा आणि स्वार्थसाधन या शक्तींचे प्रवाह जशी घडवितील तशी घडूं न देतां ती योजनापूर्वक आणि बुद्धिपुरःसर घडविली पाहिजे, हें नियोजित आर्थिक घटनेचें धोरण ( Policy of planned economy ) राष्ट्रवादानेंहि स्वीकारिलेलें आहे. कामगारांचें वेतन, वस्तूंचे बाजारभाव, व्याजाचे दर, जमिनीचा खंड, कामाचे तास वगैरे सर्व व्यवहार केवळ स्पर्धा आणि स्वार्थसाधन यांच्या चढाओढींत व ओढाताणींत जसें ठरतील तसें ठरूं द्यावेत, ज्यांना जो माल बनवावा वाटेल त्यानें तो बनवावा आणि वाटेल त्या देशांतून माल आला तरी त्याला प्रतिबंध करूं नये ही व्यक्तिवादी अर्थशास्त्रज्ञांची दृष्टि आज अनर्थावह वाटूं लागली आहे. अशा अनिर्बंध स्पर्धेत फक्त प्रबल राष्ट्रें आणि त्यांतील प्रबल

वर्ग तेवढेच आपला स्वार्थ साधूं शकतात आणि दुर्बल राष्ट्रें व दुर्बल वर्ग अथवा व्यक्ति अधिकाधिक दुरवस्थेंत जाऊन त्यांचा नाश होतो हें सर्व मान्य झालें आहे. अशा प्रकारचें आर्थिक क्षेत्रांतील व्यक्ति-स्वातंत्र्य हें लोकशाहींत अंतर्भूत होणाऱ्या समता आणि बंधुभावना या ध्येयांशीं विसंगत असून औद्योगिक क्रांतीनंतर निर्माण झालेल्या द्विवर्ग समाजांत या अयोजित घटनेमुळें वर्गयुद्धें निर्माण होऊन लोक-शाहीचा व राष्ट्रैक्य भावनेचा विध्वंस होतो असे युरोपांतील भांडवल-प्रधान राष्ट्रांत आज दिसून येत आहे.

## व्यक्तिवादाचें खरें क्षेत्र

आर्थिक क्षेत्रांतील व्यक्तिवादानें असा अनर्थ उडविल्यामुळें फॅसिझम् आणि कम्युनिझम् या पंथांनीं व्यक्तिस्वातंत्र्याचा सर्वच क्षेत्रांतून उच्छेद केल्याचें आज दिसत आहे पण ही त्यांची चूक आहे. आत्मोन्नति आणि सत्यसंशोधन या क्षेत्रांत व्यक्तिवादाला महत्वाचें स्थान असून सामाजिक व राजकीय बाबतींत विचारस्वातंत्र्य आणि प्रचारस्वातंत्र्य यांना त्यामुळेंच महत्व प्राप्त होत असतें. आत्मिक आणि बौद्धिक क्षेत्रांत राजसत्ता सर्वंकष बनली म्हणजे समाजांतील आत्मोन्नति आणि प्रगति करण्याचें सामर्थ्यच नष्ट होत असतें इकडे दुर्लक्ष करतां येणार नाहीं. या क्षेत्रांतील व्यक्तिस्वातंत्र्य आणि बुद्धिस्वातंत्र्य हा लोकशाहीचा आधार आहे व तेंच लोकशाही संस्कृतीचें श्रेष्ठत्व आहे. लोकशाहीच्या लोपाबरोबर हें स्वातंत्र्य आणि सहिष्णुता यांचा लोप होत असून समाजांत शिस्त, निष्ठा आणि सामर्थ्य यांची कांहीं काल वाढ झाली व तो कांहीं बाबतींत कांहीं काल अधिक कार्यक्षम बनल्यासारखा दिसला, तरी त्याच्या अंतरंगावर आणि चैतन्यावर त्याचा दुष्परिणाम झाल्याविना राहत

नाहीं. स्वतंत्र विचारांचें, आत्मोद्धाराचें आणि स्वावलंबनाचें हें चैतन्य नष्ट झाल्यानें मोठे पुरुष अथवा असामान्य लोकनायक निर्माण करण्याची त्याची पात्रताहि कमी होऊं लागते आणि एखाद्या आपत्तीचा आघात झाला असतां त्याचें स्वातंत्र्य व सुख गमावून तो परतंत्र आणि दुःखी बनतो. तात्पर्य समाजाच्या अंतरंगांतील हें आत्मबल आणि बुद्धिबल कार्यक्षम राहावें, त्याची वाढ होऊन तें प्रभावी बनावें आणि या चैतन्याचें तेज समाजांतील प्रत्येक व्यक्तीच्या चर्येवर आणि त्याच्या वर्तनांत प्रतिबिंबित व्हावें हें व्यक्तिवादाचें ध्येय आहे. सामाजिक परिस्थितीची पार्श्वभूमि समाजानें निर्माण करून दिली, तरी या पार्श्वभूमीवर आपल्या चारित्र्याच्या आत्मबलानें आणि सत्यसंशोधनाच्या बुद्धिबलानें आपल्या कर्तृत्वाचें चित्र स्वतः रेखाटावें आणि तसें करण्यास लागणारीं साधनें समाजाच्या साहाय्यानें त्यानें आपल्या प्रयत्नांनीं प्राप्त करून घ्यावींत असें व्यक्तिवादी सामाजिक तत्वज्ञान आहे आणि तें मानव संस्कृतीला उद्धारक असेंच आहे.

## बुद्धिस्वातंत्र्य, वैराग्य व अभ्यास

पण या आत्मिक आणि बौद्धिक क्षेत्रांतील व्यक्तिवादाचा विचार करीत असतांहि एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं आत्मस्वातंत्र्य किंवा बुद्धिस्वातंत्र्य यांची प्राप्ती केवळ बाह्य बंधनांच्या अभावानें होऊं शकत नाहीं. मनोनिग्रह, अनासक्ति आणि अभ्यास यांच्याखेरीज आत्मस्वातंत्र्य प्राप्त होऊं शकत नाहीं. त्याचप्रमाणें बुद्धिस्वातंत्र्य किंवा मतस्वातंत्र्याचाहि प्रश्न आहे. प्रत्येकाला मतें बनविण्याचें स्वातंत्र्य दिलें म्हणजे प्रत्येकाला मतें बनविण्याची पात्रता येत असतें, असें समजतां कामा नये. मतें योग्य प्रकारें बनविण्यासहि

एक प्रकारच्या 'अभ्यासाची' व 'वैराग्याची' आवश्यकता असते. 'अभ्यास' म्हणजे विचार करण्याची संवय आणि 'वैराग्य' म्हणजे स्वतःचा व स्वकीयांचा अहंकार, स्वार्थ आणि पूर्वग्रह यांपासून अलिप्त होऊन चांगल्या वाईटाचा अथवा सत्यासत्याचा निर्णय करण्याचें सामर्थ्य किंवा बुद्धि. हे गुण अंगीं बाणल्याखेरीज बनविलेलीं मतें हीं केव्हांहि सार्वजनिक हिताला पोषक होणार नाहींत. सार्वजनिक विषयांवरील मतें 'सार्वजनिक बुद्धीनें'च—म्हणजे सर्वजनहित-बुद्धीनें—बनविलीं पाहिजेत. तात्पर्य मतस्वातंत्र्याच्या हक्काबरोबर कांहीं कर्तव्यें आणि जबाबदाऱ्याहि येत असतात. या कर्तव्यांची बजावणी कायद्यांनीं करतां येणें शक्य नाहीं. लोकमत आणि समाजांतील श्रेष्ठ लोकांचें वर्तन अथवा उदाहरण यांवर सामान्य जनतेंत हे गुण कितपत प्रसार पावणार हें अवलंबून असतें.

## व्यक्तिवाद व सुखवाद

पाश्चात्य देशांतील व्यक्तिवादाला व्यक्तिसुखवादाचें स्वरूप प्राप्त झालें आणि प्रत्येकानें आपलें मत बनवितांना आपल्या स्वार्थ रक्षणाचीच दृष्टि स्वीकारण्यांत कांहीं गैर नाहीं असें मानण्यांत येऊं लागलें. व्यक्तिवादी व स्पर्धाप्रधान आर्थिक घटनेमुळें ही दृष्टि वाढत गेली आणि व्यक्तिस्वार्थ उघडपणें साधणें अशक्य होतांच वर्गस्वार्था-पर्यंत पल्ला गाठला गेला. भांडवलदार व कामगार या दोन वर्गांच्या स्वार्थांतील लढ्याला आज सर्वत्र ऊत आला असून राष्ट्रीयत्वास व लोकशाहीस अवश्य असणारा स्वार्थनिरपेक्ष बुद्धीनें बनविलेल्या लोक-मताचा शुद्ध प्रवाह आज कोठेंच दिसेनासा झाला आहे. समाजांतील व्यक्ति केवळ स्वसुखपरायणच असतात अथवा असणें शक्य आहे, आणि स्वसुख म्हणजे पैशाच्या मानदंडानें मोजतां येण्यासारखें आर्थिक

सुख अधिकांत अधिक प्राप्त करून घेण्याची हिशेबी वृत्ति हीच मनुष्याची नैसर्गिक प्रवृत्ति आहे. या दोन सिद्धान्तावर आधुनिक लोकशाहीची उभारणी सतराव्या आणि अठराव्या शतकांतील लोकशाहीच्या युरोपीय पुरस्कर्त्यांनीं केली. वैश्य वृत्तीच्या वर्गानें लोकशाहीच्या ध्येयाला मूर्तस्वरूप दिल्यामुळें असा परिणाम झाला. आपल्या व्यापारांत वैश्यवर्गाचे लोक जी हिशेबी व स्वार्थी वृत्ति व्यक्त करतात तोच नैसर्गिक मनुष्यस्वभाव आणि तसें सर्वांनीं वागलें असतां सर्वांचें हितरक्षण होऊन समाजहित साधतें, या भ्रामक सिद्धान्तांचा अवलंब जसा या लोकांनीं अर्थशास्त्रांत केला, त्याचप्रमाणें प्रत्येकाची मालमत्ता सुरक्षित राखणें हेंच राजसत्तेचें आद्य कर्तव्य आहे या पायावर त्यांनीं लोकशाही राज्यमीमांसेची उभारणी केली. अशा प्रकारें खासगी मालमत्ता आणि वैय्यक्तिक मालकी हक्क यांना सनातन अथवा निसर्ग दत्त हक्कांचें स्वरूप त्यांनीं दिलें आणि समाजांतील ज्या व्यक्तींना मालमत्ता नाहीं व ज्यांना केवळ आपल्या श्रमशक्तीचा विक्रय करूनच उपजीविका करावी लागते त्यांना केवळ करारस्वातंत्र्याचा हक्क देण्यांत आला. या हक्काचा व्यावहारिक अर्थ आपापसांत स्पर्धा करून मालकांचें गुलाम बनण्याचा अथवा उपासमारीनें स्वर्गास जाण्याचा हक्क असा होऊं लागला. औद्योगिक क्रांतीनंतर राष्ट्रांतील सर्व मालमत्ता आणि मालकी हक्क, म्हणजे कारखाने व जमिनी यांची मालकी, फार छोट्या वर्गाच्या हातीं केंद्रित झाले आणि बहुसंख्य लोकांना गुलाम होण्याच्या अथवा उपासमारीनें मरण्याच्या करारस्वातंत्र्याच्या हक्कांवर संतुष्ट होऊन राहण्याचा प्रसंग आला. तेव्हां खासगी व्यक्तीच्या मालकी हक्कांवर नियंत्रणें घालण्याचें बहुसंख्य जनतेच्या हिताच्या दृष्टीनें अवश्य वाटूं लागलें, पण मालकी हक्कांना सतातन, त्रिकालबाधित स्वरूप देणारी राज्यमीमांसा आणि व्यक्तिवादी अर्थशास्त्र यांच्या नांवानें या आवश्यक

सामाजिक सुधारणांना विरोध होऊं लागला. जो व्यक्तिस्वातंत्र्याचा सिद्धान्त सरंजामशाहीच्या परंपरागत हक्कांवर गदा घालतांना क्रांतिकारक बनला होता तोच व्यक्तिस्वातंत्र्याचा सिद्धान्त आतां कामकरी वर्गाच्या चळवळी दडपून टाकण्यासाठीं पुढें येऊं लागला आणि त्याला प्रतिगामी स्वरुप प्राप्त झालें. एका वेळचें प्रगतिकारक तत्त्व पुढील काळांत प्रतिगामी कसें बनतें याचें हें उत्कृष्ट उदाहरण आहे. ज्यांच्यापाशीं मालमत्ता आहे त्यांची व्यक्तिस्वातंत्र्याची कल्पना आणि ज्यांच्यापाशीं ती नाहीं त्यांची त्यासंबंधीची कल्पना यांत द्वैत उत्पन्न झालें आणि या प्रश्नाचा निर्णय बहुमतानें लावून घेण्यास मालकवर्ग तयार होईना. अर्थात् लोकशाहीच्या पद्धतीला हरताळ फासण्यांत आला आणि फॅसीझम आणि कम्यूनिझम यांचा उदय होऊन अनियंत्रित पक्षसत्ता निर्माण होऊं लागली.

## व्यक्तिवाद व मालमत्तेचा हक्क

या अरिष्टांतून लोकशाहीला बचावावयाचें असेल तर खासगी मालमत्तेच्या हक्काचें सनातनत्व नष्ट झालें पाहिजे आणि खासगी मालमत्ता हा समाजाचा ठेवा आहे व तो नियंत्रित करण्याचा अथवा काढून घेण्याचा हक्क समाजाला आहे हें तत्व लोकशाहीच्या पुरस्कर्त्यांनीं मान्य केलें पाहिजे. खासगी मालमत्ता किती प्रमाणांत ठेवावयाची आणि ती संपादन करण्याचे कोणते मार्ग कायदेशीर ठरवावयाचे, हा समाजाचा हक्क असून तो अर्थोत्पादन पद्धतींतील सुधारणांबरोबर निरनिराळ्या प्रकारें समाज बजावूं शकतो. छोटी शेती व हस्तव्यवसाय हीच आर्थिक घटना असेल, तेव्हां धनोत्पादनाचें स्वरूप वैयक्तिक असतें व अशा समाजांत जमिनींची मालकी व भांडवलाची मालकी ही सर्व समाजांत विखुरलेली व विभागलेली असते. अशा

समाजांत जमिनी व भांडवल यांज्यावर खासगी मालकी असण्यांत समाजचें हित असतें, पण प्रचंड शेती व प्रचंड कारखाने निर्माण होऊन धनोत्पादनाला सामुदायिक स्वरूप प्राप्त झालें म्हणजे सामुदायिक मालकीचें तत्व जमिनी व कारखाने यांना लागूं करणें भाग पडतें. या विचारसरणींतूनच समाजवादाचा जन्म झाला आणि भांडवलप्रधान संस्कृतींत लोकशाही नांदावयाची असेल तर ती समाजसत्ताक लोकशाहीच बनली पाहिजे असें लोक म्हणूं लागले.

## समाजसत्ताक लोकशाही वि. कम्यूनिझम

समाजसत्ताक लोकशाही म्हणजे कम्यूनिझम, अनियंत्रित कामगारशाही, नव्हे हें येथें स्पष्ट केलें पाहिजे. अनियंत्रित कामगारशाहीखालीं (Dictatorship of the proletariate) राजसत्ता ही एका पक्षाच्या हातीं असून ती सर्वंकष असते म्हणजे विरोधी पक्षांना मतस्वातंत्र्य आणि प्रचारस्वातंत्र्य उपभोगतां येत नाहीं. समाजसत्ताक लोकशाही ही एकपक्ष सत्ता नसून तिच्या खालीं सर्व लोकांना मतस्वातंत्र्य उपभोगतां येऊन सत्ताधारी पक्षाच्या विरूद्ध पक्ष संघटित करून लोकमत अनुकूल करण्याचें व राजसत्ता आपल्या हातीं घेण्याचें स्वातंत्र्य कोणांसहि उपभोगतां येईल. आज अशी समाजसत्ताक लोकशाही जगांत कोठेंच अस्तित्वांत नाहीं, तथापि तें अनेक विचारी लोकांचें ध्येय आहे. अनियंत्रित कामगारशाहीमुळें समाजसत्तेची प्रस्थापना होऊन भांडवलशाही नष्ट झाली, जमिनी व कारखाने सार्वजनिक मालकीचे बनले आणि धनोत्पादनाच्या कार्यांतील मालक-मजूर हा वर्गभेद नष्ट झाला तरी अनियंत्रित राजसत्तेमुळें निर्माण होणारे अन्याय व जुलूम यांचा अंत होत नाहीं. अधिकारी वर्गाची नोकरशाही निर्माण होते. विरोधी टीकेचा प्रकाश राज्यकारभारावर पडूं न

शकल्यानें नोकरशाहीचे अन्याय चव्हाट्यावर येत नाहींत, लोकांत दहशत पसरून विचारस्वातंत्र्यहि नष्ट होतें, अन्यायाचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य नाहींसें होतें, प्रजाजनांत गुलामवृत्ति फैलावूं लागतें आणि अधिकारी वर्ग अहंकारी, उन्मत्त, मदान्ध आणि तत्व-भ्रष्ट व स्वार्थी बनण्याचा धोका असतो. याचा परिणाम समाजाचा नैतिक अधःपात होण्यांत आणि न्याय-अन्यायांचा विवेक करण्याची शक्ति भ्रष्ट होण्यांत झाल्याशिवाय राहत नाहीं. सर्व गोष्टी सत्तेनें व सक्तीनें करून घेण्याची संवय लोकांना व अधिकाऱ्यांना लागून 'बळी तो कान पिळी' हाच न्याय, अशीं मतें फैलावतात. अखेरीस कामगार वर्गाच्या हातची लोकसत्ता विशिष्ट पक्षाच्या हातीं जाऊन अंतीं ती एकदोन पुढाऱ्यांच्या हातीं एकवटते. ही स्थिति, स्वातंत्र्य, समता अथवा बंधुता यांना मारक असून तिच्यांतून पुनः लोकशाही स्थापन होणें जवळजवळ अशक्य होतें. शिवाय समाजांतील विचार-स्वातंत्र्य राजकीय दहशतीमुळें नष्ट झाल्यानें समाजाच्या प्रगतीचीं बीजेंच भाजून गेल्यासारखीं होतात.

## समाजसत्ता व व्यक्तिस्वातंत्र्य

समाजसत्ताक लोकशाही ही अशा प्रकारच्या अनियंत्रित पक्ष-सत्तेहून भिन्न असून ती व्यक्तिस्वातंत्र्याला विरोधी नसून पोषकच आहे. भांडवलशाही समाजांतील व्यक्तिस्वातंत्र्य हें केवळ अभावरूप असतें, म्हणजे कोणत्याहि व्यक्तीला आपल्या प्रयत्नानें आपला सर्वांगीण विकास करण्यास कायद्याची प्रत्यक्ष अडचण नसते येवढेंच. पण या व्यक्तिविकासास जी भौतिक व बौद्धिक साधनें अवश्य असतात तीं मात्र समाजांतील नव्वद टक्के लोकांना उपलब्ध नसतात. मालक आणि मजूर, सधन आणि निर्धन या वर्गांत जन्मास येणाऱ्या मुलांना

आरोग्याचीं, शिक्षणाचीं, द्रव्यार्जनाचीं, नैतिक उन्नतीचीं, संस्कृति-संवर्धनाचीं साधनें सारखींच असतात, असें आजच्या विषम समाज-रचनेकडे पाहून कोणांसहि म्हणतां येणार नाहीं. या साधनांच्या अभावीं आजच्या समाजांत सर्वांना व्यक्तिस्वातंत्र्य आहे असें म्हणणें म्हणजे समाजांतील निर्धन दलित वर्गाच्या दुःखावर डागण्या देण्यासारखेंच नाहीं काय ? ज्या समाजांतील शेंकडा नव्वद लोकांची जीवितसाधनें शेंकडा दहा लोकांच्या हातीं गेलेलीं आहेत अथवा ज्यांतील शेंकडा नव्वद लोक शेंकडा दहांच्या आर्थिक दास्यांत रखडत आहेत तेथें व्यक्तिस्वातंत्र्य कसें नांदणार ? ज्या समाजांतील सामान्य जनतेला शिक्षण घेण्यास पैसा व फुरसत नाहीं, काबाडकष्टांच्या भाराखालीं विचार करण्यास शक्ति व वेळ नाहीं, नित्य उपासमारीच्या दहशतीनें सुखाचे दिवस कधीं दिसत नाहींत, नित्याच्या गरजा भागविण्यास पुरेसें अन्नवस्त्र मिळण्याचीहि दिवसभर कष्ट करून मारामार पडते, अशा समाजांत व्यक्तिस्वातंत्र्य किंवा सामाजिक समता आहेत असें म्हणणें ही केवळ वंचना आहे. तसेंच अशा समाजांतील मालक व मजूर अथवा सधन आणि निर्धन यांना एकेकच मत कायद्यानें दिलेलें असलें, तरी तेथील लोकशाही राज्ययंत्रावर दोन्ही वर्गांचें सारखेंच दडपण पडतें अथवा त्याचा राज्यकारभार दोघांच्याहि हिताकडे सारखीच दृष्टि देऊन चालत असतो असें म्हणणें अशक्य आहे. लोकमत बनविण्याची वृत्तपत्रादि सर्व साधनें धनिक वर्गाच्या हातीं असतात. मतप्रसाराची इतर साधनेंहि त्यांनाच सहज प्राप्त करून घेतां येतात आणि सुशिक्षित, बुद्धिमान, लेखनपटु आणि वक्तृत्व-निपुण प्रचारकहि त्यांची सेवा करण्यास उत्सुक असतात. उद्योग-धंद्यांतील आणि सरकारी नोकऱ्यांतील सुशिक्षित मध्यम वर्ग या धनिक वर्गाचा मिंधा बनलेला असतो आणि सार्वत्रिक मताधिकारानें

निवडल्या जाणाऱ्या प्रातिनिधिक संस्थाहि त्यांना आपल्या ताब्यांत ठेवतां येतात अथवा त्यांना वश करून घेतां येतात. इंग्लंड, अमेरिका आणि फ्रान्स या देशांतील राज्यसंस्था, तेथील वृत्तपत्रें आणि तेथील सुशिक्षित धंदेवाईक मतप्रचारक हे तेथील कारखानदारांच्या हातीं गेले आहेत आणि तेथील लोकशाही ही धनिक वर्गाची बटिक बनली आहे याबद्दल कोणाहि निःपक्षपाती विचारवंतास आज शंका उरलेली नाहीं. अशा समाजांतील व्यक्तिस्वातंत्र्य म्हणजे धनिकांना निर्धन वर्गाची पिळणूक करण्याची कायदेशीर मुभा, असा अर्थ करावा लागतो.

## समाजसत्ताक लोकशाहीचें ध्येय

याच्या उलट समाजसत्ताक लोकशाहींत व्यक्तिस्वातंत्र्याचा लाभ प्रत्येकास मिळणें कसें शक्य आहे तें पहा. कारखानें, जमिनी, खाणी इत्यादि धनोत्पादनाचीं सर्व साधनें सार्वजनिक मालकीचीं झाल्यानें समाजांत केवळ मालकी हक्कांवर बिन कष्टानें जगण्याचा हक्क कोणांसहि मिळणार नाहीं. द्रव्यार्जन करण्यासाठीं प्रत्येकास समाजाची प्रत्यक्ष सेवा करणें हा एकच मार्ग उपलब्ध राहून व्याज, खंड आणि नफा हे आजच्या समाजांत कायदेशीर गणलेले अकष्टार्जित धनसंपादनाचे मार्ग बंद होतील. अर्थात् भांडवलदार व कामगार हा वर्गभेद नष्ट होऊन सर्वच समाजाचे सेवक बनतील आणि सामाजिक संपत्तीचे सर्वच मालक बनतील. बाल, वृद्ध आणि रुग्ण यांची व्यवस्था करण्यास लागणारा द्रव्याचा भार समाजाच्या समाईक उत्पन्नांतून केला जाईल आणि शिक्षण, आरोग्य व नैतिक उन्नति यांची सर्वांस सारखी संधि मिळूं लागेल. श्रम, विश्रांति आणि उपभोग यांची विभागणी समान आणि न्याय्य तत्त्वांवर होऊन प्रत्येकाच्या श्रमाचा

मोबदला किती असावा हें समाजामार्फत ठरविलें जाईल. अर्थात् हें धोरण ठरवितांना राज्यपद्धति लोकशाहीची असल्यानें प्रत्येकास आपलें मत समाजापुढें मांडतां येईल. तसेंच प्रत्येक कारखान्यांत काम करणारांना व प्रत्येक धंद्यांतील लोकांना आपल्या परिस्थितीचें नियंत्रण करण्याचें मर्यादित स्वराज्यहि देण्यांत येईल आणि सर्व सत्ता एकाच मध्यवर्ति सरकारांत किंवा संस्थेंत केंद्रित न करतां ती प्रत्येक विभागांत आणि व्यवसायसंघांत विभागून देण्यांत येईल. हें सत्तेचें विकेंद्रीकरण स्थानिक स्वराज्य व व्यावसायिक स्वराज्य(Local and functional self-Government) स्थापून करण्यांत येईल. या सत्तेच्या विकेंद्रीकरणाप्रमाणें औद्योगिक विकेंद्रीकरणहि शक्य तितकें करण्यांत येईल. असें केल्यानें समाजयंत्र अधिक संकीर्ण न होतां त्यांतील प्रत्येक विभाग स्वावलंबी, स्वयंशासित आणि शक्य तों स्वयंपूर्ण बनेल आणि आपला सर्वांगीण विकास करण्याची संधि सर्व समाजघटकांस व व्यक्तींस समानतेनें मिळत जाईल. अशा समाजांतच सर्वांना खरें व्यक्तिस्वातंत्र्य उपभोगतां येईल आणि आपल्या व्यक्तिस्वातंत्र्याचा दुरुपयोग इतरांची लुबाडणूक करण्याकडे कोणांसहि करतां येणार नाहीं. तसेंच योग्य श्रम करून प्रत्येकांस आपल्या योग्य गरजा भागविण्याची सोय समाजामार्फत होत राहिल्यानें प्रत्येकाच्या जीवनांत शाश्वति आणि निश्चिति येईल. आपल्या वृद्धावस्थेची, रुग्णावस्थेची व मुलाबाळांची व्यवस्था समाजामार्फत होणार आहे अशी हमी मिळाल्यानें व्यक्तीची धनार्जनाची हाव कमी होईल, संचय करण्याची आवश्यकता भासणार नाहीं, विद्या, कला आणि संस्कृति यांच्या संवर्धनाकडे व निष्काम लोकसेवेकडे आपल्या शक्तीचा विनियोग करण्याची सामाजिक बुद्धि अधिक वाढेल आणि जीवनधारणार्थ इतरांशीं स्पर्धा करण्याची पद्धति

नष्ट झाल्यामुळें समाजांतील इतरांसंबंधीं हेवा, असूया, द्वेष या भावना जागृत न होतां, प्रेम आणि सहकार्य या सद्भावना जागृत होऊन सर्वांच्या अंतःकरणाचा खरा विकास होईल. सहकार्यानें, सेवेनें व सत्यानें भौतिक सुखें प्राप्त होतात असा अनुभव सर्वांना येऊं लागला म्हणजे अंतःकरणांतील दुष्ट, संकुचित आणि स्वार्थी वृत्ति नाहींशा होतील आणि परार्थांतच स्वार्थ साधतो असा अनुभव बराच काळ आल्यानंतर मनुष्यस्वभाव परार्थी आणि निःस्वार्थी बनूं लागेल. या उच्च स्वभावाचा विकास झाल्यानें केवळ जड भौतिक सुखापेक्षां मानसिक, बौद्धिक आणि आत्मिक सुखांची आवड वाटूं लागेल आणि आपल्या हीन इंद्रियवृत्तींचा संयम करून कलोपासना, सत्यसंशोधन आणि साधुत्वसंवर्धन करण्यांतील श्रेष्ठ पतीचा आनंद घेण्यांतच खरा व्यक्तिविकास व खरें व्यक्तिस्वातंत्र्य आहे असें लोकांना वाटूं लागेल. समाजसत्ताक लोकशाहीच्या पुरस्कर्त्यांच्या ध्येयाचें हें एक अस्पष्ट दिग्दर्शन आहे.

## समाजसत्ता व खासगी संपत्ति

व्यक्तिस्वातंत्र्याप्रमाणें खासगी संपत्तीच्या बाबतींतहि या समाजांतील प्रत्येक व्यक्तीची स्थिति आजच्या कोणत्याही भांडवलशाही समाजापेक्षां अधिक संपन्न होईल. आजच्या समाजांत कांहीं व्यक्तींना मालमत्तेचा हक्क अमर्याद उपभोगतां येत असल्यानें सर्वसामान्य जनतेला अवश्य ती उपभोग्य संपत्ति मिळूं शकत नाहीं. समाजांतील उत्पादक संपत्ति--कारखाने, जमिनी, खाणी, पेढ्या वगैरे—सार्वजनिक बनविल्यानें समाजांतील प्रत्येक व्यक्तीस मिळणारा उपभोग्य संपत्तीचा अंश अधिक मिळूं लागेल आणि त्याच्यावरील वृद्धावस्था, रुग्णावस्था अपघात आणि मुलाबाळांची व्यवस्था यासंबंधीं करण्याच्या तरतुदीचा

भार कमी झाल्यानें त्याला जी संपत्ति मिळेल तिचा अधिक निश्चित वृत्तीनें आणि समाधानानें उपभोग घेतां येईल. तसेंच समाजांतील आर्थिक विषमता नष्ट होऊन एकवर्ग समाज स्थापन झाल्यानें श्रीमंतांच्या चैनीकडे पाहून जागृत होणाऱ्या विलासी वृत्ति नाहींशा होतील आणि जे उपभोग मिळतील त्यांपासून संतोष व सुख अधिक प्रमाणांत लाभेल. तात्पर्य समाजसत्ताक लोकशाही स्थापन झाल्यानें मूठभर व्यक्तींची मालमत्ता व मालकी हक्क नष्ट होतील हें खरें असलें तरी एकंदर समाजांतील बहुसंख्य व्यक्तींचें स्वातंत्र्य आणि सुख वाढेल आणि त्यांना मिळणारी उपभोग्य संपत्तीहि आजच्यापेक्षां अधिक मिळेल. समाजांतील सर्व व्यक्तींचें जीवित, वित्त आणि स्वातंत्र्य यांची सुरक्षितता अथवा शाश्वति हेंच खऱ्या व्यक्तीवादाचें व खऱ्या लोकशाहीचें ध्येय असेल तर तें प्राप्त करण्यास आजच्या काळांत भांडवलप्रधान लोकशाही ही मुळींच उपयोगी नसून समाजसत्ताक लोकशाही हेंच त्या ध्येयाच्या प्राप्तीचें खरें साधन आहे, असें दिसून येईल.

## कम्युनिझमचें आक्षेप

वरील विवेचनावरून असें दिसून येईल कीं समाजसत्ताक लोकशाही हें ध्येय लोकशाहीच्या ध्येयाचाच अधिक विकास आहे. कम्युनिझममध्यें समाजवादी ध्येय अंतर्भूत झालें असल्यानें तें लोकशाहीशीं सुसंगत असें तत्त्वज्ञान आहे असें म्हणतां येईल, पण त्यांतील अनियंत्रित कामगारशाही स्थापण्याचें धोरण हें मात्र लोकशाहीशीं पूर्णपणें विसंगत आहे. याच दृष्टीनें लोकशाही आणि कम्युनिझम यांतील विरोध मागें दर्शविला आहे. यावर कम्युनिझमचें असें म्हणणें आहे कीं, भांडवलप्रधान संस्कृतींतून समाजसत्ताक लोकशाहीचें ध्येय गांठण्यास कांहीं काळ तरी अनियंत्रित कामगारशाही

स्थापन करण्यावाचून गत्यंतर नाहीं, कारण भांडवलदारवर्ग आपले मालकी हक्क सोडून ते समाजाच्या हवालीं करण्यास शांततेनें कधींहि तयार होणार नाहीं. ज्याप्रमाणें सरंजामशाहींतून भांडवलप्रधान लोकशाहींत प्रवेश करतांना भांडवलदार वर्गाला क्रांतीचा व वर्गयुद्धाचा आश्रय करावा लागला त्याचप्रमाणें भांडवलप्रधान लोकशाहींतून समाजसत्ताक लोकशाहींत, म्हणजे खऱ्या लोकशाहींत, प्रवेश करतांना कामगारवर्गाला दुसरी क्रांति करावी लागणार आहे आणि निदान कांहीं काळ तरी अनियंत्रित कामगारशाही स्थापन करावी लागणार आहे. सरंजामशाही ही जशी एक वर्गसत्ता होती तशीच भांडवलप्रधान लोकशाही हीहि एक वर्गसत्ताच आहे आणि कोणताहि वर्ग आपल्या हातची सत्ता शांततेनें दुसऱ्या वर्गाच्या हातीं देत नाहीं हा सिद्धान्त जसा सरंजामदार वर्गाला लागू आहे तसाच तो भांडवलदार वर्गालाहि लागू आहे.

## सनदशीर समाजवादाचा उदयास्त

समाजसत्ताक लोकशाहीच्या पुरस्कर्त्यांचें यावर असें उत्तर आहे कीं, ज्यावेळीं सरंजामशाहीचा अंत होऊन लोकशाहीचा जन्म झाला तेव्हां बहुमताचें राज्य आणि लोकशाहीचीं ध्येयें यांची कोणास कल्पनाहि सुचली नव्हती. लोकशाहीच्या उदयाबरोबर सामाजिक समतेचें ध्येय उदय पावलें असून त्यांतच एकवर्ग समाजाचें समाजसत्ताक ध्येय अंतर्भूत झालेलें आहे. शिवाय लोकशाहीचें राज्य हें बहुमताच्या हातीं असल्यानें भांडवलप्रधान लोकशाहींतून समाजसत्ताक लोकशाहींत जाण्यास सशस्त्र क्रांतीची व वर्गयुद्धाची आवश्यकता नाहीं. कामगारवर्ग हा औद्योगिक क्रांतीनंतर बहुसंख्य वर्ग बनतो आणि त्याला इष्ट अशी सामाजिक क्रांति लोकशाही राज्ययंत्राचा आश्रय

करून शांततेनें व कायदेशीर मार्गानेंहि घडवून आणतां येईल. इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका यासारख्या ज्या राष्ट्रांत लोकशाही संस्कृति दृढमूल झाली आहे त्या देशांत तरी समाजसत्ताक लोकशाहीची स्थापना करण्यास वर्गयुद्धाची व अनियंत्रित कामगारशाहीची आवश्यकता नाहीं असें मानणारे पक्ष त्या देशांत एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस निघाले. त्यांनीं केवळ सनदशीर धोरणानें समाजसत्ताक लोकशाहीचें ध्येय गाठण्याचा प्रयत्न एक दोन पिढ्या केला. विशेषतः गेलें महायुद्ध संपल्यानंतर ( १९२० नंतर ) इंग्लंड व फ्रान्स या देशांत समाजवादी कामगार पक्षांना बरेंच महत्त्व प्राप्त होऊन त्यांच्या हातून समाजसत्ताक क्रांति सनदशीर मार्गानें घडून येईल अशी आशा बऱ्याच लोकांना वाटूं लागली होती. राष्ट्रसंघाच्या कृपाछत्राखालीं जर्मनी, ऑस्ट्रिया वगैरे मध्ययुरोपांतील राष्ट्रांत जीं छोटीं लोकशाही राष्ट्रें निर्माण झालीं त्यांतहि सनदशीर मार्गानें समाजसत्तेचें ध्येय गांठण्याचा प्रयत्न करणारा एकेक पक्ष होताच. अशा प्रकारें महायुद्धानंतर युरोपांत सर्वत्र लोकशाही संस्कृति विजयी झाली असा जसा भास झाला त्याचप्रमाणें या मायासृष्टींतून समाजसत्ताक लोकशाहीचें ध्येयहि मूर्तावतार धारण करील अशी आशा कांहींना वाटूं लागली होती. पण थोड्याच काळांत इटालींत फॅसिझम्‌ची स्थापना झाली आणि हळूहळू मध्ययुरोपांतील लोकशाहीची मायासृष्टि मावळून गेली. इंग्लंड, फ्रान्स या देशांतहि सनदशीर मार्गानें समाजसत्तेचें ध्येय गांठूं इच्छिणारे समाजवादी पक्ष तत्त्वच्युत आणि पदभ्रष्ट झाले आणि राष्ट्रवादाच्या नांवानें सर्वत्र प्रतिगामी क्रांतिविरोधी पक्ष अधिकारारूढ झाले. इंग्लंड, फ्रान्स या व्यतिरिक्त बहुतेक सर्व देशांतून फॅसिझम्‌ची उघड स्थापना झाली आणि त्या दोन देशांत लोकशाही राज्यपद्धति नाममात्र राहिली असलीं तरी समाजवादी पक्ष तिचा आश्रय करून आपल्या देशांत

समाजसत्ताक क्रांति करून खरी लोकशाही निर्माण करूं शकेल अशी आशा किंवा भीति आज कोणासहि उरली नाहीं.

## लोकशाही व सामाजिक क्रांति

सनदशीर समाजवादाच्या या अपयशाचा लोकशाहीच्या सिद्धान्ताशीं बराच निकट संबंध आहे. लोकशाही राज्यपद्धति अस्तित्वांत आल्यापासून बहुजन समाजाला अभिप्रेत असा कोणताहि फरक समाजरचनेंत शांततेनें घडवून आणण्याचें तें एक साधन आहे असें मानण्यांत येत होतें. समाजरचनेंत आमूलाग्र परिवर्तन अथवा क्रांति घडवून आणण्यासहि लोकशाहीचा उपयोग करतां येईल आणि इतःपर सशस्त्र क्रांतीची कोणास आवश्यकताच उरणार नाहीं असें तिचे पुरस्कर्ते समजत असत. पण सनदशीर समाजवादाच्या अपयशामुळें या विश्वासास धक्का बसला असून लोकशाही राज्यसंस्थेचा उपयोग लहानसहान सुधारणा घडवून आणण्यास होत असला तरी जेव्हां समाजाचा आर्थिक पायाच बदलून नवा घालण्याचा प्रश्न उद्भवतो अथवा आर्थिक पाया औद्योगिक क्रांतीनें बदलल्यामुळें नव्या तत्त्वांवर राज्याची पुनर्घटना करण्याचा प्रश्न पुढें येतो, तेव्हां लोकशाही राज्यघटनेचा अशा क्रांतीस उपयोग होत नाहीं असा सनदशीर समाजवादाच्या अपयशापासून निष्कर्ष काढण्यांत येऊं लागला. लोकशाही राज्यांत बद्धमूल झालेली भांडवलशाही उन्मूलित करण्यास लोकशाहीचें सनदशीर राजकारण उपयोगी पडत नाहीं असें पाहतांच युरोपांतील प्रत्येक देशांत क्रांतिकारक समाजवादाचें ऊर्फ कम्यूनिझमचें तत्त्वज्ञान अधिक फैलावूं लागलें. रशियांतील राज्यक्रांतींत मिळालेल्या यशामुळें कम्यूनिझमचा बोलबाला सर्वत्र होऊं लागला आणि युरोपांतील अनेक समाजवादी कम्यूनिझमची दीक्षा घेऊन क्रांति-

कारक बनले. पण महायुद्धोत्तर कालांतील युरोपचा इतिहास अभ्यासिल्यास समाजसत्ताक क्रांति करून भांडवलशाहीचें उन्मूलन करण्यास जसा सनदशीर समाजवाद अयशस्वी ठरला, तसा वर्गयुद्धाची क्रांति करूं इच्छिणारा कम्यूनिझमहि अयशस्वी ठरल्याचें निदान आज तरी दिसत आहे. आतां भांडवलशाही राष्ट्रं दुसऱ्या महायुद्धांत गोविलीं गेलीं आहेत, त्यानंतर युरोपची काय अवस्था होणार हें कांहींच सांगतां येत नाहीं.

## बुद्धिबल, बाहुबल, आणि आत्मबल यांचीं राजकारणें

या सर्व घडामोडींमुळें सनदशीर राजकारणांतील बुद्धिबल आणि सशस्त्र क्रांतिवादांतील शस्त्रबल किंवा बाहुबल यांखेरीज समाजाकडून आपली ध्येयें मान्य करून घेण्याचा अथवा सत्यसंस्थापनेचा तिसरा एखादा मार्ग आहे किंवा नाहीं, इकडे लक्ष जाणें साहजिक आहे. बुद्धिबलाचें राजकारण संपलें म्हणजे बाहुबलाविना अथवा शस्त्रबलाविना दुसरा मार्ग उरत नाहीं आणि शस्त्रबलाची उपासना ही लोकशाहीला मारक आहे, हें युरोपांतील अलीकडील घडामोडीवरून सिद्ध झालें आहे. यामुळें हिंदुस्थानांत सत्याग्रहाच्या स्वरूपांत जें आत्मबलाचें राजकारण उदयास येत आहे तिकडे लोकशाहीच्या पुरस्कर्त्यांचें लक्ष वेधणें अगदीं साहजिक आहे. आत्मबल म्हणजे समाजांतील न्यायबुद्धीचें बल. सामान्यतः प्रस्थापित राजसत्तेला समाजाच्या न्यायबुद्धीचें बल पाठिंबा देत असतें, म्हणजे आपली राज्यसंस्था न्याय प्रस्थापना करून लोकहित करीत आहे अशी समाजाची समजूत असते. पुष्कळ वेळां ही समजूत चुकीची असते म्हणजे समाजाची न्यायबुद्धीच विकृत बनलेली असते. पण असें असलें तरी राज्यसंस्थेला तिचा पाठिंबा असतो असेंच व्यवहारतः म्हणावें लागते. वर्गयुक्त

समाजांत जो वरिष्ठ वर्ग म्हणून गणला जातो, त्याला वरिष्ठ गणण्यांतच समाजाचें हित आहे अशी जोंपर्यंत समजूत असते अथवा वस्तुस्थिति असते, तोंपर्यंत वर्गसंस्थेला व तिचें रक्षण करणाऱ्या राज्यसंस्थेला समाजाच्या न्यायबुद्धीचा पाठिंबा आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. आपल्या देशांत जशी चातुर्वर्ण्य संस्था होती व ती नैसर्गिक अथवा ईश्वरकृत आहे असें लोकांना वाटत होतें त्याचप्रमाणें मध्ययुगीन युरोपांत चतुर्वर्ग संस्था-धर्माधिकारी, सरंजामदार, व्यापारी-शेतकरी आणि भूदास अशी चार वर्गांची पद्धति—सरंजामशाहीचा अंत होईपर्यंत टिकून होती. व्यापारी सावकारवर्गानें सरंजामदार वर्गाविरुद्ध बंड करून लोकशाहीच्या ध्येयाचा पुकारा केला तेव्हां एकवर्ग समाजाचें ध्येय, ध्येय या दृष्टीनें अस्तित्वांत आलें. तरी औद्योगिक क्रांतीमुळें आज द्विवर्ग समाज—भांडवलदार व कामगार—अस्तित्वांत आला आहे व तो लोकशाहीच्या ध्येयाशीं विसंगत आहे हें बुद्धीनें आकलन होण्याजोगें आहे. या दृष्टीनें लोकशाहीला समाजसत्ताक स्वरूप देण्याची इष्टता समाजाच्या बुद्धीला म्हणजे न्यायबुद्धीला पटणें शक्य आहे व तें तसें पटल्यास लोकशाही राज्यांत सनदशीर मार्गानें समाजसत्ताक क्रांति घडवून आणतां येईल अशी सनदशीर समाजवाद्यांची अपेक्षा होती. पण ही अपेक्षा आज विफल झाली आहे. याचें कारण समाजांतील न्यायबुद्धि केवळ बुद्धिबलानें किंवा युक्तिवादानें जागृत होत नाहीं, निदान प्रभावी बनत नाहीं हें आहे. ही न्यायबुद्धि जागृत व प्रभावी बनण्यास सत्यसंस्थापनेसाठीं वाटेल ते आत्मक्लेश सहन करण्याचें आणि अन्यायी समाजाशीं अथवा राज्यसंस्थेशीं असहकार व अनत्याचारी प्रतिकार करण्याचें आत्मबल समाजांत निर्माण झालें पाहिजे. समाजांतील न्यायबुद्धि जागृत, संघटित,

प्रतिकारी व प्रभावी बनवावयाची, पण तिला अत्याचारी होऊं द्यावयाचें नाहीं, अशी सत्याग्रहनीति आहे आणि या नीतीचा अवलंब केला असतां कोणतीहि अन्यायी राज्यसंस्था बंद पडते व अन्याय्य समाजरचना मोडून न्यायी समाजरचनेचा पाया घालण्याचें क्रांतिकार्य घडून येतें असा सत्याग्रही तत्त्वज्ञानाचा सिद्धान्त आहे. या नीतींत राज्यसंस्थेची अडवणूक घडत असली व घडणें अपरिहार्य असलें, तरी ती अन्यायी राज्यसंस्थेचीच अडवणूक होत असते, व राज्यसंस्था अडवावी हा सत्याग्रहाचा उद्देश नसून अन्यायाचा प्रतिकार होऊन न्यायाची म्हणजे सत्याची संस्थापना व्हावी हा त्याचा हेतु असतो. सक्रिय न्यायनिष्ठेमुळें अन्यायाची अडवणूक व्हावी, हा मानवस्वभावाच्या व सृष्टीच्या घटनेचा प्रभाव आहे. समाजयंत्र व राज्ययंत्र मोडणें हा सत्याग्रहाचा हेतु किंवा त्याचें अभिप्रेत फल नसून त्यांना न्यायाचें अधिष्ठान प्राप्त व्हावें हा त्याचा हेतु असतो. भांडवलशाही संस्कृतींत समाजसत्ताक क्रांति घडवून आणण्यास या क्रांतिशास्त्राचा उपयोग करण्यांत आल्यास कामगार-शाहीचें अनियंत्रित राज्य निर्माण होऊन लोकशाहीचा अंत होण्याचें टळेल आणि लोकसत्ता व समाजसत्ता यांचा अथवा व्यक्तिवाद व समाजवाद यांचा सुंदर समन्वय घडून येईल. तसें व्हावयाचें तर भांडवलप्रधान लोकशाहींत ही क्रांति घडवून आणण्यास आत्मबलाच्या राजकारणाचा निःशस्त्र क्रांतिशास्त्राचा आधार घेणें अवश्य आहे.

## बुद्धिबलाचा अपुरेपणा व आत्मबलाची आवश्यकता

बुद्धिबल हें सामाजिक क्रांति घडवून आणण्यास अपुरें पडतें याचें कारण केवळ बुद्धि ही न्यायनिष्ठ नसते म्हणजे आपल्या स्वार्थास, अहंकारास व परंपरेस विरोधी असणाऱ्या न्याय्य तत्त्वांस

मान्यता देण्यास तयार नसते. तसें तिनें तयार व्हावें आणि सामाजिक बुद्धि न्यायनिष्ठ बनावी यासाठीं समाजाचें आत्मबल जागृत, संघटित, प्रतिकारी व प्रभावी बनवावें लागतें. आधुनिक युरोपांतील लोकशाही-राष्ट्रांनीं या आत्मबलाची जोपासना केली नाहीं आणि साम्राज्यशाहीं-तून मिळणाऱ्या लुटीच्या परान्नपुष्टतेनें आपली न्यायबुद्धि अथवा आत्मबल मलिन, हतप्रद आणि विकृत बनूं दिलें. तेथील समाज-वाद्यांचें बुद्धिबल यामुळेंच निष्प्रभ बनलें आणि लोकशाहीचा विकास होण्याऐवजीं विनाश होऊं लागला आहे. यापासून लोकशाही राष्ट्रीयत्व निर्माण करणारांनीं आज योग्य तो बोध घेतला पाहिजे. सत्याग्रही भारतवर्ष हा बोध कोणता आहे तें जगाला सांगत आहे.

## सत्याग्रह व राष्ट्रवाद

येथपर्यंत व्यक्तिवाद आणि समाजवाद यांचें लोकशाही आणि सत्याग्रह या दृष्टीनें विवेचन केलें. भारतीय सत्याग्रहाला अद्यापि राष्ट्रवादीच स्वरूप असून या राष्ट्रवादाला युरोपांतील राष्ट्रवादा-प्रमाणें फॅसिझमचें स्वरूप येईल व तो व्यक्तिवाद, लोकशाही व समाजवाद या सर्वच तत्त्वांना विरोधी बनेल अशी भीति किंवा आशा अनेकांना वाटत आहे. त्यामुळें आम्ही सत्याग्रही तत्त्व-ज्ञानाच्या आधारें व्यक्तिवाद, लोकशाही आणि समाजवाद यांचा समन्वय होतो असें जें येथवर प्रतिपादन केलें त्या सर्वांवरच मूलग्राही आक्षेप येण्याचा संभव आहे. या आक्षेपांचें निरसन करण्यासाठीं राष्ट्रवादाचा येथें थोडा विचार करणें अवश्य आहे. व्यक्तिवाद आणि समाजवाद या तत्वांप्रमाणें राष्ट्रवादी तत्वहि मूलतः हितप्रद आणि शुभपरिणामी आहे पण त्याला आधुनिक युरो-पांत विकृत स्वरूप प्राप्त झालेलें आहे. मानवसंस्कृतीची परंपरा तुटूं

नये, प्रत्येक राष्ट्रानें आपल्या संस्कृतीच्या आधारें आपला उद्धार करून घ्यावा, एकमेकांशीं बंधुभावानें वागावें आणि एकमेकांसाठीं त्याग करण्यास तयार होऊन सर्वांची उन्नति करण्यासाठीं निःस्वार्थबुद्धीनें सर्वांनीं झटावें ही तत्वें राष्ट्रीय भावनेंत अंतर्भूत होतात. या राष्ट्रीय भावनेला दोन भिन्न परिस्थितींत दोन भिन्न स्वरूपें प्राप्त होतात. आपल्या राष्ट्रावर परकीयांचें आक्रमण झालें असतां त्याचें निवारण करण्यासाठीं लढणाऱ्या राष्ट्रांत निर्माण होणारी राष्ट्रीय भावना आणि आपल्या राष्ट्राच्या संपत्तींत, सत्तेंत आणि वैभवांत भर टाकण्यासाठीं इतरांवर आक्रमण करणाऱ्या राष्ट्रांत दिसून येणारी राष्ट्रभावना या दोन राष्ट्रभावना अगदीं भिन्न असून पहिली जितकी मंगल आहे तितकीच दुसरी अमंगल आहे. राष्ट्रभावना मानवसंस्कृतीला उन्नतिकारक व मंगल राहवयाची तर तिनें न्यायनिष्ठेचें अधिष्ठान केव्हांहि सोडतां कामा नये. आपल्या व आपल्या राष्ट्राच्या स्वार्थासाठीं इतरांवर आक्रमण करणें किंवा आपल्या राष्ट्रांतील दोन वर्गांतील भांडणें मिटविण्यासाठीं परकीयांना लुटून आपल्या राष्ट्रांतील वर्गयुद्ध टाळणें हें धोरण अथवा तत्त्वज्ञान शुद्ध राष्ट्रीय भावनेशीं विसंगत आहे. सत्याग्रही राष्ट्रीय भावना असें स्वरूप धारण करील तर ती सत्याग्रही उरणार नाहीं आणि तसें तिला करणेंहि शक्य होणार नाहीं, कारण राष्ट्रवादाला वरील विकृति शस्त्रबलाच्या उपासनेविना होऊं शकत नाहीं. सत्याग्रह आणि शस्त्रबलोपासना या वृत्ति परस्परांशीं विसंगत असल्यानें सत्याग्रही राष्ट्रवाद आक्रमक स्वरूप धारण करूं शकत नाहीं. त्याचप्रमाणें ज्या भांडवलशाहीमुळें युरोपीय राष्ट्रवादाला आज लष्करशाही स्वरूप प्राप्त झालें आहे त्या भांडवलशाही संस्कृतीचाहि सत्याग्रह स्वीकार करूं शकत नाहीं. भौतिक सुखासक्ति आणि स्वार्थसाधन हीं भांडवशाहीचीं लक्षणें असून तीं सत्याग्रहाशीं

विसंगत आहेत. निःस्वार्थ सेवा आणि अनासक्ति, सत्य आणि अहिंसा या तत्त्वांनर अधिष्ठित झालेलें राष्ट्रीयत्व भांडवलप्रधान राष्ट्रीय लष्करशाहीचें स्वरूप धारण करील अशी भीति किंवा आशा कोणांसहि बाळगतां येणार नाहीं. तेव्हां जितराष्ट्रांत राष्ट्रवादाच्या रूपानें जन्मास आलेला सत्याग्रह तें राष्ट्र स्वतंत्र झाल्यानंतर आक्रमक राष्ट्रवादाचें किंवा साम्राज्यशाहीचें विकृत स्वरूप धारण न करतां आपली आत्मबलाची क्रांति अंतर्गत सुधारणांच्या कामीं लावील आणि लोकशाहीला अधिक शुद्ध बनविण्यासाठीं समाजसत्ताक स्वरूप देईल हेंच स्वाभाविक आहे.

## युरोपांतील विकृत राष्ट्रवाद

आधुनिक युरोपांतील राष्ट्रवाद हा प्रथमपासून प्रतिगामी प्रवृत्तीचा, परंपरारक्षणाच्या नांवानें अंतर्गत सुधारणांना विरोध करणारा आणि व्यक्तिवाद, लोकशाही व समाजवाद या समतावादी व स्वातंत्र्यवादी चळवळींना हाणून पाडून परकीयांवर आक्रमण करणाऱ्या साम्राज्यशाही वृत्तीचा असल्याचें दिसून येतो. व्यक्तिवाद आणि समाजवाद हीं दोन समतावादी व स्वातंत्र्यवादी सामाजिक तत्त्वज्ञानें आधुनिक युरोपांत निर्माण झालीं. त्यांनीं जेव्हां जेव्हां सशस्त्र क्रांतीचे प्रयत्न केले तेव्हां तेव्हां परंपरारक्षणाच्या नांवानें या क्रांतिकारक प्रयत्नांना दडपून टाकण्याचें कार्य युरोपांतील प्रतिगामी शक्तींनीं राष्ट्रवादाच्या नांवानें केलेलें आहे. यामुळें आधुनिक युरोपांत राष्ट्रवाद ही एक क्रांतिविरोधी प्रतिगामी शक्ति गणण्यांत येऊं लागली व तिलाच आज फॅसीझमचें आसुरी स्वरूप प्राप्त झालेलें आहे. या प्रतिगामी राष्ट्रवादाहून जितराष्ट्रांत निर्माण होणारा राष्ट्रवाद हा भिन्न असून तो क्रांतिकारक असतो. सत्याग्रही राष्ट्रवाद हा असाच क्रांतिकारक

असून त्याचें अंतरंग अहिंसावादी असल्यानें तो आक्रमक राष्ट्रवादाचें स्वरूप कधींच धारण करणें शक्य नाहीं. राष्ट्रीय स्वातंत्र्यप्राप्तीचें निकटवर्ती ध्येय प्राप्त झाल्यानंतर तो युरोपांतील व्यक्तिवादी व समाजवादी चळवळींप्रमाणें अंतर्गत सुधारणांचें अथवा सर्वांगीण क्रांतीचें कार्य करूं लागेल. खरें राष्ट्रीयत्व हें समतावादी व स्वातंत्र्य-वादच असलें पाहिजे व त्याचा लोकसत्तेला वा समाजसत्तेला विरोध असतां कामा नये. राष्ट्रवाद म्हणजे राष्ट्रांतील वरिष्ठ वर्गाचें हित आणि कनिष्ठ वर्गाचें दास्य, आणि राष्ट्रीय वैभव म्हणजे परकीयांना दास करून स्थापन केलेली साम्राज्यशाही ही राष्ट्रवादाची विकृति आहे. हें विकृत राष्ट्रीयत्व व्यक्तिस्वातंत्र्याला, आर्थिक व सामाजिक समतेला आणि लोकशाहीला विरोधी असतें. सत्याग्रही राष्ट्रीयत्व याहून भिन्न असलें पाहिजे आणि त्यानें व्यक्तिस्वातंत्र्य, आर्थिक समता, लोकसत्ता व समाजसत्ता यांच्या योग्य मर्यादा ओळखून त्या सर्वांचा समन्वय केला पाहिजे. समाजसत्ताक लोकशाही हीच खरी लोकशाही आहे हें मान्य करणाऱ्या सत्याग्रहास व्यक्तिवाद, राष्ट्रवाद आणि समाजवाद यांचा समन्वय करतां येईल.

## व्यक्तिवाद, राष्ट्रवाद व समाजवाद यांचा समन्वय

राष्ट्रवाद आणि समाजवाद यांतील मुख्य विरोध भांडवलशाहीमुळें निर्माण होणाऱ्या वर्गयुद्धांतून जन्मास येत असतो. या वर्गकलहाचा निर्णय आत्मबलानें व अनत्याचारी क्रांतिशास्त्रानें लावून घेतल्यास लोकशाहीचा व व्यक्तिस्वातंत्र्याचा त्याग न करतां समाजसत्तेची प्रस्थापना करतां येईल हें मागें दाखवून दिलेंच आहे. अशी समाजसत्ताक लोकशाही हीच जशी खरी लोकशाही आहे तशीच ती खऱ्या राष्ट्रीय भावनेचीहि परिणति आहे असें दिसून

येईल. आर्थिक समतेविना जशी लोकशाही खोटी ठरते. तसेंच आर्थिक व सामाजिक विषमतेमुळें राष्ट्रीयत्व दुभंगते हा अनुभव आज युरोपांत येत आहे. हें दुभंगलेलें राष्ट्रीयत्व सांधण्यास वरिष्ठ वर्गाची अनियंत्रित सत्ता स्थापन करणें आणि समाजाच्या बुद्धीला न पटणारी वर्गसंस्था परंपरारक्षणाच्या नांवानें चिरंतन करणें हा मार्ग नाहीं व तो अंतीं यशस्वीहि होणार नाहीं. औद्योगिक क्रांतीनंतर निर्माण होणारी द्विवर्ग समाजरचना मोडून एकवर्ग समाजरचना स्थापन करणें हें जसें लोकशाहीच्या तसेंच राष्ट्रीय भावनेच्या परिणतीसहि आवश्यक आहे. या दृष्टीनें खरें राष्ट्रीयत्व हें लोकसत्ताकच असलें पाहिजे, आणि खरी लोकशाही समाजसत्ताकच असली पाहिजे, असें आमचें मत असून अशा समाजसत्ताक लोकशाहींतच सर्वांच्या व्यक्तिविकासास योग्य अवसर मिळण्याचा संभव असल्यानें तिच्यामुळें व्यक्तिस्वातंत्र्याचीहि वृद्धीच होईल. या समाजसत्ताक लोकशाहीच्या संस्थापनेस सत्याग्रही वृत्तीची आवश्यकता आहे तशीच तिच्या सुस्थितीस व भावी विकासासहि सत्याग्रहाची आवश्यकता आहे. कारण सत्याग्रहाचें अंतिम ध्येय आत्मराज्य हें असून त्या दिशेनें समाजसत्ताक लोकशाहीचा विकास होणें हाच तिचा खरा विकास होय. या विषयाचें अधिक विवेचन अखेरच्या प्रकरणांत करण्याचें योजिलें आहे.

ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ५९८९

# लोकशाही राज्ययंत्र
# ( घटना आणि कार्यपद्धति ) : : : ५

## लोकशाहीचें ध्येय व राज्ययंत्र यांचा संबंध

आतांपर्यंत लोकशाही राज्यसंस्थेचें तात्त्विक विवेचन करण्यांत आलें. या प्रकरणांत आधुनिक लोकशाहीच्या राज्ययंत्राचे निरनिराळे प्रकार आणि त्याचीं कार्यें यांचें विवेचन करावयाचें आहे. लोकशाहीच्या ध्येयाच्या मानानें हा राज्ययंत्राच्या घटनेचा भाग एक प्रकारें गौण आहे, कारण हेंच ध्येय साध्य करण्यासाठीं आज ज्या राज्ययंत्राचा अथवा राजकीय संस्थांचा उपयोग करण्यांत येत आहे त्यांहून भिन्न संस्थांचा अथवा राज्ययंत्राच्या भिन्न प्रकारांचा उपयोग पुढें करण्यांत येण्याचा संभव आहे. लोकशाहीच्या ध्येयाच्या सापेक्षतेनें विचार केल्यास तिच्या राज्ययंत्रांच्या घटना जशा गौण तशाच त्या कमी टिकावू आणि अधिक सुधारणाक्षम असणें अगदीं साहजिक आहे. तथापि कोणतेंहि सामाजिक ध्येय सामाजिक संस्थांच्या रूपानेंच व्यक्त होत असतें व कार्य करीत असतें. ध्येयें हीं केवळ कल्पनागोचर आणि अमूर्त असतात आणि तीं व्यक्त करणाऱ्या संस्था याच अनुभवगोचर आणि मूर्त असतात. ध्येयें जितकीं पूर्ण असतात तितकीं त्यांचीं मूर्त अनुभवगोचर स्वरूपें पूर्ण असूं शकत नाहींत, पण मनुष्यांचें सुखदुःख केवळ अमूर्त सामाजिक ध्येयांवर अवलंबून नसून तें त्यांच्या मूर्त स्वरूपांवर म्हणजे त्यांच्या संस्थांवर, त्या संस्था चालविणाऱ्या व्यक्तींवर आणि त्यांच्या व्यवहारांवर अवलंबून असतें. या दृष्टीनें लोकशाहीच्या अमूर्त ध्येयापेक्षां तिच्या राजकीय संस्थांना

व्यावहारिक दृष्ट्या अधिक महत्त्व आहे. शिवाय ध्येयें हींसुद्धा व्यवहाराच्या कसोटीवर घासून पाहिल्याविना त्यांचें इष्टानिष्टत्व समजत नाहीं अथवा त्यांतील अपूर्णता प्रत्ययास येऊन त्यांवर उपाय योजना सुचत नाहींत. एका ध्येयांतील अपूर्णता लक्षांत येऊन दुसऱ्या ध्येयांचा शोध लागण्यासहि प्रत्यक्ष व्यवहारांचा अनुभव यावा लागतो. अनुभवाच्या निरीक्षणांतून व परीक्षणांतूनच नव्या ध्येयांचा उदय होत असतो आणि हा अनुभव ध्येयांच्या मूर्त स्वरूपांचा म्हणजे संस्थांचाच येत असतो. या सर्व दृष्टींनीं लोकशाही राज्ययंत्राचें म्हणजे त्यांच्या घटना प्रकारांचें ज्ञान महत्त्वाचें असतें.

## इंग्लंड, फ्रान्स व अमेरिका यांच्या घटनांचें महत्त्व

आज इंग्लंड, अमेरिका आणि फ्रान्स हे तीन देश लोकशाही संस्कृतीचीं माहेरघरें समजले जातात. या तीन देशांतील लोकशाही राज्यघटनांचे प्रकार अनेक दृष्टींनीं परस्परांहून भिन्न आहेत आणि या प्रकारभेदांप्रमाणें त्यांच्या परिणामांतहि बरेवाईट फरक अनुभवास येत असतात. गेल्या महायुद्धानंतर लोकशाहीच्या ज्या अनेक घटना बनविण्यांत आल्या त्या बनवितांना या देशांतील राज्यघटनांचेंच कमी अधिक प्रमाणांत अनुकरण करण्यांत आलें होतें आणि त्या महायुद्धापूर्वीं तर या तीन देशांतील राज्यसंस्थांचें कमी अधिक अनुकरण करण्यावाचून लोकशाही राज्यघटना निर्माण करण्याचा दुसरा मार्गच नाहीं अशी सार्वत्रिक समजूत होती. आज या राष्ट्रांतील लोकशाहीवर राज्यशास्त्रज्ञांचा इतका विश्वास उरलेला नाहीं, तरी ज्यांना लोकशाहीचा अभ्यास करावयाचा आहे त्यांना तेथील राज्ययंत्रांच्या निरनिराळ्या अंगांचा अभ्यास करण्यासारखें दुसरें साधन नाहीं असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

## शुद्ध लोकशाही व लोकसत्ताक राजशाही

लोकशाही राज्यघटनांचा अभ्यास करीत असतां त्यांचे निरनिराळे नमुने लक्षांत घ्यावें लागतात. हे नमुने लक्षांत येण्यास इंग्लंड, फ्रान्स व अमेरिका या तीन राष्ट्रांतील राज्यसंस्थांचें निरीक्षण केलें असतां पुरें होणार आहे. प्रथमतः आपण इंग्लंड आणि फ्रान्स या देशांतील राज्यघटनांकडे पाहिल्यास जो पहिला भेद आपल्या लक्षांत येतो, तो म्हणजे इंग्लंडांतील राष्ट्राधिपति हा आनुवंशिक राजा असून फ्रान्स-मध्यें राष्ट्राधिपतीच्या पदावर लोकनियुक्त राष्ट्राध्यक्षाची नेमणूक केलेली असते. यामुळें सकृद्दर्शनीं एखाद्यास असें वाटण्याचा संभव आहे कीं इंग्लंडांत लोकशाही नसून राजशाहीच अस्तित्वांत आहे. पण हा केवळ आभास आहे. फ्रान्स आणि अमेरिका या दोन राष्ट्रांत जितकी लोकशाही आहे तितकीच इंग्लंडांतहि आहे आणि पहिल्या दोन देशांत जसें लोकशाहीच्या नांवानें धनिक वर्गाचें राज्य चालू आहे तसेंच इंग्लंडांतहि लोकशाहीच्या नांवानें तेथील धनिक वर्गाचें राज्य चालू आहे. तेव्हां अमेरिका व फ्रान्स यांच्याप्रमाणेंच इंग्लंड हाहि एक आधुनिक लोकशाहीचाच प्रकार आहे असें मानिलें पाहिजे. इंग्लंडांतील राजा हा केवळ नामधारी असून त्याचें मंत्रिमंडळ हेंच खरें सत्ताधारी आहे, आणि तें मंत्रिमंडळ नेमण्याचा व काढण्याचा कायदेशीर व्यवहार त्याच्या नांवानें होत असला तरी तें मंत्रिमंडळ काढण्याची व नेमण्याची खरी सत्ता त्याच्या हातीं नसून ब्रिटिश पार्लमेंटला व विशेषतः त्यांतील कॉमन्स सभेला—लोकप्रतिनिधि सभेला—आहे. या सभेंत सर्व सभासद लोकनियुक्त असून ज्या पक्षाचें बहुमत या सभेंत असेल त्या पक्षाच्या पुढाऱ्यालाच मुख्य मंत्रि नेमावें असा इंग्लंडांतील राज्यघटनेचा अलिखित नियम आहे. या नियमाचें उल्लंघन राजानें केल्यास त्याच्या राज्यकारभारास लागणारें द्रव्य मंजूर करण्यास व सैन्य नोकरांत

ठेवण्यास कॉमन्स सभा संमति देणार नाहीं, कारण या गोष्टींना दरसाल कॉमन्स सभेची संमति घेणें कायदेशीर दृष्ट्या अवश्य असतें. कॉमन्स सभा दरसाल आयव्ययाला व सैन्य-उभारणीला संमति देत असते व ती एक वर्षाच्या मुदतीनेंच देण्यांत येत असते. अशा प्रकारें सैन्य आणि तिजोरी यांच्यावर लोकप्रतिनिधि सभेची कायदेशीर संपूर्ण सत्ता स्थापन झाल्यामुळें राजाला आपला मुख्यमंत्रि त्या सभेंतील बहुसंख्य पक्षाच्या पुढाऱ्यालाच नेमावा लागतो आणि त्याला आपल्या इच्छेप्रमाणें इतर मंत्र्यांची नेमणूक करून आपलें मंत्रिमंडळ बनविण्याचें स्वातंत्र्य द्यावें लागतें. अशा प्रकारें इंग्लंडांतील मंत्रिमंडळ राजाचे नोकर असलें व त्याच्या नांवानें राष्ट्राचा राज्यकारभार करीत असलें, तरी त्याच्यावर राजाची सत्ता नसून लोकप्रतिनिधिसभेची सत्ता त्याच्यावर चालते. आणि तें मंत्रिमंडळ प्रतिनिधि सभेला जबाबदार आहे असें म्हणतात कारण वस्तुतः ती सभाच त्याला नेमूं व काढूं शकते. तसेंच राज्यकारभाराची सर्व सत्ता या मंत्रिमंडळाच्या सहीशिवाय कायदेशीर ठरत नाहीं. अशी कायदेशीर व्यवस्था करण्यांत आली आहे. या पद्धतींत राष्ट्राधिपति हा केवळ नामधारी बनतो आणि मंत्रिमंडळ सत्ताधारी बनून प्रतिनिधि सभेला राज्यकारभारासंबंधी जबाबदार बनतें. यालाच जबाबदार मंत्रिमंडळाची पद्धति असें म्हणतात. हीच फ्रान्समध्येंहि आहे आणि तेथील लोकनियुक्त राष्ट्राध्यक्षहि इंग्लंडांतील राजाप्रमाणें नामधारी असून मंत्रिमंडळच सत्ताधारी आहे व तें तेथील प्रतिनिधिसभेला—चेंबर ऑफ डेप्युटीज्‌ला—जबाबदार आहे. तात्पर्य राष्ट्राधिपतीच्या जागेवर आनुवंशिक राजा आहे येवढ्यावरूनच कोणत्याहि देशांत लोकशाही राज्यपद्धति आहे किंवा नाहीं याचा निर्णय लागत नाहीं. इंग्लंडाप्रमाणें आनुवंशिक राजा असला

तरी (१) तो नामधारी असेल, (२) मंत्रिमंडळ सत्ताधारी असेल, (३) तें प्रतिनिधि सभेला जबाबदार असेल आणि (४) प्रतिनिधिसभा सर्व प्रजेची प्रतिनिधि असेल, तर तेथें लोकशाही राज्य आहे असें म्हणतां येईल. या चार लक्षणांपैकीं पुढील तीन लक्षणें असून राष्ट्राधिपति लोकनियुक्त राष्ट्राध्यक्ष असल्यास तिला 'शुद्ध लोकशाही' (Republic) आणि तो आनुवंशिक राजा असल्यास 'लोकसत्ताक राजशाही' (Consittutional monorahy) असें म्हणतात. हे दोन्हीहि लोकशाही राज्यपद्धतीचेच प्रकार असून दुसऱ्या प्रकारांतील आनुवंशिक राजा हा केवळ पूर्वपरंपरेचा अवशेष आहे व तें राजपद केवळ औपचारिक आहे असें मानितात.

## जबाबदार मंत्रिमंडळ आणि अध्यक्षांकित मंत्रिमंडळ

या एका औपचारिक भेदाकडे दुर्लक्ष केल्यास इंग्लंड आणि फ्रान्स यांच्या राज्यघटनेंत जितकें साम्य आहे तितकें फ्रान्स आणि अमेरिका यांच्या घटनांत नाहीं असें दिसून येतें. अमेरिकेंतहि राष्ट्राधिपति राजा नसून फ्रान्सप्रमाणें राष्ट्राध्यक्ष आहे, पण या एका बाबीखेरीज इतर दृष्टींनीं विचार केल्यास फ्रान्स आणि अमेरिका यांच्या घटनांत फार महत्त्वाचे फरक असून इंग्लंड व फ्रान्स यांच्या घटना परस्परांशीं जितक्या समान आहेत, तितक्या फ्रान्स व अमेरिका यांच्या घटना समान नाहींत असे दिसून येतें. फ्रान्समधील राष्ट्राध्यक्षाप्रमाणें किंवा इंग्लंडांतील राजाप्रमाणें अमेरिकेंतील राष्ट्राध्यक्ष हा नामधारी नाहीं आणि त्याचें मंत्रिमंडळ हें तेथील लोकसभेला (The Congress) जबाबदार नसून तें सर्वस्वी त्यालाच जबाबदार व त्याच्या हुकमतीनें राज्यकारभार करणारें आहे. लोकसभेनें कायदे करावेत आणि धोरण ठरवून द्यावें आणि त्या कायद्यांना व धोरणाला अनुसरून राष्ट्राध्यक्षानें आपणास

जबाबदार असलेल्या मंत्रिमंडळाच्या सहाय्यानें राज्यकारभार करावा अशी अधिकारविभागणी अमेरिकेंत झाली आहे. यामुळें लोकसभा आणि राष्ट्राध्यक्ष ही राजसत्तेचीं दोन पृथक अंगें बनलीं असून त्यांपैकीं कोणीहि दुसऱ्याच्या अंकित नाहीं. दोघांचाहि उगम सामान्य लोकांनीं केलेल्या निवडणुकींतूनच झालेला असतो तर इंग्लंड व फ्रान्स या देशांतील मंत्रिमंडळ—राज्यकारभार करणारें मंडळ-लोकसभेंतून उगम पावलेलें असतें व त्याच्यावर लोकसभेची हुकमत चालते. मंत्रि हे लोकसभेचे सभासद असतात, तिच्या चर्चेंत भाग घेतात, तिचें नेतृत्व करतात आणि तिनें अविश्वास प्रगट करतांच राजीनामे देतात. यानंतर लोकसभेच्या विश्वासास पात्र असें दुसरें मंत्रि-मंडळ अधिकारारूढ होतें. इंग्लंडांत मंत्रिमंडळावर पार्लमेंटचा अविश्वास प्रकट झाल्यास राजीनामे देण्याऐवजीं पार्लमेंट बरखास्त करून आप-णांस अनुकूल असें पार्लमेंट निवडून येतें किंवा नाहीं हें पाहण्याचा हक्क मंत्रिमंडळाला आहे व तसें अनुकूल पार्लमेंट निवडून आल्यास मंत्रिमंडळाला राजीनामे द्यावे लागत नाहींत. अर्थात् या फेरनिवड-णुकींत मंत्रिमंडळाच्या पक्षाचा पराभव झाला—त्या पक्षाचें बहुमत झालें नाहीं-तर मंत्रिमंडळास राजीनामे देणें भागच पडतें. पण कांहीं झालें तरी इंग्लंड किंवा फ्रान्स या राष्ट्रांत लोकसभेंत ज्या पक्षाची बहु-संख्या असेल त्याच पक्षाचें मंत्रिमंडळ असावें लागतें, आणि तें लोक-सभेला जबाबदार असतें. अमेरिकेंत अशी स्थिति नाहीं. तेथील राष्ट्राध्यक्ष एकदा निवडला म्हणजे चार वर्षे अधिकारारूढ असतो व त्याला अथवा त्याच्या मंत्र्यांना लोकसभा केव्हांहि स्थानभ्रष्ट करूं शकत नाहीं. अशा राज्यपद्धतीस स्वतंत्र मंत्रिमंडळाची किंवा 'अध्यक्षांकित मंत्रिमंड-ळांची' पद्धति (Presidential Executive) आणि इंग्लंड व फ्रान्स या राष्ट्रांतील पद्धतीस 'जबाबदार मंत्रिमंडळाची' पद्धति

( Responsible Government or Parliamentary Executive ) अशीं नांवें आहेत. अमेरिकेंत राष्ट्राध्यक्षाची मुदत चार वर्षांची असली तरी लोकसभेची निवडणूक दर दोन वर्षांनीं होते. यामुळें एकदा निवडून आलेला अध्यक्ष लोकसभांच्या दोन कारकीर्दी पूर्ण होईपर्यंत अधिकारावर राहतो. अध्यक्षाच्या निवडणुकीच्या वेळींच लोकसभेची जी निवडणूक होते, त्यावेळीं ज्या पक्षाचा अध्यक्ष निवडून येईल, बहुधा त्याचपक्षाचें बहुमत लोकसभेंतहि निवडून येण्याचा संभव असतो. कारण विशिष्ट काळीं कोणता तरी एक पक्ष लोकप्रिय असल्यानें तोच पक्ष अध्यक्षपदहि जिंकतो व लोकसभेंतील बहुसंख्य जागाहि जिंकतो. पण अध्यक्षाची निवड झाल्यानंतर बऱ्याच दिवसांनीं—त्याच्या उत्तर अमदानींत—लोकसभेची निवडणूक होईल तींत अध्यक्ष ज्या पक्षाचा असेल त्याच पक्षाचें लोकसभेंत बहुमत निवडून येईल असा निश्चित संभव नसतो. यामुळें राष्ट्राध्यक्ष एका पक्षाचा व लोकसभा त्याच्या विरुद्धपक्षाची असा बनाव होण्याची भीति असते. असें झाल्यास एक प्रकारचा पेचप्रसंग निर्माण होतो. धोरण ठरविणारी लोकसभा आणि त्याची बजावणी करणारा अध्यक्ष, यांच्यांत असा तीव्र विरोध उत्पन्न होणें उभयपक्षीं असमाधानास कारण होतें व कित्येक वेळीं राज्यकारभाराला खीळ बसून राज्ययंत्र थांबण्याचाहि धोका असतो. ज्या राष्ट्रांत राज्यकारभार करणारें मंत्रिमंडळ काढून टाकण्याचा हक्क लोकसभेला असतो, तेथें असा पेचप्रसंग निर्माण होऊं शकत नाहीं. यामुळें अध्यक्षांकित स्वतंत्र मंत्रिमंडळाच्या पद्धतिपेक्षां जबाबदार मंत्रिमंडळाची पद्धति अधिक बरी असें म्हणावें लागतें. राज्यकारभार करणारें मंडळ हें लोकसभेच्या विश्वासास पात्र असेल तोंपर्यंतच, अधिकारावर असावें अशी ही पद्धति आहे व ती मागें म्हटल्याप्रमाणें इंग्लंड व फ्रान्स या दोन देशांत असून युरोपांतील इतर देशांतहि लोकशाही स्थापन करतांना

याच पद्धतीचें अनुकरण करण्यांत आलें होतें. आपल्याहि देशांत अशाच प्रकारचीं पद्धति अस्तित्वांत येत आहे.

## संयुक्त व एककेंद्री राज्यघटना

इंग्लंड, फ्रान्स या दोन देशांतील राज्यघटना दुसऱ्या एका बाब-तींत अमेरिकेच्या राज्यपद्धतींहून भिन्न आहेत. इंग्लंड व फ्रान्स या देशांतील राज्यपद्धति 'एककेंद्री ( Unitary ) आहेत तर अमेरिकेची राज्यपद्धति ही संयुक्त स्वरूपाची ( Federal ) आहे, म्हणजे तेथील राजसत्ता अनेक समान दर्जाच्या केंद्रांत विभागलेली आहे. अमेरिकेंत अनेक पोट राज्यें आहेत व त्यांच्या सत्तेवर अथवा अधिकारावर आक्रमण करण्याची सत्ता मध्यसरकारला नाहीं. पोट राज्यांतील सरकारें आणि मध्य सरकार यांचे अधिकार ज्या राज्यघटनेंतून उगम पावले आहेत, ती राज्यघटना त्यांपैकीं कोणांसहि बदलतां येत नाहीं आणि त्या घटनेमुळें मध्यसरकारची व पोट राज्यांतील सरकारांची सत्ता मर्यादित झालेली आहे. असा प्रकार इंग्लंड किंवा फ्रान्स या देशांत नाहीं. तेथेंहि राज्यकारभाराच्या सोयींसाठीं राज्याचे विभाग पाडलेले आहेत, स्थानिक स्वराज्यासारख्या प्रादेशिक क्षेत्रांवर सत्ता उपभोगणाऱ्या संस्था आहेत, पण त्या सर्वांच्या सत्तेचा उगम मध्य-सरकारच्या कायद्यांतून झालेला असून त्यांची सत्ता कमीअधिक कर-ण्याचाहि कायदेशीर अधिकार मध्य सरकारला आहे. अशा राज्यांना एककेंद्री ( Unitary ) राज्य असेंच म्हटलें पाहिजे, मग त्याच्या पोट-विभागांना मध्य सरकारनें सोयींसाठीं केवढीहि सत्ता दिलेली असो. जोंपर्यंत पोटविभागांना दिलेली ही सत्ता कमीअधिक करण्याची सत्ता मध्य सरकारला असते तोंपर्यंत त्या राज्याला संयुक्त राज्य म्हणतां येत नाहीं, आणि पोटविभागांतील राजकीय संस्थांना पोट राज्यें असेंहि

म्हणतां येत नाहीं, पण एकदां या पोट विभागांच्या सत्तेवर मध्य सरकारला आक्रमण करतां येऊं नये अशी व्यवस्था राज्यघटनेनें केली कीं तें राज्य संयुक्तराज्य या संज्ञेला प्राप्त होतें.

## लोकशाही घटनांचें वर्गीकरण

येथपर्यंत लोकशाही राज्यगंत्रांचें जे प्रकारभेद वर्णन केले त्यांस अनुसरून त्यांचे वर्गीकरण करतां येईल. प्रथमतः लोकसत्ताक राजशाही ( Constitutional Monarchy ) आणि शुद्ध लोकशाही ( Repudlic ) असे लोकशाही राज्यांचे दोन वर्ग करतां येतील. पहिल्या वर्गाचें नमुनेदार उदाहरण इंग्लंड हें असून अमेरिका व फ्रान्स हीं राज्यें यांपैकीं दुसऱ्या वर्गात पडतात. पण यापेक्षां संयुक्त व एककेंद्री आणि जबाबदार मंत्रिमंडळ व अध्यक्षांकित मंत्रिमंडळ या तत्त्वांवर होणारें वर्गीकरण अधिक महत्त्वाचें आहे. या तत्त्वांनुसार लोकशाही राज्यांचे पुढील प्रमाणें चार वर्ग पडतात-



## लोकसभांची घटना व कार्यपद्धति

यानंतर लोकशाही राज्यांतील जें विशेष आणि महत्त्वाचें अंग लोकसभा, त्यांच्या घटनांचा व कार्यांचा विचार करूं. सर्व लोकशाही राज्यांत या लोकसभांची घटना द्विदल (Bicameral) असावी असा प्रघातच पडून गेलेला आहे. इंग्लंडांतील पार्लमेंटचें कॉमन्स सभा (प्रतिनिधिसभा) आणि लॉर्डांची सभा (उमरावसभा) असे दोन विभाग आहेत. अमेरिकेंतील लोकसभेचेहि (congress), प्रतिनिधिसभा (House of Representatives) आणि महाजनसभा (Senate) असे दोन विभाग आहेत, आणि फ्रान्समध्येंहि प्रतिनिधिसभा (chamber of deputies) आणि महाजनसभा (senate) अशा दोन दलांची मिळून लोकसभा बनलेली आहे. सामान्यतः प्रतिनिधिसभा ही बहुजनसमाजाची आणि महाजनसभा ही राष्ट्रांतील विद्येनें, धनानें, कुलानें अथवा कर्तबगारीनें श्रेष्ठ गणलेल्या वर्गांची प्रतिनिधि असावी अशी अपेक्षा असते. या दुसऱ्या सभा लोकशाहीवरील अविश्वासाच्या निदर्शक असून लोकशाहीच्या वाढीबरोबर यांची सत्ता कमी कमी होत आलेली आहे. इंग्लंडांतील महाजनसभा ही प्रायः आनुवंशिक सभासदांची बनलेली असून मध्ययुगीन सरंजामशाही युगाचा अथवा पूर्वपरंपरेचा निरुपद्रवी अवशेष याच दृष्टीनें तिचें समर्थन होऊं शकतें. तथापि लोकशाहीच्या विकासास तिचा विरोध अथवा अडथळा होत असून भांडवलप्रधान लोकशाहींतून समाजसत्ताक लोकशाहींत जाण्यास या प्रतिगामी संस्थेचा विरोध झाल्याविना राहणार नाहीं. तसेंच ब्रिटिश साम्राज्यांतील इतर घटकांना लोकशाहीचे अथवा स्वराज्याचे हक्क देण्यासहि तिचा विरोध नेहमी असून तिच्या अस्तित्वामुळें अंतर्गत राज्यक्रांति किंवा साम्राज्यांतर्गत क्रांति केल्याविना लोकशाहीचा विकास होण्यास अवकाश नाहीं, हीं मतें फैलावण्यांतच या प्रतिगामी संस्थेंतील प्रतिगामी चर्चेचा परिणाम होत

असतो. अमेरिका व फ्रान्स या राष्ट्रांतील महाजनसभा, या लोकनियुक्तच असल्यानें लोकशाहीच्या तत्त्वांस त्या तितक्याशा विरोधक मानतां येत नाहींत. अमेरिकेंतील महाजनसभेची निवड प्रत्यक्ष होत असते, तर फ्रान्समध्यें मात्र ती अप्रत्यक्ष रीतीनें होत असते, म्हणजे सामान्य मतदारांकडून न होतां स्थानिक स्वराज्याचे सभासद वगैरेंचे मतदारसंघ बनवून त्या मतदारसंघांमार्फत ती होत असते.या दोन देशांतहि महाजनसभेंतील सभासदांचीं मतें बहुजन समाजाच्या हितसंबंधांशीं विरोधी आहेत अशी भावना असून ज्यांना आजची भांडवलप्रधान संस्कृति बदलून घ्यावयाची आहे त्यांच्या मार्गांत या संस्था अडथळे उत्पन्न करीत असतात. सनदशीर मार्गानें समाजरचना बदलून घेण्याचा पक्ष अयशस्वी होण्यास जीं अनेक कारणें आहेत त्यांपैकीं या संस्थांचें अस्तित्व हें एक कारण आहे यांत शंका नाहीं. या संस्थांच्याकडे बहुजनसमाज अविश्वासानेंच पहात असल्यानें या संस्थांचा उपयोगहि व्हावा तसा होऊं शकत नाहीं, आणि त्यांची सत्ता कमी करण्याकडेच सामान्य प्रवृत्ति दिसून येते. विशेषतः आयव्ययासंबंधीचें नियंत्रण आणि मंत्रिमंडळाला पदभ्रष्ट करण्याचा हक्क या बाबतींत महाजनसभेऐवजीं प्रतिनिधिसभेलाच सर्व सत्ता असावी हें मत लोकशाहीच्या सर्व पुरस्कर्त्यांना मान्य झालेलें आहे. प्रतिनिधिसभांच्या मताधिकारासंबंधीं, सर्व प्रौढ स्त्री-पुरुष राष्ट्रिकांना मताधिकार असावा, हें मत तात्त्विक दृष्ट्या सर्वमान्य झालेलें आहे. तथापि फ्रान्समध्यें अद्यापि स्त्रियांना मताधिकार मिळालेला नाहीं यावरून मनुष्य स्वभाव किती पुराणप्रिय किंवा परंपरेचा दास आहे तें दिसून येतें. शिवाय कोणतीहि सुधारणा केवळ तर्कशुद्ध किंवा तात्त्विक दृष्ट्या सुसंगत म्हणून घडून येत नसून ती हवी असणारांनीं समाजाचें कोठेंतरी अडतें आहे असें सिद्ध केल्याविना किंवा समाजाला तसें वाटल्या-

विना अगदी स्वाभाविक आणि निरुपद्रवी अशी सुधारणाहि घडवून आणण्यास समाज तयार नसतो हेंहि यावरून व्यक्त होतें. परंपरेला चिकटून राहण्याचा हा जो समाजबुद्धींतील तमोगुण तो बुद्धिवादी राजकारणाच्या मार्गांतील एक मोठाच अडथळा आहे. मनुष्यस्वभावांतील ही वृत्ति एकोणिसाव्या शतकांतील लोकशाहीच्या युरोपीय पुरस्कर्त्यांच्या बरोबर लक्षांत आलेली नव्हती, म्हणूनच आपण केवळ बुद्धिबलानें वाटेल त्या सुधारणा घडवून आणूं असा आशावादी आत्मविश्वास त्यांना वाटत होता. पण सामान्य जनतेच्या बुद्धींतील परंपरानिष्ठेचा हा तमोगुण आणि वर्गस्वार्थांतून व वर्गीय अहंकारांतून निर्माण होणारा रजोगुण हे बुद्धिवादी राजकारणाचे दोन प्रबल शत्रु दिसून येऊं लागल्यापासून केवळ बुद्धिबलाचें राजकारण निष्प्रभ वाटूं लागलें आहे. सार्वत्रिक मताधिकाराप्रमाणें गुप्त मतदानपद्धति हीहि लोकशाहीला आवश्यक आहे असें मानण्यांत येत असतें. प्रत्येक व्यक्तिं ही न्यायनिष्ठ असती व आपलीं मतें उघडपणें बोलून दाखविण्यापासून घडणारे सर्व परिणाम सहन करण्यास तयार असती अथवा इतरांच्या प्रामाणिक मतांबद्दल त्यांना त्रास देण्याची वृत्ति व त्यांच्यावर अयोग्य दडपण आणून आपलीं मतें त्यांच्यावर लादण्याची प्रवृत्ति लोकांत नसती तर गुप्त मतदान पद्धतीची आवश्यकता भासली नसती. पण आजच्या समाजांतील मनुष्य स्वभावांत इतकी न्यायनिष्ठा, सत्यनिष्ठा, सहिष्णुता अथवा नीतिधैर्य नाहीं. सामान्य प्रतिष्ठित व सुशिक्षित मनुष्यहि आपलीं मतें व्यक्त करण्यास भितो आणि इतरांचीं मतें दडपून टाकण्यास अथवा भीति व लोभ दाखवून भ्रष्ट करण्यास मागेंपुढें पहात नाहीं असा अनुभव येत असल्यानें गुप्त मतदानपद्धति अस्तित्वांत येऊन सर्वमान्य झाली आहे. तसेंच निवडणुकींतील मतदान होत असतां अधिकारीवर्गानें पूर्ण तटस्थता स्वीकारिली पाहिजे.

असें झाल्याखेरीज खरें लोकमत काय आहे तें समजणार नाहीं. यासाठीं प्रत्येक देशांतील कायमचा अधिकारीवर्ग हा पक्षविशिष्ट राजकारणापासून अलिप्त असावा आणि राज्यसूत्रें कोणत्याहि पक्षाच्या हातीं गेलीं तरी मंत्रिमंडळानें घालून दिलेलें धोरण त्यानें निःपक्षपाती एकनिष्ठेनें अमलांत आणावें हेंहि लोकशाही राज्यपद्धतीच्या यशस्वितेस अत्यंत अवश्य आहे.

## पक्षातीत अधिकारी वर्ग

पक्षविशिष्ट मंत्रिमंडळ आणि पक्षाभिमानरहित अधिकारीवर्ग या दोहोंची लोकशाहीच्या यशस्वितेस सारखीच आवश्यकता आहे. पण अधिकारी वर्ग पक्षाभिमानरहित असावा, याचा अर्थ तो लोकशाहीचा अभिमानी असूं नये असा मात्र करतां कामा नये. लोकशाहीच्या विरुद्ध भावना ज्या अधिकारीवर्गाच्या मनांत रुजलेल्या असतील त्याच्या हातून लोकशाहीचें राज्ययंत्र योग्य प्रकारें चालविलें जाईल अशी अपेक्षा करतां येणार नाहीं. तेव्हां अधिकारी वर्ग हा पक्षविशिष्ट राजकारणापासून अलिप्त परंतु लोकशाहीचा अभिमानी असावा आणि त्याच्या निःपक्षपाति देखरेखीखालीं गुप्त मतदान पद्धतीनें व सार्वत्रिक मताधिकारानें निवडणुकी व्हाव्यात हें लोकशाहीचें ध्येय आहे. ते जितक्या प्रमाणांत प्रत्यक्ष अमलांत येईल तितक्या प्रमाणांतच लोकशाही अमलांत येऊं शकेल. निवडणुकीच्या वेळीं घडणारे लाचलुचपतीचे व धाकदडपशाचे प्रकार थांबविणें हें अधिकारी वर्गाचें महत्त्वाचें, अत्यंत महत्त्वाचें, काम असून तें त्यानें पूर्ण निःपक्षपात बुद्धीनें पार पाडलें पाहिजे.

## लोकसभांचीं कार्यें व सत्ता

आतां लोकसभांचीं कार्यें व त्यांची कार्यपद्धति यासंबंधीं थोडा

विचार करूं. लोकसभांचें मुख्य कार्य कायदे करणें हें समजण्यांत येतें व म्हणूनच त्यांना कायदेमंडळें असें म्हणतात. या कायदे करण्याच्या हक्कांतच सरकारी अंदाजपत्रक मंजूर करणें, आयव्ययांस मंजूरी देणें आणि करग्रहण पद्धति ठरवून देणें यांचा अंतर्भाव होतो व त्यांस तिजोरीवरील ताबा असें म्हणतात. लोकसभेनें केलेल्या कायद्याव्यतिरिक्त आणि मंजूरीविना सरकारला कोणतेंहि उत्पन्न मिळवितां येऊं नये आणि त्याला कोणताही खर्च करतां येऊं नये हा लोकशाहींतील प्राणभूत हक्क गणला जातो. ज्या करांना लोकप्रतिनिधींनीं मान्यता दिलेली नाहीं ते जुलमी कर होत व ते देण्याची लोकांवर नैतिक जबाबदारी नाहीं ( No taxation without representaion ) या तत्त्वाच्या आधारावरच युरोपीय लोकशाहीची वाढ झालेली आहे. या तत्त्वाचा अर्थ कांहों काळ असा करण्यांत येत असे कीं, जे सरकारला प्रत्यक्ष कर देत नाहींत त्यांना लोकसभेंत प्रतिनिधि पाठविण्याचा हक्क–मताधिकार–देण्याची गरज नाहीं. पण अप्रत्यक्ष कर बहुतेकांना द्यावे लागतात आणि कायदे सर्वांनाच पाळावे लागतात, याची जाणीव होऊं लागली आणि धनिकांचें धन हें निर्धनांनीं कायदे पाळले तरच सुरक्षित राहूं शकतें असें दिसूं लागलें, तेव्हां कोणी सरकारला प्रत्यक्ष कर देवो किंवा न देवो, प्रत्येक राष्ट्रिकाला मताधिकार मिळालाच पाहिजे हें सार्वत्रिक मताधिकाराचें तत्त्व सर्वमान्य झालें. तेव्हां कायदे करणें आणि करांना व खर्चाला संमति देणें हीं लोकसभांचीं प्रमुख कर्तव्यें आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. यानंतर दुसरें महत्त्वाचें कर्तव्य म्हणजे राज्यकारभाराचें धोरण ठरवून देणें आणि त्या धोरणानुसार तो चालू आहे किंवा नाहीं यावर देखरेख करणें. ही देखरेख राज्यकारभाराच्या निरनिराळ्या खात्यासंबंधीं प्रश्न विचारून ठेवण्यांत येत असते. फ्रान्समध्यें प्रश्न विचारण्याच्या या हक्काला

फार महत्त्व प्राप्त झालेलें असून एखाद्या महत्त्वाच्या प्रश्नाला समाधानकारक उत्तर न मिळाल्यास मंत्रिमंडळास राजीनामे देण्याचे अनेक प्रसंग येत असतात. यानंतरचा लोकसभेचा अत्यंत महत्त्वाचा हक्क म्हणजे मंत्रिमंडळ पदभ्रष्ट करण्याचा होय. अर्थात् हा हक्क ज्या देशांत मंत्रिमंडळ लोकसभेंतून उगम पावतें व तिलाच जबाबदार असतें तेथेंच हा हक्क लोकसभेला असतो. अमेरिकेप्रमाणें मंत्रिमंडळ अध्यक्षांकित स्वतंत्र असेल तेथें हा हक्क लोकसभेला नसतो. लोकसभेच्या या हक्काला पायबंद घालणारा असा लोकसभा मुदतीपूर्वी बरखास्त करण्याचा हक्क मंत्रिमंडळाला इंग्लंडांत दिलेला आहे. फ्रान्समध्यें लोकसभेची अशी फेरनिवडणूक करण्यास महाजन सभेच्या दोनतृतीयांश सभासदांची संमति अवश्य असते म्हणून तेथील मंत्रिमंडळास हा हक्क फारसा उपभोगतां येत नाहीं. इंग्लंडांत हा हक्क असल्यानें मंत्रिमंडळ अधिक प्रबल बनूं शकतें, पण हें त्याचें बल मतदारांचा पाठिंबा असेल तरच टिकूं शकतें. म्हणजे लोकसभा आणि मंत्रिमंडळ यांच्यांत मतविरोध झाल्यास लोकमताचा कौल घ्यावा अशी पद्धति इंग्लंडांत आहे,तर फ्रान्समध्यें अशा प्रत्येक विरोधाच्या वेळीं मंत्रिमंडळानें राजीनामेच द्यावेत असा संकेत आहे. यामुळें इंग्लंडांतील मंत्रिमंडळापेक्षा फ्रान्समधील मंत्रिमंडळावर लोकसभेची हुकमत अधिक आहे तर फ्रान्सपेक्षा इंग्लंडांत सामान्य मतदारांच्या मताला अधिक मान आहे. मंत्रिमंडळ अधिक प्रबळ बनण्याच्या आणि लोकसभांवर मतदारांचें अधिक दडपण पडण्याच्या दृष्टीनें इंग्लंडांतील पद्धति उपयोगी पडते.

## लोकसभा व मंत्रिमंडळ :
## इंग्लंड, अमेरिका व फ्रान्स यांतील मतभेद

दुसऱ्या दृष्टीनें इंग्लंडांतील मंत्रिमंडळापेक्षां फ्रान्समधील व

अमेरिकेंतील मंत्रिमंडळांवर तेथील लोकसभांची अधिक हुकमत चालत असते. अमेरिका आणि फ्रान्स या देशांत लोकसभांची निवडणूक झाली कीं राज्यकारभाराच्या निरनिराळ्या खात्यांवर देखरेख ठेवणारीं व त्यांच्या धोरणांचा विचार करणारीं कायममंडळें ( Standing Committees ) नेमण्यांत येत असतात. सरकारनें आणलेले कायदे व सूचना त्या त्या खात्याच्या मंडळाकडे विचारासाठीं जात असतात आणि त्यांत त्यांनीं सुचविलेल्या सुधारणा लोकसभा मंजूर करते. यामुळें लोकसभेची हुकमत मंत्रिमंडळावर अधिक चालते. दुसरा एक महत्वाचा फरक इंग्लंड, फ्रान्स येथील व अमेरिकेंतील लोकसभांच्या कार्यांत दिसून येतो. अमेरिकेंतील मंत्रिमंडळ लोकसभेंतील नसतें, यामुळें त्यानें सुचविलेल्या कायद्यांच्या मसुद्याव्यतिरिक्त अनेक कायद्यांचे मसुदे तेथील लोकसभेंत येतात व ते मंजूर होतात. याच्या उलट इंग्लंड व फ्रान्स या देशांतील मंत्रिमंडळें लोकसभेंतील बहुसंख्य पक्षांचींच असल्यानें त्यांनीं आणलेलेच कायद्यांचे मसुदे प्रायः मंजूर होतात. यामुळें कायदे करणें व कारभार करणें, या दोन्हीं कार्यांतील प्रथमपुरस्काराचा हक्क इंग्लंड, फ्रान्स-सारख्या जबाबदार मंत्रिमंडळाच्या पद्धतींत मंत्रिमंडळाकडेच जात असतो. लोकसभेचें कार्य त्यांच्या धोरणाची चर्चा करणें, त्यांस संमति देणें अथवा त्यांस बडतर्फ करणें येवढाच असतो. यामुळें राज्यकारभार करण्याची व धोरण ठरविण्याची सर्व जबाबदारी व सत्ता मंत्रिमंडळाच्या हातीं जाते व लोकसभेचा त्यावर विश्वास असेपर्यंत तें प्रबल व कार्यक्षम राहतें.

## कायमचा अधिकारी वर्ग

येथपर्यंत लोकसभा, मंत्रिमंडळ आणि राष्ट्राधिपति यांचें विवेचन

झालें. आतां मंत्रिमंडळाच्या हाताखालीं काम करणाऱ्या कायमच्या अधिकारीवर्गाचा विचार करावयाचा आहे. राज्यकारभार करण्याचा बहुतेक सर्व भार या कायमच्या अधिकारीवर्गावरच पडत असतो आणि त्याच्या कार्यक्षमतेवर आणि कर्तव्यदक्षतेवर लोकांचें हित अवलंबून असतें. हा अधिकारीवर्ग जन्मभर आपल्या खात्यांत काम करीत असल्यानें आणि त्याचा तो जन्माचाच व्यवसाय असल्यानें त्याला आपल्या खात्याचें ज्ञान झालेलें असतें. त्या त्या विषयांतील तज्ञ व्यक्तींची नेमणूक त्या त्या खात्यावर व्हावी आणि राष्ट्रास अभिप्रेत असेल त्या धोरणानें त्यांनीं त्याचा राज्यकारभार एकनिष्ठेनें करून द्यावा हें त्यांचें कर्तव्य आहे. राज्यकारभाराचें धोरण ठरविणें हें या तज्ञांचें कार्य नव्हे, तर मंत्रिमंडळानें ठरविलेलें धोरण अमलांत आणण्यांत आपलें सर्व कौशल्य आणि कार्यक्षमता व्यक्त करणें, हें त्यांचें कार्य आहे. त्यांची कार्यक्षमता ही त्यांच्या ज्ञानावर, अनुभवांवर आणि एकनिष्ठ कर्तव्यदक्षतेवर अवलंबून असते. पक्षविशिष्ट राजकारणापासून या अधिकारीवर्गानें अलिप्त राहावयाचें असतें आणि मंत्रिमंडळांतील बदलाबरोबर या अधिकारीवर्गांत बदल करावयाचे नसतात. त्यांच्या नेमणुकींत वशिलेबाजी व पक्षपात होऊं नये म्हणून पब्लिक सर्व्हिस कमिशन यासारखी एक स्वतंत्र संस्था स्थापून तिच्याकडून उघड चढाओढीची परीक्षा घेऊन तींत वर अनुक्रम येणारांना या वर्गांत प्रवेश मिळत असतो. वाटेल त्या राष्ट्रिकाला आपल्या अंगीं पात्रता आणून या वर्गांत प्रवेश मिळवितां येईल अशी आशा बाळगतां आली पाहिजे. तसेंच या अधिकारीवर्गाची भरती जनतेंतील विशिष्ट वर्गांतूनच न होतां सर्व वर्गांतील लोकांचा त्यांत भरणा असणें, हें राज्यकारभार जनतेला अनुकूल होण्याच्या दृष्टीनें, अवश्य असतें पण त्याचबरोबर त्यांचें तज्ञत्व व पात्रता कमी होऊं नये

यासंबंधीहि दक्षता ठेविली पाहिजे. जो समाज अनेक जातींत व वर्गांत विभागला आहे त्यांतील बौद्धिक, आर्थिक व सामाजिक विषमतेमुळें दलित वर्गांना अधिकारीवर्गांत प्रवेश मिळणें कठीण होतें व त्यामुळें अधिकारीवर्गाशीं जनतेला आपुलकीचे संबंध वाटत नाहींत. यासाठीं आर्थिक व सामाजिक दृष्ट्या सामान्यजनतेशीं संघट्टन असणें हें अधिकारीवर्गाच्या कार्यक्षमतेच्या व कर्तव्यदक्षतेच्या दृष्टीनें इष्ट गणलें गेलें पाहिजे. आर्थिक वर्गभेदामुळें युरोपीय लोकशाहीखालीं दलित कामगारवर्गाला अधिकारीवर्गाची सहानुभूति लाभत नाहीं अशी तक्रार ऐकूं येते. तसेंच दलितवर्गाच्या उद्धाराचें धोरण व कायदे यांच्या अंमलबजावणींत वरिष्ठ व मध्यमवर्गांतून भरणा झालेल्या अधिकारीवर्गाचें सहकार्य लाभत नाहीं अशीहि तक्रार ऐकूं येते. पाश्चात्य लोकशाही आर्थिक वर्गभेदानें दुभंगून विकृत बनली आहे आणि वर्गसंस्था लोकशाहीच्या ध्येयाशीं विसंगत व विसंवादी आहे असाच याचा अर्थ आहे. एकवर्ग समाज स्थापण्याचा प्रयत्न लोकसभेनें केला तर त्याच्याविरुद्ध बंड करण्यांत हा अधिकारीवर्ग सामील होईल अशीहि भीति तेथील अनेक समाजवाद्यांनीं व्यक्त केलेली आहे.; याचा अर्थ कायमचा अधिकारी वर्ग कोणत्याहि त्या पक्षाच्या मंत्रिमंडळाशीं सहकार्य करील. या सिद्धान्तास बऱ्याच व्यावहारिक मर्यादा आहेत. सांस्कृतिक क्रांतीच्या वेळीं वरिष्ठवर्गाशीं समरस झालेला अधिकारीवर्ग तिला अडथळा करण्याचा व ती शांततेनें घडून येण्यास विरोध करण्याचा धोका असतो. सनदशीर मार्गानें सांस्कृतिक क्रांति घडवून आणण्याच्या मार्गांतील ही एक मोठीच अडचण असून अशा संक्रमणावस्थेंतील समाजांत अधिकारीवर्ग पक्षभेदातीत राहणें व्यवहारतः फारच मुष्कीलीचें असतें. तितक्या प्रमाणांत लोकशाही राज्ययंत्र चालणेंहि कठीण पडतें. म्हणून लोकशाहीच्या भक्तांनीं या संक्रमणाव-

स्थैंतहि अधिकारीवर्ग पक्षातीत राहावा म्हणून त्यांत दलितवर्गाशीं समरस बनलेल्यांचा भरणा होण्याबद्दल, व क्रांति झाली तरी ती लोकशाहीतंत्रास धरून होत आहे तोंपर्यंत, तिच्याशी एकनिष्ठ राहण्याचें शिक्षण अधिकारीवर्गाला मिळण्याबद्दल दक्षता ठेविली पाहिजे. लोकशाही राज्याचें सार्वभौमत्व बहुजन समाजाकडे असून त्याला आपल्या मतानुसार समाजरचनेंत परिवर्तन घडवून आणण्याचा पूर्ण अधिकार लोकशाहीनें दिलेला आहे. हें तत्व अधिकारीवर्गाच्या मनांवर ठसविण्यांत आलें पाहिजे; नाहींतर लोकशाही राज्ययंत्र मोडून टाकण्यांत हा अधिकारीवर्ग प्रथम सामील होण्याचा संभव आहे. म्हणूनच हा वर्ग पक्षभेदापासून अलिप्त असावा हें जितकें अवश्य आहे तितकेंच त्याची लोकशाही संस्कृतीवर अढळ निष्ठा असावी हेंहि आवश्यक आहे. त्यानें पक्षभेदातींत असावें याचा अर्थ त्यानें सुलतानशाही अथवा अनियंत्रित पक्षसत्ता आणि लोकशाही या दोन्ही पद्धति सारख्याच पूज्य मानाव्या असा होत नाहीं. लोकशाहीं राज्यांतील अधिकारी वर्गाच्या मनावर व बुद्धीवर लोकशाही संस्कृतीचें संस्कार खोल ठसलेले असले पाहिजेत. इंग्लंडादि देशांतील अधिकारी वर्गाच्या मनांवर सामाजिक दृष्ट्या प्रतिगामी मतांची छाप बसलेली असतें, हें आतां स्पष्ट झालेलें आहे.

## न्यायासनांचें स्वातंत्र्य व ज्यूरी

येथवर अंमलबजावणी खात्यांतील अधिकारीवर्गासंबंधी जें म्हटलें तें बहुतांशीं न्यायाधिकारी व न्यायासनें यांनाहि लागू आहे. न्यायासनांचें न्यायदानाचें कार्य पक्षभेदापासून अलिप्त राहिलें पाहिजे आणि राज्यकारभार करणाऱ्या अधिकाऱ्यांचें नियंत्रण न्यायासनांवर चालतां उपयोगी नाहीं. न्यायसंस्थापना हें प्रत्येक राज्याचें प्रमुख कर्तव्य असून

त्यांत पक्षपात होतो अथवा राजाधिकाऱ्यांविरूद्ध लोकांना न्याय मिळत नाहीं अशी शंका लोकांना येणें हें त्या राज्याच्या इभ्रतीला धक्का लावणारें दूषण आहे. तसेंच न्यायदान केवळ निःपक्षपातीच असून भागणार नाहीं, तर तें अत्यंत स्वस्त किंबहुना निर्धनास मोफतहि मिळण्याची व्यवस्था असली पाहिजे. न्यायदानाच्या कार्यांपैकीं फौजदारी न्यायदानाच्यावेळीं आरोपी गुन्हेगार आहे किंवा नाहीं हें केवळ सरकारी न्यायाधिशांनीं न ठरवितां ज्यूरीनें म्हणजे स्वतंत्र राष्ट्रिकांच्या पंचांनीं ठरविलें पाहिजे असेंहि न्यायदानांतील लोकशाहीचें तत्व आहे. सरकारकडून होणाऱ्या अन्यायांचें निवारण होण्याची शाश्वति लोकांना वाटण्याच्या दृष्टीनें न्यायासनांचें स्वातंत्र्य आणि ज्यूरीची पद्धति यांना महत्व असून राष्ट्रिकांच्या स्वातंत्र्याचें रक्षण आणि लोकशाहीची वाढ यांचा तो आधार आहे असें मानण्यास हरकत नाहीं. कोणाहि व्यक्तीस शिक्षा होण्यापूर्वी केवळ सरकारी अधिकाऱ्यांनींच नव्हें, तर प्रतिष्ठित राष्ट्रिकांनीं त्या व्यक्तीस गुन्हेगार ठरविलें पाहिजे असें ज्यूरीच्या पद्धतींत गृहीत धरलेलें आहे व तें योग्य आहे. राज्यकारभार न्यायानें चालला आहे असें केवळ तो करणाऱ्या तज्ञांना वाटून काम भागत नाहीं तर तो तसा आहे असें बहुजन समाजाला वाटलें पाहिजे हें लोकशाहीचें एक आद्य तत्त्व आहे. तसेंच न्यायाधिकाऱ्यांनीं निःपक्षपाती न्याय द्यावा या दृष्टीनें त्यांची नेमणूक निवडणुकीनें किंवा अल्पकालीन न होतां ती कायमची व्हावी व ती केवळ कायद्याच्या ज्ञानावर अवलंबून असावी हें अवश्य आहे. न्यायाधीशांना काढण्याचा हक्क अंमलबजावणी खात्याच्या अधिकाऱ्यांना असतां कामा नये व प्रत्यक्ष गुन्हा केल्याखेरीज त्यांना काढण्यांत येऊं नये हें निःपक्षपाती न्यायदानाच्या दृष्टीनें अवश्य आहे. ज्या ठिकाणीं धोरणाचा प्रश्न

नसून विशिष्ट विद्येंतील प्राविण्य आणि निःपक्षपातीपणा या गुणांनाच अधिक महत्त्व असतें तेथें निवडणुकीची पद्धति अपायकारक ठरते. कायद्यांची बजावणी व न्यायदान या कार्यांत कायद्यांतील प्राविण्य आणि निःपक्षपातीपणा यांस जितकें महत्त्व आहे तितकें विशिष्ट मतांना किंवा धोरणाला महत्त्व नसतें, म्हणून कारभार करणारा कायमचा अधिकारी वर्ग आणि न्यायाधिकारी यांच्या नेमणुकींत निवडणुकीचें तत्त्व अवलंबिणें अपायकारक ठरतें. याच्या उलट कायदे करणें व धोरण ठरविणें, या कामांत लोकमताशीं समरस होणें आणि स्वतःच्या मताशीं एकनिष्ठ राहणें, या गुणांना अधिक महत्त्व असल्यानें कायदे करणाऱ्या लोकसभा आणि मुख्य मंत्रि, अध्यक्ष अथवा मंत्रिमंडळ, यांच्या घटनेंत अथवा नेमणुकींत निवडणुकी आणि पक्षविशिष्ट दृष्टि यांचा अवलंब करणें अवश्य व सयुक्तिक ठरतें.

## राजकीय पक्ष व सत्याग्रही वृत्ति

आतां राजकीय पक्षसंस्थेचा विचार करूं. लोकशाही राज्यपद्धति ही सार्वजनिक प्रश्नांची उघड चर्चा आणि मतदान यांच्यावर अवलंबून असल्यानें लोकमत बनविणें, तें व्यक्त करणें, तें अजमावणें, तें विशिष्ट प्रश्नांवर केंद्रित करणें आणि त्याची राज्यकारभारावर छाप पाडणें या गोष्टींना फार महत्त्व असतें. हीं कार्यें करण्यासाठीं निरनिराळ्या मतांच्या लोकांची संघटना करावी लागते अथवा अशा संघटना निर्माण होणें अपरिहार्य ठरतें. या विशिष्ट मतांच्या प्रचारासाठीं आणि त्याच्या प्रभावासाठीं निर्माण होणाऱ्या संघटनांना राजकीय पक्षसंघटना असें म्हणतात. लोकशाही राज्यांत असे अनेक पक्ष आपल्या मतांची छाप राज्यकारभारावर पडावी आणि तो आपल्या मतांच्या लोकांच्या हातीं यावा, याबद्दल उघडपणें खटपट

करीत असतात. राज्यकारभाराचें नियंत्रण करण्यासाठीं अथवा राज्ययंत्रावर ताबा मिळविण्यासाठीं होणारी निरनिराळ्या राजकीय पक्षांमधील चढाओढ हें लोकशाही राज्यांचें नित्य लक्षणच आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण ही चढाओढ निष्काम लोकसेवेसाठीं आणि सत्यसंस्थापनेसाठीं आहे कीं, स्वार्थसंपादनासाठीं आणि सत्ताभिलाषासाठीं आहे हें समजल्याखेरीज तिचे परिणाम चांगले होतील कीं वाईट होतील हें सांगतां येणार नाहीं. स्वार्थी सत्ताभिलाषी राजकारण आणि तत्त्वनिष्ठ निष्कामसेवेचें राजकारण यांतील भेद स्पष्ट करणें व सिद्ध करणें हें फारच बिकट कार्य आहे. राजकारणांत वावरणारे व त्याचे धुरीणत्व करणारे लोक स्वार्थ आणि सत्ताभिलाष यांच्यापासून जितके दूर राहतील तितकें लोकशाहीचें राजकारण अधिक शुद्ध राहील हें उघड आहे. पण राजकारणांत सत्तेच्या उपभोगापासून दूर राहतांच येत नाहीं, कारण सत्तेचा उपभोग घेतल्याविना राजकारण पूर्णच होऊं शकत नाहीं; तेव्हां सत्तेचा उपभोग घेऊनहि तिच्या अभिलाषापासून व आसक्तिपासून अलिप्त कसें राहावें हा राज्यशास्त्रांतील अत्यंत बिकट प्रश्न आहे. या कार्यांत गुंतलेले लोक जशी लोकवंचना करीत असतात तसें ते आत्मवंचनाहि करूं शकतात. जाणूनबुजून अथवा बुद्धिपुरःसर अन्याय करणारांपेक्षां अबुद्धिपूर्वक नेणतेपणानें अन्याय करणारे लोकच जगांत अधिक आढळतात आणि आत्मवंचना करण्याची मानवी बुद्धीची करामत फार अचाट आहे असें अलीकडील मानसशास्त्रवेत्ते जोरानें प्रतिपादित आहेत. राजकीय बुद्धिवादाच्या मार्गांतील आत्मवंचनाशक्ति ही एक प्रचंड धोंड असून या राक्षसीचें निर्दालन केल्याखेरीज कोणासहि खरें राजकारण करतां येणार नाहीं. ही आत्मवंचनाशक्ति मानवी मनांतील सुप्त वा गुप्त हीन प्रेरणांतून निर्माण होत असते व राज-

कारण करणाऱ्या कर्तबगार लोकांच्या अंतःकरणांतहि अशा हीन प्रेरणा गुप्तपणें दबा धरून बसलेल्या असतात. त्यांचे छापे अकस्मित-पणें होत असतात, व ते मोहरूपानें होत असल्यानें आकर्षक वाटतात. या संकटांतून पार पडण्यासाठींच राजकारणाला अध्यात्माचें अधिष्ठान द्यावें लागतें, आणि शत्रूवर विजय संपादण्यास निघालेल्या राजांना

आत्मा जेयः सदा राज्ञा ।
ततो जेयाश्च शत्रवः ॥ मनुस्मृति

असा उपदेश करावा लागतो. राजकीय कर्मयोगांतील अनासक्ति अथवा राजकारणाचें अध्यात्मीकरण तें हेंच होय. हें अध्यात्मीकरण सत्यनिष्ठा आणि अहिंसाप्रवृत्ति यांच्याशिवाय होणार नाहीं. राजशाही राज-कारणाला आज लोकशाही स्वरूप प्राप्त झालें आहे. प्राचीन राजधर्माचें अध्यात्मीकरण भगवद्गीता किंवा मनुस्मृति या ग्रंथांनीं केलेलें दिसून येतें. अर्वाचीन लोकशाही राजकारणाचें अध्यात्मीकरण अद्यापि झालेलें नाहीं. म. गांधी सत्याग्रही वृत्तीचा व तत्त्वज्ञानाचा प्रचार करून त्याचें अध्यात्मीकरण आज करीत आहेत.

## सत्याग्रह हा साधनवाद आहे, सिद्धान्तवाद नव्हे

लोकशाही राजकारणाचें हें अध्यात्मीकरण पूर्णपणें व्हावयाचें तर लोकशाहीखालीं कार्य करणाऱ्या सर्व पक्षांत सत्याग्रही वृत्ति बाणली पाहिजे. याचा अर्थ असा होतो कीं, सत्याग्रहाचा विशिष्ट मतसंप्रदायाशीं म्हणजे समाजवाद, व्यक्तिवाद, राष्ट्रवाद यांसारख्या समाजसंघटने-संबंधींच्या विशिष्ट ‘वादा’शीं नित्यसंबंध आहे असें मानण्याची जी प्रवृत्ति कोठें कोठें दिसून येते, ती चुकीची आहे, असें मान्य झालें पाहिजे. सत्याग्रही मनुष्य हा व्यक्तिवादी, राष्ट्रवादी किंवा समाजवादी

यांपैकीं कोणीतरी एक असला पाहिजे किंवा या सारख्याच एखाद्या चौथ्या 'वादा' चा तो पुरस्कर्ता असला पाहिजे असें म्हणणें चुकीचें आहे. जसा बुद्धिवादी मनुष्य निरीश्वरवादीच असला पाहिजे असें म्हणणें चुकीचें आहे तसेंच सत्याग्रही मनुष्याची विश्वघटनेसंबंधीं विशिष्ट मतेंच असलीं पाहिजेत असा आग्रह धरणें चुकीचें आहे. बुद्धिवाद याचा अर्थ जें बुद्धिला पटेल तें सत्य मानण्याचें तत्त्व, तसेंच सत्याग्रह याचा अर्थ जें निष्काम अनासक्त शुद्ध बुद्धीला पटेल त्याला मान्यता देण्याचें तत्त्व असें समजलें पाहिजे. याला बुद्धियोग असें नांव देण्यास हरकत नाहीं. बुद्धिवादाहून बुद्धियोगाचें वैशिष्ट्य असें सांगतां येईल कीं, पहिल्यापेक्षा दुसऱ्यांत बुद्धीच्या शुद्धीकरणाला प्राधान्य दिलेलें असून, बुद्धीची शुद्धता ही अंतःकरणाच्या व शीलाच्या शुद्धतेवर अवलंबून असतें असें गृहीत धरलेलें आहे. सत्य, अहिंसा आणि संयम यांच्या आधारावर बुद्धियोगाची उभारणी झालेली असून ज्याप्रमाणें सर्व बुद्धिवाद्यांनीं बुद्धिप्रामाण्याला मान्यता दिली पाहिजे, त्याचप्रमाणें सर्व बुद्धियोग्यांनीं बुद्धीच्या शुद्धतेला चारित्र्यशुद्धीची, अंतःकरणशुद्धीची अथवा तपश्चर्येची आवश्यकता आहे येवढी मान्यता दिली पाहिजे. हीच सत्याग्रही वृत्ति आहे व ही वृत्ति ज्यांच्यांत असेल ते सत्याग्रही, मग ते कोणत्याहि पक्षाचे अथवा मताचे असोत. युरोपीय लोकशाहीचा आधार बुद्धिवाद बनला असून त्यांतील धोका बुद्धी रजोगुणानें व तमोगुणानें मलिन होण्यामुळें उत्पन्न होत असतो. हा धोका टाळण्यासाठीं बुद्धियोगाचें तत्त्व अवश्य आहे; पण बुद्धिवाद म्हणजे विशिष्ट संप्रदाय नव्हे हें जितकें खरें आहे, तितकेंच बुद्धियोग म्हणजेहि विशिष्ट मतसंप्रदाय नव्हे हे विसरून चालणार नाहीं. बुद्धियोगी हा श्रीकृष्णासारखा सेश्वरवादी असेल, शंकराचार्यासारखा अद्वैतवादी असेल किंवा गौतमबुद्धासारखा अज्ञेयवादी अथवा निरीश्वरवादीहि

असेल. बुद्धिवाद हा सिद्धान्तवाद नसून साधनवाद आहे. तसाच बुद्धियोग किंवा सत्याग्रह हा सिद्धान्तवाद नसून साधनवाद आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे. म. गांधींच्या विशिष्ट सिद्धान्तांशीं त्याचा नित्यसंबंध नाहीं. ब्रह्मज्ञानाप्रमाणें सामाजिक शास्त्रें व भौतिक शास्त्रें या क्षेत्रांतहि बुद्धियोगी सत्याग्रही मनुष्य निरनिराळ्या मतांचा पुरस्कार करतांना आढळूं शकेल. लोकशाहींतील विचार स्वातंत्र्याला सत्याग्रहानें पायबंद घातला जाऊं नये. तसें होईल आणि सत्याग्रह हा एक इतर अनेक पक्षांप्रमाणें विशिष्ट मतसंप्रदाय बनेल, तर तो सत्याग्रह न उरता मताग्रह बनेल आणि त्यांतून अनियंत्रित पक्षसत्तेचाहि उद्भव होऊं शकेल. अशा पक्षाच्या हातीं राज्यसत्ता आल्यास त्याचें अहिंसात्मक स्वरूपहि नष्ट होईल व तो फॅसिझमचाच एक पर्याय बनेल. तात्पर्य सत्याग्रह आणि लोकशाही यांचा नित्य संबंध टिकावयाचा, तर सत्याग्रह म्हणजे विशिष्ट मतसंप्रदाय हें मत मागें पडून सत्याग्रह म्हणजे एक विशिष्ट मनोवृत्ति व बुद्धियोग येवढाच त्याचा अर्थ रूढ झाला पाहिजे. लोकशाहींतील निरनिराळ्या पक्षांत ही वृत्ति जितकी बाणेल तितक्या प्रमाणांत लोकशाहीचें शुद्धीकरण होईल आणि निरनिराळ्या पक्षांच्या चढाओढीला स्वार्थी सत्ताभिलाषी राजकारणाचें स्वरूप प्राप्त होणार नाहीं.

## इंग्लंडांतील पक्षभेद

आजच्या लोकशाही राज्यांतील पक्षसंघटनांकडे पाहूं लागल्यास निरनिराळ्या देशांत निरनिराळी स्थिति दिसून येते. इंग्लंडांत कॉन्झर्वेटिव म्हणजे परंपरावादी आणि लिबरल म्हणजे प्रागतिक असे दोनच पक्ष एकोणिसाव्या शतकांत होते. यांत कामगारपक्षाची भर या शतकाच्या अखेरीस पडूं लागली आणि गेलें महायुद्ध संपल्यानंतर कांहीं

काळ पार्लमेंटांत परंपरावादी, प्रागतिक आणि कामगार असे तीन पक्ष होऊन कोणत्याच एका पक्षाचें बहुमत तेथें होऊं नये अशीं त्यांची संख्याबलें विभागलीं गेलीं होती. थोड्याच दिवसांत तेथील प्रागतिक पक्ष अगदींच कमबल झाला आणि परंपरावादी आणि कामगार ऊर्फ समाजवादी असे दोनच पक्ष उरले. पण इ. स. १९३० सालीं रॅम्से मॅक्डोनल्ड, फिलिप स्नोडन वगैरे प्रमुख कामगार पुढारी परंपरावादी पक्षास मिळाले व त्याला राष्ट्रवादी असें नांव प्राप्त झालें. उरलेल्या कामगार पक्षानें समाजवादी असें तत्त्वनिष्ठ नांव घेतलें. आतां इंग्लंडांत पुनः राष्ट्रवादी व समाजवादी असें दोनच पक्ष उरलेले असून राष्ट्रवादी पक्षाला आज तेथील पार्लमेंटांत प्रचंड बहुमत प्राप्त झालेलें आहे. समाजवादी पक्ष अगदींच अल्पसंख्य असून त्याला अभिप्रेत असणारें कार्य क्रांतिकारक स्वरूपाचें आहे, पण त्या कार्यास अनुरूप असें साधन त्याच्यापाशीं नाहीं. त्याच्यापाशीं असणारें बुद्धिबलाचें साधन क्रांतिकार्यास अपुरें आहे अशीं लोकांची खात्री पटूं लागल्यानें तो पक्ष लवकर अधिकारारूढ होईल अशी आशा दिसत नाहीं. राष्ट्रवादी हा पक्ष पूर्वींच्या परंपरावाद्यांचाच नवा अवतार आहे आणि भांडवलशाही व साम्राज्यशाही संस्कृतीची परंपरा टिकविण्याचा तो आटोकाट प्रयत्न करीत आहे. त्याचें संख्याबल हें त्याच्या कर्तबगारीवर अवलंबून नसून वरिष्ठ वर्गाचा स्वार्थी रजोगुण आणि कनिष्ठ वर्गाचा तमोगुण यांच्या आधारानें त्याचें बल टिकून आहे. भांडवलशाही व साम्राज्यशाही संस्कृति टिकण्याचा कालच संपल्यानें या राष्ट्रवादी पक्षाला कर्तृत्व दाखवून यश संपादन करण्यास संधि मिळण्याचा संभव दिसत नाहीं. तथापि समाजवादी पक्षाचें दौर्बल्य हेंच राष्ट्रवादी पक्षाचें बल, या न्यायानें भांडवलशाही व साम्राज्यशाही संस्कृतीवर कांहींतरी मोठें अरिष्ट कोसळल्यावांचून

राष्ट्रवादी पक्षाच्या हातचीं राज्यसूत्रें निसटतील असें वाटत नाहीं. भांडवलशाही संस्कृतीचा काळ संपला हें ओळखण्याचें सामर्थ्य ब्रिटिश राष्ट्रांत असतें तर समाजवादी पक्षाकडे त्याचें नेतृत्व येऊं शकलें असतें. पण इतकें नैतिक बल आज तेथें उरलेलें नाहीं यामुळें भांडवलशाही संस्कृतीचें परिवर्तन अंतर्गत शक्तीनें होऊं शकत नाहीं. अर्थात् बाह्य आघातांचें अरिष्ठ कोसळूनच ती संस्कृति रसातळास जाईल व तिच्या बरोबरच उदयास येऊन भरभराटीस आलेलें हें राष्ट्रच रसातळास जाईल अशीं चिन्हें आज दिसत आहेत.

## अमेरिकेंतील पक्षभेद

इंग्लंडाप्रमाणें अमेरिकेंतहि दोन प्रमुख राजकीय पक्ष असण्याची परंपरा बरींच वर्षे टिकून आहे. तेथील या पक्षांस रेपब्लिकन आणि डेमोक्रॅटिक अशीं नांवें आहेत. ही नांवें जशीं—दोहोंचा अर्थ लोकशाही—असाच होत असल्यानें—जवळ जवळ समानार्थक आहेत त्याचप्रमाणें अमेरिकेंतील या दोन पक्षांच्या धोरणांतहि फारसा तात्त्विक भेद दिसून येत नाहीं. अमेरिकेंतील पक्षभेद प्रथमतः गुलामगिरीची संस्था आणि संरक्षक जकाती या प्रश्नांवरून निर्माण झाले. डेमोक्रॅट म्हणविणारा पक्ष शेतकऱ्याचा कैवार घेई आणि शेतीला लागणारे नीग्रो गुलाम ठेवण्याचा गोऱ्या शेतकऱ्यांना सनातन हक्क आहे, व तो नष्ट केल्यानें गोऱ्या शेतकऱ्यांच्या व जमीनदारांच्या मालकी हक्कांवर गदा येते असें प्रतिपादन करी. तसेंच तो कारखानदारांच्या हितरक्षणासाठीं परदेशी मालावर बसविण्यांत येणाऱ्या जकातींना शेतकऱ्यांच्या हितरक्षणाच्या नांवानें विरोध करी व खुल्या व्यापाराचा पुरस्कार करी. याच्या उलट रेपब्लिकन पक्ष हा औद्योगिक उन्नतीसाठीं संरक्षक जकाती बसवाव्या आणि गुलामगिरीची संस्था मोडून टाकून काम-

कऱ्यांना आपली श्रमशक्ति चढाओढीच्या बाजारभावानें वाटेल त्यांस विकण्याचें अनिर्बंध करार स्वातंत्र्य असावें असें प्रतिपादन करीत असे. गुलामगिरी नष्ट होऊन अनिर्बंध स्पर्धेनें श्रमशक्ति विकण्याचें करार-स्वातंत्र्याचें युग हें कारखानदारांना फायदेशीर पडतें असा अनुभव येऊं लागल्यामुळें बहुतेक बरे कारखानदार आणि सावकार ऊर्फ पेढीवाले हे रेपब्लिकन पक्षांत घुसले होते. अशा प्रकारें डेमोक्रॅट पक्ष हा शेतकरी-जमीनदारांचा पक्ष आणि रेपब्लिकन पक्ष हा कारखानदार—पेढी-वाल्यांचा पक्ष बनले. डेमोक्रॅट हे मध्यवर्ति संयुक्त सरकारने केलेले कायदे न मानण्याचा व वेळीं संयुक्त राज्यांतून फुटून जाण्याचाहि हक्क पोट-राज्यांस आहे असें म्हणत, कारण या संयुक्त सरकारांत बहुधा कार-खानदार पक्षाचें बहुमत होई व त्याचें धोरण गुलामगिरीच्या विरुद्ध आणि संरक्षक जकातींच्या बाजूचें असे. यांतूनच एकोणिसाव्या शत-काच्या मध्यानंतर उत्तरेकडील कारखानदारी पोटराज्यें आणि दक्षिणेकडील शेतकरी पोटराज्यें यांच्यांत उघड युद्धच झालें. अखे-रीस दक्षिणेकडील पोटराज्यांचा पाडाव झाला, गुलामगिरी नष्ट झाली आणि संयुक्त सरकारची सत्ता अबाधित बनली. या वेळे-पासून वस्तुतः डेमोक्रॅटपक्षाला ध्येय असें कांहींच उरलें नाहीं म्हणजे रेपब्लिकन पक्षाहून त्याचें वैशिष्ट्य असें कांहीं उरलें नाहीं. कांहीं काल संरक्षक जकातींच्या धोरणास त्यानें मान्यता दिली नव्हती, पण पुढें तीहि देण्यांत आली. यामुळें हे दोन पक्ष म्हणजे विशिष्ट धोरणांचा पुरस्कार करणारे तत्त्वनिष्ठ पक्ष आहेत, असें त्यांचें स्वरूप आतां मुळींच उरलेलें नसून राज्यसंस्था आपल्या ताब्यांत घेण्यासाठीं उपयोगी पडणारीं संघटनायंत्रें, येवढेंच त्यांचें स्वरूप आज उरलें आहे व ही स्थिति पन्नास पाऊणशें वर्षें तरी अशीच चालू आहे. या काळांतील बहुतेक काळांत रेपब्लिकन पक्षच अधिकारारूढ झालेला

दिसून येतो आणि बहुतेक बडे कारखानदार व पेढीवाले या पक्षांत दाखल झालेले आहेत. प्रेसिडेंट विल्सन आणि आजचे प्रेसिडेंट रूझवेल्ट हेच काय ते डेमोक्रॅट पक्षाचे प्रसिद्ध अध्यक्ष सांगतां येतील. प्रेसिडेंट रूझवेल्ट यांना यश मिळण्यास दारूबंदीच्या प्रश्नावर रेपब्लिकन पक्षांत पडलेली फूट कारण झाली असून १९२९ नंतर आलेल्या आर्थिक अरिष्टांतून भांडवलशाही संस्कृति बचावून नेण्यास बड्या कारखानदारांवर नियंत्रणें घालणें अवश्य आहे, असें दिसून आल्यामुळें त्यांचें भांडवलशाहीच्या नियंत्रणाचें अथवा नियोजित आर्थिक घटनेचें धोरण बरेंच लोकप्रिय झालेलें आहे. अशीं नियंत्रणें घालून भांडवलशाहींतील आंतरविरोध कांहीं काळ तरी नष्ट करतां येतात व तिला जीवदान देतां येतें असें प्रेसिडेंट रूझवेल्ट यांनीं दाखवून दिलें आहे. हीं बंधनें कारखानदारांना अप्रिय आणि कामगारांना प्रिय वाटत आहेत, तरी त्यामुळें भांडवलशाहीचें स्वरूप पालटणार नाहीं आणि तिच्यांतील आंतरविरोध नष्ट होणार नाहींत असें अमेरिकेंतील समाजवाद्यांचें मत असून प्रेसिडेंट रूझवेल्ट यांचा पक्ष हा युरोपांतील फॅसिस्ट पक्षाचाच एक प्रकार आहे असें त्यांना वाटतें. पण अमेरिकेंतील समाजवादी पक्ष हा अगदींच दुर्बल असून वर सांगितलेल्या दोन पक्षांच्या संघटनांच्या मानानें त्याची संघटना कांहींच नाहीं. सनदशीर मार्गानें लोकसभेंत बहुमत होण्याची किंवा अध्यक्षपद जिंकण्याची आशा त्याला निदान जवळच्या भविष्यकाळांत तरी वाटत नाहीं. तेथें क्रांतिकारक समाजवादी किंवा कम्यूनिस्ट पक्षहि आहे, पण युरोपापेक्षांहि अमेरिकेंत भांडवलशाही अधिक प्रबल बनल्यामुळें तेथें कम्युनिस्ट क्रांति घडण्याचा मुळींच संभव दिसत नाहीं. युरोपांतील भांडवलशाही राष्ट्रें आपापसांत लढून आपलें मरण ओढवून घेत आहेत आणि रशियासारखें कम्यूनिस्ट राष्ट्र या त्यांच्या भांडणांचा फायदा घेण्यास

टपून जवळच बसलें आहे, यामुळें युरोपांत कम्यूनिस्ट पक्षाला यशाची जेवढी आशा आहे तेवढीहि अमेरिकेंतील कम्यूनिस्ट पक्षाला आज दिसत नाहीं. तथापि युरोपांतील भांडवलशाही आपापसांत लढून नामशेष झाली आणि तेथें कामगार-संस्कृति स्थापन झाली, तर युरोपांत ओतलेलें अमेरिकन भांडवलहि नष्ट होईल व अमेरिकेंतील भांडवलशाहीचा समतोल ढळून ती गडगडून पडेल अशी भीति अमेरिकन भांडवलशाहीच्या हितरक्षकांस वाटत आहे. यामुळें युरोपीय महायुद्धाचा परिणाम भांडवलशाहीच्या विनाशांत होऊं नये, येवढी दक्षता अमेरिकेंतील दोनहि प्रबल पक्ष घेत असून तसा संभव दिसला तर ते दोघेहि एक होऊन या महायुद्धांत पडल्याविना राहणार नाहींत. अमेरिकेंतील कम्युनिस्टांना क्रांति करण्याची हीच संधि आहे, पण तिचा ते फायदा घेऊं शकतील किंवा नाहीं, आणि तेथील भांडवलप्रधान लोकशाही उलथून पाडून अनियंत्रित कामगारशाही स्थापन करूं शकतील किंवा नाहीं हें कोणासहि नक्की सांगतां येणार नाहीं. तथापि युरोपांतील भांडवलप्रधान लोकशाहीच्या अंताबरोबर अमेरिकेंतील भांडवलप्रधान लोकशाहीवरहि गंडान्तर येईल असें भविष्य वर्तविण्यास हरकत नाहीं.

## फ्रान्समधील पक्षभेद व फ्रेंच घटनेवर परिणाम

फ्रान्समधील राजकीय पक्षांची अवस्था इंग्लंड आणि अमेरिका या दोनहि देशांतील पक्षांहून अगदींच भिन्न आहे. तेथें इंग्लंड किंवा अमेरिका या देशांप्रमाणें दोन प्रमुख व प्रबल पक्ष नसून अनेक छोटे छोटे गट आहेत. या गटांत तत्त्वांचा मतभेद असा फारसा नाहीं. यामुळें त्यांपैकीं कोणत्याही गटांचें तात्पुरतें ऐक्य होऊं शकतें आणि असें तात्पुरतें ऐक्य करून संयुक्त मंत्रिमंडळें बनविण्यावाचून तेथील राजकारण

चालूंच शकत नाहीं. इंग्लंडाप्रमाणें तेथील मंत्रिमंडळ लोकसभेला जबाबदार असून त्याला लोकसभा बरखास्त करण्याचा हक्क प्रायः उपभोगतां येत नाहीं. तेथील लोकसभेंत बहुमत असल्याखेरीज कोणतेंहि मंत्रिमंडळ अधिकारारूढ राहूं शकत नाहीं आणि दोन किंवा अधिक पक्षांचें ऐक्य बनविल्यावांचून कोणत्याहि पक्षास हमखास बहुमत आपल्या बाजूस करून घेतां येत नाहीं. यामुळें इंग्लंडाप्रमाणें एकपक्षीय मंत्रिमंडळ न बनवितां संयुक्त मंत्रिमंडळें बनविण्याची प्रथा त्या देशांत रूढ झाली आहे. याचा परिणाम कोणतेंहि मंत्रिमंडळ अधिकारावर आलें तरी तें निर्भेळ नसतें आणि मंत्रिमंडळें बदललीं तरी राज्यकारभाराचें धोरण बदलत नाहीं, असा होता. तेथील राज्यकारभाराचें धोरण ठरविण्यांत मंत्रिमंडळापेक्षां लोकसभेचा हात अधिक दिसून येतो आणि मंत्रिमंडळें हीं तिच्या हातचीं बाहुलीं बनतात, यामुळें कोणत्याहि एका पक्षाच्या धोरणाला अवसर मिळत नाहीं आणि सर्वांचीच सारखी कुचंबणा होऊन राज्यसुधारणा करण्याचा वेग वाढूं शकत नाहीं. लोकसभेंत दोनच प्रमुख व प्रबल पक्ष असले, म्हणजे प्रत्येक वेळीं कोणा तरी एका पक्षाच्या हातीं संपूर्ण राजसत्ता जाऊं शकते व त्याला आपली कर्तबगारी दाखविण्यास पूर्ण अवसर मिळतो आणि लोकांनाहि त्या धोरणाची इष्टानिष्टता प्रत्ययास येऊं शकते. या दृष्टीनें दोनच प्रमुख पक्ष असणें व एकपक्षीय मंत्रिमंडळें अस्तित्वांत येणें, हें लोकशाहीच्या विकासास अधिक पोषक ठरतें. तसेंच अनेक छोटे छोटे गट असले म्हणजे त्यांच्यांतील मतभेदांना तात्त्विक स्वरूप न राहतां त्यांना व्यक्तिनिष्ठेचें स्वरूप प्राप्त होतें आणि स्वार्थी सत्ताभिलाषी राजकारणाला ऊत येतो.

## दोनच पक्ष केव्हां निर्माण होतात ?

पण असे दोनच प्रमुख प्रबल पक्ष अस्तित्वांत येण्यास एखादा सार्व-

जनिक प्रश्नावरील लढा बराच काळ देशांत चालू राहावा लागतो. इंग्लंडांत जमीनदार-कारखानदार या दोन वर्गांतील लढा बराच काळ चालू असल्यानें पहिल्याचा कैवारी परंपरारक्षक कॉंझर्वेटिव पक्ष आणि दुसऱ्याचा कैवारी प्रागतिक लिबरल पक्ष असे पक्ष अस्तित्वांत आले. पुढें भांडवलशाही व साम्राज्यशाही यांच्या अस्तित्वालाच धोका येतांच हे दोनहि पक्ष राष्ट्रवादी हें नांव घेऊन भांडवलशाहीची परंपरा—ही आतां त्या देशांत जुनीच परंपरा बनली आहे—चिरंतन करण्यास सज्ज झाले. पूर्वीचें जमीनदार कारखानदार हे भेद नष्ट होऊन आतां भांडवलदार व कामगार असा नवा वर्ग-विरोध निर्माण झाला व त्यांतून राष्ट्रवादी व समाजवादी असा नवा पक्षभेद अस्तित्वांत आला. त्यांपैकीं समाजवादी हा पक्ष आपल्या अंगीकृत कार्याला अगदींच नालायक ठरल्यानें इंग्लंडांत आज जवळ-जवळ एकपक्ष सत्ताच निर्माण झाली आहे. अमेरिकेंतहि रूझवेल्टचा पक्ष पुनः यशस्वी झाल्यास अशचि स्थिति होईल. समाजवादी माऱ्या-पासून भांडवलशाहीचा बचाव करावयाचा आणि तिच्यांतील आंतर-विरोध वाढविणारें अनिर्बंध स्पर्धेचें तत्त्व नियंत्रित करून राष्ट्रवादाच्या नांवानें साम्राज्यशाही आक्रमण करावयाचें असें हें नवें धोरण आहे. अमेरिकेंतहि या धोरणास विरोध करणारा समाजवादी पक्ष प्रबल होऊन या पक्षास प्रतिस्पर्धी होण्याचा संभव दिसत नाहीं. तात्पर्य भांडवलशाही संस्कृतीचें आमूलाग्र परिवर्तन करण्याचा जो लढा आज या पाश्चात्य लोकशाही राष्ट्रांत निर्माण झाला आहे, तो सामोपचारानें, समेटानें व क्रमविकासानें मिटण्याचा संभव असतां तर राष्ट्रवादी व समाजवादी असे दोन प्रमुख व प्रबल पक्ष या देशांत अस्तित्वांत येऊं शकले असतें. तत्त्वनिष्ठ पक्षभेद निर्माण व्हावयाचे तर ते आज असेच होऊं शकतील. पण हा लढा शांततेनें सोडवून घेण्याची वृत्ति या देशां-

तर्हि टिकेल असें वाटत नाहीं. ती टिकली नाहीं कीं, बुद्धिबलाचे राजकारण संपतें. यानंतर आत्मबलाचें सत्याग्रही राजकारण किंवा शस्त्रबलाचें क्रांतिकारक अथवा क्रांतिविरोधी राजकारण हीं दोनच शिल्लक उरतात. यांपैकीं सत्याग्रही राजकारण निर्माण होण्यास अनुकूल भूमिका भांडवलशाहीनें व साम्राज्यशाहीनें भ्रष्ट बनलेल्या या लोकशाही राष्ट्रांत उरलेली नाहीं. तेव्हां शस्त्रबलाच्या क्रांतिकारक व क्रांतिविरोधी राजकारणांच्या झगड्यांत पाश्चात्य लोकशाहीचा अंत होण्याचाच संभव अधिक दिसतो.

## भरतखंडांतील राष्ट्रवाद व समाजवाद

भरतखंडांत सत्याग्रही राजकारण यशस्वी झाल्यास राष्ट्रवादी व समाजवादी असे दोन तत्त्वनिष्ठ पक्ष अस्तित्वांत येऊन त्यांच्यांतील लढा अनत्याचारी क्रांतीनें मिटूं शकेल अशी आम्हांस आशा आहे. याचीं दोन कारणें आहेत. एकतर आत्मबलाचें राजकारण राष्ट्रीय लोकशाही स्थापण्यांत यशस्वी झाल्यास येथील समाजवादहि सत्याग्रही बनेल, आणि येथें जन्मास येत असलेली भांडवलशाही साम्राज्यशाही स्थापण्याइतकी प्रबल होण्याचा संभव नाहीं. यामुळें राष्ट्रीयत्व आणि लोकशाही यांना विकृत बनविणाऱ्या भांडवलशाहीचा अंत करून खरी लोकशाही, अथवा समाजसत्ताक लोकशाही, स्थापन करण्याचें कार्य, सत्याग्रही राष्ट्रवाद आणि सत्याग्रही समाजवाद असे दोन तत्त्वनिष्ठ पक्ष बनवून हिंदुस्थानांत घडवून आणणें शक्य आहे. मात्र हिंदुस्थानांत राष्ट्रीय स्वातंत्र्य व लोकशाही यांची स्थापना सत्याग्रही क्रांतीनें घडून आली पाहिजे. हिंदुस्थानांत चालू असलेल्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या सत्याग्रह संग्रामांत राष्ट्रवादी व समाजवादी हे दोघेहि सामील

होऊन त्या होमकुंडांत त्या दोन्ही पक्षांतील हिणकस भाग जळून गेला, म्हणजे स्वतंत्र भारतांतील राष्ट्रवादी व समाजवादी पक्षांना शुद्ध तत्त्व निष्ठेचें चोख बावनकशी स्वरूप प्राप्त होईल. अशा तत्त्वनिष्ठ सत्याग्रही पक्षांतील मतभेद एकपक्षीय अनियंत्रित सत्ता स्थापन न करतां व रक्त-पाताची क्रांति न करतां खरी लोकशाही संस्कृति निर्माण करूं शकेल व या लोकशाहीला आत्मबलाचें अधिष्ठान प्राप्त होईल. या आत्म-बलाधिष्ठित लोकशाही संस्कृतींत व्यक्तिवाद, राष्ट्रवाद आणि समाज-वाद या तीनहि वादांचा विरोध नष्ट होऊन त्यांचा योग्य समन्वय झाल्याचें दृष्टीस पडेल.

## पक्षविरोध, हितविरोध व वर्गयुद्ध

सार्वजनिक पक्षभेदांना समाजांतील निरनिराळ्या वर्गांच्या हित-विरोधांचें स्वरूप प्राप्त झालें, म्हणजे सामाजिक न्याय प्रस्थापनेच्या कार्यांतील निरनिराळ्या प्रामाणिक दृष्टिकोणांचें त्यांचें तत्त्वनिष्ठ स्वरूप नष्ट होतें. अशा परिस्थितींत मतविरोधांना हितविरोधांचे उघड स्वरूप प्राप्त होऊन त्यांतील प्रामाणिकपणाचा अंत होतो आणि निरनिराळ्या हितसंबंधांच्या वर्गांत उघड लढा सुरू होतो. या लढ्यांत न्याय प्रस्थापनेची दृष्टि मागें पडून वर्गविजयावर भर देण्यांत आला कीं लोकशाही नष्ट होऊन अनियंत्रित वर्गसत्ता निर्माण होते. भांडवल-शाहीनें दुभंगलेल्या राष्ट्रीयत्वाला व लोकशाहीला एकसंधी बनविण्यास हाच एक उपाय आहे, असें सिद्ध झाल्यास भांडवलशाहीच्या जुलमाला कंटाळलेली जनता त्याचा अवलंब केल्याविना राहणार नाहीं. परंतु मनुष्यांजवळ न्यायप्रस्थापनेचें बाहुबल व बुद्धिबल यांहून श्रेष्ठ असें आत्मबलाचें साधन असेल, तर अद्यापीहि पक्षभेदांना अत्याचारी वर्ग-विग्रहाचें स्वरूप न येऊं देतां प्रामाणिक मतभेदांचें तत्त्वनिष्ठ स्वरूप

कायम ठेवतां येणें शक्य आहे. असें व्हावयाचें तर तत्त्वनिष्ठेसाठीं अथवा सत्यासाठीं त्याग करण्याची वृत्ति समाजांत फैलावली पाहिजे आणि व्यक्तिवादाचा सुखवादाशीं व स्वार्थसाधनाशीं जडलेला संबंध तुटला पाहिजे. समाज-घटनेंत स्वार्थसाधनाला फारच गौण स्थान देण्यांत आलें पाहिजे आणि मानव संस्कृतीचा पाया स्वार्थ व स्पर्धा हा नसून सेवा आणि सहकार्य हा आहे, हें तत्त्व सर्वमान्य झालें पाहिजे. हें होईल तरच लोकशाही संस्कृति निर्माण होईल आणि बुद्धिस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, सामाजिक समता आणि बंधुभावना हा तिचा आदर्श मूर्तस्वरूप धारण करूं शकेल. नाहींतर लोकशाही हा एक लोक-वंचनेचा प्रकार भांडवलशाहीच्या जन्माबरोबर जन्मास आला, तिच्या वाढीबरोबर वाढला आणि तिच्या अंताबरोबर अंत पावला असेंच सिद्ध होईल.

---

# लोकशाही संस्कृति : : : ६

लोकशाही ही एक केवळ राज्यपद्धति नसून तो एक मानव संस्कृतीचा आदर्श आहे हें आतांपर्यंत अनेकवार सांगितलें. या प्रकरणांत या लोकशाही संस्कृतीचा थोडा अधिक विस्तारानें विचार करावयाचा आहे. लोकशाही संस्कृति ही स्वतंत्रता, समता आणि बंधु भावना या ध्येयांनीं प्रेरित झालेली असली पाहिजे हेंहि येथवर सांगण्यांत आलेंच आहे; पण या ध्येयांच्या मूर्त स्वरूपासंबंधीं अधिक तपशील सांगणें अवश्य आहे.

## वर्गसंस्थेनें दुभंगलेली लोकशाही

लोकशाही संस्कृति ही समता व बंधुभावना यांची जननी असली पाहिजे, असें म्हटलें तरी आजपर्यंत जीं जीं लोकशाही राज्यें म्हणून निर्माण झालीं वा आजहि अस्तित्वांत आहेत,त्यांत ही समता व बंधुभावना दिसून येत नाहीं आणि त्यांच्याच आश्रयानें असणारी खरी स्वतंत्रताहि तेथें दिसत नाहीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे. केवळ मताधिकार सार्वत्रिक बनल्यानें लोकशाहीचें ध्येय अस्तित्वांत येऊं शकत नाहीं, तर तिच्यांत अंतर्भूत होणारीं सर्व सामाजिक ध्येयें सर्व समाजाच्या सर्व व्यवहारांत कार्यक्षम झालेलीं अनुभवास आलीं पाहिजेत. असें होण्याच्या मार्गांत मुख्य अडचण समाजांतील वर्गसंस्था हीच असून ही वर्गसंस्था कशी निर्माण होते व तिचा अंत होणे कसें व केव्हां शक्य आहे,याचा विचार केल्याविना लोकशाही संस्कृतीचें विवेचन पुरें होऊं शकत नाहीं. आजपर्यंत ज्यांना सुसंस्कृत मानवसमाज असें गणण्यांत आलें आहे, ते सर्व वर्गसंस्थेनें युक्त असेच असून या वर्गसंस्थेमुळें त्यांची संस्कृति दुभंगलेली आणि विकृत बनलेली आढळून येते. ही वर्गसंस्था राज्यसंस्थेनें निर्माण केलेली नसून तिच्या संरक्षणाचें कार्यच राज्यसंस्था करीत असते. तेव्हां वर्गसंस्थेची उत्पत्ति, अभिवृद्धि आणि विनाश यांचा उलगडा होण्यास केवळ राज्यसंस्थेचा विचार करून पुरेसें होणार नाहीं. वर्गसंस्थेचा संबंध समाजाच्या आर्थिक घटनेशीं असून या आर्थिक घटनेंतील फेरबदलानुसार या संस्थेंतहि फेरबदल होत आलेले आहेत.

## इतिहासाची भौतिक मीमांसा

या दृष्टीनें विचार केल्यास समाजांची आर्थिक घटना हा त्याच्या संस्कृतीचा पाया आहे, आणि या पायांतील बदलांप्रमाणें त्याच्या सर्व

संस्कृतींत बदल घडून येत असतात, असें म्हणण्यास हरकत नाहीं. मानवसंस्कृतीच्या इतिहासाच्या या मीमांसेला भौतिक मीमांसा असें म्हणतात. मानवी इतिहासाची मीमांसा करण्याची ही पद्धति भौतिक किंवा वास्तववादी असली तरी ती अध्यात्माशीं किंवा ध्येयवादाशीं विसंगत आहे असें पुष्कळांना वाटतें, पण तो एक गैरसमज आहे. मानवजीवनाचा पाया शरीरधारणा आहे आणि या दृष्टीनें शरीर हें आद्य धर्मसाधन आहे हें म्हणणें जसें अध्यात्माशीं किंवा ध्येयवादाशीं विसंगत नाहीं, त्याचप्रमाणें सामाजिक संस्कृतीचा पाया त्याच्या आर्थिक घटनेंत असतो हें मत अध्यात्माला किंवा ध्येयवादाला विरोधी नाहीं. समाजाची अध्यात्मिक उन्नति करूं इच्छिणारांनींही त्याच्या आर्थिक परिस्थितीकडे लक्ष पुरविलें पाहिजे आणि सामाजिक ध्येयांच्या प्रस्थापनेस त्याच्या आर्थिक परिस्थितीनें मर्यादा पडत असतात इकडे दुर्लक्ष करतां कामा नये, येवढाच या म्हणण्याचा अर्थ आहे.

## भांडवलशाहीचा पाया

आजच्या भांडवलशाही संस्कृतीचा पाया भौतिक विद्या, यंत्रकला आणि यांत्रिक धनोत्पादन पद्धति हा आहे, याबद्दल कोणाचाहि मतभेद होईल असे वाटत नाहीं. हाच सिद्धान्त मध्ययुगीन आणि प्राचीन मानवसंस्कृतींना लाविला म्हणजे मानवसंस्कृतींची भौतिक मीमांसा तयार होत असते. मध्ययुगीन संस्कृतींत सरंजामदारवर्गाला श्रेष्ठ स्थान होतें आणि आजच्या संस्कृतींत व्यापारी कारखानदार वर्गाला श्रेष्ठ स्थान मिळालेलें आहे. असा हा फरक कां पडला, याचा विचार केल्यास आजच्या समाजांत नव्या धनोत्पादन पद्धति अस्तित्वांत आल्या, धनार्जनाचे नवे मार्ग अस्तित्वांत आले, श्रीमंत बनण्यास नवीं साधनें उपलब्ध झालीं आणि त्यांचा उपयोग करून वैभवास चढलेला वर्ग सरं-

जामशाहीखालीं नांदण्यास तयार नव्हता, हेंच उत्तर द्यावें लागतें. अर्थात् आतांच्या काळांत सरंजामशाही संस्कृति टिकणें अशक्य झाले आहे व तें समाजाच्या आर्थिक घटनेंतील या क्रांतीमुळें अशक्य झालें आहे हें कोणासहि कळूं शकतें. आजच्या समाजांत लोकशाही नष्ट झाली आणि अनियंत्रित राजसत्ता स्थापन झाली तरी ती मध्ययुगीन सरंजामशाही पद्धतीची न होतां फॅसिझम किंवा कम्यूनिझमच्या पद्धतीची म्हणजे धनिकशाही किंवा कामगारशाही पद्धतीची अनियंत्रित पक्षसत्ता किंवा वर्गसत्ता स्थापन होऊं शकेल हेंहि उघड आहे. यावरूनहि मानवसंस्कृतीचा पाया त्याच्या आर्थिक घटनेवर अवलंबून असतो हाच सिद्धान्त सिद्ध होतो.

## वर्गसंस्थेचा त्रोटक इतिहास

समाजाच्या अगदीं प्राथमिक किंवा वन्य अवस्थेंत मृगयावृत्ति हाच मानवाचा शरीरपोषणाचा आधार होता. या समाजांतील संस्कृति ही मात्र वर्गाधिष्ठित संस्कृति नव्हती. ज्याप्रमाणें पशुपक्ष्यांच्या कळपांत श्रीमंत गरीब हा वर्गभेद नसतो, त्याचप्रमाणें या प्राथमिक मानव समाजांतहि सधननिर्धन असा वर्गभेद नव्हता. स्त्रीपुरुष किंवा काळेगोरे अथवा उंचठेंगणें असे मानवाचे नैसर्गिक प्रकार आहेत तसेच सधननिर्धन हे नैसर्गिक जन्मसिद्ध प्रकार आहेत ही कल्पना त्यावेळीं कोणांसहि असणें शक्य नाहीं. "चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्म विभागशः" असें म्हणणारा एखादा अवतारी पुरुष या समाजांत जन्मास येणेंहि तितकेंच अशक्य आहे. मृगयावृत्तींतील समाजांत थोडथोडे स्थैर्य येऊन शेतीचें, दूधदुभत्याचें, अन्न शिजवण्याचें ज्ञान वाढूं लागलें, तसतसा श्रमविभाग अस्तित्वांत येऊन घरगुती कामें स्त्रियांकडे आणि पारध करण्याचें काम पुरुषांकडे देणें सोयीवार वाटूं लागलें

असलें पाहिजे. या श्रमविभागांतून हळू हळू वर्गभेदहि निर्माण होऊन स्त्रियांना दुर्बल म्हणून घरगुती कामें देण्यांत आलीं व त्याबरोबर त्यांना दास्यहि येऊं लागलें. वस्तुतः श्रमविभागांतून दास्य येण्याची आवश्यकता नाहीं किंवा दुर्बलांना हीन लेखण्याचीहि आवश्यकता नाहीं. पण शौर्य आणि धाडस यांनाच मान देऊन कष्ट करणाऱ्यांना तुच्छ लेखावें, ही प्रवृत्ति मनुष्याच्या जडबुद्धीची द्योतक आहे, व ही बुद्धि या अवस्थेंत आजच्यापेक्षां अधिक प्रमाणांत नसली तरी आजच्या इतकी तरी असणें साहजिक आहे. प्रबलांनीं दुर्बलांना दास बनवावें आणि त्यांच्याकडून कष्ट करून घेऊन त्यांना हीन लेखावें या भावनेचा परिणाम पहिल्यानें स्त्रियांना भोगावा लागला. पुढें शेतीची कला अधिक अवगत झाली आणि समाजांतील धनोत्पादन वाढूं लागलें. त्या मानानें पंचांग सांगणारे जोशी आणि यज्ञ करून देवतांना वश करून पाऊस पाडणारे याज्ञिक, यांना समाजांत वर्चस्व प्राप्त होऊन त्यांचा एक निराळा वर्ग बनूं लागला. समाजाचें धन वाढूं लागलें तशी संरक्षण करणाऱ्या लढवय्यांचीहि आवश्यकता वाटूं लागली आणि शेतींतून मिळणाऱ्या उत्पन्नांपैकीं कांहीं भाग ब्राह्मण-क्षत्रियांना देऊन विद्यावृद्धि आणि संरक्षण हीं कामें त्यांच्याकडून करून घेण्यांत आपला फायदा आहे, असें शेती करणाऱ्या वैश्यांना वाटूं लागलें. शेतींत खपण्याला जिंकलेल्या प्रदेशांतील शूद्र किंवा दास मिळाल्यानंतर वैश्यांना इतर कला व धंदे इकडे लक्ष पुरवितां येऊं लागलें. अशाप्रकारें समाजांत चातुर्वर्ण्य निर्माण झालें आणि शूद्रांच्या, अतिशूद्रांच्या व दासांच्या श्रमांतून अधिकाधिक संपत्ति निर्माण करण्याचें ज्ञान वाढूं लागलें त्यामानानें धर्म, शास्त्रें, कला, नीति वगैरे उच्च संस्कृतीचीं लक्षणें समाजांत दिसूं लागलीं. पण या संस्कृतीचा उपभोग त्रैवर्णिकांना, व विशेषतः क्षत्रिय उर्फ सरंजामदार वर्गालाच अधिक मिळत असे.

ब्राह्मण व वैश्य हे या वर्गाचे आश्रित बनून राहूं लागले आणि हळूं-हळूं ब्राह्मणांचें वर्चस्व कमी होऊन सरंजामदारांना वर्चस्व मिळूं लागलें. हा मानव संस्कृतीचा सामान्य इतिहास मध्ययुगाच्या अंतापर्यंत बहुतेक समाजांना लागू पडतो. अशा समाजांत प्राचीन काळीं लोक-शाहीचीं राज्यें झालेलीं आहेत; पण त्या सर्व लोकशाही राज्यांत कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत गुलामगिरी नांदत असल्याचेंच दिसून येतें. आपल्या इकडे जी प्राचीन गणराज्यें म्हणून होतीं, तीं पाहिलीं अथवा आपल्या ग्रामसंस्थांचा विचार केला, तरी त्यांत लोकशाहीच्या कांहीं संस्था होत्या पण शूद्र अतिशूद्रांच्या सामाजिक वा धार्मिक दास्यांचा कलंक त्यांना लागलेला होता हें विसरून चालणार नाहीं. पुढें जैन बुद्ध धर्मांनीं या सामाजिक दास्याविरूद्ध बंड केलें, तेव्हां शूद्रांचें दास्य बहुतेक नष्ट होऊन त्यांच्यापैकीं कांहीं सरंजामदार व राजे बनले, पण अतिशूद्रांचें दास्य आजपर्यंत चालू आहे.

## वर्गसंस्था व प्राचीन, अर्वाचीन लोकशाह्या

युरोपांतील ग्रीस रोम या देशांत ज्या लोकशाह्या नांदत होत्या त्यांतहि दाससंस्था अधिकच तीव्र स्वरूपांत होती. मध्ययुगीन युरोपांत कांहीं व्यापारी शहरें लोकशाहीचीं गणलीं जात, तेथेंहि नगरश्रेष्ठींचें दास्य सामान्य व्यापाऱ्यांस व नोकरांस करावें लागे. आजच्या युरोपां-तील लोकशाही राज्यांत अशा प्रकारचें दास्य नष्ट झालें असलें, तरी कामकरी वर्गाला आर्थिक दास्यांत रखडावें लागत असून तेथील राज्यांत कामकरी वर्गाला स्वातंत्र्य उपभोगतां येत नाहीं. तसेंच या लोकशाही राज्यांतील वैभव आणि त्यांतील कनिष्ठ कामकरी वर्गाची संपन्नता हीं त्यांच्या साम्राज्यांतील जित राष्ट्रांच्या लुटीवर अवलंबून आहेत. तात्पर्य आजपर्यंतचा मानव संस्कृतीचा इतिहास हा एका

अर्थानें कनिष्ठ गणलेल्या कष्टजीवी जनतेच्या श्रमांतून निर्माण होणाऱ्या संपत्तीवर वैभव उपभोगणाऱ्या श्रेष्ठ म्हणविणाऱ्या अल्पसंख्य वर्गांचाच इतिहास आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. या इतिहासांत लोकशाही राज्यसंस्थेच्या स्थापनेमुळें अद्यापि फारसा फरक पडलेला नाहीं. आधुनिक युरोपांत जेव्हां या राज्ययंत्राचा उपयोग ही वर्गसंस्था नष्ट करून एकवर्ग संस्कृति निर्माण करण्याकडे होण्याचा संभव दिसूं लागला तेव्हां लोकशाही राज्ययंत्रच झुगारून देण्याकडे तेथील वरिष्ठ वर्गांची प्रवृत्ति झाली असें स्पष्ट दिसत आहे. तात्पर्य समाजाच्या सांपत्तिक व सांस्कृतिक वाढीबरोबर अस्तित्वांत आलेली वर्गसंस्था अद्यापि अस्तित्वांत असून तिच्यामुळें लोकशाहींत अंतर्भूत होणारीं ध्येयें मूर्तस्वरूप धारण करूं शकत नाहींत.

## लोकशाही संस्कृतीला योग्य आर्थिक पाया

आतां लोकशाहीला पोषक अशी समाजाची आर्थिक घटना कशी असली पाहिजे याचा थोडा विचार करूं. आर्थिक व सामाजिक विषमता फार वाढली असतां लोकशाही दुभंगते हें लक्षांत घेतल्यास या प्रश्नाचा विचार करतांना औद्योगिक क्रांतिपूर्वींचा समाज आणि तिच्यानंतरचा समाज, या दोन अवस्थांचा पृथक विचार करावा लागतो. मोठी कारखानदारी, यांत्रिक दळणवळणाचीं साधनें, आंतरराष्ट्रीय व्यापार आणि प्रचंड पेढ्या, यांचें अस्तित्व समाजांत नसल्यास जमीनदार व शेतकरी येवढाच वर्गभेद आर्थिकदृष्ट्या जाचक होत असतो. या समाजांत शेत कसणाऱ्या वर्गाचें दास्य नष्ट झालें, प्रत्येक शेतकरी कुटुंबाला मालकीची जमीन असली आणि सरंजामदारवर्गाची सत्ता व सामाजिक श्रेष्ठत्व नष्ट झालें, म्हणजे एकवर्ग समाज अस्तित्वांत येतो. अशा सामाजिक अवस्थेंत दुकानदारी, सावकारी

व कारखानदारी यांना फारसा अवकाश असत नाहीं. पण आजच्या औद्योगिक क्रांतीनंतरच्या प्रचंड कारखानदारीच्या, दळणवळणांच्या आणि पेढ्यांच्या काळांत शेतकऱ्यांना स्वतःच्या मालकीची जमीन मिळाल्यानेंहि त्यांच्यावरील दास्याचें संकट टळत नाहीं. त्यांच्या मालाची खरेदीविक्री, त्यांना लागणारें कर्ज आणि त्यांच्या मालाचें दळणवळण हे व्यवहार जोंपर्यंत खासगी व्यक्तींच्या ताब्यांत आहेत तोंपर्यंत त्यांच्यावरील आर्थिक दास्याचें संकट टळत नाहीं. या सर्व व्यवहारांवर सामाजिक नियंत्रण आणि मालकी उत्पन्न झाली नाहीं तोंपर्यंत शेतकरीवर्गाला लोकशाही राज्याचा लाभ झाला अथवा आपल्या भवितव्यावर सत्ता मिळून त्याला स्वातंत्र्य प्राप्त झालें, असें म्हणतां येणार नाहीं. तेव्हां मालक शेतकरी वर्ग ( Class of peasant proprietor ) हा आजच्या सामाजिक व आर्थिक अवस्थेंत समाज-सत्ताक उपायांचा उपयोग केल्याविना आर्थिक व अर्थात् राजकीय दास्यांतूनहि मुक्त होऊं शकत नाहीं, असें मान्य करावें लागतें.

तसेंच मोठमोठे कारखाने, खाणी, आगगाड्या, पेढ्या वगैरे संस्थांत राबणारे लहान मोठे नोकर हेही या औद्योगिक संस्था सार्वजनिक मालकीच्या बनल्यावाचून स्वातंत्र्य उपभोगूं शकत नाहींत. यालाच समाजसत्ताक लोकशाही असें म्हणतात. तेव्हां औद्योगिक क्रांतिपूर्व कालांत सरंजामशाही आणि या क्रांतिनंतरच्या काळांत भांडवलशाही, या लोकशाही संस्कृतीला मारक आहेत असें दिसून येतें. फ्रेंच राज्य-क्रांति झाली त्यावेळीं औद्योगिक क्रांतीचे सामाजिक व आर्थिक परिणाम लोकांच्या ध्यानांत आले नव्हते, पण ते येऊं लागतांच समाजसत्ताक लोकशाही हीच खरी लोकशाही असें विचारी लोकांस वाटूं लागलें याचें हेंच कारण आहे.

## लोकशाही व शिक्षण संस्था

पण लोकशाही संस्कृतीच्या आर्थिक पायाचाच केवळ विचार करून लोकशाही संस्कृतीचा विचार पुरा होऊं शकत नाहीं. लोकशाही राज्यांतील शिक्षणपद्धति आणि त्यांतील राष्ट्रिक नीति यांचाहि विचार येथें केला पाहिजे. शिक्षणसंस्था या सहसा कोणतीहि संस्कृति निर्माण करूं शकत नाहींत, तर ज्या संस्कृतींत त्या अस्तित्वांत असतात तिचाच त्या कळत अगर न कळत प्रचार आणि पुरस्कार करीत असतात. युरोपीय लोकशाही राष्ट्रांतील शिक्षणसंस्था मध्ययुगीन संस्कृतीच्या पायावर बऱ्याच काळ चालू होत्या, त्या अलीकडे आधुनिक भांडवलशाही संस्कृतीच्या पुरस्कर्त्या बनल्या आहेत. इंग्लंडांतील धनिक वर्गाच्या शिक्षणसंस्था—शाळा कॉलेजें या खासगी संस्था—असून तेथील राहणी, शिकवण आणि सांस्कृतिक आदर्श हीं सर्व सधननिर्धन वर्गभेद वाढविणारीं, निर्धन वर्गाबद्दल अनादर निर्माण करणारीं, चैन आणि विलास, निष्क्रिय जीवन आणि संपत्तीचा व सत्तेचा अभिलाष, यांना श्रेष्ठ स्थान देणारीं आणि शरीरकष्ट करून उपजीविका करणाऱ्या सामान्य जनतेसंबंधीं तुच्छता बाणविणारीं असतात. सुसंस्कृतपणा आणि कष्टजीवन या गोष्टी परस्पर विरूद्ध आहेत आणि केवळ अकष्टार्जित संपत्तीचा उपभोग घेत जगणाऱ्यांनाच सुसंस्कृत जीवन शक्य आहे, ही वृत्ति वाढण्यास अनुकूल वातावरण या शिक्षणसंस्थांत दिसून येतें. सामान्य जनतेला शिक्षण देणाऱ्या शिक्षणसंस्था या सरकारी संस्था असून त्या गरीबांच्या मुलांना शिक्षण देण्यासाठीं काढलेल्या आहेत असें तिकडील संपन्न व सुसंस्कृत गणलेल्या वर्गांतील मुलांना वाटत असतें. त्यांच्या घरीं जसें नोकरचाकर सर्व हलकीं कामें करीत असतात, त्याचप्रमाणें त्यांच्या शाळा कॉलेजांतहि राहणीचें मान असतें आणि समाजांतहि असाच

रावणारा असंस्कृत नोकरवर्ग असावा आणि समाजाच्या शिरोभागीं संपन्न आणि सुसंस्कृत गणलेला मालकवर्ग नांदावा हें त्यांना नैसर्गिक वाटतें. ज्यांना आपली मुलें या वरिष्ठ वर्गाच्या शाळाकॉलेजांत पाठविणें परवडत नाहीं पण ज्यांना सामान्य कामकरी लोकांच्या मुलांतहि आपल्या मुलांनीं मिसळावें असें वाटत नाहीं, अशा मध्यम व्यापारी वर्गाच्या मुलांसाठींहि कांहीं शाळा असतात. अशा प्रकारें भांडवलशाही वर्गसंस्थेचें प्रतिबिंब इंग्लिश शिक्षण संस्थांत भरपूर पडलेलें असून या निरनिराळ्या संस्थांत शिक्षण घेऊन बाहेर पडणारीं मुलें समता आणि बंधुता या भावनांपासून अगदीं पारखीं झालेली असतात. लोकशाही आणि राष्ट्रीयत्व यांच्या वाढीस ही वर्गाधिष्ठित शिक्षण पद्धति अगदीं मारक आहे हें उघड आहे. पुढील आयुष्यांत सामाजिक व्यवहारांतील अपरिहार्य विषमता अनुभवास येणार असली तरी, शिक्षणसंपादनाच्या काळांत तरी समाजांतील सर्व वर्गांचीं मुलें एकाच प्रकारच्या शिक्षण संस्थांत वावरल्याविना एकराष्ट्रीयत्वाची आणि लोकशाहीची भावना त्यांच्या मनावर बिंबणार नाहीं आणि सामाजिक वर्गभेद हे कृत्रिम आहेत व ते कमी करणें हें अवश्य व शक्य आहे असें त्यांना वाटणार नाहीं. पण याच्या अगदी उलट असे संस्कार इंग्लिश शिक्षण संस्थांत होत असतात. केवळ भांडवलशाही समाजांतील वर्गसंस्थाच नव्हे तर आपल्या राष्ट्रानें स्थापन केलेली साम्राज्यशाही ही सुद्धा नैसर्गिक आणि पवित्र आहे असेंहि शिक्षण ब्रिटिश मुलांना मिळत असतें, व तें राष्ट्राभिमानाच्या नांवानें मिळत असतें.

इंग्लंडापेक्षां फ्रान्समध्यें शिक्षण संस्थांत हा वर्गभेद कमी प्रमाणांत दृष्टीस पडतो. तेथील निरनिराळ्या वर्गांचीं मुलें एकाच प्रकारच्या शाळाकॉलेजांत एकत्र शिक्षण घेत असलेलीं दिसतात. तथापि तेथेंहि जें शिक्षण दिलें जातें, तें लोकशाहीच्या संस्कृतीस पोषक असें असत

नाहीं. शरीरश्रमाच्या कामासंबंधीं तुच्छता आणि केवळ बौद्धिक व्यवसायासंबंधीं आदर या भावना त्या देशांतील शिक्षण संस्थांतहि मुलांच्या मनावर ठसविल्या जातात. लोकशाही संस्कृतीला हे पोषक नाहीं. शरीरकष्ट करण्यांत अभिमान वाटेल आणि कष्टजीवि सामान्य जनतेंत मिसळण्यांत कमीपणा वाटणार नाहीं, असें शिक्षण एकाच संस्थांतून सर्व वर्गांच्या मुलांना मिळत गेलें पाहिजे. हेंच लोकशाही संस्कृतीचें शिक्षण म्हणतां येईल. कला आणि संस्कृति यांनाहि लोकशाहीचें स्वरूप प्राप्त होऊन सामान्य जनतेच्या जीवनांत सौंदर्याचा आनंद प्रकट झाला पाहिजे आणि तो उपभोगण्याची रसिकता सुशिक्षित व्यक्तीच्या अंगीं आली पाहिजे. सामान्य जनतेच्या गलिच्छ राहणीवर आणि गुलामगिरीवर उभारलेलें श्रीमंतांचें विलासी आणि निष्क्रिय जीवन ही संस्कृति रानटी किंवा अर्धरानटी आहे असें मुलांच्या मनांवर बिंबविलें पाहिजे, तरच लोकशाही राष्ट्रिक निर्माण होतील. तसेंच आपल्या राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रांवर राज्य करणें हाहि एक रानटी संस्कृतीचाच अवशेष आहे असें शिकविण्यांत आलें पाहिजे. स्वतःच्या शरीरकष्टानें स्वतःला लागणारी संपत्ति संपादन करणें आणि तिचा उपयोग समाजहित दृष्टीनें घेणें हें लोकशाही संस्कृति मान्य करणाऱ्या प्रत्येक राष्ट्रिकाचें अवश्य कर्तव्य गणिलें पाहिजे. बाल, रुग्ण आणि वृद्ध यांच्या खेरीज कोणांसहि अकष्टार्जित संपत्तीचा उपभोग घेण्याचा हक्क नाहीं आणि आपली जीवनशक्ति प्रफुल्लित राहून कार्यक्षमता वाढती राहील, याहून अधिक संपत्तीचा उपभोग घेणें हें पाप आहे असें सर्वांना शिकविलें गेलें पाहिजे.

## लोकशाही व राष्ट्रिक नीति

आतां सामान्य शिक्षणाच्या प्रश्नावरून राष्ट्रिक नीतीकडे व तिच्या

शिक्षणाकडे वळूं. आजच्या म्हणजे औद्योगिक क्रांतीनंतरच्या भांडवलशाही समाजाच्या आर्थिक पायाला नैतिक अधिष्ठान उरलेलें नाहीं आणि अशा समाजांतील संपत्ति ही उद्योगाची, साहसाची किंवा श्रमाची निदर्शक असतेच असें नाहीं, हें प्रत्येक राष्ट्रिकाला समजलें पाहिजे. या समाजांत श्रम आणि संपत्ति यांचें व्यस्त प्रमाण आढळतें व ही अवस्था अनैसर्गिक जुलमी आणि समाजावर अनर्थ ओढवून आणणारी असल्यानें ती नाहींशी करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे याचेंहि शिक्षण राष्ट्रिकांना मिळालें पाहिजे. अर्थात् अशा समाजांत कोणताहि धंदा करून मिळणारी संपत्ति ही कष्टार्जित आहे व तिचे आपण पूर्ण मालक आहों, या भावना किती चुकीच्या आहेत तेंहि लोकांना समजलें पाहिजे.

भांडवलशाही संस्कृतीचा पाया व्यक्तिवादावर घातला गेला असून या व्यक्तिवादाचा सुखवादाशीं व स्वार्थसाधनाशीं संबंध जोडला गेला आहे. हा संबंध तोडून व्यक्तिवादाचा संबंध सत्यसंशोधनाशीं, सत्यनिष्ठेशी आणि आत्मविकासाशीं जोडण्यांत आला पाहिजे. मतस्वातंत्र्याचा उपभोग घेणें म्हणजे निःस्वार्थीबुद्धीनें, सार्वजनिक वृत्तीनें विचार करण्यास शिकणें, निःस्वार्थबुद्धीला पटेल त्याप्रमाणें बोलण्याचें व वागण्याचें धैर्य अंगीं बाणविणें आणि निष्काम कर्तव्यबुद्धीनें समाजसेवा करून समाज देईल त्या मोबदल्यांत समाधान मानणें, हें राष्ट्रिकाचें कर्तव्य आहे आणि अशा वृत्तीनें समाजोपयोगी कर्तव्य करणाऱ्या प्रत्येक राष्ट्रिकाच्या सर्वांगीण विकासास अवश्य अशीं सर्व साधनें त्याला उपलब्ध होतील अशी व्यवस्था करणें, हें राष्ट्राचें कर्तव्य आहे अशी राष्ट्रिकनीति व राष्ट्रनीति रूढ होईल तरच खरें लोकशाही राष्ट्र निर्माण होऊं शकेल. प्रत्येकानें आपल्या अंगच्या सर्व शक्तींचा विकास करून त्या समाजाला अर्पण कराव्या आणि समाजानें प्रत्येक

राष्ट्रिकाच्या सर्वांगीण विकासास अवश्य अशीं साधनें व परिस्थिति निर्माण करून द्यावी. असें केल्याविना लोकशाही राष्ट्र निर्माण होऊं शकत नाहीं. प्रत्येकानें आपापला स्वार्थ साधण्याचा प्रयत्न केला आणि अशा स्वार्थसाधूंची अनिर्बंध स्पर्धा चालू दिली म्हणजे राष्ट्रहित अथवा सार्वजनिक हित आपोआप साधतें हें आर्थिक घटनेंतील घातक तत्त्वच युरोपीय लोकशाहीला अनर्थावह ठरलें आहे. अशा तत्त्वावर अधिष्ठित झालेल्या संस्कृतीला लोकशाहीचें फळ लागावें अशी अपेक्षा करणें म्हणजे कारल्याच्या वेलाला द्राक्षें लागण्याची अपेक्षा करण्याइतकेंच अनर्थावह ठरणार आहे.

## बुद्धिस्वातंत्र्य, लोभ व हिंसा

लोकशाही संस्कृति ही बुद्धिस्वातंत्र्यावर अधिष्ठित झालेली असून हें बुद्धिस्वातंत्र्य सत्यसंशोधन आणि सत्यनिष्ठेवर अधिष्ठित असतें. या सत्यनिष्ठेस परिग्रहीवृत्ति किंवा लोभ आणि हिंसावृत्ति या मारक असतात. लोभ आणि हिंसा यांच्यामुळें असत्यच सत्य भासूं लागतें आणि न्यायाच्या नांवानें अन्यायाची संस्थापना होत असते. युरोपांतील फॅसिस्ट आणि कम्युनिस्ट पक्षांत अनुक्रमें परिग्रहाचा लोभ आणि हिंसा या वृत्ति दिसून येतात. भांडवलशाही संस्कृतीची परंपरा रक्षण करण्यासाठीं निर्माण झालेलें फॅसिस्ट तत्त्वज्ञान आणि तिचा हिंसेनें उच्छेद करणारें कम्युनिस्ट तत्त्वज्ञान ही दोन्हींहि लोकशाहीला मारक झालेलीं आहेत, यावरूनच परिग्रह आणि हिंसा यांच्यामुळें लोकशाहींचा अंत होतो हें स्पष्ट होत आहे. अर्थात् अपरिग्रह म्हणजे दारिद्र्य नव्हे आणि अहिंसा म्हणजे अन्याय सहन करण्याची भीरुता नव्हे. दारिद्र्य हें बुद्धीला व नीतीला भ्रष्ट बनवितें, त्याचप्रमाणें भीरुतेमुळेंहि सत्यासत्याचा व न्याय-अन्यायाचा विवेक बुद्धि करूं शकत

नाहीं. स्वयंप्रेरणेनें व स्वेच्छेनें सत्यनिष्ठ राहण्यासाठीं असत्यमय व असत्याधिष्ठित समाजांत अंगीकारिलेलें दारिद्र्य हीं अपरिग्रहवृत्ति आहे. अन्याय्य समाजरचनेंतील संपत्तीचा उपभोग घेऊन त्यांतील अन्यायाशीं सहकार न करण्यासाठीं घेतलेलें ते एक आत्मशुद्धीचें व्रत आहे. व या व्रतानें होणाऱ्या आत्मशुद्धीनें प्राप्त होणाऱ्या आत्मबलाचा उपयोग समाजशुद्धीसाठीं करावयाचा असतो.

## समाजनेतृत्वास अपरिग्रह व अहिंसावृत्तीची आवश्यकता

जोंपर्यंत समाजाच्या आर्थिक घटनेंत अन्याय आहे, तोंपर्यंत या प्रकारच्या अपरिग्रही व अहिंसानिष्ठ यतींची आवश्यकता त्याचें नेतृत्व करण्यासाठीं लागेल. सर्व समाजांतील लोभ आणि भीरुता यांच्यांतून निर्माण होणारी हिंसा नष्ट करण्यास, अशा सत्यनिष्ठ अहिंसावादी व अपरिग्रही यतींच्या नेतृत्वाखालीं लोकशाहीचा राज्यकारभार बराच काळ चालला, सर्व अन्याय्य आर्थिक व सामाजिक संस्थांत क्रांति होऊन समाजरचनेचा पाया न्यायावर घातला गेला, सर्व व्यक्तींची अंत:करणें लोभ आणि भय यांच्यापासून मुक्त होऊन सत्यनिष्ठ आणि न्यायनिष्ठ बनलीं, असत्याचरण व अन्याय करण्यांत मनुष्याच्या अंत:करणाला स्वभावत: दु:ख होऊं लागलें आणि परदु:ख निवारणांत आनंद वाटूं लागला, म्हणजे सत्ययुगाची प्राप्ति होऊन आत्मराज्य प्रस्थापित होईल. या आत्मराज्यांत आजच्या लोकराज्यांत दिसून येणाऱ्या दंडसंस्था—पोलीस, लष्कर, तुरुंग—यांची समाजाला आवश्यकताच उरणार नाहीं आणि खऱ्या 'स्व'राज्याची प्राप्ति सर्वांना होईल. लोकशाही संस्कृतीची अंतिम परिणति हीच होय आणि तें ध्येयशिखर गांठण्याचा सत्याग्रह हाच खरा व प्रभावी मार्ग आहे. लोक-

शाही आणि सत्याग्रह यांच्या साहाय्यानें मानव संस्कृतीची प्रगति सत्ययुगाच्या दिशेनें आत्मराज्याकडे होत राहील. लोकराज्याचा आत्मराज्यांत विकास व्हावा हीच त्याची स्वाभाविक परिणति होय आणि मानव संस्कृतीचेंहि तेंच ध्येय आहे. ज्या मानानें हें ध्येय निकट येत जाईल, त्या मानानें पुढारी आणि अनुयायी हा भेदहि नष्ट होईल आणि प्रत्येक व्यक्ति आपल्याच अंतरात्म्याच्या प्रकाशांत आपली प्रगति करूं लागेल आणि समाजाच्या प्रगतींत भर घालणें हाच आत्मोन्नतीचा मार्ग आहे असें तिला अनुभवितां येऊं लागेल. या वेळीं आजच्या सुसंस्कृत गणलेल्या समाजांना मानव संस्कृतीची बाल्यावस्था गणण्यांत येईल. ही आदर्श संस्कृति निर्माण करण्यासाठीं झटण्याचें शिक्षण लोकशाही राष्ट्रिकांना ज्या मानानें मिळेल त्या मानानें लोकशाही राष्ट्रिकनीति विशुद्ध बनत जाईल.

---

# लोकराज्य आणि आत्मराज्य : : : ७

## सत्ययुगांतील दंडहीन समाज

लोकराज्याची परिणति आत्मराज्यांत व्हावयास हवी असें मागें म्हटलें, त्याचें अधिक स्पष्टीकरण या प्रकरणांत करून हें पुस्तक संपवावयाचें आहे. आधुनिक युरोपांत अराज्यवादाचा पुरस्कार करणारे अनेक विचारी लोक निघालेले आहेत. हे प्रायः राज्यसंस्थेचा केवळ भौतिकदृष्ट्या विचार करणारे आहेत. याच भौतिक अराज्यवाद्यांच्या-प्रमाणें आध्यात्मिक दृष्ट्या राज्यसंस्थेचा विचार करणारेहि कौंट टॉल-

स्टॉयसारखे कांहीं लोक राज्यसंस्थेच्या हिंसेचा निषेध करणारे आणि राज्यसंस्थाच नको म्हणणारे निघालेले आहेत. या आध्यात्मिक अराज्यवादासच आम्ही आत्मराज्यवाद असें नांव दिलें आहे. महाभारतांत सत्ययुगाचें वर्णन करीत असतां

नैव राज्यं न राजासीत् नच दंडो न दंडिकः ।
धर्मेणैव प्रजाः सर्वा रक्षन्ति स्म परस्परम् ॥

म्हणजे त्या कालीं सर्वच प्रजा एकमेकांचें धर्मबुद्धीनें रक्षण करीत असल्यानें त्यावेळीं राज्य ही संस्था नव्हती, अर्थात् राजदंड आणि राजदंड धारण करणारा राजाहि नव्हता, असें वर्णन केलेलं आहे. राजधर्माची मीमांसा करीत असतां हें वर्णन आलें असून सर्व प्रजा या स्वयंप्रेरणेनें न्यायानुसारी व्हाव्यात हेंच राजधर्माचें ध्येय अथवा साध्य असावें असा महाभारतकाराचा यांतील हेतु आहे. लोक लोभानें, भीतीनें, अहंकारानें पापाचरण करण्यास प्रवृत्त होतात आणि म्हणून अशा पापाचरणी लोकांचें शासन करून सदाचरणी साधु लोकांचें संरक्षण करण्यासाठीं राज्यसंस्था किंवा तिच्यांतील दंड संस्था निर्माण झाली आहे, असें येथें कल्पिलें आहे. पुण्यशील आणि पापी असे मनुष्यांचे दोन पृथक्वर्ग असून त्यांपैकीं पापी लोकांपासून पुण्यशील लोकांचें संरक्षण करण्यासाठीं राज्यसंस्था हिंसा करीत असते अशी ही राजकीय हिंसेची मीमांसा आहे.

## पापप्रवृत्ति कां वाढते ?

पण प्रत्यक्ष जगाकडे पाहूं लागलें असतां या मीमांसेंत अनेक दोष दिसतात. पुण्यशील अथवा न्यायनिष्ठ आणि पापाचरणी अथवा परपीडक असे मनुष्यांचे दोन पृथक् वर्ग पाडतां येत नाहींत. सामान्यतः पुण्यशील गणलेले किंवा सदाचारी समजलेले लोक आपत्तींत आले

असतां दुराचारी बनलेले आढळतात आणि पापाचरणी गणलेले लोकहि भिन्न परिस्थितींत पापप्रवृत्त होत नाहींत. प्रत्येक मनुष्याच्या अंतः-करणांत सत्प्रवृत्ति आणि दुष्प्रवृत्ति यांचें द्वंद्व चालू असतें आणि या प्रवृत्तींपैकीं कोणत्या परिस्थितींत कोणतीचें प्राबल्य व्हावयाचें हें बऱ्याच अंशीं बाह्य परिस्थितीवर अवलंबून असतें. समाजांतील निरनिराळ्या वर्गांतील व्यक्तींचें निरीक्षण केलें असतां त्यांच्या सामाजिक परिस्थितींचे निरनिराळे परिणाम त्या परिस्थितींत वाढणाऱ्या मुलांच्या स्वभावावर होत असल्याचें दिसून येतें आणि शिक्षण व सामाजिक संस्कार यांचेहि बरेवाईट परिणाम मनुष्यांच्या स्वभावावर घडत असल्याचें दिसून येतें. समाजांत असे अनेक वर्ग आहेत कीं त्यांच्यावर हे शिक्षणाचे अथवा संस्कृतीचे संस्कार मुळींच होत नाहींत, न्यायानुसरणानें त्यांना आपली जीवितयात्रा कंठणेंहि कठीण असतें आणि समाज त्यांच्याकडे प्रेमानें आणि आपुलकीनें पहात नाहीं. असे लोक दुराचरणी बनले, अन्यायाचरण करूं लागले अथवा समाजाचा द्वेष करूं लागले, तर त्याचा दोष केवळ त्यांच्यावर नसून तो समाजावरहि येतो. अशा लोकांना शिक्षा केल्यानें ते सत्प्रवृत्त होतात असा अनुभवहि नाहीं. ज्यांना कायदे मोडल्याखेरीज जीवनच कंठतां येत नाहीं त्यांनीं कायदे मोडूं नयेत तर जगावें तरी कसें, असा प्रश्न हे विचारूं शकतील.

## कायदे न मोडणार पुण्यशील असतात काय ?

शिवाय जे कायदे न मोडतां जीवित कंठूं शकतात अथवा ऐहिक वैभव संपादन करूं शकतात, ते सर्व सत्प्रवृत्तीचेच असतात काय ? कायदे-शीर व्यवहार करून लोकांना पीडतां किंवा नाडतां येत नाहीं काय ? उपासमारीच्या भीतीनें आपली श्रमशक्ति ज्यांना मातीमोलानें विकावी लागते त्यांची ती शक्ति विकत घेऊन माल निपजविणारे, तो माल

गरजू गिऱ्हाइकांना अडवून विकणारे आणि अडचणींत सापडलेल्यांना कर्जे देऊन त्या सावकारीवर श्रीमंत होणारे हे सर्व लोक कायदेशीर वर्तन करीत असले तरी ते परपीडक अथवा पापाचरणी नाहींत, असें म्हणतां येईल काय ?

बरें जे न्यायप्रस्थापना करण्यासाठीं स्थापन झालेल्या राज्यसंस्थेचे सेवक म्हणून मिरवीत असतात, तेहि सर्व पुण्यशीलच असतात काय ? अनेक अन्यायी कायद्यांची ते जाणून बुजून बजावणी करीत असतात, अनेक पक्षपाताचीं कृत्यें त्यांच्या हातून घडत असतात आणि त्यांच्यापैकीं अनेक तर प्रत्यक्ष कायद्यांचें उल्लंघन करूनहि आपला स्वार्थ साधत असतात. तुरुंगांतील कैदी, त्यांच्यावर देखरेख व पहारा करणारे पोलीस आणि त्यांच्यावरील अधिकारी, या सर्वांच्या व्यवहारांवर शुद्ध नैतिक दृष्टीची पाळत ठेविल्यास त्यांपैकीं अधिक गुन्हेगार कोण आणि कमी गुन्हेगार कोण हें सांगणें फार कठीण जाईल. समाजाच्या न्याय-प्रस्थापनेच्या कार्यावर नेमलेले लोक जर असे आहेत, तर इतर व्यव-हारांत वावरणारे कसे असतील ?

## श्रीमंताविषयीं सरकारचा पक्षपात

श्रीमंतांच्या संपत्तिवर आघात घालणाऱ्या चोरांचें व लुटारूंचें, भामट्यांचें व विश्वासघात्यांचें पारिपत्य पोलीस व न्यायाधीश करीत असतात, पण श्रीमंतांपासून गरिबांना होणाऱ्या पीडेचें निवारण मात्र आजच्या कायद्यानें होत नाहीं. धनिकांच्या धनाचें रक्षण करण्याची हमी घेणारीं सरकारें निर्धनांच्या प्राणांचें रक्षण करण्याचीं हमी अद्यापि घेत नाहींत. एक गिरणी स्थापून लक्षावधि रुपये मिळवि-णाराची संपत्ति रक्षण करणें हें प्रत्येक सरकारचें पवित्र कर्तव्य गणिलें जातें, पण ती गिरणी स्थापन झाल्यामुळें जे हजारो हस्तव्यवसायी धंदे-

वाले देशोधडीला लागले त्यांच्या जीविताचा प्रश्न कसा सोडवावा याचा विचार सरकार करीत नाहीं. गिरण्यांतील कामगारांनीं संप केले व त्यांच्या चळवळींतून दंगे होण्याचा संभव उत्पन्न झाला कीं आपलें पोलिस व लष्कर आणून गोळीबार करणारें सरकार कामगारांना अमुक वेतन देणें भाग आहे अशी कायदेशीर सक्ति मालकांवर करीत नाहीं. हे सर्व व्यवहार पाहिले म्हणजे परपीडेचें पाप करणारांना शासन करण्यासाठीं निर्माण झालेली राज्यसंस्था परपीडकांचेंच अधिक संरक्षण करते कीं काय, अशी शंका येऊं लागते. आजची राज्यसंस्था ही श्रीमंतांची पक्षपाती आहे, आजचे कायदे वरिष्ठ वर्गाचे पक्षपाती आहेत आणि आजचें न्यायदान हेंहि या पक्षपातानें झुकलेलें आहे, यासंबंधीं कोणाहि विचारवंतास शंका उरलेली नाहीं. पण हीच स्थिति पूर्वीच्या सरंजामशाही संस्कृतींतहि होती आणि त्या काळांतहि लोकांच्या रक्षणाच्या नांवानें लोकांचें भक्षण होत असे.

## राष्ट्राभिमानानें पापाचरण

पण राज्यसंस्थेमार्फत होणारे अन्याय, जुलूम अथवा पापें येवढ्यानेंच संपत नाहींत. राष्ट्राभिमानाच्या नांवानें परराष्ट्रांवर आक्रमण करून तेथील लोकांचें खून, जाळपोळ, लूटमार, अत्याचार इत्यादि सर्व अनन्वित पापें आजच्या राज्यसंस्थेमार्फत घडत असतात. या अत्याचारांचें शिक्षण सैनिकांना मिळत असतें आणि भौतिक विद्येचा उपयोग मानवसंहाराची साधनें शोधून काढण्याकडे होत असतो. या सर्व पापाचरणांचा व हिंसेचा एकत्र विचार केल्यास सामान्य गुन्हेगार आणि त्यांच्यापासून जगाला होणारी पीडा हे कःपदार्थ आहेत, असें वाटूं लागतें आणि न्यायप्रस्थापनेच्या नांवानें इतकी हिंसा आणि इतके अत्याचार करणारी राज्यसंस्था नेस्तनाबूत केली पाहिजे, असें वाटूं लागतें. याच

विचारसरणींतून भौतिक अराज्यवादाचा उद्भव झालेला आहे. आजच्या समाजांतील सर्व दुःखांना आपत्तींना व अन्यायांना राज्यसंस्थाच कारणीभूत आहे व तें मूळ उपटून टाकलें असतां समाजांत खरी न्यायप्रस्थापना होईल व एकमेकांपासून एकमेकांना होणारी पीडा पुष्कळच कमी होईल असें या अराज्यवाद्यांचें मत आहे.

## कम्यूनिझम आणि भौतिक अराज्यवाद

राज्यसंस्थेची भौतिक दृष्टिनेंच मीमांसा करणाऱ्या कम्युनिस्टांचें मत या बाबतीत अराज्यवाद्यांहून बरेंच भिन्न आहे. समाजाला दंडहीन अराज्य अवस्था प्राप्त झाली पाहिजे हें अंतिम दृष्ट्या त्यांनाहि मान्य आहे, तथापि आजच्या समाजांतील राज्यसंस्था राभस्यानें मोडून टाकणें हा त्या अवस्थेच्या प्राप्तीचा उपाय आहे असें त्यांना वाटत नाहीं. आजची राज्यसंस्था ही भांडवलदारवर्गाची पक्षपाती आहे आणि तिच्या आश्रयानें समाजावर जो अन्याय वा जुलूम होत आहे, त्यामुळेंच समाजांत गुन्ह्यांचें प्रमाण वाढत आहे हेंहि त्यांना मान्य आहे. तथापि आजच्या सामाजिक आपत्तींचें मूळ राज्यसंस्था हें नसून ती राज्यसंस्था ज्या वर्गसंस्थेचें संरक्षण करीत आहे, ती वर्गसंस्था हें या आपत्तींचें खरें मूळ आहे. तसेंच ही वर्गसंस्था सुद्धां समाजाच्या सर्वच अवस्थेंत असमर्थनीय असतें, असें म्हणतां येत नाहीं. जेव्हां समाजांत धनोत्पादन फारच अल्पप्रमाणावर होत असतें, तेव्हां सर्वच लोकांनीं भौतिकदृष्ट्या दारिद्र्यांत राहण्यापेक्षां कांहीं थोड्या लोकांनीं थोडे सुस्थितींत राहावें आणि धनोत्पादनाव्यतिरिक्त इतर कार्ये करून समाजाच्या संस्कृतीचीं इतर अंगें विकसित करावींत, हेंहि कांहीं अंशी अपरिहार्य व समर्थनीय असतें. पण भौतिक विद्येची प्रगति होऊन धनोत्पादन सुलभ झालें म्हणजे समाजाच्या वाढत्या संपत्तीची व संस्कृतीची

विभागणी अधिक समतेनें होणें अवश्य आणि शक्य असतें. आजच्या भौतिक विद्येतील प्रगतिमुळेंच समाजरचनेंतील सर्व प्रकारचें दास्य नष्ट करून वर्गसंस्था मोडणें शक्य, अवश्य आणि अपरिहार्य बनलें आहे. याच भौतिक धनोत्पादनाच्या वाढीमुळें वर्गसंस्थायुक्त समाजांतील आंतरविरोध वाढत आहेत आणि त्याच्यावर आर्थिक अरिष्टें येऊन कोसळत आहेत. भांडवलदार वर्ग धनोत्पादनाचा वेग आणि प्रमाण वाढवीत असून समाजांतील बहुजन संख्येची पिळणूक करून त्याची क्रयशक्ति संकुचित करीत असतो. यामुळें मालाची निपज होते पण उठाव होत नाहीं आणि उठाव बंद झाल्यानें निपजहि थांबतें. अशा प्रकारें समाजांतील धनोत्पादन यंत्र एकदम बंद पडतें आणि भांडवलदार वर्ग आपलें सामाजिक कार्य करण्यास नालायक ठरतो. तसाच तो आज अनवश्यकही ठरला आहे, कारण तो धनोत्पादनाचें सर्व कार्य पगारी नोकरांकडून करून घेत असून स्वतः केवळ त्यांच्या श्रमांतून निपजणाऱ्या संपत्तीतील अवशेष उपभोगण्यासाठीं धडपडत आहे. अशा प्रकारें समाजाला अनवश्यक आणि आपलें नियोजित कार्य करण्यास नालायक ठरलेल्या वर्गाच्या हातीं राज्यसंस्था गेल्या-मुळें सामाजिक अन्यायाची कमाल झाली आहे. ही राज्यसंस्था त्यांच्या हातून हिसकावून घेणारा आणि त्याच्या साहाय्यावाचून समाजाच्या जीवनास आवश्यक असणारें धनोत्पादनाचें कार्य अधिक योग्य प्रकारें करून दाखविण्यास पात्र असलेला कामगार वर्ग या अन्यायांविरूद्ध क्रांति करण्यास पुढें आला आहे. या क्रांतींत यशस्वी झाल्यानंतर वर्गसंस्था मोडून टाकण्याचें आणि एकवर्ग समाजाची स्थापना करून त्यांतील धनोत्पादन व्यवस्थितपणें चालवून दाखविण्याचें कार्य अनेक वर्षें करून दाखविल्यानंतरच समाजाला अराज्य अवस्था प्राप्त होऊं शकेल, व तीहि क्रमाक्रमानें प्राप्त होईल, असें कम्यूनिस्टांचें

मत आहे. ही अवस्था प्राप्त होईपर्यंतच्या काळांत समाजाला राज्य-संस्थेची आवश्यकता आहे पण ती आजच्या लोकशाही राज्ययंत्राची नसून त्याला अनियंत्रित कामगारशाहीच्या राज्ययंत्राची आवश्यकता आहे. एकदां कामगारशाही आपल्या कार्यांत यशस्वी झाली आणि तिनें वर्गसंस्था मोडून टाकून एकवर्ग समाज स्थापन केला म्हणजे सर्वांच्या भौतिक गरजा समाजाकडून योग्य प्रकारें भागविल्या जातील, निरुद्योगानें धनार्जन करण्याची संवय कोणासहि उरणार नाहीं, स्वार्थ आणि समाजहित यांतील द्वैत नष्ट होऊन समाजसेवा करणें हाच स्वार्थसाधनाचा मार्ग आहे असें सर्वांच्या अनुभवास येऊं लागेल आणि समाजविरोधी स्वार्थ, लोभ यांचा विनाश होऊन मनुष्यस्वभावांतील गुन्ह्यांची प्रवृत्ति लुप्त होईल. भांडवलदार वर्गाच्या लोपामुळें मनुष्यांमनुष्यांमधील हितविरोध नष्ट होईल आणि भांडवलशाहींतून निर्माण होणारीं युद्धें नष्ट होऊन मानव बंधुभावना सर्वत्र फैलावेल. अशा समाजांतील राज्ययंत्र हळूहळू निरुपयोगी होऊन गंजून जाईल व तें लोप पावेल. समाजविरोधी वृत्तीच नष्ट झाल्यामुळें त्यांच्या दंड-शक्तीची आवश्यकताच कोणांस वाटणार नाहीं. साप ज्याप्रमाणें आपली कात टाकून देऊन पुनः तरुण होतो त्याप्रमाणें राज्ययंत्राचें कवच निरुपयोगी म्हणून गळून पडल्यानंतर समाजाची सर्व बाह्य बंधनांतून मुक्तता होईल आणि त्याला खरें स्वातंत्र्य उपभोगतां येईल.

## या युक्तिवादांतील दोष

या विचारसरणींतील एकदोन दोष विशद करणें अवश्य आहे. भांडवलशाही मोडल्यानंतर जी कामगारशाही स्थापन होईल ती अनियंत्रित असल्यामुळें तिचे दुष्परिणाम सामान्य जनतेच्या किंवा कामगार वर्गाच्या मनावर व बुद्धीवर प्रतिकूल होऊन त्यांच्यांतील विचार-

स्वातंत्र्याची व आचारस्वातंत्र्याची प्रवृत्ति नष्ट झाल्याविना राहणार नाहीं. कामगारशाहींतहि सर्व कामकरी जनतेच्या हातीं राज्यकारभार न जातां तो तिच्यापैकीं कांहीं व्यक्तींच्याच हातीं राहावयाचा असतो हें उघड आहे. असा राज्यकारभार करणाऱ्या अधिकाऱ्यांचा एक वर्ग कामगारशाहींत निर्माण होतो व त्याच्या हातीं अनियंत्रित सत्ता गेल्यानें त्याची व जनतेची तत्त्वच्युति होऊन अधिकाऱ्यांना अहंकाराची आणि जनतेला गुलामगिरीची सवय लागल्याविना राहणार नाहीं. अशा अवस्थेंत जुलूम आणि अन्याय होणें अपरिहार्य आहे आणि अधिकारी वर्ग सुस्थिर बनला तर जनता गुलाम बनून अन्यायालाच न्याय समजूं लागेल, अथवा जनता न्याय अन्यायाचें विवेचन करूं लागली आणि अन्यायाचें निर्मूलन करून न्यायाची संस्थापना करण्याचे प्रयत्न करूं लागली कीं, अनेक पक्ष निर्माण होऊन लोकसत्तेची प्रस्थापना तरी होईल किंवा त्यांपैकींच कोणत्या तरी दुसऱ्या एका पक्षाची पुनः अनियंत्रित सत्ता स्थापन होईल. पहिली अवस्था प्राप्त झाल्यास कामगारशाहींतून अराज्य अवस्थेंत जाण्याचा सिद्धान्त खोटा ठरून एकवर्ग समाजांतील लोकशाही स्थापन होईल. दुसरा प्रकार घडला तर ज्या पक्षाची अनियंत्रित सत्ता स्थापन झाली असेल, त्या पक्षाला पदभ्रष्ट करण्यास पुनः एखादी क्रांति करण्याची आवश्यकता निर्माण होईल. तात्पर्य कांहीं झालें तरी अनियंत्रित कामगारशाहींतून एकदम अराज्य अवस्थेंत समाज जाऊं शकेल ही कल्पना भ्रामक ठरते आणि एकवर्ग समाजालाहि जर राज्ययंत्राची आवश्यकता असेल तर तें राज्ययंत्र अनियंत्रित नसतां लोकनियंत्रित असणें हेंच अवश्य व इष्ट ठरतें. समाजाला अराज्य अवस्था येणार असेल तर ती कोणत्याहि प्रकारची अनियंत्रित पक्षसत्ता किंवा वर्गसत्ता उपभोगणाऱ्या समाजाला येणार नसून शुद्ध लोकशाहीच्या मोकळ्या व स्वतंत्र वातावरणांत

वावरणाऱ्या समाजालाच येऊं शकेल. रशियामध्यें स्टॅलिनच्या नेतृत्वाखालीं पंधरा सोळा वर्षें अनियंत्रित कामगारशाहीचा उपभोग घेतलेल्या कामकरी शेतकरी जनतेला कामगारशाहीचें लोकशाहींत रूपान्तर व्हावें, असें वाटूं लागलें आणि स्टॅलिन पक्षानेंहि आपण ही जनतेची आकांक्षा पुरी करण्यासाठीं लोकशाहीची स्थापना करणार आहों असें जाहीर करून एक लोकशाही राज्यघटना मंजूरहि करून घेतली. ही अद्यापि अमलांत आलेली नाहीं व अनियंत्रित स्टॅलिनशाही अद्यापि अधिकारारूढ आहे. तथापि अनियंत्रित कामगारशाहींतून समाज अराज्य अवस्थेंत न जातां तो लोकशाही अवस्थेंत गेला पाहिजे असें रशियांतील कामगारशाहीच्या प्रयोगावरून सिद्ध झालें आहे असें म्हणण्यास आज कांहीं प्रत्यवाय दिसत नाहीं. फॅसिस्टांच्या अनियंत्रित पक्षसत्तेप्रमाणें कम्यूनिस्टांची अनियंत्रित पक्षसत्ता हीहि एक लोकशाहीच्या अपेक्षेनें मानव संस्कृतीची पुच्छ–प्रगति आहे व त्या अवस्थेंतील समाजाला पुनः लोकशाही राज्ययंत्राचा अवलंब केल्याविना आत्मोद्धाराचा मार्ग सांपडत नाहीं असा याचा अर्थ आहे.

## लोकशाही व निःशस्त्र क्रांति यांतून आदर्श मानव समाज

तसेंच समाज एकवर्ग बनला तरी त्यांत समाज घटनेसंबंधीं अनेक पक्ष निर्माण होणें अपरिहार्य आहे, हेंहि उघड आहे. अशा सर्व पक्षांना विचार व प्रचार स्वातंत्र्य देऊन त्यांना बहुमतानुसार राज्यकारभार करण्याची संधि देणें हाच लोकशाही राज्ययंत्राचा उद्देश असतो. समाजसत्ताक अवस्थेंतहि अशा राज्ययंत्राची आवश्यकता समाजाला असेल कारण तेथेंहि समाजाचे सर्व निर्णय केवळ स्वयंप्रेरणेनें सर्व लोक अनुसरतील अथवा या निर्णयासंबंधीं मतभेद होणार

नाहींत असें मानतां येणार नाहीं. न्यायबुद्धि आणि स्वार्थबुद्धि यांच्यांतील द्वंद्व आज भांडवलशाही समाजांत फारच वाढलेलें आहे, तें समाजसत्ताक अवस्थेंत पुष्कळच कमी होईल. आज मनुष्याचा न्याय्य स्वार्थहि त्याला अन्यायाचें अवलंबन केल्याविना साधतां येत नाहीं अशी स्थिति आहे. मनुष्यमात्राला आजच्या समाजांत कोणत्याहि प्रकारची शाश्वतीच वाटत नाहीं, यामुळें तो अधिक स्वार्थी अधिक लोभी आणि अधिक मत्सरी बनला आहे. समाजसत्ताक अवस्थेंत स्वार्थ, लोभ, मत्सर, स्पर्धा, असूया या वृत्ति कमी होतील. पण मानवी अंतःकरणांतील दुष्ट प्रवृत्तींचा उद्भव केवळ अन्यायी किंवा जुलमी समाज रचनेंतूनच होत असतो व म्हणून ती समाज रचना बदलली किंवा तींत क्रांति झाली कीं या दुष्ट प्रवृत्ति नष्ट होतील, ही सामाजिक प्रश्नांचा विचार करण्याची केवळ एकांगीं दृष्टि आहे. या विचारसरणीला दुसरी बाजू आहे व ती म्हणजे मनुष्य स्वभावांतच दुष्ट वृत्तींचेंहि बीज आहे व स्वार्थाला, अहंकाराला, लोभाला, आलस्याला, भीरुतेला आणि दास्याला कवटाळण्याच्या त्याच्या प्रवृत्तीमुळेंच समाजांत अन्यायी संस्था निर्माण होत असतात व चालू असतात. या दुष्प्रवृत्तींचा उपशम होण्यास केवळ बाह्य भौतिक परिस्थितीची सुधारणा पुरी पडणार नाहीं. इतकेंच नाहींतर या प्रवृत्तींचा उपशम करण्याची संयमी, तत्त्वनिष्ठ आणि परार्थी वृत्ति आधीं लोकांच्या अंतःकरणांत कांहीं अंशीं तरी बाणल्याखेरीज या बाह्य भौतिक व सामाजिक परिस्थितींतहि इष्ट अशी क्रांति घडून येणार नाहीं. जे लोक ही क्रांति करण्यास उद्युक्त व्हावयाचे त्यांच्या अंतःकरणांतील स्वार्थ, अहंकार, मद, मत्सर या दुष्ट भावनांवर त्यांनीं प्रथम विजय संपादन केला पाहिजे. ज्या प्रमाणांत या भावना त्यांच्या अंतःकरणांत दबा धरून बसल्या असतील, त्या प्रमाणांत त्यांनीं केलेल्या क्रांतींत

व त्या क्रांतीनंतर प्रस्थापित केलेल्या राज्ययंत्रांत व समाजयंत्रांत या दुष्प्रवृत्तींचें प्रतिबिंब पडलेंच पाहिजे. सशस्त्र क्रांतीच्या मार्गांतील हीच मोठी अडचण असून सशस्त्र क्रांतीनंतर न्यायाच्या नांवानें अन्यायाची प्रस्थापना झाल्याचा अनुभव इतिहासांत वारंवार येतो त्याचेंहि कारण हेंच होय. सामाजिक क्रांतीचें साध्य न्याय्य समाजरचना म्हणजेच अहिंसेची संस्थापना असतें असें म्हटलें पाहिजे. सत्यनिष्ठ आणि प्रेम-मय मानवांचा समाज निर्माण करणें, हेंच प्रत्येक क्रांतीचें उद्घोषित ध्येय अथवा साध्य असतें, पण क्रांतिकारकांनीं शस्त्र धारण केलें आणि वाटेल त्या साधनांनीं आपल्या हातीं सत्ता घेण्याचें ठरविलें कीं त्यांची स्वतःचीच विवेकशक्ति भ्रष्ट होण्याचा धोका निर्माण होतो. विशेषतः समाजांत सर्वांगीण क्रांति घडवून आणण्याच्या प्रयत्नांत हा धोका अधिक असतो. समाजाची सर्वच रचना आमूलाग्र उखडून टाकण्याचा हा प्रयत्न असतो आणि तो यशस्वी झाल्यानंतर कांहीं काळ सर्वच समाजरचना नवी बनवून तिला शस्त्रबलाचा आधार द्यावा लागतो. हें कार्य सशस्त्र साधनांनीं केल्यास अपूर्ण व विकृत बनल्याखेरीज राहत नाहीं. या अपूर्णतेंतून व विकृतींतूनच नवे अन्याय निर्माण होतात. याचसाठीं निःशस्त्र सत्याग्रही क्रांतिशास्त्र निर्माण झालें आहे. हें यशस्वी होईल, तर भांडवलशाही लोकशाहीं-तून समाजसत्ताक लोकशाहींत जाण्याचा एक अहिंसात्मक मार्ग उप-लब्ध होईल आणि भांडवलशाही लोकशाहीची विकृति नष्ट होऊन तिला शुद्ध स्वरूप प्राप्त होईल. ही एकवर्ग समाजांतील शुद्ध लोक-शाही कमी हिंसक, अधिक न्यायनिष्ठ आणि अधिक प्रेममय होईल. साधनाची शुचिता ही साध्याची शुचिता सुरक्षित ठेवते आणि साध-नाची अशुचिता साध्यांत प्रतिबिंबित होत असते, याच सिद्धान्ताच्या आधारें सत्याग्रही तत्त्वज्ञान सशस्त्र क्रांतीचा मार्ग गौण ठरवितें.

नाहींत असें मानतां येणार नाहीं. न्यायबुद्धि आणि स्वार्थबुद्धि यांच्यांतील द्वंद्व आज भांडवलशाही समाजांत फारच वाढलेलें आहे, तें समाजसत्ताक अवस्थेंत पुष्कळच कमी होईल. आज मनुष्याचा न्याय्य स्वार्थहि त्याला अन्यायाचें अवलंबन केल्याविना साधतां येत नाहीं अशी स्थिति आहे. मनुष्यमात्राला आजच्या समाजांत कोण-त्याहि प्रकारची शाश्वतीच वाटत नाहीं, यामुळें तो अधिक स्वार्थी अधिक लोभी आणि अधिक मत्सरी बनला आहे. समाजसत्ताक अव-स्थेंत स्वार्थ, लोभ, मत्सर, स्पर्धा, असूया या वृत्ति कमी होतील. पण मानवी अंतःकरणांतील दुष्ट प्रवृत्तींचा उद्भव केवळ अन्यायी किंवा जुलमी समाज रचनेंतूनच होत असतो व म्हणून ती समाज रचना बदलली किंवा तींत क्रांति झाली कीं या दुष्ट प्रवृत्ति नष्ट होतील, ही सामाजिक प्रश्नांचा विचार करण्याची केवळ एकांगीं दृष्टि आहे. या विचारसरणीला दुसरी बाजू आहे व ती म्हणजे मनुष्य स्वभावांतच दुष्ट वृत्तींचेंहि बीज आहे व स्वार्थाला, अहंकाराला, लोभाला, आल-स्याला, भीरुतेला आणि दास्याला कवटाळण्याच्या त्याच्या प्रवृत्तीमुळेंच समाजांत अन्यायी संस्था निर्माण होत असतात व चालू असतात. या दुष्प्रवृत्तींचा उपशम होण्यास केवळ बाह्य भौतिक परिस्थितीची सुधारणा पुरी पडणार नाहीं. इतकेंच नाहींतर या प्रवृत्तींचा उपशम करण्याची संयमी, तत्त्वनिष्ठ आणि परार्थी वृत्ति आधीं लोकांच्या अंतःकरणांत कांहीं अंशीं तरी बाणल्याखेरीज या बाह्य भौतिक व सामाजिक परिस्थितींतहि इष्ट अशी क्रांति घडून येणार नाहीं. जे लोक ही क्रांति करण्यास उद्युक्त व्हावयाचे त्यांच्या अंतःकरणांतील स्वार्थ, अहंकार, मद, मत्सर या दुष्ट भावनांवर त्यांनीं प्रथम विजय संपादन केला पाहिजे. ज्या प्रमाणांत या भावना त्यांच्या अंतःकरणांत दबा धरून बसल्या असतील, त्या प्रमाणांत त्यांनीं केलेल्या क्रांतींत

व त्या क्रांतीनंतर प्रस्थापित केलेल्या राज्ययंत्रांत व समाजयंत्रांत या दुष्प्रवृत्तींचें प्रतिबिंब पडलेंच पाहिजे. सशस्त्र क्रांतीच्या मार्गांतील हीच मोठी अडचण असून सशस्त्र क्रांतीनंतर न्यायाच्या नांवानें अन्यायाची प्रस्थापना झाल्याचा अनुभव इतिहासांत वारंवार येतो त्याचेंहि कारण हेंच होय. सामाजिक क्रांतीचें साध्य न्याय्य समाजरचना म्हणजेच अहिंसेची संस्थापना असतें असें म्हटलें पाहिजे. सत्यनिष्ठ आणि प्रेममय मानवांचा समाज निर्माण करणें, हेंच प्रत्येक क्रांतीचें उद्‌घोषित ध्येय अथवा साध्य असतें, पण क्रांतिकारकांनीं शस्त्र धारण केलें आणि वाटेल त्या साधनांनीं आपल्या हातीं सत्ता घेण्याचें ठरविलें कीं त्यांची स्वतःचीच विवेकशक्ति भ्रष्ट होण्याचा धोका निर्माण होतो. विशेषतः समाजांत सर्वांगीण क्रांति घडवून आणण्याच्या प्रयत्नांत हा धोका अधिक असतो. समाजाची सर्वच रचना आमूलाग्र उखडून टाकण्याचा हा प्रयत्न असतो आणि तो यशस्वी झाल्यानंतर कांहीं काळ सर्वच समाजरचना नवी बनवून तिला शस्त्रबलाचा आधार द्यावा लागतो. हें कार्य सशस्त्र साधनांनीं केल्यास अपूर्ण व विकृत बनल्याखेरीज राहत नाहीं. या अपूर्णतेंतून व विकृतींतूनच नवे अन्याय निर्माण होतात. याचसाठीं निःशस्त्र सत्याग्रही क्रांतिशास्त्र निर्माण झालें आहे. हें यशस्वी होईल, तर भांडवलशाही लोकशाहींतून समाजसत्ताक लोकशाहींत जाण्याचा एक अहिंसात्मक मार्ग उपलब्ध होईल आणि भांडवलशाही लोकशाहीची विकृति नष्ट होऊन तिला शुद्ध स्वरूप प्राप्त होईल. ही एकवर्ग समाजांतील शुद्ध लोकशाही कमी हिंसक, अधिक न्यायनिष्ठ आणि अधिक प्रेममय होईल. साधनाची शुचिता ही साध्याची शुचिता सुरक्षित ठेवते आणि साधनाची अशुचिता साध्यांत प्रतिबिंबित होत असते, याच सिद्धान्ताच्या आधारें सत्याग्रही तत्त्वज्ञान सशस्त्र क्रांतीचा मार्ग गौण ठरवितें.

अर्थात् गुलामगिरींत खितपत पडण्यापेक्षां सशस्त्र क्रांतीहि श्रेष्ठ असून ज्यांना सत्याग्रहाचा अवलंब करण्याचें नैतिक सामर्थ्य नसेल त्यांचा सशस्त्र क्रांतीचा आश्रय करणें हाहि सापेक्षतः धर्मच ठरतो.

## लोकशाही ही किमानहिंसक राज्यपद्धति

राज्यसंस्था चालविण्यांत हिंसेचा आश्रय करून न्यायप्रस्थापना करण्याचा प्रयत्न होत असतो, पण लोकशाही राज्यांत ही हिंसा शक्य तितकी कमी व्हावी आणि ती न्यायप्रस्थापनेसाठींच आहे असें सिद्ध करून मग करण्यांत यावी अशी व्यवस्था केलेली असते. राष्ट्रिकांचे मूलभूत हक्क कायद्यांनीं सुरक्षित केलेले असून निःपक्षपाती उघड चौकशी होऊन गुन्हेगार ठरविल्याविना कोणाच्याहि जीवितवित्तस्वातंत्र्यास इजा पोहोचूं नये अशी व्यवस्था केलेली असते. कायद्यांना बहुसंख्य प्रजाजनांची संमति घ्यावयाची असते, अन्याय करणाऱ्या पक्षाचा अन्याय लोकांपुढें मांडून त्याला लोकमताचा पाठिंबा नष्ट करून आपल्या हातीं सत्ता घेण्याचें स्वातंत्र्य इतर पक्षांना असतें. यामुळें न्याय-प्रस्थापनेच्या नांवानें होणारी हिंसा हीहि शक्य तितकी कमी व्हावी अशी योजना होते. अशा राज्ययंत्रामार्फत होणारी हिंसा आणि क्रांति-कारक पक्षाकडून होणारी हिंसा यांत फारच मोठा प्रमाणभेद आहे. क्रांतिकाळांत हिंसा करणारांना कायदेशीर घटनेचें व लोकमताचें बंधन टिकूं शकत नाहीं, क्रांतिकारक केवळ आपल्या मनोदेवतेलाच जबाबदार असतात; देशांत यादवी माजलेली असते आणि निरनिराळे पक्ष आपा-पलें बल संघटित करून आपल्या हातीं सर्व सत्ता आणण्याचे वाटेल त्या साधनांनीं प्रयत्न करीत असतात. बहुजनसमाज भांबावलेला असतो आणि सत्ताप्राप्तीसाठीं सुरूं झालेल्या मात्स्यन्यायाच्या दरबारांत कोणाला यशःप्राप्ती होईल तें सांगणें कठीण असतें. अन्यायांनीं गांजलेल्या दुर्ब-

लांची या परिस्थितींत दाद लागणें अगदींच कठीण असतें. ही अंदाधुंदीची परिस्थिति संपल्यानंतरहि बराच काळ यशस्वी पक्षाची अनियंत्रित पक्षसत्ता नष्ट होऊन पुनः लोकशाही स्थापन होणें हीहि गोष्ट सोपी नसते. यामुळें सशस्त्र क्रांतीच्या प्रयत्नांत होणारी हिंसा प्रस्थापित राज्ययंत्र लोकशाही पद्धतीप्रमाणें चालवीत असतां होणाऱ्या हिंसेहून कितीतरी प्रमाणांत अधिक असून तितक्याच प्रमाणांत तिच्यांतून न्यायप्रस्थापना होण्याचा संभवहि कमी असतो. याचमुळें लोकशाही राज्ययंत्र असणाऱ्या राष्ट्रांत सशस्त्र क्रांतिवादाचा प्रसार होणें कठीण असतें आणि तें राज्ययंत्र मोडून पडून अनियंत्रित पक्षसत्ता निर्माण झाली, तरच तेथील जनता अत्याचारी मार्गानें क्रांति करण्यास उद्युक्त होऊं शकते.

तथापि आजची लोकशाही भांडवलशाहीनें दुभंगलेली असल्यानें ती खरी नाहीं व तिच्यांत क्रांति होणें अवश्य आहे. ही क्रांति व्हावयाची, तर केवळ बुद्धिबलाचें कायदेशीर राजकारण पुरेसें पडत नाहीं म्हणून आत्मबलाचें निःशस्त्र क्रांतीचें राजकारण हाच एक सशस्त्र क्रांतीला पर्याय आहे हें मागें सांगितलेंच आहे. ही आत्मबलाची क्रांति लोकशाहीला मारक नसून तारक आहे, आणि प्रस्थापित कायद्यांच्या राज्यापलीकडे जाऊन न्यायाचा शोध व संस्थापना करण्याची संवय ती लोकांना लावूं शकते. सत्याग्रही क्रांतिकारक हे कायद्याच्या मर्यादा उल्लंघन करून न्यायनिष्ठ राहण्याचा मार्ग लोकांना शिकवीत असतात आणि असें करीत असतां प्रस्थापित राज्यसंस्थेनें दिलेली शिक्षा सहन करून आपली तपश्चर्या पणाला लावीत असतात. अशी जागती, जाज्वल्य, अनत्याचारी न्यायनिष्ठा प्रजाजनांत निर्माण झाल्यानें राज्यसंस्था आपलें बल अन्याय करणाऱ्या पक्षाच्या मागून काढून घेईल आणि त्याचा पाठिंबा अन्यायाचें निवारण करण्यासाठीं झगडणाऱ्या पक्षाच्या मागें उभें करील, अशी सत्याग्रही क्रांतिकारकांची आकांक्षा

व अपेक्षा असते. लोकशाही राज्ययंत्र असतां ही अपेक्षा अधिक सुलभतेनें सफल होऊं शकेल, हें उघड आहे व म्हणून लोकशाही राज्ययंत्र आणि सत्याग्रही क्रांतिशास्त्र यांच्या आधारानें समाजांत न्याय-प्रस्थापना करण्यासाठीं वाटेल ती क्रांति घडवून आणतां येईल, असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. याच दृष्टीनें सत्याग्रही तत्त्वज्ञानास लोकशाही राज्ययंत्र हें इतर कोणत्याहि राज्यपद्धतीपेक्षा अधिक अहिंसक, अधिक न्यायप्रवण आणि म्हणून अधिक सत्यसंस्थापक असें वाटतें.

## लोकशाही व समाजक्रांति

एकोणिसाव्या शतकांतील व्यक्तिवादी राज्यशास्त्रज्ञ, लोकशाही राज्यपद्धति हाच एक कायदेशीर मार्गानें क्रांति घडवून आणण्याचा मार्ग आहे, असें म्हणत असत व म्हणून त्यांना अशा राज्याखालीं नांदणाऱ्या प्रजेला सशस्त्र क्रांतिचा आश्रय करावा लागणार नाहींअसें वाटत असें. शास्त्रीय समाजवादी कार्ल मार्क्स आणि एञ्जल्स् यांनाहि इंग्लंड किंवा अमेरिका यासारख्या लोकशाही राज्यांत समाजसत्ताक क्रांति शांततेच्या मार्गानें घडून येण्याचा संभव आहे, अशी आशा वाटत असे. आज ही आशा विफल ठरली आहे, कारण बुद्धिबलाच्या कायदेशीर राजकारणाच्या मर्यादा अधिक विशद झाल्या आहेत. पण याचवेळीं कायदेशीर राजकारणाच्या मर्यादा उल्लंघन करून शांततेची मर्यादा पाळणारें एक सत्याग्रही क्रांतिशास्त्र निर्माण होत आहे. त्याचा आश्रय केल्यास भांडवल प्रधान लोकशाहीचे समाजसत्ताक लोक-शाहींत रूपान्तर करण्याचा शांततेचा मार्ग उपलब्ध होऊं शकेल, अशी पुनः आशा वाटूं लागली आहे. लोकशाहीच्या ध्येयापर्यंत पोहचलेली मानव संस्कृतीची गाडी अनियंत्रित पक्षसत्तेच्या प्रस्थापनेनें

मार्ग न नेतां, पुढें नेण्याचा आणि भांडवलशाहीमुळें लोकशाहीची झालेली कोंडी फोडून तिचा प्रवाह पुढें नेण्याचा हा एक सर्वोदय-कारक मार्ग आहे.

## सत्याग्रह व राजकीय अहिंसा

येथपर्यंत सत्याग्रहाचा केवळ एक राज्यक्रांति करण्याचा मार्ग याच दृष्टीनें विचार केला. आतां त्याच्याच आश्रयानें राज्यसंस्थेचें हिंसक स्वरूप नष्ट करून आत्मराज्याच्या दिशेनें आपल्या संस्कृतीची प्रगति करण्याची शक्ति मनुष्यांना प्राप्त होणें कसें शक्य आहे, त्याचा विचार करूं. सत्याग्रह हा राज्यक्रांतीचा मार्ग आहे असें सिद्ध झाल्यास राज्यसंस्थेमार्फत होणाऱ्या हिंसेचा अंत करण्यास त्याच मार्गाचा उपयोग होईल हें सिद्ध करणें अवघड नाहीं. राज्यसंस्थेमार्फत दोन प्रकारची हिंसा होत असते. ज्या सामाजिक संस्थांना तिचा पाठिंबा मिळत असतो, त्या सामाजिक संस्थांमार्फत होणाऱ्या अन्यायांची हिंसा आणि राज्यसंस्थेच्या बंधनांचें उल्लंघन केल्यामुळें दिलेल्या शिक्षेमुळें होणारी हिंसा. यांपैकीं पहिल्या प्रकारची हिंसा बंद करणें आणि सामाजिसंस्था न्यायानुसारी बनविणें हा राज्यक्रांतीचा उद्देश असतो. हा उद्देश जितक्या प्रमाणांत यशस्वी होईल, तितक्या प्रमाणांत समाजरचना अहिंसक आणि न्यायाधिष्ठित होत जाईल आणि अर्थातच सामाजिक अन्यायांमुळें गुन्ह्यांकडे होणारी मनुष्यांची प्रवृत्तिहि कमी होईल. अर्थात् ही गुन्ह्यांची प्रवृत्ति कमी झाल्यानें राज्यसंस्थेला आपलीं बंधनें मोडल्यामुळें करावी लागणारी हिंसाहि कमी करावी लागेल, हें उघड आहे. तेव्हां सामाजिक संस्थांत न्याय-प्रस्थापनेसाठीं क्रांति घडवून आणण्यानें राज्यसंस्थाहि अधिकाअधिक अहिंसक बनेल हें दिसून येईल.

## सत्याग्रह व आध्यात्मिक क्रांति

पण सत्याग्रहानें राज्यक्रांति घडवून आणीत असतां समाजाच्या अंतरंगांतहि क्रांति घडून येत असते. स्वार्थबुद्धि आणि न्यायबुद्धि यांच्यांतील द्वंद्वांत स्वार्थबुद्धीवर न्यायबुद्धीचें प्रभुत्व स्थापन करण्यासाठीं वाटेल ते क्लेश सहन करण्याची दीक्षा सत्याग्रही क्रांतिकारकांनीं घेतलेली असते व त्यांच्यापाठीमागून जाणाऱ्या जनतेंतहि ही न्यायनिष्ठेची आणि अहिंसेची वृत्ति बाणत जाते. मानवी अंतःकरणांतील या क्रांतीच्या अभावीं केवळ बाह्य भौतिक अथवा सामाजिक क्रांतीपासून मनुष्य समाजांत न्यायप्रस्थापना होणार नाहीं, गुन्हे थांबणार नाहींत आणि अर्थात् राज्यसंस्थेची व तिच्या हिंसेचीहि आवश्यकता लोकांना भासल्याविना राहणार नाहीं. याच्या उलट केवळ अंतरंग क्रांति करून बाह्य सामाजिक व भौतिक क्रांति घडवूं नये असें म्हटलें, तर तेंहि साध्य होऊं शकत नाहीं किंवा शकणार नाहीं. समाजांतील अंतरंगांतील क्रांतीचा आविष्कार त्याच्या बाह्य स्वरूपांतहि झाला पाहिजे आणि सत्यनिष्ठ व अहिंसावादी साधूंनीं समाजरचनेंतील अन्याय व हिंसा नष्ट करण्याकडे दुर्लक्ष करतां कामा नये, असें सत्याग्रही तत्त्वज्ञान सांगतें. अशाप्रकारें समाजाच्या आंतरबाह्य क्रांतीचें हें शस्त्र असल्यानें त्याच्या आश्रयानें सामाजिक अन्यायांचें मूळच खणून काढण्याचा प्रयत्न करतां येतो. या बाह्याभ्यंतर क्रांतीच्या प्रयत्नांतच भावी कालांतील आत्मराज्याचा पाया घातला जात आहे.

## अराज्यवाद आणि आत्मराज्यवाद

राज्यसंस्था ही हिंसक संस्था आहे आणि तिचें हिंसक स्वरूप नष्ट झाल्याविना समाजांत न्यायप्रस्थापना झाली असें म्हणतां येणार नाहीं, हें सत्याग्रही तत्त्वज्ञानाला मान्य आहे. अराज्यवाद किंवा समाज-

वाद् अथवा कम्यूनिझम हें सर्वच एका अर्थानें समाजाला दंडहिन अवस्थेकडे नेत आहेत, किंवा नेऊं इच्छित आहेत, त्याचप्रमाणें सत्याग्रहही त्याच दिशेनें समाजाला नेऊं इच्छितो. पण केवळ भौतिक बाह्य-क्रांतीनें समाजाला दंडहीन अवस्था प्राप्त होऊं शकेल असें त्याला वाटत नाहीं. तसें होण्यास मनुष्यांच्या अंतःकरणांत क्रांति होऊन तेथें आत्मराज्य स्थापन झालें पाहिजे असें त्याला वाटतें. हें आत्मराज्य झाल्याविना बाह्य राज्यसंस्था नष्ट होणार नाहीं व म्हणून सत्याग्रहींस अभिप्रेत असणाऱ्या त्या अंतिम अथवा आदर्श अवस्थेस 'अराज्य अवस्था' असें नांव न देतां 'आत्मराज्य अवस्था' असें नांव द्यावें आणि सत्याग्रहाच्या या सिद्धान्तास 'आत्मराज्यवाद्' असें म्हणावें असें आम्हांस वाटतें. असें केल्यानें बॅकूनिन् किंवा क्रोपाटेकिन् यांच्या भौतिक अराज्य-वादाहून टॉलस्टॉय किंवा म. गांधी यांना अभिप्रेत असणाऱ्या 'अराज्यवादाचें' वैशिष्ट्यही अधिक विशद होऊं शकते.

## सत्याग्रहाची सापेक्ष दृष्टि

सत्याग्रही दृष्टीनें राज्यसंस्था ही हिंसक आहे आणि सर्व प्रकारची हिंसा नष्ट करण्यास प्रवृत्त झालेल्या सत्याग्रही तत्त्वज्ञानास राज्य-संस्थाहि नष्ट करणें भाग आहे यांत शंका नाहीं. पण ही राज्यसंस्था एकदम अत्याचारानें नष्ट केल्यानें समाजांत अहिंसा वाढेल असा अविवेकी विचार मात्र सत्याग्रही तत्त्वज्ञानास संमत होणार नाहीं. आज राज्यसंस्था नष्ट झाल्यानें समाज अधिक अहिंसक न बनतां अधिकच हिंसक बनेल आणि या त्याच्या वाढलेल्या हिंसा प्रवृत्तींतून दुसरी अधिक हिंसामय राज्यसंस्था निर्माण होईल, येवढें तारतम्य नसेल तर त्या व्यक्तीस सत्याग्रही हें नांवहि देतां येणार नाहीं. आजच्या मनुष्य-मात्रांना जीवितवित्ताची इतकी आसक्ति आहे कीं, त्यांच्या सुरक्षित-

तेची हमी देणारी राज्यसंस्था कोसळून पडतांच ते वाटेल त्या अन्यायी राज्यसंस्थेचाहि आश्रय करून अनवस्थेचा अंत करूं इच्छितात. तेव्हां अशा राज्यसंस्थेच्या अभावीं ते अहिंसात्मक व सत्यनिष्ठ बनतील अशी अपेक्षां करतां येणार नाहीं. तसेंच सर्वच राज्यसंस्था न्याय-प्रस्थापनेसाठीं दंडाचा उपयोग करतात, म्हणून त्या सारख्याच हिंसक आहेत, असेंहि सत्याग्रही तत्त्वज्ञानास वाटत नाहीं. तसें त्यास वाटत असतें तर परराज्यापेक्षां स्वराज्य बरें, अनियंत्रित सत्तेपेक्षां लोकशाही बरी, भांडवलप्रधान लोकशाहीपेक्षां समाजसत्ताक लोकशाही बरी असा विवेकहि सत्याग्रही तत्त्वज्ञान करूं शकलें नसतें. पण सत्याग्रहांतही तारतम्यदृष्टि किंवा सापेक्ष दृष्टि वगळलेली नाहीं व म्हणूनच त्याला राज्यक्रांतिशास्त्राचें स्वरूप प्राप्त झालेलें आहे. जर सर्व राज्यसंस्था सारख्याच हिंसक व सारख्याच अन्यायी आहेत असें त्यास वाटलें असतें, तर एक राज्यसंस्था मोडून दुसरी राज्यसंस्था उभारण्याचीहि खटपट सत्याग्रहानें केली नसती. पण सत्याग्रह ही अंतरंग क्रांति बरो-बर बाह्य भौतिक व सामाजिक क्रांतीचीहि विद्या असल्यानें त्याला या बाह्य व्यवहारांत तारतम्याची सापेक्ष दृष्टि स्वीकारावीच लागते आणि ज्यांचा जसा अधिकार असेल तशी त्यांच्या कर्तव्यांची मर्यादा ओळखून व्यवहार करावा लागतो.

## राजधर्म, प्रजाधर्म, व यतिधर्म यांतील अहिंसा

या दृष्टीनें अहिंसेच्या मर्यादा ठरवितांना प्राचीन तत्त्वज्ञानांतील राजधर्म, प्रजाधर्म आणि यतिधर्म या तीन धर्मांतील अहिंसेच्या मर्या-दांचा विचार केल्यास या तीनहि धर्मांतील हिंसेचा नाश कोणत्या क्रमानें होऊं शकेल त्याचें विवेचन करतां येईल. सत्याग्रहाची दीक्षा घेतलेल्या लोकांना आजच्या समाजांतील यतिवर्ग म्हणण्यास हरकत

नाहीं. सामान्य राष्ट्रिकांच्या धर्माचा विचार करतांना त्यांचा धर्म हा प्रजाधर्म आहे, आणि प्रत्यक्ष राज्यकारभार करणारांच्या धर्माचा विचार करीत असतां त्यांचा धर्म हा राजधर्म आहे, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. या तीनहि धर्मांतील हिंसा नष्ट करणें हें सत्याग्रहाचें अंतिम ध्येय आहे, पण हें ध्येय गांठण्याचा एक विशिष्ट मार्ग किंवा क्रम आहे. यतिधर्मांत अहिंसेचा आविष्कार जितका होऊं शकेल तितका प्रजाधर्मांत होऊं शकणार नाहीं आणि प्रजाधर्मांत तो जितका होऊं शकेल, तितका राजधर्मांत होऊं शकणार नाहीं. तथापि या तीनहि धर्मांचें ध्येय सत्य व अहिंसा हेंच आहे.

पूर्ण सत्यनिष्ठा ही अहिंसा व अपरिग्रह यांवर अवलंबून असल्यानें सत्याग्रही व्यक्तीनें अहिंसा व अपरिग्रह हीं व्रतें घेतली पाहिजेत, म्हणजेच तिनें यति बनलें पाहिजे. असा मनुष्य स्वसंरक्षणासाठींहि हिंसेचा त्याग करूं शकतो आणि आपलें म्हणजे आपल्या सत्त्वाचें, स्वत्वाचें अथवा निष्ठेचें रक्षण तो केवळ आत्मबलानें करूं शकतो. इतकी अनासक्ति व अपरिग्रही वृत्ति सामान्य प्रजाजनांत बाणलेली नसल्यानें सामान्य प्रजाधर्मास स्वसंरक्षणार्थ हिंसा करण्याचा कायदेशीर टेकू दिला पाहिजे असें सत्याग्रही तत्त्वज्ञान मान्य करतें. ज्यांना आपलें व आपल्या सत्त्वाचें रक्षण आत्मबलानें करतां येत नाहीं त्यांनीं त्यासाठीं हिंसेचा अवलंब करावा, मात्र तो राज्यसंस्थेला पूरक होईल म्हणजे जेथें राज्यसंस्था संरक्षण करूं शकणार नाहीं, तेथेंच स्वतः हिंसा करण्याचा हक्क निरुपाय म्हणून स्वसंरक्षणासाठीं वापरावा, पण तो त्या मर्यादेंतच वापरण्यांत आला असें न्यायासनापुढें सिद्ध करावें, अशी प्रजाधर्मांतील हिंसेची मर्यादा आहे.

## राजधर्मांतील हिंसेचा अंत केव्हां होईल ?

राजधर्मांतील हिंसेची मर्यादा त्याहून अधिक व्यापक आहे. प्रजाजनांच्या जीवितवित्ताच्या व स्वत्वाच्या रक्षणासाठीं पोलिस, लष्कर या संस्था ठेवणें व न्यायानुसारी दंड, शासन करणें, हें राजधर्म आचरणाऱ्यांचें कर्तव्य आहे. अर्थात् प्रजाजनांतील अहिंसा प्रवृत्ति जितकी वाढेल, तितक्या प्रमाणांत राजधर्मांतील हिंसा निरुपयोगी ठरेल आणि प्रजा पूर्ण अहिंसक बनेल, त्याच्या थोडा काळ आधीं राजधर्मच नाहींसा होईल आणि

नैव राज्यं न राजासीन्नच दंडो न दांडिकः ।
धर्मेणैव प्रजाः सर्वाः रक्षन्ति स्म परस्परम् ॥

ही महाभारतांत वर्णन केलेली सत्ययुगाची वा आत्मराजाची अवस्था प्राप्त होईल.

सत्याग्रहाच्या या दृष्टिकोनामुळें तो अहिंसेच्या प्रचाराचा प्रारंभ यतिधर्मापासून करतो, व नंतर प्रजाधर्मांतून राजधर्मांत त्याचा प्रवेश होईल हें ओळखून वर्तन करीत असतो. राज्यक्रांति हा प्रजाधर्मांतील विषय आहे व ती राज्यक्रांति अहिंसेनें कशी घडवून आणावी हें दाखवून देण्याची जबाबदारी सत्याग्रही यतिवर्गावर आहे. ही जबाबदारी त्यानें पार पाडिल्यास राज्यक्रांतीसाठीं करावी लागणारी हिंसा प्रजाधर्मांतून नष्ट होईल, आणि अनियंत्रित राजसत्तेंतून लोकशाहींत आणि भांडवलप्रधान लोकशाहींतून समाजसत्ताक लोकशाहींत समाजाला नेतांना होणारी हिंसा टळेल आणि या बाह्यांगांतील क्रांतीबरोबरच समाजाच्या अंतरंगांतहि क्रांति घडून येऊन आत्मराज्याची पूर्वसिद्धता होऊं शकेल.

## समाजसत्ताक लोकशाही व सत्तेचें विकेंद्रीकरण

असें व्हावयाचें तर केवळ समाजसत्ताक लोकशाही स्थापन होऊनच चालणार नाहीं, तर या समाजसत्ताक लोकशाहींतील राजसत्तेचेंहि अनेक संस्थांत विकेंद्रीकरण झालें पाहिजे. समाजसत्ताक लोकशाही राज्यांत राज्यसंस्थेच्या कार्यांचा व्याप फार वाढत असतो व या कार्याच्या व्यायाबरोबर अधिकारी वर्गाची संख्या, सत्ता आणि महत्त्व यांचीहि वाढ होत जाते. यामुळें हा सर्व अधिकारी वर्ग केवळ मध्यवर्ति सरकारच्या नियंत्रणाखालीं असेल,तर त्या मध्यवर्ति सरकारवर लोकप्रतिनिधीची सत्ता असली तरी त्या वर्गाचा जुलूम लोकांवर झाल्याविना राहणार नाहीं. यासाठीं राज्यांतील सत्ता त्याचे निरनिराळे प्रादेशिक व स्थानिक विभाग पाडून त्या त्या प्रदेशांतील लोकांच्या प्रातिनिधिक संस्थांकडे शक्य तितकी सोपविली पाहिजे. सत्तेचें केंद्रीकरण हें लोकशाहीला मारक असते आणि खरी परिणामकारक लोकसत्ता लहान प्रदेशावरच नांदू शकते या दृष्टीनें राजसत्तेचें हें विकेंद्रीकरण होणें लोकस्वातंत्र्याच्या दृष्टीनें अवश्य आहे. तसेंच राज्यसंस्थेची हिंसाप्रवृत्ति कमी व्हावी आणि केवळ संरक्षक खात्यांतील ही प्रवृत्ति शिक्षण, धनोत्पादन, इत्यादि राष्ट्रसंवर्धक अंगांत शिरूं नये या दृष्टीनेंहि हें अवश्य आहे.

त्याचप्रमाणें सर्व मोठ्या प्रमाणावरील धनोत्पादन सरकारी मालकीचें बनविल्यानेंहि त्या कार्यांत काम करणाऱ्यांवरील सर्व जुलूम नष्ट होईल व त्यांना स्वातंत्र्याचा अनुभव येऊं लागेल असें म्हणतां येत नाहीं. या उद्योगधंद्यांचेंहि पुष्कळ विकेंद्रीकरण झालें पाहिजे व त्यांत काम करणाऱ्या लोकांना त्याच्या नियंत्रणांत हक्क मिळाला पाहिजे. या नियंत्रणाच्या हक्कांस व्यावसायिक स्वराज्य असें म्हणतात.

स्थानिक स्वराज्य आणि व्यावसायिक स्वराज्य, यांची वाढ ज्या मानानें होईल त्या मानानें राजसत्तेचें केंद्रीकरण नष्ट होईल आणि तें नष्ट होईल त्यामानानें अधिकारी वर्गाचा अथवा नोकरशाहीचा जुलूस नष्ट होईल. तसेंच या स्थानिक व व्यावसायिक स्वराज्याच्या आणि राजकीय सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या परिपोषास औद्योगिक विकेंद्रीकरण आणि स्थानिक व प्रादेशिक आर्थिक स्वयंपूर्णता स्थापन करण्याचीहि आवश्यकता आहे. राजसत्तेच्या सक्तीचा आणि राज्यसंस्थेच्या हिंसेचा अंत करण्यास या सर्व सुधारणांची आवश्यकता आहे. राज्यांतील प्रत्येक विभाग आर्थिकदृष्ट्या शक्य तितका स्वयंपूर्ण बनला, स्थानिक व व्यावसायिक स्वराज्याची वाढ झाली, राजसत्ता या निरनिराळ्या केंद्रांत विभागली गेली आणि या सर्व केंद्रांतील लोकांना एकवर्ग लोकशाहीचा अनुभव येऊं लागला, म्हणजे त्यांच्यांतील आक्रमक हिंसाप्रवृत्ति नष्ट होईल आणि या सर्व सुधारणा त्यांनीं सत्याग्रही वृत्तीनें घडवून आणिल्या म्हणजे आत्मराज्याची पूर्व तयारी होऊन राज्यसंस्थेच्या आवरणावाचून आपले सर्वव्यवहार आपण करूं शकूं, असा विश्वास लोकांना वाटूं लागेल.

## सत्याग्रही लोकशाही व लष्करशाहीचा अंत

अशा स्वयंपूर्ण आणि स्वयंशासित सत्याग्रही राज्यांना परकीय आक्रमणाची भीति वाटणार नाहीं, आणि त्यांच्यावर आक्रमण करून त्यांना आर्थिक व राजकीय दास्यांत लोटणें शक्यहि नाहीं व फायदे-शीरहि नाहीं, असें इतर राज्यांनाहि दिसून येईल आणि अशा संस्कृतीचें आपण अनुकरण करावें अशी वृत्ति तेथील जनतेंतहि वाढूं लागेल. **अशाप्रकारें सत्याग्रही समाजसत्ताक लोकशाही संस्कृति हीच खरी मानव संस्कृति आहे,** अशी जगाची

खात्री होऊन तिचा स्वीकार प्रत्येक राज्यांतील सामान्य प्रजाजन व त्यांचे संतप्रवृत्तीचे लोकनायक करूं लागतील. असें झाल्यानंतर लष्करशाहीचा लोप आपोआपच होईल, आणि मानवाची सर्व शारिरिक, बौद्धिक व आत्मिक शक्ति संहारशास्त्राकडे खर्ची न पडतां पारमार्थिक अर्थशास्त्राच्या व उत्पादनशास्त्राच्या संशोधनाकडे, कलावृद्धीकडे आणि आत्मोन्नतिकडे लागूं लागेल. इतकें उज्वल भवितव्य लोकशाही संस्कृतीला आहे, पण तिनें आत्मबलाचें व सत्याग्रहाचें अधिष्ठान स्वीकारिलें पाहिजे. सत्याग्रही भारताचा आजच्या जगाला हाच उज्वल संदेश आहे.

## आधुनिक भारताचा जगाला संदेश

आधुनिक भारतानें राष्ट्रीयत्व आणि लोकशाही यांचा प्रथम स्वीकार युरोपापासून केला ही गोष्ट खोटी नाहीं. सुमारें शंभर वर्षांपूर्वी राष्ट्रीयत्व आणि लोकशाही यांचे धडे भारतीय नेते युरोपापासून घेत होते. आज या ऋणाची सव्याज फेड करण्याचा काळ प्राप्त झाला आहे, व तो काळ प्राप्त होण्याचें बहुतेक श्रेय पाश्चात्य युरोपियन संस्कृतीचें अंधानुकरण करणारांच्या पदरीं पडत नसून आपल्या प्राचीन संस्कृतीच्या आध्यात्मिक अधिष्ठानावर सत्याग्रही नवसंस्कृति निर्माण करणाऱ्या म. गांधींना व त्यांच्या पूर्वी ज्यांनीं भारतीय संस्कृतीचें आध्यात्मिक अधिष्ठान जागृत व प्रभावी बनविण्याचे प्रयत्न केले त्यांना आहे. लोकशाही संस्कृतीचें भवितव्य सर्वस्वी या सत्याग्रही अधिष्ठानावर अवलंबून आहे अशी आमची श्रद्धा आहे. ती तशी कां आहे याचें थोडें विवेचन या पुस्तकांत केलें आहे.

वाचनालय ठाणे ... १९८९ ... 

# वाद-विवेचन-माला

संपादक—श्री. **पां. वा. गाडगीळ**

मालेंत एकंदर १२ पुस्तकें प्रसिद्ध होणार आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १ सुलभ समाजवाद | पां. वा. गाडगीळ. | किं. ८ आणे. | प्रसिद्ध झाले. |
| २ फॅसीझम् | पां. वा. गाडगीळ. | किं. ८ आणे. | प्रसिद्ध झाले. |
| ३ साम्राज्यशाही | कॉ. ना. ग. गोरे. | किं. ८ आणे. | प्रसिद्ध झाले. |
| ४ अराज्यवाद | पां. वा. गाडगीळ. | किं. ८ आणे. | प्रसिद्ध झाले. |
| ५ लोकशाही | आचार्य जावडेकर. | किं. १ रुपया. | प्रसिद्ध झाले. |

## १ जानेवारी १९४१ पर्यंत प्रसिद्ध होणारी मालेचीं राहिलेलीं सात पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| ६ राष्ट्रवाद | कॉ. एस्. एम्. जोशी. | किं. १२ आणे. |
| ७ कम्युनिझम् | कॉ. के. एन्. फडके. | किं. १२ आणे. |
| ८ गांधीवाद | आचार्य भागवत. | किं. १२ आणे. |
| ९ हिंदुत्ववाद | शि. ल. करंदीकर. | किं. १२ आणे. |
| १० मार्क्सचा भौतिकवाद | पां. वा. गाडगीळ. | किं. १२ आणे. |
| ११ ईश्वरवाद | आचार्य सोनोपंत दांडेकर. | किं. १२ आणें. |
| १२ जडवाद | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी. | किं. १२ आणे. |

मालेचें पहिलें पुष्प १५।१०।३८ रोजीं प्रसिद्ध झालें व पुढील पुष्पें दर तीन महिन्यांनीं प्रसिद्ध करावयाची ठरविलें होतें. परंतु कांहीं लेखकांकडून हस्तलिखितें वेळेवर न मिळाल्यामुळें मध्यें बराच कालावधी गेला. मालेची सुरवात होऊन २० महिने झाले म्हणजे एव्हाना मालेची सहा सात पुस्तकें प्रसिद्ध व्हावयाला पाहिजे होतीं. पण फक्त पांचच पुस्तकें प्रसिद्ध होऊं शकलीं. पण दर तीन महिन्यास एक याप्रमाणें १२ पुस्तकें प्रसिद्ध होण्यास तीन वर्षांची मुदत लागली असती ती आतां बहुतेक हस्तलिखितें तयार होत आलीं असल्यामुळें १ जानेवारी १९४१ पर्यंत मालेची राहिलेली सात पुस्तकें निश्चित प्रसिद्ध होणार आहेत.

मालेचें पांचवें पुष्प लोकशाही हे मालेच्या एरवीच्या पुस्तकाच्या मानानें दुप्पट मोठें झाल्यामुळें त्याची किंमत १ रुपया ठेवणें भाग पडलें आहे. महायुद्धाच्या महागाईमुळें मालेच्या पुढील पुष्पांची किंमत ८ आण्या-ऐवजीं १२ आणे ठेवणें भाग पडलें आहे. म्हणजे मालेच्या १२ पुस्त-कांचीं किंमत ८। रुपये होते.

**मालेचे वर्गणीदार होणारांस हीं बारा पुस्तकें फक्त साडेपांच रुपयांत पोस्टखर्चासुद्धां द्यावयाचें ठरविलें आहे.**

## मार्क्सच्या " कॅपिटल " चा सारग्रंथ

तसेंच मालेचे संपादक श्री. पां. वा. गाडगीळ हे सध्यां लिहीत असलेल्या कालें **मार्क्सच्या कॅपिटल** या पुस्तकाचा **सार ग्रंथ** एप्रिल १९४१ मध्यें प्रसिद्ध होणार असून त्याची किंमत १० रुपये आहे. पण मालेच्या बारा पुस्तकांसुद्धां कॅपिटल ग्रंथ घेणारांस आज आगाऊ वर्गणी फक्त १२ रुपये आहे. मार्क्सच्या कॅपिटल या ग्रंथाच्या प्रति मोजक्याच काढणार असल्यामुळें ज्यांना फक्त तेवढाच ग्रंथ घ्यावयाचा असेल त्यांनीं १ रुपया पाठवून अगाऊ नांवें नोंदविल्यास फक्त ९ रुपयाच्या व्ही. पी. नें त्यांना कॅपिटलचा **सार ग्रंथ** पाठविला जाईल.

प्रकाशक : यशवंत गोपाळ जोशी, ६२३।१५ सदाशिव, पुणें २.

# संसारांतील गुन्हेगारी
# म्हणजेच विमा न उतरणें !

**जवाहिर, बहादुर, किसान, दामदुप्पट वगैरे अनेक नावीन्यपूर्ण आकर्षक योजना !**

## हजारीं त्रैवार्षिक
## ७५ रु. गॅरंटीड बोनसची योजना

**संस्था नवी, पण**

**विमेदारांच्या फायद्याच्या दृष्टीनें पूर्ण जुनी. हप्ते फारच माफक, व्यवस्था चोख व अत्यंत काटकसरीची. संचालक-मंडळ निःस्वार्थी, वजनदार व प्रातिनिधिक.**

## एजंटांना भरपूर कमिशन व शिवाय वृद्धापकाळीं पेन्शन !

— एजन्सीसाठीं आजच लिहा —

**जी. जी. सौंदणकर,**

मॅ. डायरेक्टर,

# सह्याद्रि इन्शु. कं. लि., नासिक

REFBK-0005991

# विमेदारांच्या विश्वासाचें प्रतीक



मुख्य कचेरी, पुणें.

| | |
|---|---|
| एकंदर मिळविलेलें काम :— | रु. ३,००,००,००० |
| दहावे वर्षांतील पूर्ण काम :— | रु. ४५,०५,००० |
| विमा-निधि :— | रु. १४,५०,००० वर |

तृतीय मूल्यमापनांतील त्रैवार्षिक बोनस

| | |
|---|---|
| हयातींतील विम्यावर | हयातीनंतरचे विम्यावर |
| दर हजारीं रु. ४५ | दर हजारीं रु. ५४ |

स्थापनेपासून केवळ दहा वर्षांचे अवधींत 'कॉमनवेल्थ'नें विमा-क्षेत्रांत अत्युच्च स्थान मिळविलें आहे, हें वरील माहितीवरून दिसून येईल. तरी विमेच्छूंनीं व होतकरू विमा-प्रचारकांनीं विम्याचे व एजन्सीचे माहितीकरितां खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एल्एल्. बी., मॅनेजिंग एजंट,

**दि कॉमनवेल्थ विमा कं. लि., पुणें.**


राजगुरु प्रेस, पुणें २.